म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
वा. नं. ४८
१८९८

नं १६० सन १९८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
पुस्तक — सद्बोधमंदिर
लेखक — शं. रा. हलवळे.
विषय — निबंध

१६०

सद्बोधमंदिर

निबंध

# सद्बोधमंदिर.

## भाग २

## गृहशिक्षण.

हा ग्रंथ
शंकर रामचंद्र हतवळणे
ह्यांनीं केला.

पुणें
" ज्ञानप्रकाश " छापखान्यांत छापिला.

हा ग्रंथ इसवी सन १८६७ चा आक्ट २५ अन्वयें
नोंदला आहे.

( ह्या ग्रंथासंबंधी सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपलेकडे राखून
ठेविले आहेत. )

सन १८९८.

किंमत एक रु.

सखाराम निळकंठ पटवर्धन
यांचे स्मरणार्थ,
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,
ह्या संस्थेस नजर.
रा. ब. पटवर्धन

# प्रस्तावना.

—0: 0 :0—

गृहशिक्षण हें ह्या पुस्तकाचें नांव आहे. ह्या पुस्तकाचा थोडा पूर्व इतिहास आहे. सुमारें दहा अकरा वर्षांपूर्वी नीतिविषयक प्रश्नाविषयीं बरीच चर्चा चालू होती. तेव्हां ह्या विषयावर एक पुस्तक लिहावें असें मनांत आलें. म्हणून आपणांतील व इतर ठिकाणच्या थोर पुरुषांच्या रसाळ वचनांच्या द्वारें तो बोध केला असतां इष्ट हेतू विशेष सिद्धीस जाईल, असें वाटल्यावरून दासबोध, गाथा वगैरे ग्रंथांतील निवळ बोधपर वेचे काढून विद्यार्थ्यांकरतां पुस्तक तयार करण्याचें काम सुरू केलें. परंतू नीतिविषयक प्रश्नाविषयीं विशेष विचार करतां, नुसते वेचे दिल्यानें इष्ट कार्य होईल किंवा नाहीं ह्याबद्दल मनांत शंका आली. हा प्रश्न व्यापक असून वादग्रस्त आहे. धर्मशिक्षणाशिवाय नीतिशिक्षण अपुरें आहे. शाळांतून धर्मशिक्षण देण्यास अडचणी आहेत. जरी अशा प्रकारें शिक्षण देण्यास आरंभ केला, तरी इष्ट कार्य होईलच असें म्हणतां येत नाहीं. एवढ्याच गोष्टीनें इष्ट हेतू सिद्धीस जाईल असें सांगतां येत नाहीं. कारण, मुळांतच बिघाड झाला असेल, तर वरवर उपाय करून तादृश उपयोग होत नाहीं. मुलांच्या नीतीवर दुसऱ्या अनेक गोष्टींचा परिणाम होत असतो. घरीं घरांतील माणसांच्या व विशेषें आईबापांच्या वर्तनाचा, बाहेर इतर मुलांच्या सहवासाचा, व मुलें मोठीं झालीं म्हणजे समाजाच्या वर्तनाचा त्यांच्या नीतीवर परिणाम होत असतो. तेव्हां वरील

प्रश्नाविषयीं एकाच दिशेनें विचार करून उपयोग होणार नाहीं, असें वाटलें. नीतिविषयक प्रश्नाविषयीं विचार करतांना ज्या गोष्टींविषयीं विचार केला पाहिजे त्यांसंबंधानें पाहतां कांहीं गोष्टींविषयीं एकवाक्यता दृष्टीस पडते; परंतू कांहींविषयीं मतभेद दिसून येतो. हे सर्व विचार मनांत येऊन जींत सुविचारांचा संग्रह आहे अशी 'सद्बोधमंदिर' ह्या नांवाची ग्रंथमाला मराठींत असावी असें वाटलें. हींत कोणकोणत्या विषयांचा विचार असावा, हें पहिले भागांत सांगितलेंच आहे.

सर्व शिक्षणाचा पाया गृहशिक्षण आहे. ह्या शिक्षणावर मुलांच्या इतिकर्तव्यतेचें स्वरूप विशेष अवलंबून असतें. मुलांच्या वर्तनावर दुसऱ्या अनेक गोष्टींचा पुढें परिणाम होत असतो हें खरें आहे; परंतू गृहशिक्षणामुळें जीं कार्यें होतात तीं प्रथमपासून होत असल्यामुळें दृढतर असतात; म्हणून गृहशिक्षणाची मातबरी फार. इंग्लंड वगैरे सुधारलेल्या देशांतील लोकांविषयीं विचार केला असतां आपणास एक विशेष गोष्ट कळून येते. ती ही कीं, त्या लोकांत जो एक प्रकारचा जोम दिसून येतो तो आमच्यांत तितका दिसून येत नाहीं. जोमदार व करारी बरींच माणसें निपजल्याशिवाय राष्ट्राचें पाऊल पुढें पडण्यास अडचण असते. आमचीं मुलें अशीं निपजलीं असतां, इतर सुधारलेल्या देशांची जशी उन्नती झाली आहे तशी आमच्या देशाचीही होईल. पण हें कार्य आपोआप होत नाहीं; त्यासाठीं प्रयत्नच केला पाहिजे, व तो सतत प्रथमारंभापासून घरींच केला पाहिजे; म्हणजे इष्ट हेतू लवकर सिद्धीस जाण्याची आशा असते. ह्याचसाठीं प्रस्तुतच्या स्थितींत गृहशिक्षणाची

विशेष आवश्यकता आहे. गृहशिक्षणांत स्त्रियांची मातबरी फार. पण मुलांस चांगलें गृहशिक्षण मिळण्यास स्त्रियांच्या मनावर शिक्षणाचा चांगला संस्कार झाला पाहिजे. असें नसेल, तर वरील हेतू लवकर सिद्धीस जाण्यास अडचण येते. स्त्री सुशिक्षित असली, म्हणजे ती शहाणपणानें व प्रेमवृत्तीनें मुलांच्या मनास कसें वळण लावतें, हें समजून सांगण्यासाठीं '**सुशिक्षित स्त्री**' ह्या नांवाचें पुस्तक तयार करण्याची आवश्यकता वाटली. म्हणून तसा ग्रंथ प्रथम प्रसिद्ध केला, व तोच '**सद्बोधमंदिर**' मालेचा पहिला भाग होय. प्रस्तुतचा गृहशिक्षण ग्रंथ त्याच्या पुढील म्हणजे दुसरा भाग आहे.

गृहशिक्षण ह्या ग्रंथांत तीन प्रकरणांविषयीं मुख्यतः विवेचन आहे. त्याः—शारीरसंगोपन, मानसीक शिक्षण व सद्वर्तन. ह्या तीन बाबतींत सामान्य तत्वें कोणतीं व लोकांच्या समजुती काय, ह्यांचा निर्देश करून आईबापांनीं ह्या तीन गोष्टींच्या संबंधानें काय केलें पाहिजे, ह्याविषयीं विवेचन करण्याचा यत्न केला आहे. हा यत्न कितपत सिद्धीस गेला आहे हें सांगतां येत नाहीं. प्रस्तुतच्या स्थितीविषयीं विचार करतां बापानें मुलांस कोणत्या बोधपर वचनांचा उपदेश वारंवार करावा, व त्यांस धर्मशिक्षण देणें झाल्यास कोणतें द्यावें हा प्रश्न उत्पन्न झाला. धर्म व नीति ह्यांसंबंधानें उपदेश करण्यास आमच्या ग्रंथांत पाहिजे तितकीं वचनें आहेत, असें समजून तुकारामाचा गाथा व रामदासाचा दासबोध ह्यांतील जीं वचनें पुष्कळांस मान्य होतील असें वाटलें, तीं ग्रंथाच्या शेवटीं दिलीं आहेत. दुसऱ्या कांहीं ग्रंथांतील वेचे काढून ठेविले होते, परंतू पृष्ठसंख्या बरीच वाढूं लागली,

म्हणून ते वगळावे लागले. धर्मशिक्षणाचा विषय विशेष वादग्रस्त आहे; तथापी भगवद्गीतेची थोरवी विशेष मानिली आहे. हा ग्रंथ जुन्या समजुतीच्या लोकांस मान्य असून नव्या समजुतीच्या लोकांसही प्रायः मान्य आहे. धर्मसंबंधी ज्या उदात्त कल्पनांचें बीजारोपण मुलांच्या मनांत झालें पाहिजे त्या ह्या ग्रंथांत आहेत, असें समजून गीतेचें सार शेवटीं दिलें आहे. हें समजावून देऊन त्याचें अध्ययन मुलांकडून नित्य करवीत गेलें असतां धर्मसंबंधी ज्या गोष्टीचें शिक्षण देणें प्रथम अवश्य आहे, तें देण्यास सहाय्य होईल असें वाटतें. कमजास्ती आणखी माहिती देण्यास बापास मोकळीक आहे हें सांगावयास नको.

ज्या गृहशिक्षणानें मुलांस आपली स्वतःची, आपल्या देशबंधूंची व आपल्या देशभगिनींची उन्नती करण्यास सहाय्य होऊन ही कष्टतर संसारयात्रा सुखानें करतां येते तेंच खरें गृहशिक्षण. असें शिक्षण देणें आईबापांवर अथवा त्यांच्या पश्चात् इतर पालकांवर मोठ्या जबाबदारीचें काम आहे. ह्या कामास अंशतः तरी त्यांस मदत व्हावी, ह्या हेतूनें मुख्यत्वें हा ग्रंथ तयार केला आहे. ह्या ग्रंथाच्या दुसऱ्या व तिसऱ्या भागांत, म्हणजे मानसीक शिक्षण व सद्वर्तन ह्या सदरांखालीं ज्या गोष्टींचें निरूपण केलें आहे, त्यांपैकीं कांहीं गोष्टी भावी शिक्षकांसही उपयोगी पडतील असा भरंवसा आहे. शिवाय, आज जीं मुलें आहेत तींच पुढें थोडे दिवसांनीं मोठीं माणसें होणार आहेत, व त्यांकडेही जबाबदारीचें काम यावयाचें आहे; तेव्हां ज्या गोष्टी पुढें कराव्या लागणार त्यांचा त्यांस थोडथोडा परिचय अगोदरपासून होणें इष्ट आहे; व ह्या दृष्टीनें विचार करतां प्रौढ

मुलांसही ह्या ग्रंथापासून थोडा फार उपयोग होईल, असें वाटतें.

ह्या ग्रंथांत ज्या गोष्टींचें विवेचन केलें आहे त्यांपैकीं कांहीं जन्म देणाऱ्या मातोश्रीच्या फार दिवसांच्या सहवासामुळें, त्यांच्या कष्टाळू स्वभावामुळें व त्यांच्या प्रेमवृत्तीमुळें घरींच कळून आल्या; कांहीं स्वतःच्या अनुभवानें कळून आल्या; कांहीं इष्टमित्रांच्या घरीं अथवा इतर ठिकाणीं पाहण्यांत आल्या; व कांहीं थोर पुरुषांच्या ग्रंथांतून प्रस्तुतच्या विषयास उपयोगीं वाटल्यामुळें घेतल्या आहेत. ह्या ग्रंथाचा बराच भाग विविधज्ञानविस्तारांत प्रथम आला होता, तो तपासून व त्यांत कांहीं भर घालून हा प्रसिद्ध केला आहे. हा पूर्वींच छापून प्रसिद्ध व्हावयाचा, परंतु अनेक अडचणींमुळें तो योग घडून आला नाहीं. विविधविज्ञानविस्तार कर्त्यांनीं हा ग्रंथ प्रथम आपले मासीक पुस्तकांत छापून प्रसिद्ध करण्यास सवड दिली, ह्याबद्दल त्यांचे आभार येथें मानणें अवश्य आहे. ह्या ग्रंथांतील पहिलें प्रकरण शरीरसंगोपन व गाथ्यांतील व दासबोधांतील वेंचे हे आमचे बाळपणचे मित्र कै० लक्ष्मणराव कोल्हट-

---

१ हा ग्रंथ लिहीत असतां ज्या ग्रंथांचा मुख्यत्वें फार उपयोग झाला तेः—शिक्षणमीमांसा (स्पेनसर); लिव्हाना (रिचर); बेकनसाहेबांचे निबंध; स्माईलकृत क्योरेक्टर, सेल्फहेल्प व ड्यूटी; सेल्फ कल्पर (ब्लॅकी); प्लेन लिव्हिंग व हाय थिंकिंग; कोबेटस ॲड्व्हाइस टू यंग मेन; अमेरिकन डाक्टरांचा वैद्यक विषयावरील ग्रंथ; लेक्चर्स ऑन एज्युकेशन (फिच); गाथा, दासबोध, व भगवद्गीता.

कर ह्यांनीं वाचून पाहिले होते. ते आज आपल्या सहाय्याचें फल पहाण्यास नाहींत, ही दुःखाची गोष्ट आहे.

आमचे दुसरे मित्र रा० सा० काशिनाथ नारायण साने ह्यांनीं समग्र ग्रंथ वाचून पाहून पुष्कळ उपयुक्त सूचना केल्या, त्यांबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्य आहे.

ह्या ग्रंथासंबंधानें एक गोष्ट सांगणें जरूर आहे. ती ही कीं, नेहमीच्या लेखनपद्धतीहून ह्याच्या *लेखनपद्धतींत फरक केला आहे. तो मुख्यत्वें अंतींच्या व उपांतींच्या इ, उ बद्दल व प्रत्ययांशिवाय इतर ठिकाणच्या कांहीं अनुस्वारांसंबंधानें आहे. मराठी भाषेच्या लेखनपद्धतीविषयीं हल्लीं चर्चा चालू आहे. नवीन लेखनपद्धतींत गुणदोष कोणते आहेत, वगैरे गोष्टींचा अनुभव पाहण्यासाठीं केवळ ती आहे, कायमची नाहीं असें समजावें. कांहीं ठिकाणीं नजर-

---

* **टीपः**–ह्या ग्रंथाची लेखनपद्धती पुढील नियमांप्रमाणें आहे.

१ अंतींचे इ उ दीर्घ करावे.

२ अंत्याक्षर अकारांत असल्यास उपांत्य ऱ्हस्व इ व उ दीर्घ लिहावे, मात्र अंत्याक्षर जोडाक्षर असल्यास, किंवा उपांत्यावर अनुस्वार असल्यास किंवा उपांत्य जोडाक्षर ( संस्कृत शब्दांतील ) असल्यास इ, उ ऱ्हस्व ठेवावे.

३ इतर ठिकाणचे इ उ, शुद्ध संस्कृत शब्दांशिवाय इतर शब्दांत ऱ्हस्व असावे.

४ समासघटीत शब्द जशाचे तसे ठेवावे. अनुस्वाराच्या संबंधानें जी व्यवस्था आहे ती अशीः–नें, णें, एं, शीं वगैरे प्रत्यय, ऊकारांत व एकारांत वगैरे नपुंसकलिंगी नामें, कांहीं अव्ययें, ह्यांच्या अंत्याक्षरावर अनुस्वार देण्याची वहिवाट आहे ती प्रायः कायम ठेवून इतर ठिकाणच्या ज्या अनुस्वाराचा उच्चार होत नाहीं, असे अनुस्वार प्रायः वगळले आहेत. ह्या संबंधानें विशेष खुलासा मराठी भाषेची लेखनपद्धती ह्या लेखांत करण्यांत आला आहे.

चुकीनें अशुद्धें राहून गेलीं आहेत, त्याबद्दल शुद्धिपत्र दिलें आहे; तें वाचून नंतर ग्रंथ वाचावा अशी विनंती आहे.

शेवटीं ज्या मित्रांच्या मदतीचा व ग्रंथकारांच्या ग्रंथांचा फार उपयोग झाला, त्यांचे पुनः एक वेळ आभार मानून ही लांबलेली प्रस्तावना पुरी करतों.

सं० रा० ह०.

# शुद्धिपत्र.

—:o:—

| पृष्ठ. | ओ० | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २ | २६ | निराश्रीत | निराश्रित |
| ४ | ४ | दुर्गूण | दुर्गुण |
| ,, | २५ | ... | .. |
| ५ | १८ | सार्वत्रीक | सार्वत्रिक |
| ,, | २१ | सुशिक्षीत | सुशिक्षित |
| ६ | ११ | दुर्गूण | दुर्गुण |
| ,, | २६ | सद्गूण | सद्गुण |
| ७ | २० | नैसर्गीक | नैसर्गिक |
| ,, | ,, | कृत्रीम | कृत्रिम |
| ९ | ६ | गुण | गूण |
| ,, | २१ | जरूरी | जरुरी |
| १० | १९ | व्यवस्थीत | व्यवस्थित |
| ,, | २३ | ,, | ,, |
| ११ | ५ | गुण | गूण |
| ,, | ८ | ,, | ,, |
| ,, | ९ | जरूरी | जरुरी |
| ,, | २३ | अव्यवस्थीत | अव्यवस्थित |
| ,, | २६ | गुण | गूण |
| १२ | १२ | समजूनदार | समजुतदार |
| ,, | १६ | उपस्थीत | उपस्थित |
| ,, | २४ | सांगोपन | संगोपन |
| १४ | १३ | बराबेर | बरोबर |
| १५ | १६ | सुशिक्षीत | सुशिक्षित |
| ,, | ,, | पुरुषाचे | पुरुषांचे |
| ,, | २६ | सुशिक्षीत | सुशिक्षित |
| १७ | २१ | नैसर्गीक | नैसर्गिक |
| ,, | २३ | ,, | ,, |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | १९ | कुत्रीम | कुत्रिम |
| २५ | २६ | त्य | त्या |
| २८ | २२ | पराङ्मूख | पराङ्मुख |
| २९ | १७ | जरूरी | जरुरी |
| ३२ | १६ | सुशिक्षीत | सुशिक्षित |
| " | १८ | होती | होतीं |
| " | २३ | आहे | आहे. |
| ३३ | २२ | सिव्हील | सिव्हिल |
| ३४ | १३ | प्रस्तूत | प्रस्तुत |
| " | " | जरूरी | जरुरी |
| ३७ | ५ | अन्हीक | अन्हिक |
| ४७ | १२ | वेडे | वेडें |
| ५० | १६ | स्थीर | स्थिर |
| ५१ | १३ | सांगोपन | संगोपन |
| ५४ | १६ | जरूरी | जरुरी |
| ६५ | ३ | " | " |
| ६८ | १० | सार्वजनिककामासाठीं | सार्वजनीक कामासाठीं |
| ७१ | २४ | उपयोगी | उपयोगीं |
| " | २५ | निरुपयोगी | निरुपयोगीं |
| ८९ | ३ | व्यवहारात | व्यवहारांत |
| ९० | १ | मोजता | मोजतां |
| ९४ | १८ | पुरुष | पुरूष |
| १०० | १२ | दाविण्यासाठीं | दाखविण्यासाठीं |
| १०३ | २ | वार्षीक | वार्षिक |
| १०८ | १४ | त्याचे | त्याचें |
| ११० | २० | गुण | गूण |
| ११२ | २१ | मोक्षाच्या संबंधानें | मोक्षाच्या व संतपणाच्या संबंधानें. |
| ११४ | ५ | उन्नति | उन्नती |
| ११५ | २० | तरुण | तरूण |
| ११९ | १६ | सघट्टन | संघट्टन |
| १३१ | ६ | नाहीं | नाहीं. |
| " | २० | हकीकत | हकिकत |
| १३२ | ३ | शेक्सपीयर | शेक्सपियर |

| | | | |
|---|---|---|---|
| १४२ | २२ | सदाचार संपन्न | सदाचारसंपन्न |
| १४५ | १ | ह्य | ह्या |
| १४७ | १५ | व्यवहाराविषयी | व्यवहाराविषयीं |
| १६१ | ११ | नाहीत | नाहींत |
| १६३ | २१ | दिला | दिली |
| १७१ | २५ | गृव | गृह |
| १७७ | २२ | शुद्धविर | शुद्धीवर |
| १८३ | २० | तें | ते |
| १८६ | १९ | आहे | आहे. |
| १८८ | २६ | अस | असें |
| १९२ | १५ | साहाय्यभूत | सहाय्यभूत |
| २०१ | २६ | गहस्थाश्रमांत | गृहस्थाश्रमांत. |
| २०९ | २१ | बळे | बळें |
| २१३ | २ | गरुवीण | गुरुवीण |
| ,, | ३ | काटयानकाटी | कोट्यानुकोटी |
| ,, | ४ | शा।क्त | शक्ति |
| ,, | ९ | मुख | मुखें |

सखाराम निळकंठ पटवर्धन
यांचे स्मरणार्थ,
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,
या संस्थेस नजर.
वा. नि ६३२

# गृहशिक्षण.

## शारीरसंगोपन.

सर्व शिक्षणांत गृहशिक्षण हें मुख्य होय. जसें गृहशिक्षण असतें तशीं मुलें बरीं किंवा वाईट निपजतात. सत्संगतीनें, अथवा शाळेंत, किंवा स्वतः अभ्यास करून मुलांस जें शिक्षण मिळतें, त्या योगानें मुलांचे वर्तनांत बदल होतो; परंतू गृहशिक्षण हें प्रथमपासून बराच वेळ मिळत असल्यामुळें, व हें शिक्षण सर्व शिक्षणाचा पाया आहे म्हणून, मुलांचे वर्तनांत त्या योगानें जसा बदल होतो, तसा इतर शिक्षणापासून होत नाहीं. ही गोष्ट थोड्यांचे लक्षांत येते. गृहशिक्षणाची खरी मातबरी व या शिक्षणापासून होणारे बरे वाईट परिणाम हे फारच थोड्या आईबापांस माहीत आहेत. मुलगा बिघडला असतां तो दुसऱ्या मुलांच्या संगतीनें बिघडला अथवा शाळेंत जाऊन बिघडला, असें म्हणण्यास ते चुकत नाहींत. ही ओरड अलीकडे बरीच ऐकू येते. मुलें संगतीनें बिघडत नाहींत, किंवा जीं मुलें शाळेंत जातात तीं सर्व सच्छिष्य बनतात, असें आम्ही म्हणत नाहीं; तथापी तीं बिघडण्यास अथवा चांगलीं निपजण्यास आईबाप बरेच अंशीं कारणभूत असतात. मुलांस बाहेरचे सहवासापेक्षां बहुतकरून आईबापांचा सहवास फार असतो. जसें आईबापांचें वर्तन असतें, तसा त्या वर्तनाचा ठसा मुलांचे मनावर उमटून तो बरेच

दिवस कायम राहतो. शाळेंत मुलें प्रतिबंधांत असतात. ज्याप्रमाणें घरीं मुलांचें मन मोकळें असतें त्याप्रमाणें दुसरे ठिकाणीं नसतें; त्यांस ज्या बऱ्या वाईट सवयी लागतात, त्या मुख्यत्वें प्रथम घरीं लागतात; त्यांस जें बरें वाईट वळण लागतें तें विशेषेंकरून तेथें लागतें. यामुळें त्याचें परीक्षण करून त्यांचे मनास वळण लावण्यास घर हें उत्तम व मुख्य साधन आहे. म्हणून, आपल्या मुलांचें आचरण चांगलें असावें अशी जर आपली इच्छा आहे तर, गृहशिक्षणाविषयीं आपण प्रथमपासून काळजी घेणें फार अगत्याचें आहे. ज्या तत्त्वांवरून समाजाच्या उत्कर्षाचें नियमन होतें, अर्थात् सर्व राष्ट्राचेही उत्कर्षाचें नियमन होतें, त्या तत्त्वांचें बीज वस्तुतः गृहशिक्षण आहे. ज्यांकडे गृहशिक्षणाचें काम आहे, त्यांचा जसा मुलांवर अधिकार चालतो तसा सरकारचा चालत नाहीं. सरकारचे हातपाय स्वतःच्याच नियमांनीं अथवा लोकमतामुळें बांधले असतात. आईबापांची गोष्ट कांहीं अंशीं निराळी असते; त्यांस जसें आपल्या मुलांना शिक्षण द्यावेंसें वाटेल तसें देतां येतें. सरकारास तसें करण्यास पुष्कळ अडचणी असतात. समाज हा अनेक व्यक्ती मिळून होतो. जसे व्यक्तिमात्राचे आचार विचार असतील, तसे समाजाचे असणार आहेत. गृहशिक्षण हें व्यक्तिमात्राच्या शिक्षणाचा पाया आहे; म्हणून सामाजीक सुधारणेची, व पर्यायेंकरून राष्ट्रीय सुधारणेची खरी शाळा गृह आहे.

कसाही मनुष्य शहाणा असला तथापी लहानपणीं त्यास जी संगत अथवा ज्या सवयी लागल्या असतील, त्यांचा त्याचे मनावर कांहींना कांहीं तरी परिणाम झालेला असतो; लहानपणीं मुलांची स्थिती निराश्रीत असते; पोषण व

शिक्षण यांसाठीं त्यांस दुसऱ्यांवर अवलंबून रहावें लागतें; तीं फक्त अनुकरण करणारीं असतात; जरी यःकश्चित् गोष्टीमुळें त्यांस कांहीं सवयी लागल्या असल्या तरी त्या सवयी फार दिवस कायम राहतात; ही गोष्ट आईबापांनीं अथवा मुलांचे पालकांनीं लक्षांत ठेविली पाहिजे. ज्याप्रमाणें प्रभात समयावरून दिवसाचें साधारण अनुमान बहुशः कळतें, त्याप्रमाणें मुलें कशीं निपजणार याचें स्थूल अनुमान बहुशः त्यांचे प्रथमचे अंकुरावरून कळतें. यास कांहीं अपवाद सापडतात. कांहीं मुलें लहानपणीं हूड असून पुढें तीं चांगलीं निपजलीं आहेत, अशीं उदाहरणें दृष्टीस पडतात; परंतू हें साधारण मान नाहीं.

ज्या गोष्टी प्रथम मुलांचे दृष्टीस पडतात, व ज्या तीं प्रथम ऐकतात, त्यांचा ठसा त्यांचे मनावर चांगला उमटतो; पदार्थांचे स्वरूपाविषयीं प्रथम जी त्यांस माहिती मिळते, तीच तीं ग्रहण करतात; भय, आनंद, दुःख, यांविषयीं जी त्यांची प्रथम कल्पना होते ती मागाहून पुष्कळ दिवस राहते. मनुष्यास विचारशक्तीच्या योगानें बाह्य गोष्टींचें यथार्थ ज्ञान होऊन त्यास बरें वाईट कळूं लागतें हें खरें आहे; तथापी बाह्य पदार्थांचा अथवा बाह्य संगतीचा परिणाम कांहीं तरी झाल्याशिवाय रहात नाहीं. जर मोठ्या लोकांचे मनास अज्ञान व हलकट लोकांचे नित्य सहवासानें थोडा तरी विकार होतो, तर मुलांचे मनास विकार होईल यांत नवल नाहीं. ज्या गृहांत प्रेमभाव आहे, जेथें कर्तव्याविषयीं आसक्ती आहे, ज्याठिकाणीं सदाचरणाचें वर्तन आहे, ज्या घरीं व्यवस्था करणारीं वडील माणसें समजुतदार व उद्योगी आहेत, त्या घरांतील मुलें सशक्त, निरोगी व दुस-

त्यांचे उपयोगीं पडणारीं निपजतात. तसेंच ज्या घरीं अज्ञान, आपमतलब, पंक्तिप्रपंच, भांडणकज्जा, आळस, हलकटपणाचें वर्तन हीं आहेत त्याठिकाणीं मुलांसही हे दुर्गूण जडतात. ज्या ज्या गोष्टी मुलांच्या नजरेपुढें असतात, त्या त्या त्यांस उत्तम वाटतात. अशी जर वास्तवीक स्थिती आहे, तर त्यांच्यापुढें अनुकरणीय वस्तू नेहमीं चांगल्या ठेवाव्या. दुर्दैवामुळें अथवा दुसरे कारणामुळें कांहीं ठिकाणीं आई व मुलें यांचा वियोग झालेला असतो; परंतू एकंदरींत लहानपणीं मुलांस विशेषेंकरून आईचा सहवास फार असतो; त्यांचे डोळ्यांपुढें अनुकरणीय वस्तू फार करून आई असते. आईची स्थिती लोहचुंबकाप्रमाणें असते; तिला ज्याप्रमाणें मुलांचें मन आपलेकडे ओढून घेतां येतें, त्याप्रमाणें दुसऱ्या कोणासही तितकें घेतां येत नाहीं. कांहीं मुलांस बाप, आजा, आजी, वगैरे वडील माणसांचा लळा लागलेला असतो; परंतू तो आईच्या अभावीं अथवा पश्चात् होय. बहुतकरून मुलांचा ओढा जन्म देणाऱ्या आईकडे फार. आईनें मुलास तोंडानें प्रत्यक्ष कांहीं सांगितलें पाहिजे असें नाहीं; तोंडाच्या सांगण्यापेक्षां तिचे स्वतःच्या कृतीपासून जास्त कार्य होतें; मुलें कृतीचें तेव्हांच अनुकरण करतात. आई रडावयास लागली असतां तीं रडतात; हसूं लागली असतां तीं हसतात. तात्पर्य, त्यांची बहुतेक कृती तिजवर अवलंबून असते. आईचें वर्तन बोलण्याप्रमाणें आहे किंवा नाहीं हें त्यांस समजतें; बोलण्याप्रमाणें तिची कृती नसेल तर "मनस्यन्यद्वचस्यन्यत्कार्यमन्यत्" हा जो मोठा दुर्गूण तो त्यांस जडतो. मुलांचा स्वभाव आईबापांच्या कृतीप्रमाणें अनुकरणाचे योगानें हळू हळू बरावाईट

बनत जातो. प्रथमतः आपणाला त्यांचे अनुकरणाची मौज वाटते; त्यांचे कृतींत तादृश अर्थ नाहीं अशा समजुतीवर आपण जातों; व त्याकडे फारसें लक्ष देत नाहीं. परंतू एक-दोन-तीन-चार-वेळां एकच गोष्टीचें अनुकरण करण्यानें त्यांस ती गोष्ट करण्याची सवय लागून त्यांचा स्वभाव बनतो; अनुकरणीय गोष्ट चांगली असेल तर चांगलें कार्य होतें; वाईट असेल तर वाईट कार्य होतें. बापाचे कृतीपेक्षां आईच्या कृतींचा मुलांचे मनावर दृढतर परिणाम होतो. ही गोष्ट आपण लक्षांत ठेवीत नाहीं. घर हें लहानसें राज्य आहे; गृहकृत्यांत बापापेक्षां आईची मुखत्यारी फार असते; असें असणें हेंच योग्य व हितावह आहे; आईचा आपले मुलांवर पूर्ण अंमल असतो; कांहीं वस्तू लागली असतां, मुलें ती आईपाशीं मागतात; तीं आईच्या द्वारें बहुतकरून बापाजवळ गोष्ट काढतात. आई त्यांचे डोळ्यांपुढें अक्षयीं असते. म्हणून गृहशिक्षणसंबंधी पहिली गोष्ट आईचें सद्वर्तन ही होय.

आईची ममता ही अमोलीक चीज आहे; हिचें साम्य दुसऱ्या कोणत्याही गोष्टीस येणार नाहीं; ही सार्वत्रीक आहे. मुलें लहान असोत अथवा मोठीं असोत; कुरूप असोत अथवा सुंदर असोत; रोजगारी असोत अथवा बिनरोजगारी असोत; आईची ममता त्यांजवर असतेच. आई सुशिक्षीत असेल तर ही ममता सदोदीत असते. मुलांवर संकटें येऊन त्यांस दुःख झालें असतां आई त्यांचें सांत्वन करून तें दुःख कमी करिते; त्यांस दुखणेंबहाणें आलें असतां अथवा त्यांचें मन प्रपंचांतील काळजीमुळें उद्विग्न झालें असतां त्यांस आईची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. यासाठीं आपलें

मन कोणत्याही गोष्टीनें दूषीत होऊं न देतां, आया सदोदीत आपल्या मुलांवर ममता करतील तर मुलांचे मनांतही ममता नेहमीं जागृत राहील; त्यामुळें दुसऱ्यांवर ममता करण्याची त्यांस सवय लागेल; व अशा रितीनें त्यांस परोपकार करण्याचें वळण लागेल. परंतू मुलांवर आईची ममता नसेल तर मुलेंही तिजवर ममता करणार नाहींत; तीं फक्त स्वार्थपर बनतील; व हेंच वळण त्यांस लागून तीं आपआपल्या मतलबाचा उद्योग करतील; त्यांना दुसऱ्यावर प्रेम करण्याची सवय लागणें कठीण. कुटुंबांत परस्परांचें परस्परांवर प्रेम असलें म्हणजे कुटुंबांतील माणसांमध्यें आपलपोटेपणा हा दुर्गूण बहुशः नसतो. परस्परांनीं परस्परांवर प्रेम करण्यांत सर्वांचें हीत आहे. अशा प्रकारें प्रेम करण्यास व येणेंकरून दुसऱ्यांवर प्रेम करण्याची सवय लागण्यास गृह हें उत्तम साधन आहे. जर घरांत प्रेम नसेल तर त्यांत व गोसाव्याचे मठांत फरक तो काय ? आईचे कष्टांची आठवण, मुलांचे कल्याणाविषयीं बापाची इच्छा व त्याचा सतत उपदेश, बहीणभावंडांचें प्रेम, सुखदुःखाच्या गोष्टी सांगण्यास उत्तम ठिकाण, ह्या व अशाच प्रकारच्या गोष्टींमुळें ज्याचा त्याचा ओढा घराकडे असतो, व या गोष्टींमुळेंच घराची मातबरी फार असते.

सर्व शिक्षकांपेक्षां आईची योग्यता फार आहे; कारण आईचे शिक्षणांत ममता फार असते. बापाचे शिक्षणापासून मुलांचे मनावर कार्य होतें; आईचे शिक्षणानें त्यांचे अंतःकरणावर कार्य होतें. अंतःकरण हें प्रीती वगैरे सद्गुणांचें स्थान आहे. बापाचे शिक्षणानें मुलांचे मनास स्थैर्य व दृढता हीं येतात; आईच्या शिक्षणानें त्यांस सद्गूण लागतात. बापाचे

शिक्षणानें मुलांची बुद्धी विकसीत होते; परंतू ज्या मनोवृत्तीं च्या प्राबल्यानें मनुष्याचा स्वभाव बनतो त्यांचे दमन आईचे शिक्षणानें होतें. बापाचे शिक्षणानें मुलांचा एकादे गोष्टीवर विश्वास बसतो; परंतू आईचे शिक्षणानें त्या गोष्टीवर त्यांचें प्रेम जडतें. अशा प्रकारें आईबापांचे शिक्षणापासून मुलांचे मनावर निरनिराळीं कार्यें होतात.

आईबापांचे शिक्षणापासून मुलांचे मनावर प्रथम कांहींच परिणाम झालेला नाहीं, अशीं आपण कित्येक उदाहरणें पाहतों; परंतू मुलांस आपल्या दुर्वर्तनाचा मागाहून पश्चात्ताप होऊन, व आईबापांचे सदुपदेशाची आठवण होऊन, तीं शुद्धीवर आल्याचीं उदाहरणें पुष्कळ दृष्टीस पडतात. पूर्व-कालांतील शिक्षणाचा परिणाम घडल्यावाचून रहात नाहीं. यावरून हें उघड आहे कीं, आयुष्याचीं पहिलीं वीस वर्षें फार महत्वाचीं आहेत; हीं बहुतकरून घरीं जातात; हीं जर सच्छिक्षण व सत्समागम ह्यांत गेलीं तर परिणामीं चांगलें हीत होतें; हीं व्यर्थ गेलीं तर पुढें पश्चात्ताप होतो; परंतू मग उपयोग काय?

आपल्या शरिरास शुद्ध हवेची फार जरूरी आहे; शुद्ध हवेचे योगानें मनास हुशारी वाटून काम चांगलें होतें; परंतू ती कांहीं नैसर्गीक अथवा कृत्रीम कारणांनीं बिघडली असेल तर मनास चांगली हुशारी वाटत नाहीं. ही गोष्ट प्रत्येक मनुष्यास अनुभवावरून माहित असेल. हीच गोष्ट घरास लागू आहे. कुटुंबांत आईबापांनीं आपलें मन निर्मळ ठेवण्या-विषयीं यत्न केला असतां, मुलांचें वर्तन सहज रितीनें चांगलें राहील हें उघड आहे. ही गोष्ट बापापेक्षां आईवर फार अवलंबून आहे. आई सुशील, ममताळू, उद्योगी,

स्वस्छ राहणारी, सर्वांचा सारखा समाचार घेणारी व समजुतदार असली, म्हणजे घरांतील मंडळी बहुतकरून आनंदी, संतुष्ट, व शांत असते. मुलांस घरीं आनंदांत व शांतपणें राहण्याची सवय लागली, म्हणजे या सवयीमुळें तीं बाहेरही आनंदानें वागतात. तीं शाळेंतून अथवा काम करून घरीं आलीं म्हणजे दमून भागून गेलीं असतात; त्यांचें मनभुकेनें अथवा दुसरे कारणानें कांहींसें क्षुब्ध असतें. अशा वेळीं त्यांचे पुढें कांहीं खावयास ठेविलें असतां, अथवा त्यांच्याशीं गोड बोललें असतां तीं आनंदी राहतात. परंतू तुला रोजचेरोज काय खावयास देऊं, असें म्हणून वस्कन् त्यांचे अंगावर ओरडलें असतां, अथवा हातांतील काम एकीकडे ठेवून त्यांच्याशीं दोन शब्द बोललें नाहीं तर त्यांची वृत्ती थंड राहत नाहीं. असला प्रकार वारंवार होत असेल, तर त्यांस घरीं राहण्याविषयीं आनंद वाटत नाहीं; तीं बाहेर जाऊन कर्मणूक करतात; म्हणून आयांची वृत्ती थंड असली पाहिजे. मुलांची आनंदीत व शांत वृत्ती असणें त्यांच्यावर अवलंबून आहे. त्या नेहमीं आनंदांत असल्या तर, मुलेंही आनंदांत राहतील. जर त्या सद्गुणी, आनंदवृत्ती, संतुष्ट, व काटकसरीनें राहणाऱ्या असतील, तर मुलांस गरिबीचें कांहीं वाटणार नाहीं; परंतू त्या डागडागिन्यांसाठीं, अथवा दुसरे गोष्टीसाठीं उगीच नेहमीं चडफड करतील, पुरुषाचें डोकें पिकवितील, घरांतील जिनसांची नासधूस करतील, दिवस बराच आल्यावर उठून गृहकृत्यास लागतील, तर पुरुषांची वृत्ती शांत राहणार नाहीं; पुरुषांस घरीं राहण्याची इच्छा फारशी होणार नाहीं; शिवाय मुलेंही चिरचिरीं होतील. मुलांस

अथवा पुरुषांस घरीं आनंद वाटूं लागला तर, घर हें सुखाचें स्थान होईल. दिवसभर काम करून श्रमपरिहार करण्यासाठीं अथवा संसारसंबंधी काळजीमुळें अथवा दुर्जनसहवासानें त्रास झाला असतां विसर पडण्यासाठीं, गृह हें उत्तम साधन होय; हें स्थान लहान मोठें, गरीब श्रीमंत यांस सारखें सुखावह आहे.

घर हें प्रेमाचें स्थान आहे. प्रेम हा गुण शिकण्यासाठीं हीं एका प्रकारची शाळा आहे. आई, बाप व मुलें, हीं परस्परांवर प्रेम करतील, तर मुलें दुसऱ्यांवर प्रेम करतील. आई, बाप, व मुलें यांस, कर्तव्य गोष्टी करण्याची जशी सवय असेल, तसें मुलांस सार्वजनीक कर्तव्याविषयीं आपोआप शिक्षण मिळेल; व ज्याप्रमाणें घराविषयीं त्यांचें प्रेम असेल त्याप्रमाणें स्वदेशाविषयीं त्यांचे प्रेम असणार आहे.

शिवाजीमहाराज व जर्मनीचा विलियम बादशाहा यांस स्वदेशप्रीतीचें, व वाशिंगटन व स्कॉट यांस सौजन्याचें शिक्षण मिळण्यास पुष्कळ अंशीं त्यांच्या आया कारण झाल्या; बरें उलटपक्षीं बायरन कवीची जी उदासीन वृत्ती बनली ती त्याचे दुष्ट आईमुळें होय. त्याचप्रमाणें राव बाजी बृहस्पती निपजण्यास मुख्यत्वें त्याची राक्षसी आई आनंदीबाई ही कारण नव्हे काय ? बापापेक्षां आईचें वर्तन चांगलें असण्याची फार जरूरी आहे. ज्या ठिकाणीं बाप ख्यालीखुशाली व दुर्व्यसनी निघाला आहे, त्या ठिकाणीं जर आई शहाणी व सद्गुणी असेल तर, कुटुंबाचे स्थितींत तादृश बिघाड होत नाहीं; आई आपले शहाणपणानें मुलांस आवरून धरते; तिच्या सदाचरणामुळें तीं चांगलीं निपजतात. अशीं उदाहरणें पुष्कळ सापडतील. परंतू बाप चांगला असून आई

दुराचारी, आळशी, तापट व उधळी असली, तर मुलें चांगलीं निपजण्याचा संभव कमी असतो; अशा आईचीं मुलें सद्गुणी निघाल्याचीं उदाहरणें थोडीं सापडतात. आपणास बाप व गुरू यांचे शिक्षणाचा प्रत्यक्ष परिणाम दिसून येतो; म्हणून आपण त्याचें फार गौरव करतों. आईचे वर्तनानें मुलांस जें वळण लागतें तें न कळत लागत असतें, त्यापासून ढळढळीत परिणाम दृष्टीस पडत नाहींत; यामुळें ते लोकांस समजून येत नाहींत; म्हणून लोक या गोष्टीची फारशी मातबरी मानीत नाहींत. आईच्या वर्तनापासून मुलांच्या वर्तनांत बरें वाईट कार्य होतें, ही गोष्ट कित्येक लोकांचे ध्यानींमनींही नसते. सद्गुणी आयांचीं चरित्रें लिहून ठेवणें जरूर आहे; परंतू तीं लिहून ठेवण्याचा फारसा परिपाठ नाहीं. त्या राज्यपदावर असत्या, तर त्यांचीं चरित्रें लिहून ठेवणारे पुष्कळ लोक दृष्टीस पडले असते; आतां जीं थोडीं बहूत दृष्टीस पडतात, तीं युरोपियन व अमेरिकन लोकांमध्यें होत. पण एवढ्याच कारणावरून प्रकृत विषयाचे संबंधानें आयांचें वर्तनाची मातबरी कमी मानणें बरोबर नाहीं. मुलांचे अल्पवयांत बाप मेल्यावर, आया सर्व पसारा आवरून धरून व्यवस्थीत रितीनें वागल्यामुळें, मुलें उदयास आल्याचीं पुष्कळ उदाहरणें दृष्टीस पडतात. त्याचप्रमाणें अज्ञान व अविचारी आयांचे दुर्वर्तनामुळें मुलें बिघडल्याचीं उदाहरणें ही पुष्कळ सापडतात.

काम व्यवस्थीत रितीनें करण्याची सवय ही फक्त व्यापारांतच हितावह आहे असें नाहीं; ही जगांतील सर्व व्यवहारांत असली पाहिजे. व्यापार करणें अथवा राज्यकारभार चालविणें, हा मोठा प्रपंच करणें आहे; गृह-

 वा.नं. ६३२

कृत्यांची व्यवस्था करणें हा लहान प्रपंच करणें आहे; दोन्हीही प्रकारचे प्रपंचांत व्यवस्थितपणें काम करण्याची सवय असली पाहिजे. ज्याप्रमाणें पुरुषास पद्धत, काम करण्याची हतोटी, शिक्षण, उद्योग, काटकसर, आद्याप्रमाणें खर्च करण्याची सवय, हे गुण व्यवहारांत उपयोगी पडतात, त्याचप्रमाणें, प्रपंचाचा गाडा सुरळीत लोटतां यावा, व गृह हें सुखाचें स्थान असावें अशी ज्या स्त्रियांची इच्छा आहे त्यांच्यांत हे गुण अवश्य असले पाहिजेत. कित्येक लोकांचा असा समज आहे कीं, बायकांस या गुणांची जरूरी नाहीं. परंतू हा समज चुकीचा आहे. गवळणीचे दुधाबद्दल, मोलकरणीचे मजुरीबद्दल, दळणवालीचे दळणाबद्दल, व प्रपंचांतील दुसऱ्या शतशः किरकोळ गोष्टींत, हरहमेषा हिशेबाचें कारण पडतें. स्त्रियांस साधारण हिशेबाची माहिती असल्यानें पुरुषाचे मागची बरीच कटकट चुकेल; त्यांवर जबाबदारी राहून त्यांचे अंगीं व्यवस्थितपणा येईल, व त्यांचे अंगीं व्यवस्थितपणा आला म्हणजे मुलांसही सहज व्यवस्थितपणाचें वळण लागेल. व्यवस्थितपणानें काम करण्याची सवय असली म्हणजे कामाचा निकाल लवकर होतो, कोणत्याही गोष्टींत घोटाळा राहत नाहीं. परंतू पद्धतशीर काम करणें झालें असतां तें वक्तशीर केलें पाहिजे. ज्या स्त्रिया वाटेल तेव्हां उठतात व वाटेल तेव्हां अंग धुतात, त्या स्त्रियांपासून घरांतील मंडळीस सूख होत नाहीं; शेजारीपाजारी त्यांचा तिटकारा करतात; त्यांचीं मुलें त्यांच्यासारखी स्वछंदी व अव्यवस्थीत होतात; मुलांस व पुरुषांस वेळेवर जेवण न मिळाल्यामुळें कामावर वक्तशीर हजर राहतां येत नाहीं, व त्यांच्या जिवाची त्रेधा होते; म्हणून स्त्रियांचे अंगीं वरील गुण असण्याची

फार आवश्यकता आहे. व्यापारी लोक वेळेचें महत्व पैशाप्रमाणें मानतात; त्याप्रमाणें स्त्रियांनींही या गुणाची योग्यता मानिली पाहिजे; कारण या गुणामुळें सर्वांस सूख होतें.

ज्याप्रमाणें पुरुषांचे अंगीं व्यवहारज्ञान असलें पाहिजे, त्याप्रमाँणें तें स्त्रियांचेही अंगीं असलें पाहिजे; हें अनुभवानें प्राप्त होत असतें; म्हणून त्याचा फार उपयोग आहे. कोणते वेळीं काय करावयाचें, कोठें काय बोलावयाचें, मुलांचे लाड कितपत करावयाचे, घरांतील मंडळीस कसें खूष ठेवावयाचें, विपत्ती आली असतां कसें वागावयाचें, वैभव आलें असतां कसें वर्तन ठेवावयाचें, हें स्त्रियांस समजलें पाहिजे. मुलांचें लालनपालन व शिक्षण हीं चांगले प्रकारें होण्यास त्या जितक्या समजूतदार असतील, तितकें श्रेयस्कर असतें. विशेषेंकरून हिंदू कुटुंबांतील स्त्रियांची स्थिती कांहींशी चमत्कारीक असते; त्यांस दुसऱ्याच्या मुली वागवावयाच्या असतात. हें काम सोपें नाहीं. सास्वा समजुतदार नसल्या म्हणजे क्षुल्लक कारणांवरून तंटे उपस्थीत होतात. सुनांचा अमर्यादशीलपणा व सास्वांची गांजणूक हीं उभयतांचे असमंजसपणाचा परिणाम आहे. लेकीस एक व सुनेस एक अशाप्रकारें सासूचें वर्तन नसावें. सासूकडे कांहीं अधिकार असतो, परंतू हा अधिकार योग्य प्रकारें चालविण्यास सासू थोडीशी समजुतदार असली पाहिजे.

आयांची मुलांवर नुसती ममता असून उपयोगीं नाहीं; त्यांनीं आपल्या बुद्धीचा उपयोग केला पाहिजे. मुलांचें सांगोपन करणें हें त्यांचें कर्तव्य आहे; तें त्यांस चुकत नाहीं—व चुकणार नाहीं. मुलांचें जीवन व सद्वर्तन हीं त्यांचे संगोपनावर अवलंबून आहेत. जर त्यांना मुलांचें

संगोपन कसें करावें याविषयींचें ज्ञान नसेल, अथवा हें ज्ञान असून त्याप्रमाणें वागण्यास त्या हेळसांड करतील, तर त्या अज्ञानाबद्दल अगर त्या हलगर्जीपणाबद्दल त्यांस शासन झाल्याशिवाय राहणार नाहीं. आज जीं शेकडो मुलें अल्पवयांत मरतात, तीं मुख्यत्वें आयांचे अज्ञानामुळें अथवा हलगर्जीपणामुळें. स्वतःची अक्कल नाहीं, सांगितलेलें पटावयाचें नाहीं, दुसऱ्याचें ऐकावयाचें नाहीं, आपला हेका सोडावयाचा नाहीं, असा पुष्कळ स्त्रियांचा स्वभाव बनून गेला असतो. मुलें असावीं म्हणून, किंवा तीं जगावीं म्हणून त्या नवससायास करतील, नेमधर्म करतील, आपल्या देहास कष्ट देतील, तीं मेल्यावर त्या जन्मभर रडत बसतील व दुसऱ्यास रडावयास लावतील; परंतू संगोपनाचे योग्य उपाय करणार नाहींत. ही स्थिती फार दुःखास्पद आहे. म्हणून आयांनो, मुलांचे संगोपनाविषयीं यत्किंचित्‌ही कसूर करूं नका; हेकटपणा सोडून द्या; कारण तो सर्व प्रकारें घातक आहे. नुसती कोरडी माया करण्यांत अर्थ नाहीं, कोरडया ममतेनें मृत्यू तुमच्या प्रिय बालकांची क्षमा करणार नाहीं, मुलें मरतात म्हणून नुसतें रडत बसण्यांत अर्थ नाहीं.

पुरुषास जी बुद्धी दिलेली आहे तिचा ज्याप्रमाणें उपयोग झाला पाहिजे, त्याप्रमाणें स्त्रियांचे बुद्धीचाही उपयोग झाला पाहिजे. मुलांचे संगोपनाची व गृहकृत्याची जबाबदारी त्यांवर आहे. हीं कामें चांगले रितीनें करण्यास ज्या योग्य अडचणी असतील त्या पुरुषांनीं दूर केल्या पाहिजेत. जर असें न केलें, तर मुलें वाईट निपजण्याचा दोष स्त्रियांकडे नाहीं. त्यांनीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत बैलासारखें अथवा मजुरासारखें राबावें एव-

ढेंच त्यांचें काम नाहीं, व पुरुषाच्या मनाचें रंजन करावें एवढ्याचसाठीं त्यांनीं जन्म घेतला नाहीं. ज्याप्रमाणें आमचा हा एवढा खटाटोप केवळ आमच्या एकट्याचे जिवासाठीं नसून दुसऱ्यांकरितांही आहे, त्याप्रमाणें स्त्रियांचा जन्म हा फक्त त्यांचेचकरितां नसून, मुलेंबाळें वगैरे ह्यांकरतांही आहे. ज्याप्रमाणें दुसऱ्याचें हिताहीत हें आमचे आचरणावर अवलंबून आहे, त्याप्रमाणें स्त्रियांचे आचरणावर मुलांचें हिताहीत अवलंबून आहे. जर आमच्या बुद्धीला संस्कार नाहीं, तर आमच्यावर काय जबाबदारी आहे हें आम्हांस कसें कळणार? व आमचेकडून जबाबदारीचीं कामें योग्य प्रकारें कशीं होणार? त्याचप्रमाणें स्त्रियांचे बुद्धीस संस्कार नसेल, तर त्यांना आपणांवर केवढी जबाबदारी आहे हें कोठून कळणार? त्यांस ही जबाबदारी बरोबर रितीनें न कळल्यामुळें त्यांचेकडून कसें तरी काम होतें यांत नवल नाहीं. ह्यासाठीं आमच्या मुलांची स्थिती चांगली असावी अशी जर आमची इच्छा आहे, तर ज्या उपायांनीं त्यांच्या आयांची बुद्धी प्रगल्भ होईल, व त्यांचें अंतःकरण शुद्ध व प्रेमळ राहील, ते उपाय करणें अवश्य आहे. स्त्रियांची बुद्धी प्रगल्भ असली पाहिजे असें आम्हीं म्हटलें, परंतू ज्या प्रकारच्या संस्कारापासून त्यांना प्रपंचांत विशेष उपयोग होईल, त्या प्रकारचा संस्कार मुख्यत्वें प्रथम त्यांस असला पाहिजे. त्यांस शिक्षण मिळाल्यानें त्यांची नीती बिघडेल ही समजूत कोती आहे; त्या बिघडूं नयेत, त्या सद्गुणी असाव्या, त्यांस आपण काय केलें पाहिजे हें समजावें, त्यापासून स्वतः त्यांस, त्यांचे मुलांबाळांस व दुसऱ्यांस उपयोग व्हावा, म्हणून त्यांस शिक्षण द्यावयाचें आहे. जर शिक्षणानें

पुरुषांस उपयोग होतो, तर स्त्रियांसही होईल. उभयतांची स्थिती कांहीं बाबतींत भिन्न आहे, म्हणून उभयतांचे शिक्षणव्यवस्थेंत कांहीं भेद असला पाहिजे हें उघड आहे. जर वरिष्ठ प्रतीचे शिक्षणापासून पुरुषांचे समजुतींत फेरफार होत आहे, तर स्त्रियांचेही समजुतींत बदल होईल, व त्यापासून त्यांचा हल्लीं पेक्षां विशेष उपयोग होईल. आयुष्यांत जे अकस्मात् प्रसंग येऊन गुदरतात त्यांसाठीं अगोदर तरतूद करून ठेवण्याचें त्यांस ज्ञान येऊन, त्यांस संसारसंबंधी कृत्यें विशेष व्यवस्थेनें व विशेष आस्थेनें करण्याची सवय लागेल; अज्ञानामुळें त्या ज्या कित्येक वेळां फसतात त्या फसणार नाहींत; त्या सदाचरणाचें दृढतर अवलंबन करतील; व त्यांची परवशता कमी होऊन त्यांस लोकांचे तोंडाकडे पाहण्याचें फारसें कारण राहणार नाहीं. स्त्रियांस जें शिक्षण द्यावयाचें तें केवळ त्यांचेचकरतां नसून, त्यांचा दुसऱ्यांसही उपयोग व्हावा म्हणून आहे. पुरुष सुशिक्षीत असून स्त्रिया सुशिक्षीत नसतील, तर पुरुषाचे सद्विचार कायम राहण्यास अडचण येते. पुरुषांच्या समजुती निराळया व बायकांच्या समजुती निराळ्या, असा प्रकार होऊन परस्परांमध्यें विरोध उत्पन्न होतो; यामुळें कित्येक लोकांस आपलीं मतें एकीकडे ठेवण्याचा प्रसंग येतो, व ते उपहासास पात्र होतात. जर राष्ट्राची नीती व अनीती ही बरेच अंशीं गृहस्थितीवर अवलंबून आहे, व गृहस्थितीची सुधारणा म्हणजे विशेषेंकरून स्त्रियांची सुधारणा करणें आहे, तर स्त्रियांचे शिक्षणाविषयींचा प्रश्न हा केवळ एक अथवा दोन व्यक्तींविषयीं नसून राष्ट्रीय प्रश्न आहे. राष्ट्राचे उत्कर्षासाठीं स्त्रिया सद्गुणी व सुशिक्षीत असल्या

पाहिजेत; त्यांस शिक्षण देणें हें पुरुषांस शिक्षण देणें होय; त्यांचें वर्तन सुधारणें म्हणजे पुरुषांचें वर्तन सुधारणें होय; कारण राष्ट्र हें अनेक कुटुंबें मिळून होतें. जें शिक्षण स्त्रियांस द्यावयाचें तें त्यांनीं मोठमोठाले रोजगारधंदे करावे म्हणून नाहीं; त्यांनीं पैसे मिळवून पुरुषांचे पोट भरावें म्हणून नाहीं; तर, त्यांची सुधारणा होऊन त्या सद्गुणी असाव्या, त्यांपासून त्यांचे मुलांस व कुटुंबास फायदा व्हावा, व त्यामुळें गृहस्थिती सुधारून त्या राष्ट्रोन्नतीस साहाय्यभूत व्हाव्या, या हेतूनें त्यांस मुख्यत्वें शिक्षण द्यावयाचें आहे.

स्त्रियांस शिक्षण द्यावें, त्यांस स्वातंत्र्य असावें, व त्यांस हक्क असावे असें जें वर प्रतिपादन केलें, त्यावरून त्यांस पुरुषांप्रमाणें सर्व गोष्टींत पूर्ण स्वातंत्र्य व बरोबरीचे हक्क देण्याचा काल आला आहे असें म्हणण्याचा आमचा हेतू नाहीं. स्त्रियांचे स्थितीविषयीं व विशेषेंकरून आमच्या स्त्रियांचे सांप्रतचे स्थितीविषयीं विचार करतां आमच्या स्त्रियांस सर्व बाबतींत सारखे हक्क देण्याचा काल अद्याप आला नाहीं. अशा प्रकारें हक्क देण्यास बराच काल लोटला पाहिजे. आमच्या स्त्रियांपेक्षां इंग्लंडांतील स्त्रियांस बरेंच शिक्षण मिळालें आहे. तेथें स्त्रीस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते बरेच होऊन गेले व दिवसेंदिवस जास्त होत आहेत. ह्यांची चळवळ पुष्कळ चालू आहे. परंतू आज मित्तीस तेथें अशी स्थिती आहे कीं, तेथील कित्येक थोर पुरुषांच्या स्त्रियांसदेखील वरील मत पसंत नाहीं. त्यांचा असा अभिप्राय आहे कीं, स्त्रिया व पुरुष ह्यांची स्थिती भिन्न असल्यामुळें उभयतांचे हक्क हे कांहीं बाबतींत भिन्न असले पाहिजेत. स्टानले ऑफ आल्डरनी, क्यावेंडिश, चर्चिल, गोशन, मंडेला, ग्रीन ( प्रसिद्ध इतिहा-

सकार ) फार्स्टर, माथ्यु आर्नाल्ड, मोक्षमुलर वगैरे गृहस्थ कोण आहेत हें पुष्कळांस माहीत आहे. ह्यांच्या स्त्रियांच्या सहीचा लेख नाइंटींथ सेंचरी ( एकुणिसावें शतक ) ह्या नांवाचे मासीक पुस्तकांत छापून प्रसिद्ध झाला आहे. त्यांत वरील सभ्यगृहस्थांच्या स्त्रियांचें असें म्हणणें आहे:—

" स्त्रियांचें सामर्थ्य, त्यांचा उत्साह व त्यांचें शिक्षण ह्यांची वृद्धी होणें इष्ट आहे अशी जरी आमची इच्छा आहे, तरी त्यांनीं आपले देशाकरतां जीं कामें करावयाचीं तीं व त्या संबंधानें त्यांवर जी जबाबदारी असावयाची ती निराळी असली पाहिजे. पार्लमेंट सभेंत बसून वादविवाद करण्याचें व कायदे करण्याचें काम, राष्ट्राचें उत्पन्न व सामर्थ्य वाढविण्यासाठीं लागणारे श्रम, परराष्ट्राबरोबर दळणवळण ठेवणें, सैन्य व आरमार ह्यांची व्यवस्था ठेवणें, खाणी, धातू, आगगाड्या वगैरे प्रकारचे उद्योगांस लागणारे श्रम, व्यापाराचे कामांत पुढारी होणें व नजर ठेवणें, वसुलाची व्यवस्था ठेवणें, व ज्या व्यापारी आरमारावर इंग्लंड देशाचा अन्नाचा पुरवठा अवलंबून आहे त्याची व्यवस्था ठेवणें, ह्या बाबतींत स्त्रियांनीं प्रत्यक्ष वाटा उचलणें हें त्यांच्या नैसर्गीक स्थितीमुळें, व नैसर्गीक स्थितीमुळें ज्या चाली पडल्या आहेत व त्यांस ज्या सवयी लागल्या आहेत त्यामुळें अशक्य आहे. स्त्रियांच्या नैसर्गीक स्थितीमुळें त्यांस जी दुर्बलता आलेली असते ती घालविण्याविषयीं व तिजपासून उत्पन्न झालेल्या चाली व त्यांस लागलेल्या सवयी मोडण्याविषयीं यत्न करणें व्यर्थ आहे. वरील गोष्टीपासून त्यांचें हिताहीत आहे,

---

१—नाइंटींथ सेंचरी. जून १८८९.

म्हणून या बाबतींत त्यांचा प्रत्यक्ष संबंध नसतां निराळ्या प्रकारचा संबंध असावा. वरील गोष्टींत शारिरीक व मानसीक उत्साह नित्यशः दाखविण्याचे प्रसंग पुरुषांस येतात. स्त्रियांस इतका उत्साह दाखवितां येणार नाहीं. म्हणून लढाईचे संबंधाचा प्रश्न, परराष्ट्राबरोबर अथवा वसाहतींबरोबर चालू असणारे व्यवहार, व्यापार व वसूल ह्या बाबतींत स्त्रियांस पुरुषांप्रमाणें हक्क देणें योग्य नाहीं."

वरील अभिप्राय विचार करण्यासारखा आहे. ह्यावरून स्त्रियांस पुरुषांबरोबर कोणत्या गोष्टींत सारखे हक्क नसावे, व कांहीं काळपर्यंत तरी त्यांचे उद्योग काय असावे व त्यांचें स्वातंत्र्य कोणत्या गोष्टींत असावें हें समजून येईल. स्त्रियांस व पुरुषांस सारखे हक्क असावे, व स्त्रियांस पूर्ण स्वातंत्र्य असावें हें जरी केवळ न्यायदृष्ट्या योग्य आहे, तरी ह्यापासून जर फायदा नाहीं व स्वाभावीक दुर्बलतेमुळें ह्याचा उपयोग करण्यास अडचण आहे असें समजुतदार स्त्रियांस वाटत आहे, तर या बाबतींत विशेष सावधगिरीनें चालणें हितावह आहे. वर ज्या गोष्टींचा निर्देश केला त्याशिवाय पुष्कळ गोष्टी आहेत. त्यांत त्यांस स्वातंत्र्य असणें हितावह होणार आहे. सुधारणेचें पाऊल झपाट्यानें प्रथम चालवून नंतर उलटवाणें ह्यापेक्षां सुधारणा सावकाश परंतू स्थिरपणें करणें वाईट नाहीं. सध्यां आपण कांहीं गोष्टींत दुसऱ्या सुधारलेल्या राष्ट्रांचें अनुकरण करीत आहों; परंतू ज्यांचें आपण अनुकरण करीत आहों, ते कांहीं गोष्टींत उलट घेत आहेत असें त्यांपैकीं कांहींचे वर्तनावरून दिसत आहे. म्हणून व्यर्थ आग्रहास न पडतां विचारानें पुढें पाऊल टाकणें हें आपणास योग्य आहे. असो.

गृहशिक्षण हें सद्वर्तन व सच्छिक्षण यांचें बीज आहे. यासंबंधानें मुख्य गोष्ट आईचें सद्वर्तन व शिक्षण हें आहे, म्हणून गृहशिक्षणांत आईची मातबरी फार आहे, असें आम्हीं येथवर निरूपण केलें; व आयांचे अंगीं कोणते गूण असावे, त्यांचें कर्तव्य काय, हे गूण त्यांचे अंगीं असतां व त्यांनीं आपलें कर्तव्य केलें असतां काय परिणाम होतात, हेंही आम्हीं सांगितलें आहे. परंतू गृहशिक्षणांत बापाची कांहींच मातबरी नाहीं, त्यानें स्वस्थ बसून झोप घ्यावी, किंवा वाटेल तसें वागावें असें नाहीं. गृहशिक्षणांत तोही भागिदार आहे, त्याचींही कर्तव्यें आहेत, व त्यावर जी जबाबदारी आहे ती व त्यापासून जो उपयोग होतो तो कमी आहे असें नाहीं.*

मुलांशीं आईचा जो संबंध असतो त्याहून बापाचा भिन्न असतो. बापाचा मुलांवर जितका हुकूम चालतो तितका आईचा चालत नाहीं. मुलें बापाचें जितकें ऐकतात तितकें आईचें ऐकत नाहींत. बापाला आईपेक्षां माया कमी असते; परंतू त्याला विचार जास्त असतो. बापाला मुलांच्या रागद्वेषादी अंतःकरणवृत्ती कशा आहेत हें जरी आईसारखें माहीत नसतें, तरी बुद्धी आदिकरून मनाच्या शक्ती कशा आहेत हें त्यास आईपेक्षां जास्त समजून येतें. बापाला जगाचा अनुभव बराच असतो व

---

* हिंदू स्त्रियांस शिक्षण न मिळाल्यामुळें त्या गृहशिक्षणाचें काम करण्यास अद्याप जितक्या लायक असाव्या तितक्या नाहींत. ही लायकी त्यांचे अंगीं येईपर्यंत पुरुषांवरच जबाबदारी आहे. गृहशिक्षणाविषयीं वरवर विचार करून उपयोग होणार नाहीं. मुळापासून विचार केला पाहिजे. असें समजून तसें केलें आहे.

ठेचा लागून त्यास शहाणपण आलें असतें; म्हणून तो मार्गदर्शक, खरा सल्ला सांगणारा व प्रसंगीं मदत करणारा असतो; व तो आपल्या समजुतीप्रमाणें मुलांना कल्याणाचा वारंवार उपदेश करीत असतो. बाप शहाणा व सज्जन असला म्हणजे त्यापासून शिक्षकाचे शिक्षणापेक्षां अधीक उपयोग होतो; मुलें त्याचा उपदेश नेहमीं ग्रहण करीत असतात; त्याचें आचरण त्यांच्या डोळ्यांपुढें नेहमीं असतें; त्याचें आत्मसंयमन, त्याचा धिमेपणा, त्याचें सौजन्य, त्याचा धार्मिकपणा, हीं त्यांचे डोळ्यांपुढें असल्यानें त्या गुणांचा त्यांचे मनावर परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीं.

मुलें हीं बापाची प्रतिमा होत; हीं लहानपणीं आनंदाचें, तरुणपणीं अभिमानाचें, व पुढें विसाव्याचें स्थान होत. मुलांपासून जे सूख होतें तें सांगतां येत नाहीं; परंतू तीं शरिरानें व मनानें सुदृढ असून त्यांपासून सूख व्हावें अशी जर बापाची इच्छा आहे, तर बापानें आपलें कर्तव्य करण्यास चुकतां कामा नये. तो आपलें कर्तव्य न करतां मुलांविषयीं हयगय करील, त्यांस वाईट रितीनें वागवील, व आपल्या वाईट आचरणानें त्यांस तसें वागायास लावील, तर त्यास तीं डोळ्यांपुढें नकोत असें वाटेल; त्यांपासून म्हातारपणीं सूख न होतां उलट दुःख होईल. मुलांविषयीं जी तजवीज ठेवावयाची ती एक दोन दिवस ठेवून उपयोगी नाहीं. ती सतत पुष्कळ दिवस चालू असली पाहिजे.

आतां ही गोष्ट उघड आहे कीं, मुलांविषयीं तजवीज ठेवावयाची ती फक्त त्यांचे शरीरप्रकृतीच्या संबंधानेंच अथवा केवळ शिक्षण व आचरण ह्यांच्या संबंधानेंच असून उपयोगी नाहीं. ही दोन्हीही गोष्टींचे संबंधानें असली पाहिजे.

प्रथम त्यांचे शरीरप्रकृतीचे संबंधानें बापानें काय केलें पाहिजे याविषयीं विचार करून नंतर त्यांचें शिक्षण व आचरण ह्या संबंधानें त्यानें काय केलें पाहिजे यविषयीं विचार करूं.

ही गोष्ट सर्वांस माहीत आहे कीं, फळ चांगलें मिळण्यासाठीं प्रथम जमिनीची निगा नीट ठेविली पाहिजे. केवळ रोपाच्या उत्पत्तीपासून सावधगिरी ठेवून उपयोग होत नाहीं. हीच गोष्ट मुलांस लागू आहे. तेव्हां मुलांविषयीं विचार करणें म्हणजे ज्यांपासून त्यांचा संभव त्यांविषयीं प्रथम विचार करणें जरूर आहे. ही गोष्ट पुष्कळांस बरोबर समजत नाहीं; व यामुळें लहानपणींच पुष्कळ मुलें मरण पावतात. स्त्रियांविषयीं विचार करावयाचा तो ज्या वेळेस त्यांस स्त्रीत्व येतें तेव्हांपासून विचार करणें अवश्य आहे. कारण मुलांचें शरीर सुदृढ किंवा दुर्बळ असणें हें स्त्रियांचे या वेळचे व नंतरचे स्थितीवर अवलंबून आहे.

स्त्रिया व पुरूष यांचें संगोपन करावयाचें तें एकच प्रकारें केल्यानें हीत होणार नाहीं; पुरूषांची शरीररचना भिन्न* आहे म्हणून त्यांचे संगोपनांतही कांहीं फरक असला पाहिजे. या संगोपनाविषयीं लोकांचे अज्ञानामुळें चुका होतात व परिणामीं अहीत होतें म्हणून याविषयीं थोडा ज्यास्त विचार करणें अगत्याचें आहे.

साधारण रितीनें विचार करतां स्त्रियांस स्त्रीत्व येण्याचा

---

* स्थूल दृष्टीनें पाहतां पुरूष राकट असतो; स्त्री नाजूक असते. पुरुषांचे खांदे रुंद, शिरा बळकट, हात मोठे, कवची जाड, व स्वर कठोर असतो. स्त्रीची गोष्ट निराळी आहे. स्त्रीत्व येणें ही स्त्रियांची विशेष गोष्ट आहे.

काल १३ वर्षांपासून १७ वर्षेंपर्यंत होय. स्त्रीत्व येणें ही स्त्रियांची विशेष गोष्ट आहे. हें स्त्रीत्व येण्यास त्यांचे शरिरांतील पोषक अंशाचा व्यय होत असतो. पुरुषांची अशी स्थिती नाहीं. म्हणून या कालांत पुरुषांचे शरिरास कम: जास्त त्रास पडला असतां तादृश नुकसान होत नाहीं. स्त्रियांचा जो खरा विवाहकाल तो येण्याचे सुमारास वर्ष दोन वर्षें त्यांची लहान मुलांप्रमाणें काळजी घेतली पाहिजे. हा काल स्त्रियांचा एक प्रकारचा जन्मकाल आहे असें म्हटलें असतां चालेल.

ज्याप्रमाणें कांहीं रोग लहानपणींच होतात, मागाहून उद्भवत नाहींत, त्याप्रमाणें वरील कालांत ज्या कारणांमुळें स्त्रियांस कांहीं आजार होतात तीं कारणें लहानपणीं अथवा मोठेपणीं नसतात. वेड, अपस्मार, वगैरे जे रोग कित्येक वेळां वंशपरंपरेचे होतात त्यांचा प्रादुर्भाव यावेळीं होण्याचा संभव असतो. नियमीत रितीनें रजोदर्शन न होणें, वांझपणा असणें व निशक्तपणा वाटणें, या विकारांचा प्रादुर्भाव होण्याचा काल बहुतकरून हाच असतो असें वैद्यशास्त्रकारांचें मत आहे. कांहीं स्त्रिया वांझ असतात त्याबद्दल कित्येक लोक त्यांस व देवास दोष देतात; परंतू हा अविचार आहे. वांझ असणें वगैरे ज्या गोष्टी सांगितल्या त्या पुष्कळ अंशीं आईबापांच्या अथवा सासुसासऱ्यांच्या अज्ञानामुळें अथवा हयगयीमुळें, किंवा नवऱ्याच्या अविचारामुळें होतात. आपल्या अज्ञानामुळें आपल्या हातून चुका होतात त्याबद्दल दुसऱ्याचे माथीं खापर फोडणें हा मुर्खपणा नाहीं काय? जर आपण अविचार करूं लागलों तर देवानें काय करावें!

ज्याचे हातून अविचार होईल त्यानें आपल्या अविचाराचें फळ भोगिलें पाहिजे.

ज्यांस मुली आहेत त्यांनीं ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, आपल्या मुलींस पूर्ण स्त्रीत्व येण्यासाठीं जे उपाय आहेत ते करणें हें आपलें महत्वाचें व पहिलें कर्तव्य आहे. पहिली गोष्ट ही कीं, रजोदर्शनाचे पूर्वीं व नंतर कांहीं दिवस फार सावधगिरी ठेवावी. यावेळीं मुलींच्या संगोपनाचा प्रकार मुलांच्या संगोपनाच्या प्रकारापासून भिन्न असला पाहिजे. मुलांचेही स्थितींत यावेळीं बदल होत असतो, परंतु त्यांच्या सवयी व त्यांचे व्यवसाय यांस त्यापासून फारसा व्यत्यय येत नाहीं. मुलींविषयीं विचार करतां, यावेळीं त्यांचें पुष्कळ अंशीं स्थित्यंतर होत असतें; बालपण जाऊन स्त्रीत्व येतें; व शरिरास व मनास त्रास होत असतो. मुलींचें कल्याण व्हावें अशी ज्यांची इच्छा आहे त्यांनीं त्यांस या वेळीं शिक्षण देणें, अथवा त्यांस एकादें काम करावयास सांगणें, या बाबतींत त्यांची या वेळची स्थिती मनांत आणून त्या धोरणानें वर्तन ठेवावें. मुलींस पूर्ण स्त्रीत्व प्राप्त झाल्याशिवाय शरीर व मन हीं सुदृढ नसतात. स्त्रीत्व पूर्ण दशेस येण्यासाठीं कांहीं कृत्रिम उपाय करावे लागतात असें नाहीं. शरीर व मन यांचे नेहमींचे व्यापारांविषयीं बेताबाताची काळजी घेतली असतां बस आहे. या वेळीं शारिरीक व मानसीक श्रम बेताबाताचे असावे; सर्व शिक्षण या अल्पकाळांतच देण्याविषयीं घाई करूं नये; पुढें पुष्कळ काल आहे.

जाग्रण वगैरे गोष्टींपासून मोठ्या स्त्रियांचे शरिरास विशेष त्रास होत नाहीं; परंतु बालस्त्रियांस त्यापासून त्रास झाल्याशिवाय राहत नाहीं. त्यांची मानसीक सुधारणा व त्यांचें

पूर्ण स्त्रीत्व हीं दोन्ही एकाच वेळीं उत्तम रितीनें साध्य होण्यासारखीं नाहींत. पूर्ण स्त्रीत्व येण्यास अडचण न येईल अशा प्रकारें त्यांचे शारीर व मानसीक व्यवसाय असावे. मुख्य गोष्ट म्हणजे स्त्रीत्व प्रथम साध्य करणें हें शहाणपणाचें काम आहे. मुलगा प्रौढ होण्यास जो काल लागतो त्यापेक्षां मुलीस प्रौढत्व येण्यास कमी लागतो; व थोडया कालांत ही प्रौढदशा तीस प्राप्त होत असल्यामुळें उभयतांकडून सारखे शारीर अथवा मानसीक श्रम करवून घेणें अविचाराचें काम आहे. ही गोष्ट बापानें अथवा सासऱ्यानें अथवा शिक्षकानें चांगली लक्षांत ठेविली पाहिजे; स्त्रियांची उन्नती व्हावी अशी ज्यांची मनापासून इच्छा आहे त्यांनीं तर ती विशेषेंकरून लक्षांत ठेवावी. पुष्कळांस अनुभवावरून माहीत असेल कीं, जेवल्याबरोबर आपले हातून शारीर अथवा मानसीक श्रम चांगले होत नाहींत. मानसीक श्रमाचें काम उत्तम रितीनें चालू असतां स्नायू व पक्वाशय ह्यांचा व्यापार कमी चालतो. स्नायूंचा व्यापार व पक्वाशयाचा व्यापार हे दोन्ही एकदम चालले असतां परस्परांस व्यत्यय येतो. अन्नपचनक्रिया चालली असतां, स्नायूंचा व्यापार ढिलाईनें चालतो. शिरा आकुंचीत झाल्या असतां, अन्नपचनक्रिया कमी चालते. शारीर अथवा मानसीक श्रम होण्यास स्नायूंत पुष्कळ रक्त असून त्याचें अभिसरण चांगलें चाललें पाहिजे. अन्नपचन चांगलें होण्यास पक्वाशयांत पुष्कळ रक्त असून त्याचें अभिसरण झालें पाहिजे. दोहींचा व्यापार चांगला चालण्यास रक्त कोठून आणावें ? त्याचप्रमाणें मुलीस स्त्रीत्व येण्यास तिच्या शरिरांत जास्ती रक्त खेळलें पाहिजे. तिनें मानसीक श्रम विशेष करणें झाल्यास

ज्या मज्जास्नायूंचा व्यापार चालला पाहिजे, त्यांत रक्त जास्त असलें पाहिजे. मानसीक श्रम फार केले असतां रजोदर्शनाची क्रिया चांगली चालण्यास अडचण पडते. अभ्यासासारखे मानसीक श्रम सुरू असतां वरील क्रिया ढिलाईनें चालते. प्रतिमासीक रजोदर्शन झाल्यावर, पहिल्या अठवडयांत अभ्यास किंवा दुसरें मानसीक काम कमी असावें. हा नियम प्रथम रजोदर्शन झाल्यापासून दोन तीन वर्षें म्हणजे स्त्रीत्व पूर्णपणें येईपर्यंत अवश्य पाळला पाहिजे. या वेळीं मानसीक श्रम विशेष केले असतां स्वाभावीक रितीनें स्त्रीत्व पूर्णपणें येण्यास अडचण येते. हें स्त्रीत्व या वेळेस आलें नाहीं, तर तें पुढें येणें कठीण आहे. अभ्यासासारखें मानसीक काम होण्यास पुढें सवड आहे. या वेळीं शारीर अथवा मानसीक श्रम कमी झाले तथापी हरकत नाहीं. पूर्ण स्त्रीत्व येण्यास ज्या पोषक अंशाची जरूरी आहे तो या वेळेस जर मिळत गेला नाहीं, तर रोग अथवा दुर्बलता ही शंभरांत नव्वद स्त्रियांस आल्याशिवाय राहणार नाहीं. कित्येक स्त्रिया एक दोन वेळ प्रसूत झाल्या म्हणजे पुढें अगदी थकून जाऊन अल्प वयांतच त्यांस जरा आल्यासारखें होतें, व त्या काळाचे दिवस कसे तरी लोटतात.

आम्ही या मुद्याविषयीं विशेष विवेचन करीत आहों तें, केवळ स्त्रियांच्या स्वतःच्याच सौख्याकरतां नव्हे; तर त्यांच्या शरीरसंपत्तीवर त्यांचे मुलांची लहानपणीं शरीरप्रकृती अवलंबून असते, म्हणून या गोष्टीचा विशेष विस्तार करणें जरूर आहे. कित्येक मुलांस लहानपणीं चांगलें दूध मिळत नाहीं अथवा तें कमी मिळतें, याचें कारण वर जो काळ सांगितला त्य काळांत बालस्त्रियांविषयीं

हयगय हें होय. स्त्रीत्व येण्याचा साधारण काळ म्हटला म्हणजे १३ पासून १७ वर्षेंपर्यंत आहे हें मागें सांगितलेंच आहे; व या काळांत मुलींविषयीं काळजी घ्यावी असेंही सांगितलें आहे; परंतू ही काळजी काय घ्यावयाची असा प्रश्न उत्पन्न होतो. या प्रश्नाविषयीं सविस्तर विचार प्रकृत निबंधांत करणें अप्रासंगीक आहे; तथापी, कोणत्या गोष्टींत आपण लक्ष दिलें पाहिजे व काय तजवीज केली पाहिजे हें थोडक्यांत सांगणें जरूर आहे. वर जो काळ सांगितला त्यांत बालस्त्रियांस पुष्टिवर्धक अन्न देण्याविषयीं तजवीज करणें ही पहिली गोष्ट. हें नियमीत वेळीं व नियमीत रितींनें देत असावें. फळफळावळ व दूध हीं देणें चांगलें. चहा, काफी वगैरे उत्तेजक पदार्थ देण्याचा प्रघात असेल तर तो सोडून द्यावा. दुसरी गोष्ट झोपेच्या संबंधानें. वर सांगितलेल्या काळांत बालस्त्रियांस आठ तास झोप मिळालीच पाहिजे.

ज्या व्यायामापासून मनाला सूख होईल तसा व्यायाम असावा. या वेळीं बालस्त्रियांस कामाची फार हौस असते. पाणी आणणें, दळण दळणें, वगैरे विशेष श्रमाचीं कामें त्या हौसेनें करतात; परंतू असलीं कामें त्यांजकडून बेताबातानें करवून घ्यावीं.

कपड्याचे संबंधानें विशेष काळजी घेणें जरूर आहे. प्रतिमासिक रजोदर्शन झाल्यावर पहिले अठवड्यांत म्हणजे ज्यावेळेस विशेष काळजी घेणें जरूर आहे, त्या वेळेस तर पुष्कळ लोक फार हयगय करतात. पांघुरणें धुवावीं लागतील ह्या भीतीनें ही हयगय विशेष असते. विटाळशीच्या

वाट्यास भिकार जागा व घाणेरडे कपडे येतात, ते न आले तर चांगलें.

साधारण रितीनें विचार करतां १२ पासून १८ वर्षें-पर्यंत ऋतुकाळ असतो. हवा व प्रकृतीचें मान याप्रमाणें या मुदतींत ऋतू प्राप्त होतो. उष्ण हवेंत लवकर व थंड हवेंत उशिरानें असें मान असतें. हें साधारण मान झालें. परंतू एकाच ठिकाणीं जो फरक दृष्टीस पडतो, त्यास मानसीक अथवा शारिरीक श्रमाचा अभाव, उत्तेजक पदार्थांचें सेवन, कादंबऱ्यासारख्या ग्रंथांचें वाचन, जाग्रण, पुरुषमंडळींत बसण्याची सवय व ज्या स्त्रियांस बीभत्स विषयावर बोल-ण्याची सवय असते अशा स्त्रियांचा सहवास, या योगानें ऋतू लवकर प्राप्त होण्याचा संभव असतो. ज्या स्त्रिया नाजूक, अशक्त, अथवा चैनी असतात त्या वारंवार विटाळशा होतात, असा साधारण नियम आहे.

वर ज्या प्रकारचे विकारांविषयीं निरूपण केलें, तशाच सारखा एक विकार बालस्त्रियांस व प्रौढ मुलांस होतो, तो खर पडणें हा होय. हा विकार अशक्ततेमुळें होतो; व फार करून लहानपणीं मुलांस ज्या वाईट सवयी लागल्या अस-तात त्यांपासून उद्भवतो. या गोष्टीकडे आईबापांचें जितकें लक्ष असावें तितकें नसल्यामुळें, कित्येक वेळां मुलांस अथवा मुलींस क्षय होण्याची भीती असते. ज्या वेळेस ही भीती उत्पन्न होते, त्या वेळेस आईबाप शुद्धीवर येतात. मुली हा विकार लज्जेमुळें कळवीत नाहींत. ही गोष्ट दुसऱ्यांस कळ-ण्यापेक्षां आईस कळणें अगत्याचें आहे. आई व मुलगी यांमध्यें प्रेम असेल तर, मुलगी आईस कळवील. अशा गोष्टींत आपण चौकशी कशी करावी हें म्हणणें चुकीचें

आहे. बहुतेक स्त्रिया अज्ञान असतात. यासाठीं बापानें या गोष्टींची माहिती करून घेऊन त्यांचे परिणाम काय होतात याविषयीं आईची कानउघाडणी करावी; व तिच्या द्वारें मुलीची कानउघाडणी करावी.

ज्या सवयींमुळें वरील विकार होतो, त्या सवयी वाईट मुली व मुलें यांचे सहवासानें विशेषेंकरून लागतात ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे. ह्याविषया- विषयीं मुलींस अथवा मुलांस मुळींच माहिती नसावी हें खरें आहे, परंतू त्यांस माहिती नसते कां ? मग मनांत शंका आणून काय उपयोग ? ही शंका आईबापांस फार बाधते. असल्या घाणेरड्या सवयी थोड्या मुलांमध्यें दृष्टीस पडत्या, तर त्याविषयीं इतका पाल्हाळ करण्याचें कारण नव्हतें. या सवयी बऱ्याच मुलींस व मुलांस लागतात; व त्यांपासून त्यांची फार हानी होते. ही हानी फक्त शरिराचीच होते असें नाहीं. या सवयींमुळें मुलांचें आचरण बिघडण्याचीही भीती असते; म्हणून आईबापांनीं या गोष्टीविषयीं अवश्य विचार केला पाहिजे. या गोष्टीपासून काय हानी होते हें मुलांस व मुलींस चांगलें माहीत नसतें; म्हणून मुलींच्या बाबतींत आईनें व मुलांचे बाबतींत बापानें या हानीचें स्वरूप त्यांचे मनावर ठसविलें पाहिजे. ज्याप्रमाणें आपण त्यांस अनेक गोष्टींचा उपदेश करतों, त्याप्रमाणें या गोष्टीचाही त्यांस उप- देश करून तीं या सवयींपासून पराङ्मूख होऊन त्यांचा तिटकारा करावयास लागतील अशी तजवीज ठेविली पाहिजे. ही तजवीज लहानपणापासून ठेवावी; व जर वरील विकार अशक्ततेपासून उद्भवला असेल तर खाण्यापिण्याचा बंदो- बस्त ठेवावा, व मलशुद्धी साफ होईल अशी व्यवस्था ठेवावी,

वाईट सवयीचा परिणाम असेल, तर तसे उपाय करावे. नुसत्या दाबण्यानें कार्य होणार नाहीं. प्रेमानें व शहाणपणानें कानउघाडणी करीत गेलें पाहिजे.

स्त्रियांस व विशेषेंकरून बालस्त्रियांस गर्भसंभवानंतर कांहीं विकार होतात, त्यांपैकीं ओकणें हा एक होय. या विकारानें स्त्रियांस फार त्रास होतो; गर्भपात होईल अशी भीती वाटते; केव्हां केव्हां त्यांची प्रकृती इतकी हलक होते कीं, दातखिळीही बसते व प्राण जातो कीं काय असें वाटतें. अशी स्थिती झाली असतां ज्या अन्नापासून प्रकोप होतो तें वर्ज्य करणें हा एक उपाय आहे. या वेळीं त्यांचे कोठ्याची स्थिती कांहीं चमत्कारीक असते; म्हणून औषध-पाण्याचा उपाय करण्यापूर्वीं खाण्याचे निरनिराळे पदार्थ* देऊन कशाविषयी त्यांची आवड आहे, हें प्रथम पाहणें जरूर आहे. स्त्रिया गर्भार असतां त्यांस फार जपलें पाहिजे. या वेळीं त्यांस जपणें म्हणजे त्यांचे मुलांस जपणें होय. गर्भ जों जों वृद्धिंगत होतो तों तों त्यांस जास्त व चांगल्या अन्नाची जरूरी असते. पुष्कळ ठिकाणीं असें पाहण्यांत

---

* सकाळीं जें खावयास द्यावयाचें तें कांहीं पातळ असावें. केव्हां केव्हां स्त्रिया सकाळीं निजून उठण्यापूर्वीं अंथरुणांत असतां त्यांस कांहीं खावयास द्यावें; व त्यांनीं तसेंच एक दोन तास अंथरुणावर पडून राहावें; उठूं नये. दूध व चुन्याची निवळी एकत्र करून तें दूध अथवा जवसाचें पाणी देऊन पाहावें. बर्फ मिळाल्यास त्याचे तुकडे तोंडांत धरावयास द्यावे. इतके उपाय करूनही ओकण्याचा विकार बंद न होईल, तर वैद्य पाहावा हें सांगावयास नको. गर्भार स्त्रियांस रेचक देणें इष्ट नाहीं. बेताचा व्यायाम, खाण्याचा बंदोबस्त, पिकलीं फळें, व ताजा भाजीपाला वगैरे साधारण उपचार करावे.

येतें कीं, स्त्रिया या काळांतसुद्धां दोनदांच खातात. हा प्रघात बरोबर नाहीं. एकाच वेळीं एकदम न खातां त्यांस तीन चार वेळां थोडें थोडें खावयास द्यावें; त्यांचें जेवण साधें परंतू पुष्टिवर्धक असावें; त्यांस भूक लागली असतां खावयास द्यावें; त्यांची भूक मारूं नये. परंतू खापरखुंट्या, चिकणमाती, राख, खडू वगैरे भिकार जिनसांवर त्यांची वांछा जात असेल तर त्या खाऊं देऊं नये.

पोषाकाच्या संबंधानें मुख्य गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती. ही कीं, तो आवळ नसावा; त्यांचे कोणतेही अवयव दाबले जाऊं नयेत. त्यांचें स्नान कोंबट पाण्यानें होत असावें; फार ऊन अथवा थंड पाणी वर्ज्य करावें. त्यांना सकाळीं उठावयास उशीर लागला असतां, अथवा त्या दुपारीं निजल्या असतां, त्यांस हरकत करूं नये. यावेळीं त्यांस पोटांतील गर्भाच्या योगानें श्रम होत असतात. इतर वेळापेक्षां या वेळीं त्यांना जास्त विश्रांती पाहिजे. या वेळीं विशेषेंकरून स्त्रियांची आनंदवृत्ती असावी; कारण या वेळचे त्यांचे वृत्तीवर मुलांची वृत्ती कांहीं अंशीं अवलंबून असते. स्त्रिया अशक्त झाल्या असतां त्यांचीं मुलें अशक्त होतात; त्यांच्या मनाला क्षोभ झाला असतां गर्भासही अपाय होतो.

गर्भारपणीं गर्भपात होण्याची भीती असते. शोधाअंतीं असें समजलें आहे कीं, तीस वर्षांचे आंतील स्त्रियांमध्यें याचें प्रमाण सुमारें एकचतुर्थांश असतें. ही गोष्ट पोटावर धपका बसणें, जड ओझें उचलणें, अथवा मलशुद्धी होतांना त्रास होणें या कारणांमुळें, अथवा अतिशय भय, राग अथवा दुःख यामुळें होण्याची भीती असते. कित्येक स्त्रियांचा तर दर खेपेस गर्भपात होत असतो; व त्याबद्दल

त्या प्रारब्धाला दोष देतात. हा त्यांचा गैरसमज आहे. वरील प्रकार झाल्याबरोबर सुज्ञ वैद्याची गांठ घेणें हें पहिलें काम. या बाबतींत नवऱ्यानें अथवा घरांतील मंडळींनें यत्किंचित्‌सुद्धां चालढकल करणें इष्ट नाहीं. हा प्रकार दोन अडीच महिन्यांचे आंत असतां* त्याचें फारसें भय नसतें; परंतू यानंतर झाला असतां अपाय होतो.

स्त्रियांचा प्रसूतिकाळ+ हा त्यांच्या आयुष्यांतील कठीण

---

* गर्भपात होण्यापूर्वीं जीं लक्षणें होतात तीं:--थंडी वाजून ताप येणें, तहान लागणें, अस्वस्थ वाटणें, काळीज धडधड उडणें, पाय गार असणें व चक्कर येणें. केव्हां केव्हां पाठीचा व पोटाचा खालचा भाग दुखतो. हें दुःख सतत चालतें किंवा राहून राहून चालतें. हीं सर्व लक्षणें एकदम होतात असें नाहीं. यांपैकीं कांहीं लक्षणें जरी होऊं लागलीं तरी तीं स्त्रियांनीं चोरून ठेवूं नये. त्यांनीं प्रथम हातचें काम एकीकडे ठेवून पातळ बिछान्यावर आडवें स्वस्थ पडून राहावें. चळवळ बिलकूल करूं नये.

\+ प्रसूती होण्यापूर्वीं सुमारें दोन अठवडे प्रसूतीचीं लक्षणें समजून यावयास लागतात. गर्भ थोडा खालीं उतरतो; पोट थोडेंसें लहान दिसूं लागतें; श्वासोच्छ्वासक्रिया थोडीशी सुकर होते. यामुळें स्त्रियांस हलकें वाटतें, परंतू त्यांस फारसे श्रम करूं देऊं नये. शेवटीं गर्भ संकुचीत व्हावयास लागतो. हा संकोच बरेच दिवस होत असतो. या योगानें त्यांस कित्येक वेळां झोप येत नाहीं. या संकोचामुळें त्यांची पाठ व मांड्या दुखतात. हीं प्रसूतीचीं खरीं लक्षणें आहेत असें समजावें. प्रसूतीचे पूर्वीं कित्येक वेळां थंडी वाजून हुडहुडी भरते. परंतू याविषयीं भीती बाळगण्याचें कारण नाहीं. गरम कपडा पांघरावयास देणें व कारणपरत्वें ऊन पाणी पिण्यास देणें

काळ होय. ही वेळ विशेषतः बालस्त्रियांचे जिवावरची असते या वेळीं त्या थकून जातात; परंतू त्यांनीं धीर सोडून उपयोगी नाहीं. या वेळीं थोडें दुःख होणें स्वाभावीक आहे. तें वैद्याला कमी करतां येण्यासारखें नाहीं; म्हणून त्यांस धीर देणें ही मुख्य गोष्ट आहे, परंतू यास तरी यत्ता आहे. यत्तेबाहेर गोष्ट दिसून यावयास लागल्यास वैद्य पाहण्यास आळस करणें अहितावह असतें. प्रसूतीच्या वेदना होऊं लागल्या असतां बोभाटा करण्यास स्त्रिया अनमान करतात. या बाबतींत त्यांच्या समजुती चमत्कारीक आहेत. कित्येक वेळां पुरूषही गोंधळून जाऊन स्वस्थ बसतात; परंतू यामुळें पुष्कळ वेळां हानी होते; व मागाहून त्यांस पश्चात्ताप होतो. ही स्थिती पुष्कळांचे पाहण्यांत आली असेल. पुढील गोष्ट प्रत्यक्ष आमचे पाहण्यांत आली. नांव गाव सांगणें आम्हास प्रशस्त दिसत नाहीं.

एकदां असें झालें कीं, एका गृहस्थाची बदली झाली. तो सुशिक्षीत असून त्यास पगारही मोठा होता. गावाबाहेर चांगला बंगला पाहून तेथें तो व त्याची १९ वर्षांची बायको अशीं सुखानें राहत होती. बायको लहान होती, परंतू शहाणी व शिकलेली होती. नवरा थोडासा हिरवट असे, तथापी नवराबायकोचें प्रेम चांगलें असे. धन, शिक्षण, सुशीळ स्त्री, वगैरे गोष्टींची अनुकूळता असली म्हणजे प्रपंचांत पुष्कळ सूख होतें. या सर्व गोष्टी वरील गृहस्थास

---

एवढा उपाय बस आहे प्रसूतीविषयीं वैद्यांचे अभावीं जी तजवीज ठेवावयाची ती ही कीं, उठणें, बसणें वगैरे गोष्टींत बालस्त्रियांस पूर्ण मोकळीक असावी व त्यांस वारंवार प्रश्न विचारून त्रास देऊं नये.

अनुकूळ होत्या. त्याची बायको गर्भार राहून नऊ महिनें पूर्ण झाले. ज्याप्रमाणें कांहीं स्त्रियांस प्रसूतीच्या वेळीं खोड असते, त्याप्रमाणें या बाईसही होती. ही गोष्ट नवऱ्यास माहीत होती, म्हणून मायेचें मनुष्य कोणी जवळ असावें सबब त्यानें आपल्या आईस आणिलें. त्यास बाहेर गावीं जावयाचें होतें; परंतू त्यानें बेत तहकूब केला. वैद्य येण्यापूर्वीं समंजस मनुष्यानें काय केलें पाहिजे याची त्यानें पुस्तकांतून व अन्य रितीनें माहिती करून घेतली होती. तात्पर्य, येथपर्यंत सर्व ठीक व्यवस्था होती. बाई प्रसूत होण्याची वेळ जवळ येऊन ठेपली; परंतू ही गोष्ट बायकांनीं कळविली नाहीं. दोन तास गेले; चार तास गेले; परंतू उलगडा होईना. नवऱ्यास हें वर्तमान कळलें; परंतू तो स्वस्थ होता. वैद्यास बोलावणें पाठवावें असें त्याच्या मनांत आलें, पण बायकांस हें प्रशस्त वाटलें नाहीं. सबंध दिवस व रात्र निघून गेली; परंतू बाईची सुटका झाली नाहीं. शेवटीं तिनें नवऱ्यास सांगितलें कीं, माझी गत ठीक दिसत नाहीं. तुम्हास वाटेल तें करा. या वेळेस नवऱ्याचे व दुसऱ्या माणसांचे डोळे उघडले व त्यांनीं वैद्यास बोलावणें पाठविलें. वैद्य आला, परंतू बाईस पाहण्याची त्यास परवानगी मिळाली नाहीं. वैद्य नुसता येऊन बसला. दोनप्रहर उलटले. बाई घाबरली. परंतू बायाबापड्यांचेच उपचार चालू होते. शेवटीं नवऱ्यानें सिव्हील सर्जन आणविला. डाक्टरानें नाडी पाहिली, परंतू त्यास ठीक चिन्ह दिसेना. नंतर श्वास आहे किंवा नाहीं म्हणून त्यानें पाहिलें; परंतू थोडेच वेळापूर्वी प्राण निघून गेला आहे असें त्यास वाटलें. तथापी खात्री करण्यासाठीं त्यानें किरकोळ कांहीं उपाय केले. शेवटीं

ब्याटरीसुद्धां लावून पाहिली; परंतू व्यर्थ. वरील गृहस्थाची स्नेही मंडळी जमली. त्यांजपाशीं डाक्टरानें सांगितलें कीं, "मला प्रथमच बोलावणें पाठविलें असतें, तर बाई व मूल हीं दोन्ही वांचलीं असती; थोड्या वेळानें बोलावणें केलें असतें, तर निदान बाई खास वांचली असती; बाईची घटका घातल्यावर उपायास लागले असतां काय उपयोग? बाया माणसांनीं अडाणीपणानें पोट चोळून सर्व नाश केला." बायको मरण पावली म्हणून नवऱ्यानें व त्याच्या आईनें फार आक्रोश केला. असो. अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें आहेत. या उदाहरणावरून ही एक गोष्ट स्पष्ट दिसून येते कीं, वेळेवर योग्य उपाय केला नाहीं, तर मोठी हानी होण्याचा संभव असतो. दुसरें असें कीं, प्रस्तूत स्त्रीवैद्य असण्याची फार जरूरी आहे.* ही आवश्यकता फक्त स्त्रियांचे प्रसूतीच्या वेळीं अथवा मागाहून आहे इतकेंच नाहीं, तर अन्य वेळीं त्यांची प्रकृती बिघडली असतांही आहे. स्त्रीवैद्य असणें फार हितावह आहे. ज्यांस मुलें झालीं आहेत अशा स्त्रीवैद्य तर फार उपयोगाच्या; कारण त्यांस सर्व गोष्टींचा अनुभव असतो. स्त्रिया स्त्रियांबरोबर जितक्या मोकळ्या मनानें वागतील तितक्या पुरुषांबरोबर वागणार नाहींत. फार तर काय, त्या कांहीं रोगांचे बाबतींत कांहीं वेळां प्रत्यक्ष नवऱ्याजवळ देखील बोलत नाहींत. अंगाला परपुरुषाचा हात लागेल या भीतीनें त्या आपलें दुखणें चोरून ठेवतात. कित्येक कदाचित् म्हणतील कीं,

---

* ही व्यवस्था कांहीं मोठमोठ्या शहरांतून प्रचारांत येत आहे; परंतू अजून बऱ्याच ठिकाणीं तिचा प्रसार होणें अवश्य आहे.

स्त्रियांचें हें वर्तन मुर्खपणाचें आहे, तर असें समजूं नये. त्यांचे अंगीं लज्जा फार असते. ही असणें हेंच त्यांस भूषण आहे. त्यांची लज्जा राखण्यासाठीं योग्य उपाय करणें आपलें कर्तव्य आहे. हें न केलें असतां आपण दोषास पात्र आहों. स्त्रीवैद्य असावे म्हणून जो प्रयत्न चालू आहे तो स्तुत्य आहे. या कृत्यापासून सर्वांचें हीत आहे; म्हणून त्यास सर्वांनीं मदत करणें योग्य आहे. पुष्कळ लोकांचा या कृत्याविषयीं गैरसमज झाला आहे; म्हणून ते उदासीन असतात. कोण-तीही नवीन गोष्ट आरंभिली असतां कांहीं लोक आपल्या स्वभावाप्रमाणें तिचा उपहास करतात; त्याप्रमाणें कांहीं उप-हास करणारे सापडतील; परंतू त्याकडे लक्ष द्यावयाचें नाहीं.

स्त्रियांचे म्हणजे पर्यायेंकरून मुलांचे हितासाठीं प्रसूती-पूर्वीं व नंतर स्त्रियांविषयीं जी काळजी घेणें जरूर आहे, ती न घेतली तर पुष्कळ अहीत होतें. थंडी होण्याचे अथवा वायू होण्याचे भीतीनें हल्लीं जी पुष्कळ ठिकाणीं वहिवाट चालू आहे ती चांगली नाहीं. स्त्रिया बाळंत झाल्या-वर त्यांस एका लहान कोठडींत दोन तीन महिने काढावे लागतात, कित्येक ठिकाणीं खोलींत मोरीही नसते. खोलींत वाऱ्याचा प्रवेश होऊं नये म्हणून पूर्ण बंदोबस्त केलेला असतो. जेवणखाण, न्हाणमाखण वगैरे सर्व विधी दहा दिवसपर्यंत खोलींत होतात. तींतच दिवाबत्ती जळत असते; तींतच शेकशेगडी ठेवलेली असते; तींतच शेजारी-पाजारी समाचार घेण्यासाठीं येऊन बसतात. या सर्व प्रका-रांमुळें खोलींतील हवा दूषीत होते. बाळबाळंतीण दहा दिवसपर्यंत तर घाणेरड्या हवेचें ग्रहण करतात. शरिरास अवश्य जो प्राणवायू तो शुद्ध स्थितींत न मिळाल्यामुळें बाळ

व बाळंतीण या दोहोंची प्रकृती वारंवार बिघडते. बाळंतपणचे पहिले दहा दिवस हे स्त्रियांचे मोठे जिवावरचे दिवस होत. हे पार पडले म्हणजे घरच्या मंडळीचे जिवांत जीव येतो. पुष्कळ मुलें दहा दिवसांतच मरण पावतात व कांहीं मागाहून मरतात. या गोष्टीस पुष्कळ अंशीं वरील स्थिती कारण आहे. यासाठीं बापानें अथवा सासऱ्यानें अथवा दुसऱ्या पालकानें या बाबतींत विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. आपले वाडवडील हीच गोष्ट करीत आले असें नेहमीचें वचन सांगण्यांत अर्थ नाहीं. बाळंतिणीची खोली मोठी असून तींत थोडीबहूत तरी हवा येत असावी. तींत मोरी तर अवश्य असावी. ज्या खोलींत मोरी नाहीं तशा खोलींत बाळंतीण नसावी; तिचे खोलींत दिवा जळत ठेवूं नये; दिवा ठेवणें भाग पडेल, तर लांब अंतरावर ठेवावा, म्हणजे त्याची घाण परभारें बाहेर जाईल. बाळंतिणीचे अंगांत उष्णता कायम राहावी म्हणून हवा बंद करून टाकण्याची वहिवाट आहे; परंतू उष्णता, खाण्यापिण्याचे पदार्थ, गरम कपडे व औषधें यासंबंधानें योग्य व्यवस्था केली असतां ती कायम ठेवितां येते. अशा कामाकरतां थोडा जास्त पैसा खर्च होईल, परंतू तो करणें अवश्य आहे. बाळबाळंतीण ह्यांची प्रकृती चांगली असावी, वैद्याला फी देण्याचें कारण पडूं नये व मुलें रोगी होऊं नयेत, अशी जर बापाची इच्छा असेल तर त्यानें खर्चाकडे पाहूं नये. ज्यास ऐपत आहे त्यानें अशा बाबतींत खर्चास भिऊन हयगय करणें दोषास्पद आहे. स्त्रियांचे असमंजसपणामुळें वरील उपाय करण्यास हरकत येईल, शेजारीपाजारी भय घालतील; परंतू त्याकडे दुर्लक्ष करून बाळबाळंतिणीचे हितावर नजर पुरविणें जरूर आहे. गरि-

बीमुळें किंवा दुसऱ्या कारणांमुळें सर्वांस मोठी जागा मिळण्याचा संभव नाहीं हें खरें आहे, परंतू ज्यास वरील उपाय करण्याची सोय आहे, त्यांनीं तरी ती करण्यास आळस करूं नये.

मूल जन्मास आल्यावर त्याच्या संबंधानें पहिलें अन्हीक उरकल्यानंतर त्यास प्यावयास लावणें ही प्रथम गोष्ट. ही गोष्ट केवळ मुलाच्याच हिताची नसून आईच्याही हिताची आहे. या वेळीं तिचा गर्भाशय जसा संकुचीत व्हावा तसा न झाला, तर विकार होण्याचा पुष्कळ संभव असतो; म्हणून स्त्रियांनीं कांहीं विशेष कारण नसतां पाजण्याचा आळस करूं नये. पाजण्यापासून मुलांस तर सूख होईलच, परंतू त्यांसही सूख होईल. मुलांस नियमीत वेळानें नियमीत पाजण्याची सवय ठेवणें जरूर आहे. कारण, उगीच फार वेळ पाजीत बसल्यानें दूध कमी न होतां तें जास्ती येण्याची भीती असते. प्रथम दोन अथवा तीन तासांनीं, नंतर जास्ती वेळानें पाजण्याची व्यवस्था ठेवावी. मुलें रडतात म्हणून वाटेल तेव्हां पाजणें इष्ट नाहीं. नियमीत वेळ जाऊं दिल्यानें आईच्या अंगावर दूध येतें; तीस विसावा सापडतो; व मुलाच्या पचनेंद्रियास दूध पचविण्यास सवड मिळते. पहिले दोन दिवसांचें दूध खराब असतें, अशा समजुतीवर कित्येक स्त्रिया तें मुलांस पाजण्याचा कंटाळा करतात; परंतू ही समजूत चुकीची आहे. या दुधानें थोडे फार रेच होतील; पण पचनक्रियेला ही गोष्ट फार अवश्य आहे; इतकेंच कीं, असलें दूध फार पाजूं नये. मुलास वेळच्या वेळेवर पुष्कळ दूध मिळून जर तें अशक्त राहील, तर दुधांत कांहीं तरी विकार आहे असें सम-

जावें; व आईच्या खाण्यापिण्याचा वगैरे बंदोबस्त ठेवावा. बाळंतिणीस काय खावयास द्यावयाचें हें बायकांस साधारण रितीनें माहीत असतें. जी मुख्य गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती ही कीं, ती अंथरुणावर जितकी पडून राहील तितकें चांगलें. स्वस्थ पडून राहिल्यानें गर्भाशय जितका लवकर संकुचीत होतो, तितका बसण्यानें अथवा चालण्यानें व्हावयाचा नाहीं. या वेळीं मुख्य धोरण गर्भाशय संकुचीत करण्याविषयीं असावें. दुसरी गोष्ट अशी कीं, तिनें चहा वगैरे प्रकोप करणारे पदार्थ सेवन करणें, अथवा अतिभोजन करणें हें वाईट आहे; तिनें आपलें तोंड संभाळलें पाहिजे; मुलांस औषध देण्यांत अर्थ नाहीं.

कित्येक आयांचे अंगावर कमी दूध येतें; हें कित्येक वेळां प्रसूतीनंतर त्यांस जे विकार होतात त्यांमुळें होय. परंतू बहुतकरून ज्या स्त्रिया चैनी व आळशी असतात त्यांस दूध कमी असते. कित्येक वेळां दुसरेंही कारण असतें. यासाठीं उभयता स्त्रीपुरुषांनीं शहाणपणानें वागणें यांतच मुलांचें हीत आहे. जितके दिवस मूल आईच्या* अंगावर पीत आहे तितके दिवस तीस मानसीक श्रम बेता-

---

*आईनें ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, जें आपण खातों तें केवळ आपल्यासाठीं नसून आपल्या मुलासाठींही आहे. कांहीं पदार्थ आपणास सोसतील, परंतू ते मुलास सोसणार नाहींत. तिला कमी दूध येऊं लागलें तर वरचें दूध घालण्यापूर्वीं शुद्ध हवा घेणें, बेताचे श्रम करणें, नियमीत वेळीं नियमीत जेवणें व बेताची झोप घेणें हे उपाय करून पाहावे. इतकें करून अंगावरचें दूध पुरत नसेल, तर मुलास रात्रींच्या वेळीं वर दूध घालावें.

बाताचे असावे. तिनें काळजी वगैरे गोष्टींनीं आपल्या मनास त्रास होऊं देऊं नये. तात्पर्य, या वेळीं तिच्या मनाची समतोलता ठेवणें फार महत्वाचें आहे.

वर ज्या गोष्टी सांगितल्या त्या करून जर मुलास दूध मिळण्याचा मार्ग नसेल तर मग दाई पाहण्याचे भरीस पडावें; परंतू ही सशक्त आहे एवढ्याच गोष्टीवर जाऊं नये. तिचें मूल कसें आहे हें पाहिलें पाहिजे; तिचें वय अठरांपासून तीस वर्षांचें असावें; ज्या वेळेस मुलाची आई प्रसूत झाली असेल त्याच सुमारास दाई प्रसूत झाली असावी.

मुलांचें मुख्य अन्न आईचें दूध आहे असें वर सांगितलें आहे; परंतू हें कांहीं कारणांनीं मिळण्यासारखें नसेल अथवा दाई मिळण्यासारखी नसेल तर गाईचें दूध पाजावें. परंतू ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, गाईच्या दुधांत स्त्रियांच्या दुधापेक्षां पोषक अंश जास्ती असतो व साखरेचा अंश कमी असतो; म्हणून स्त्रियांच्या दुधांत जे गुण आहेत ते गाईच्या दुधांत साधारणपणें येण्यासाठीं त्यांत थोडें *पाणी व थोडी

---

*गाईच्या दुधांत पाणी घालणें तें मुलाच्या वयाप्रमाणें घालावें. एक दोन महिन्याच्या आंतील मुलास दूध देणें तें जितकें दूध तितकें पाणी असें द्यावें; परंतू ही गोष्ट घरच्या गाईच्या दुधास लागू आहे. गवळ्यापासून दूध घेतलें असतां निमें पाणी बस आहे. मुलांस आईचें अथवा गाईचें दूध मानवतें किंवा नाहीं हें मुलाच्या मळावरून समजतें. म्हणून या गोष्टीकडे आईचें दररोज लक्ष असावें. प्रथमतः तिनें स्वतऔषध घेण्याच्या अथवा मुलास देण्याच्या भरीस पडूं नये. खाणें, पिणें वगैरे गोष्टींविषयीं अथवा वर दूध चालू असल्यास त्याविषयीं चांगली व्यवस्था ठेविली म्हणजे पुष्कळ वेळां कार्य होईल.

साखर घालून देणें हितावह आहे. बायका नुसतेंच दूध देतात व तें मुलांस सोसलें नाहीं म्हणून हाका मारतात. गाईचें दूध ताजें मिळालें तर फार उत्तम; व उष्ण देशांत तर विशेषेंकरून दर खेपेस ताजें मिळालें तर बरें असतें.

मुलें आईस तोडतात म्हणून तिचें दूध बंद करूं नये. दायांकडून मुलांस पाजविणें हें विशेष प्रसंगीं व अनिवार्य कारणास्तव आहे असें समजावें. आईच्या दुधावर जितके दिवस काढवतील तितके बरें. दूध तोडणें तें हळू हळूं तोडावें व तें रात्रीस तोडावें. हौसेसाठीं मुलांस भात वगैरे दुसरें अन्न लवकर सुरू करण्याच्या भरीस पडूं नये. भात, भाकर वगैरे पदार्थ कांहीं दात आल्याशिवाय देणें प्रशस्त नाहीं. दात येईपर्यंत पातळच पदार्थ पाहिजेत. मुलांस चांगलें दूध बरेच दिवस मिळावें अशी जर बापाची इच्छा असेल, तर आयांच्या खाण्यापिण्याची वगैरे तजवीज चांगली ठेविली पाहिजे. याप्रीत्यर्थ दोन पैसे अधीक लागले तरी हरकत नाहीं. अशा कामाकरतां पैसे खर्च करणें हा व्यर्थ व्यय नाहीं. साधारण नियम पाहतां गाईस सरकी, भूस वगैरे खावयास घातलें असतां ती चांगलें दूध देते; परंतू तिला धर्मखुंटाशीं बांधून नुसतें वाळलेलें गवत घातलें, तर ती कमी दूध देते व या दुधांत कसही कमी असतो. हाच नियम साधारण रितीनें आईच्या दुधाच्या संबंधानें आहे.

मुलें लहानपणीं किरकीर करतात म्हणून पुष्कळ स्त्रिया त्यांस अफू देतात. हा प्रघात परिणामीं वाईट असतो. मुलें चिरचीर करतात तीं फारकरून त्यांस पोटभर दूध न मिळाल्यामुळें, किंवा त्यांच्या संगोपनाविषयीं हयगय केल्यामुळें. त्यांस अफू दिल्यानें तीं गुंगून पडतात व आईबापांस

विसावा सापडतो ही गोष्ट खरी आहे; परंतू आपल्या थोड्या दिवसांच्या सुखासाठीं त्यांच्या निरंतरच्या सुखाकडे दुर्लक्ष करणें हें शहाणपणाचें आहे कीं काय याविषयीं मुख्यत्वें बापानें विचार करावा.

मुलें आईच्या गर्भांत असतात तोंपावेतों त्यांचें आपोआप पोषण होत असतें. परंतू तीं बाहेर आल्यावर त्यांस सर्वच गोष्टी नवीन. तीं सर्वांशीं परतंत्र असतात. ज्या गोष्टींची त्यांस सवय नसते त्यांपासून त्यांस विकार होऊन तीं मरतात. पहिल्या महिन्याच्या आंतील शेकडा दहा, पहिल्या वर्षाच्या आंतील शेकडा पंधरा, व चार वर्षांच्या आंतील शेकडा पंचवीस. यावरून लहानपणीं मुलांची काळजी घेणें किती जरूर आहे हें उघड दिसून येईल.

ऋतुमान व हवामान यांप्रमाणें मुलांस कपडे घालणें चांगलें आहे; परंतू वर्षभर त्यांस फलाणीसारखा गरम कपडा घालणें अवश्य आहे. अशा प्रकारच्या कपड्यापासून थंडी व उष्णता यांचें मान समान राहतें; व घाम वगैरे दूषीत अंशाचें शोषण होतें- मुलांस स्वच्छ ठेविलें पाहिजे इतकेंच नाहीं, तर त्यांचे कपडेही स्वच्छ ठेविले पाहिजेत. ते उन्हांत नुसते वाळवून स्वच्छ होत नाहींत. ज्याप्रमाणें रोपांस हवेची व उन्हाची आवश्यकता असते त्याप्रमाणें ती मुलांसही असते. ज्याप्रमाणें रोप अक्षयीं सावलींत असल्यानें त्यास अपाय होतो त्याप्रमाणें मुलांची गोष्ट आहे. बारा दिवस झाले म्हणजे त्यांस वस्त्रांत गुंडाळून हिंडविलें पाहिजे. हवेचें मान माफक आहे किंवा नाहीं ही गोष्ट मात्र लक्षांत ठेवावी.

लहानपणीं दात येणें, हगवण, जंत, डांग्याखोकला वगैरे विकार हे मुलांचे विशेष रोग होत. या विकारां-

विषयीं वेळेवर तजवीज न केली, तर मुलांचें शरीर क्षीण होऊन तीं जन्मभर अशक्त राहतात व रोज त्यांची कांहींना कांहीं तरी कुरकूर असते. मुलांस दात येऊं लागले म्हणजे कांहीं विकार होतात. दात येत असतां जोंपावेतों अस्वस्थता व थोडा ताप यांपेक्षां दुसरा विकार होत नाहीं, तोंपावेतों स्वस्थ असावें. परंतू ज्या वेळेस हिरड्या सुजून मुलांस त्रास होतो, अथवा त्यामुळें दुसरे विकार होतात त्यावेळेस चालढकल करणें परिणामीं चांगलें नसतें.

बायका अज्ञानामुळें मुलांची हगवण अफू वगैरे औषधें देऊन एकाएकी बंद करण्याविषयीं तजवीज करतात; परंतू ही त्यांची चूक आहे.* पोटांतील दूषीत अंश बाहेर पडणें

---

*हगवणीसारखा आमांश हा दुसरा एक विकार होतो. हा विकार झाला असतां प्रथम एरंडेल तेल देऊन कोठा साफ होऊं द्यावा; मग दुसरीं औषधें द्यावीं. या विकारानें मुलांचा जीव हलक होतो; म्हणून त्यांचा उपासमार होऊं देऊं नये. अमांश झाला असतां फार जपलें पाहिजे. हा कांहीं दिवस, कांहीं महिने, अथवा कांहीं वर्षंपर्यंतसुद्धां असतो. हा फार दिवस होत असेल तर थारेपालट करणें हा चांगला उपाय आहे. जेथें हवा नेहमीं थंड अथवा नेहमीं रुक्ष असते तें ठिकाण या विकारास चांगलें.

जंत होणें, पोट फुगणें, अन्नावर वांछा नसणें, तोंडाला पाणी सुटणें, झोपेंत दात खाणें वगैरे या विकाराचीं लक्षणें आहेत. प्रथम एरंडेल देऊन कोठा साफ होऊं द्यावा. नंतर सांटोनाईनची चिमूट रात्रीं निजतांना साखरेंत द्यावी.

डांग्या खोकला झाला असतां मुलांस थंड हवेंत अथवा ओलांत हिंडूं देऊं नये. त्यांस फलाणीची बंडी घालावी. त्यांस नित्य सकाळीं गाईचें तूप दिलें असतां आराम वाटेल.

वाईट नाहीं. हगवण एक दोन दिवसांत बंद न झाली, तर प्रथम सौम्य औषधें व हलकें अन्न हीं द्यावीं. मुलांस ओलांत अथवा उघडे फिरूं देऊं नये. त्यांस गरम कपडे घालावे व त्यांचे पाय उघडे नसावे. मुलांस जंताचा विकार फार होतो. हा गोड पदार्थ खाण्यानें होतो अशी पुष्कळ लोकांची समजूत आहे. परंतू हा घाणेरडें पाणी पिण्यानें होतो असें अलीकडील विद्वानांचें मत आहे. मुलें वाटेल तसलीं भांडीं घेऊन वाटेल तें पाणी पितात. या बाबतींत त्यांस घरबंद नसतो.

मुलें उन्हाळ्यांत गळाठून जातात. जीं मुलें उन्हाळ्यांत जन्मतात त्यांच्या आईबापांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवून थारेपालट करण्यासाठीं त्यांस थंड हवेंत नेणें हें चांगलें. हें न च जमेल तर संध्याकाळीं नदीच्या काठीं अथवा बागेंत त्यांस हिंडविण्याची तजवीज ठेवणें हितावह आहे. असो. या प्रकारच्या विकारांविषयीं दिग्दर्शन करण्यापेक्षां विशेष सविस्तर विचार करणें अप्रासंगीक होईल, म्हणून दुसऱ्या ज्या गोष्टींकडे बापानें लक्ष दिलें पाहिजे त्यांविषयीं आपण विचार करूं.

मुलांवर बापाची ममता असणें हें बापास व मुलांस हितावह आहे, परंतू बापाची ममता मुलांवर असल्यानें आईस फार संतोष होत असतो. स्वतःच्या जिवापेक्षां आईस तीं प्यारीं असतात. ज्या स्त्रिया चांगल्या आहेत त्यांस आपलीं मुलें चांगलीं आहेत असें लोकांनीं म्हटलें असतां जितका संतोष होतो, तितका लोकांनीं त्यांच्या सौंदर्याची प्रशंसा केली असतां होत नाहीं; ही प्रशंसा नवऱ्यानें केली तर त्यांस फारच संतोष होतो. मुलांच्या संगोपनासाठीं आयांना फार कष्ट सोसावे लागतात; हे कष्ट त्यांच्या त्याच सोसूं जाणत; हे सोसण्यासाठीं मुलांवर जें त्यांचें अप्रतीम

प्रेम असतें त्यामुळें त्यांस हुशारी असते. हें प्रेम ढळावयास लागलें म्हणजे त्यांच्या हातून तितके कष्ट होणार नाहींत; म्हणून त्यांचें प्रेम कमी होणार नाहीं अशाविषयीं बापानें खबरदारी घेतली पाहिजे. मुलांवर आपलें प्रेम आहे हें त्यानें कृतीनें दाखविलें पाहिजे.

मुलांचें संगोपन करणें हें आईचें कतव्य आहे ही गोष्ट खरी आहे; तथापी बापानें हें काम तिच्या एकटयावर लोटून देऊन आपण स्वस्थ बसणें योग्य नाहीं. या कामांत त्यानें तीस मदत करणें जरूर आहे. ज्या ठिकाणीं पदरीं मुलें बरींच असून गरिबी आहे त्या ठिकाणीं बिचाऱ्या एकटया आईनें काय करावें ? अशा स्थितींत बापानें तीस संगोपनाच्या कामांत सहाय्य करणें हें तीस फार सुखावह होणार आहे. अडचणीच्या वेळीं अथवा सवडीप्रमाणें मुलांस जेऊंखाऊं घातलें असतां, अथवा त्यांस पाळण्यांत निजवून पाळणा हलवीत बसलें असतां अथवा त्यांस संभाळीत बसलें असतां, लोक आपणास हसतील ही गोष्ट त्यानें मनांत आणूं नये. असें करण्यानें आपली योग्यता कमी होते, असें त्यानें समजूं नये. हा समज अगदी चुकीचा आहे. आपण मुलांची काळजी घेतों म्हणून लोक हसूं लागले तर खुशाल हसोत. जे लोक अविचारी व मुर्ख आहेत ते मात्र या गोष्टीबद्दल उपहास करतील. स्त्रिया म्हणजे केवळ मजूर, त्यांजवर वाटेल तितकें ओझें घालावें, असा ज्यांचा समज आहे तेच थट्टा करतील; समजुतदार लोक याबद्दल कधींही नांवें ठेवणार नाहींत इतकेंच नाहीं, तर उलट ते बापाची स्तुती करतील. जो मनुष्य प्रत्यक्ष आपल्या पोटच्या पोरांविषयीं काळजी घेत नाहीं व त्यांवर बापपणाचा अधिकार मात्र

चालवितो, त्यास हा अधिकार चालविण्याविषयीं किती हक्क पोहोचतो, याविषयीं त्यानें विचार करावा.

ज्या वेळेस बापास जरूरीचें काम असेल, त्या वेळेस त्यानें बाहेर असणें योग्य आहे; परंतू सणाच्या दिवशीं अथवा सुट्टीच्या दिवशीं अथवा एरवीं सवड सापडली असतां, आपल्या कुटुंबांत राहून आनंदानें दिवस घालविणें सर्वांस सुखकारक आहे. असें करण्यानें सर्वांस आनंद होतो. बाप आपल्या एकट्याच्याच सुखाकडे पाहूं लागला तर मुलेंही आपल्याच सुखाकडे पाहतील. आपलीं मुलें नोकरचाकरांच्या स्वाधीन केलीं म्हणजे आपण सुटलों, असें बापानें समजूं नये. हा समज चुकीचा आहे. नोकरचाकरांपाशीं तीं अक्षयीं असलीं म्हणजे त्यांच्या डोळ्यांपुढें चाकरांचें वर्तन असतें; त्यांस चाकरांची भाषा लागते. आईबापांविषयीं त्यांचें प्रेम कमी होतें; कारण जो त्यांस अक्षयीं घेतो, त्याचा लळा त्यांस लागतो. ज्या ठिकाणीं चाकर असतात त्या ठिकाणीं आया बहुतकरून मुलें संभाळण्याचा कंटाळा करतात; त्या त्यांस पाजण्यापुरतें जवळ घेतात; कारण त्यांस शेजारणीपाजारणींबरोबर यथेच्छ गप्पा मारण्यास व्यत्यय येतो. परंतू आपल्या चाकर माणसांस आपल्या इतकी आपल्या मुलांविषयीं ममता नसते ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नाहीं. चाकरांची मदत कारणपरत्वें घ्यावी. आईबाप अथवा दुसरे खात्रीचे आप्त यांशिवाय मुलें दुसऱ्यांच्या स्वाधीन असूं नयेत.

मुलें सुदृढ ठेवणें हें बापाचें पहिलें कर्तव्य आहे; तीं शरिरानें व मनानें चांगलीं असणें ही सुखाची गोष्ट आहे. त्यांजकरतां पैसा मिळवून ठेवणें हें महत्वाचें कर्तव्य आहे; परंतू या कर्तव्यापेक्षां त्यांचें शरीर व मन हीं होईल तितकें

करून सुदृढ ठेवणें हें विशेष महत्वाचें कर्तव्य आहे; या संबंधानें थोडीसुद्धां हयगय उपयोगी नाहीं. पुष्कळ मुलें खुजट, वेडसर, पाप्याचीं पितरें अशीं आपणांस दिसतात. ही स्थिती पुष्कळ अंशीं आईबापांच्या निष्काळजीपणाच्या वर्तनामुळें प्राप्त होते. कित्येक मुलें जन्मभर वेडी राहतात; तीं मुख्यत्वें आईबापांच्या हयगयीमुळें तशीं होतात. एकदां असें झालें कीं, पेनसिलव्हानिया येथें एक गृहस्थ राहत होता. तो व त्याची बायको हीं आपल्या तीन वर्षांच्या मुलास आपल्या चाकराच्या स्वाधीन करून गमतीसाठीं बाहेर दोन दिवस गेलीं. मूल राहीना म्हणून चाकरानें प्रथम त्यास भीति दाखवून पाहिली; परंतू तें कांहीं केल्या राहीना; म्हणून त्यानें त्यास कोंडून ठेविलें व तो स्वतःच्या करमणुकीसाठीं बाहेर गेला. कांहीं वेळानें तो परत आला, व पाहतो तों मूल अंगांत वारें आल्यासारखें करीत होतें. मुलाचा झटका नाहींसा झाला; परंतू तें जन्मभर वेडसर झालें. चैनीबद्दल आईबापांस व विशेषेंकरून त्या मुलास जन्मभर केवढी शिक्षा भोगावी लागली बरें !

बर्मिंगह्याम येथेंही असाच प्रकार झाला. आईबाप हे संध्याकाळीं मेजवानीस गेले. घर संभाळण्यासाठीं जे चाकर होते त्यांजपाशीं त्यांचें मूल होतें. आपल्या यजमानास परत येण्यास फार वेळ लागेल हें चाकरांस माहीत होतें, म्हणून त्यांनींही मौजेचें जेवण करण्याचा बेत केला. घरधनिणीस कांहीं जरूरीच्या कारणासाठीं लवकर घरीं यावें लागलें. मध्यघरांत मंडळी जमलेली पाहून मूल कोठें आहे म्हणून ती पाहण्यासाठीं माडीवर गेली, व पाहते तों तें निचेतन पडलेलें तिच्या दृष्टीस पडलें. ती

घाबरली. तिनें डाक्टरास बोलावणें पाठविलें. डाक्टर आला. परंतु मुलाचा प्राण गेला आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. शोधाअंतीं असें कळून आलें कीं, मूल राहीना म्हणून चाकरानें बागुलबोवासारखी भयंकर आकृती पडद्याला टाचून ठेवून तो एकटाच मौजेच्या जेवणासाठीं खालीं गेला होता; व यामुळें मूल भयानें मरण पावलें होतें. भीतीनें प्राण जाण्यापूर्वीं मुलास किती वेदना झाल्या असतील यावि- षयीं कल्पना केली असतां, अंगावर रोमांच आल्यावाचून राहणार नाहींत. मूल मेल्याबद्दल चाकर तर गुन्हेगार आहे; परंतू आईबाप शतपट गुन्हेगार नाहींत काय ? जर मूल न मरतां वेडसर झालें असतें, तर तें मेंदू बिघडून अथवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कारणानें वेडे झालें असावें अशी परीक्षा झाली असती. असो. मुलांच्या शरिराची अथवा मनाची स्थिती बिघडल्याविषयीं अशीं किती उदाहरणें असतील बरें ? आईबापांचें सूख तें किती, व त्याचा परि- णाम काय होत असतो, याविषयीं बापानें विचार करणें फार अगत्याचें आहे. आपण पक्ष्यांची अशी गोष्ट पाहतों कीं, पिलें लहान असतात तेव्हां नर बाहेर गेल्यावर मादी पिलां- जवळ असते; मादी बाहेर गेली असतां नर पिलांजवळ असतो. जर पक्षी आपलीं पिलें लहान असतां त्यांस इतकें जपतात तर मनुष्यांनीं आपल्या मुलांस किती बरें जपलें पाहिजे ? आईबाप अथवा घरांतील दुसरे खात्रीलायक आप्त यांनीं मुलें लहान असतां पाळी पाळीनें त्यांस संभाळलें पाहिजे; त्यांस खेळविलें पाहिजे; त्यांस हिंडविलें पाहिजे; त्यांस बोलविलें पाहिजे; तात्पर्य, त्यांचें शरीर व मन सुदृढ राहण्यास ज्या ज्या क्रिया अवश्य आहेत त्या त्या करण्यास

त्यांनीं यत्किंचित्सुद्धां आळस करतां कामा नये, व त्या क्रिया होतात किंवा नाहींत हें बापानें, बाप नसेल तर आईनें, व आईबाप नसतील तर मुलांच्या पालकांनीं पाहणें हें त्यांचें मुख्य कर्तव्य आहे. हें करण्यास ते चुकले असतां दोषी होतील.

मुलांचें संगोपन करतांना आईबापांच्या अंगीं थोडेसें धैर्य असावें लागतें. या योगानें त्यांस थोडेसें दुःख होईल; परंतु परिणामीं सुख होईल. मुलांस न्हाऊ घालतांना अथवा कपडे घालतांना किंवा त्यांस स्वच्छ ठेवितांना तीं ओरडतात, किंवा किंकाळ्या फोडून घर दणाणून टाकतात. याकडे लक्ष न देतां त्यांस रोजच्या रोज स्नान घालून कपडे घातले पाहिजेत; त्यांस नेहमीं स्वच्छ ठेविलें पाहिजे; त्यांस उघडें कधींही ठेवूं नये; व त्यांच्या डोळ्यांविषयीं विशेषेंकरून लहानपणीं फार काळजी घेतली पाहिजे. ही काळजी न घेतल्यामुळें त्यांस पुढें कमी दिसतें. यासाठीं स्वच्छ गरम पाण्यांत स्वच्छ व मऊ कपडा भिजवून त्यानें त्यांचे डोळे साफ करावे. बायका घाईमुळें ते खसाखस पुसतात हें वाईट आहे. ते हळू हळू पुसावे. मुलांचें डोकें व अंग धुतलें म्हणजे डोळ्यांत पाण्याचा अंश जाऊं देऊं नये. लहान मुलांस मुद्दाम दिव्याजवळ बसवून खेळविण्याची चाल वाईट आहे. त्याचप्रमाणें त्यांस उन्हांत घेऊन जाणें वाईट आहे. त्यांचे डोळे न दिपतील अशी तजवीज ठेवावी. मूल तान्हें असतां ही तजवीज तर अवश्य ठेविली पाहिजे; कारण या स्थितींत त्यांच्या भिवयांपासून त्यांच्या डोळ्यांचें संरक्षण होत नाहीं. यावरून मुलांच्या डोळ्यांवरून पांघरूण

घालावें अथवा त्यांस अंधार कोठडींत ठेवावें असें नाहीं. हेंही करणें वाईट आहे. मूल आईच्या गर्भांतून बाहेर पडत असतां केव्हां केव्हां त्याच्या डोळ्यांत घाण जाऊन त्याचे डोळे सुजतात. ही सूज प्रसूतीनंतर सात दिवसांच्या आंत सुरू होते; डोळ्यांना लाली येते, व ते चिकटतात. हा रोग फार भयंकर आहे असें समजावें. त्यावर प्रथम बायाबापड्यांचीं औषधें देण्याच्या नादीं लागू नये. चांगला वैद्य न मिळाला, तर मग इलाज नाहीं. या रोगानें जितकीं मुलें अंधळी होतात तितकीं दुसऱ्या रोगानें होत नाहींत. पटकीच्या दिवसांत ढाळ व्हावयास लागले असतां हेळसांड करणें जितकें वाईट आहे, तितकेंच डोळे सुजून लाल होऊं लागले असतां चालढकल करणें वाईट आहे. दोन्हीही गोष्टींत वेळेवर उपाय केला पाहिजे.

कांहीं मुलांस लांबचें दिसत नाहीं व कांहींस जवळचें दिसत नाहीं. तीं वाचावयास लागलीं असतां त्यांच्या डोळ्यांस कळ लागते; व तीं वाचण्याचा कंटाळा करतात. हें व्यंग न समजल्यामुळें तीं ढ आहेत अथवा आळशी आहेत, असें आपण म्हणतों. हा दोष सर्वथैव त्यांच्या बुद्धीचा नसतो, त्यांच्या डोळ्यांचा असतो; म्हणून खरी स्थिती काय आहे, याबद्दल बापानें परीक्षा करण्यास आळस करूं नये. हें व्यंग लक्षांत न आल्यामुळें मुलें तिरळे पाहूं लागतात. तीं असें करावयास लागलीं कीं, वरील दोन गोष्टींपैकीं एका गोष्टीमुळें असें करतात असें समजावें. ही खोड दुसऱ्यांस वेडावून दाखविल्यामुळें लागते, अशी कांहीं लोकांची समजूत होऊन ते मुलांस शासन करतात, ही चूक आहे. मूल तिरळे पाहूं लागल्यापासून थोडेच दिवसांनीं तजविजीस लागलें पाहिजे;

कारण, एकच डोळ्यानें पाहण्याची सवय असली, म्हणजे दुसऱ्या डोळ्यानें कमी दिसूं लागतें.

डोळ्याचें हें जें व्यंग सांगितलें, तें वेळेवर उपाय केले असतां दूर होण्यासारखें आहे. चांगला चष्मा लावणें हा उत्तम उपाय आहे. मुलांनीं चष्मा लावणें हें चमत्कारीक दिसतें; परंतू एवढ्याच गोष्टीवरून हा उपाय न करणें चांगलें नाहीं. मुलगा चार पांच वर्षांचा झाला नाहीं, तोंच त्याच्या हातीं पुस्तक देणें बरोबर नाहीं. ज्याप्रमाणें त्याचें शरीर नाजूक असतें, त्याप्रमाणें त्याचे डोळेही नाजूक असतात. शरीर नाजूक असतां मोठें काम करावयास लावणें हें जसें इष्ट नाहीं, तसेंच डोळ्यांस त्रास देणें बरोबर नाहीं. बारीक व जवळ जवळ अक्षरांचीं पुस्तकें मुलांच्या हातीं कधींही देऊं नये. हीं पुस्तकें थोड्या किंमतींत मिळतात, म्हणून या गोष्टीकडे आईबाप लक्ष देत नाहींत. ही काटकसर अयोग्य आहे. ज्या दिव्यापाशीं मुलें वाचावयास बसतात त्याचा प्रकाश स्थीर असावा, परंतू अतिशय नसावा; किंवा प्रकाश पडण्यासाठीं कोळिष्ट वारंवार झाडण्याचें अथवा वात काडीनें वारंवार ओढण्याचें कारण पडूं नये. अतिशय प्रकाशानें डोळे दिपतात; व मंद प्रकाशानें डोळ्यांस ताण बसतो.

ज्या मुलांचे डोळे अधू आहेत, त्यांस फार वाचण्यास लावल्यानें त्यांचे डोळे लवकर खराब होतात. त्याचप्रमाणें ज्या मुलींचे डोळे अधू आहेत, त्यांसही फार वाचण्यास अथवा शिवणकाम करण्यास लावणें चांगलें नाहीं. मुलें वाचीत नाहींत, अथवा लिहीत नाहींत, अशी पुष्कळ आईबापांची व शिक्षकांची ओरड असते; परंतू त्यांचे डोळे साफ आहेत किंवा

नाहींत, अशी चौकशी कितीजणांनीं केली आहे? ही चौकशी न करतां मुलें ढ किंवा कुचर आहेत, असें समजून त्यांस घोपटींत सुटणें किती वाईट आहे? चित्रकला, सोनाराचें काम, खोदींव काम व घड्याळें नीट करण्याचें काम, या सर्वांस डोळे चांगले असावे लागतात. मुलांचे डोळे अधू असतां त्यांस हीं कामें करण्यास लावूं नये. ज्या कामांत डोळ्यांचें फारसें कारण पडत नाहीं, तशीं कामें त्यांजकडून करवावीं. ज्या मुलांचे डोळे सुजेच्या योगानें अधू झालेले आहेत, त्यांच्या डोळ्यांस धूळ अथवा धूर न लागेल, अशी तजवीज ठेवणें जरूर आहे. धुराबद्दल तर फार सावधगिरी ठेवावी.

डोळ्यांचा विषय थोडासा जास्त लांबला, परंतू हा विषय फार महत्वाचा आहे. डोळे आहेत, तर सर्व ठीक आहे, हें म्हणणें पुष्कळ अंशीं खरें आहे. डोळ्यांविषयीं हयगय केली असतां मुलांचें नुकसान फार होतें; आईबापांच्या अविचारामुळें अथवा अज्ञानामुळें कित्येकांस जन्मभर त्रास सोसावा लागतो; म्हणून या गोष्टीविषयीं बापानें यत्किंचित्‌ही हेळसांड करूं नये.

देवी काढविण्याच्या बाबतींत पुष्कळ आईबाप आळस करतात; कित्येक तर मुळींच काढीत नाहींत; परंतू ही मोठी चूक आहे. या बाबतींत आईबापांच्या अज्ञानामुळें अथवा आळसामुळें पुष्कळ मुलें अल्प वयांत मरण पावतात अथवा कुरूप होतात.* देवी काढण्यासाठीं

---

* अशीं उदाहरणें पुष्कळ दृष्टीस पडतात. एका गृहस्थास एकुलती एक मुलगी होती. ह्या गृहस्थास देवी फार आल्यामुळें त्याच्या

लोकांस छदाम पडत नाहीं; या संबंधानें त्यांस घर सोडून बाहेर जावें लागत नाहीं; देवीडाक्टर चालत घरीं येतो. इतकी सोय असून आईबापांनीं देवी काढविण्याविषयीं आळस करणें, हा त्यांचा मुर्खपणा नाहीं काय ? देवी न काढल्या, तर पुष्कळ मुलें मरतात व त्या काढल्या, तर कमी मरतात, ही गोष्ट आज बरेच दिवसांच्या अनुभवावरून कळून आली आहे; म्हणून या संबंधानें विशेषेंकरून बापानें फार काळजी घेतली पाहिजे.

इ० स० १८३७ त मांडन इंडियन लोकांमध्यें देवीचा आजार सुरू झाला. या आजारानें १,५०,००० लोक बेजार होते. एका वर्षांत बहुतेक मरून फक्त २७ लोक वांचले. यावरून या रोगापासून किती प्राणहानी होते हें समजेल. हा स्पर्शजन्य रोग आहे, म्हणून रोग्यां-

---

तोंडावर देवीचे शेकडो वण होते. हा गृहस्थ निवर्तला. मुलीस आठ नऊ मुलें झालीं. जागेवर एक मुलगा व एक मुलगी राहिली. मुलगा बापाचा जीव का प्राण होता. देवी काढल्या असतां मुलास त्रास होईल, म्हणून बापानें चालढकल केली. आज काढूं, उद्यां काढूं, असें करतां करतां पांच वर्षें लोटलीं. मुलीस सासरीं राहून बरेच दिवस झाले; सबब चुलत्यानें तीस घरीं आणलें. मुलगा विलक्षण बुद्धिवान होता. त्याचें भाषण ऐकून सर्वजण कौतूक करीत. थोडे दिवस लोटल्यावर त्यास ताप आला. चौथे दिवशीं पुटकुळ्या दिसूं लागल्या. चुलत्यास वाटलें कीं देवी काढल्या असतील; म्हणून तो स्वस्थ होता. दिवसेंदिवस देवी फुगत चालल्या व एकाएकी चपटया झाल्या. वैद्य आणले; परंतू कांहीं उपाय चालेना. शेवटीं चौदावे दिवशीं मुलगा मरण पावला. आईस व बापास पश्चात्ताप झाला; परंतू मग उपयोग काय ? अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें आहेत.

जवळ मुलांस बसूं देऊं नये. घरीं किंवा गावांत हा रोग उद्भवला असतां, ज्यांस देवी काढविल्या नसतील त्यांस काढविण्यास आळस करूं नये. देवी काढवून पुनः त्या येत नाहींत असें नाहीं; तथापी, त्यापासून कमी त्रास होतो. देवी बऱ्या झाल्यावर रोग्याचे कपडे जाळून टाकण्याचें पुष्कळ लोकांच्या जिवावर येईल; म्हणून हे स्वच्छ करण्याविषयीं प्रथम तजवीज करणें जरूर आहे. देवी काढविल्या असतां पुनः काढविण्यास हरकत नाहीं. पुनः काढविल्यानें तोटा व्हावयाचा नाहीं; नफाच होईल. ज्याप्रमाणें पटकी हा रोग आहे, त्याप्रमाणें देवी हा रोग आहे. हा रोग देवी आणते, ही चुकीची समजूत आहे. या रोगाच्या निवारणार्थ दैवीक उपाय करणें वेडेपणा आहे.

मुलांचें सांगोपन करतांना त्यांचें शरीर व मन हीं सुदृढ राहतील, अशी बापानें तजवीज ठेवावी, असें आम्हीं वर सांगितलें आहे. शरीर सुदृढ राहण्याकरतां त्यांच्या खाण्यापि-

---

१ थंडी वाजून ताप भरणें हें या रोगाचें पूर्वलक्षण आहे. नंतर तोंडावर पुटकुळ्या उठतात. देवींचें खरें स्वरूप पुटकुळ्या उठल्यापासून पांचवे दिवशीं समजतें. तें हें कीं, पुटकुळ्या मध्यभागीं चपट्या असतात. त्या बेंबीसारख्या दिसतात. हें रूप दिसलें म्हणजे देवी खास आल्या आहेत असें समजावें; नाहींतर कांजिण्या आहेत की काय असा संशय असतो. देवी दिसूं लागल्या म्हणजे केळें, पापड, म्हशीचें दूध व तूप हे पदार्थ देण्याचा प्रघात आहे; परंतु हा कितपत चांगला आहे हें सांगतां येत नाहीं. ज्यांस देवींचा आजार झाला आहे, तो तापानें बेजार झाल्यामुळें गळून जातो; म्हणून त्याची हुशारी कायम ठेवणें हें पहिलें काम. स्वच्छ हवेपासून रोग्यास संतोष होतो; म्हणून त्याचा कोंडमारा करूं नये.

ण्याचा बंदोबस्त चांगला ठेविला पाहिजे, व मन सुदृढ राहण्यास आईबापांचें आचरण चांगलें असलें पाहिजे. गुरांस चांगलें खावयास घातलें असतां तीं उंच व बळकट होतात. तीच गोष्ट मुलांस लागू आहे. त्यांच्या खाण्यापिण्याच्या संबंधानें हाल केले असतां तीं खुजट व रोगट होतात, व त्यांच्या अंगीं धाडस कमी असतें. मनुष्य उंच असणें ही फायद्याची गोष्ट आहे. शिपाई, मजूर, गवंडी व सुतार हे जितके उंच असतील तितकें त्यांस हितावह असतें.

मुलांस खावयास घालावयाचें तें एकदम घालूं नये; दिवसांतून निदान तीन वेळां असावें; त्यांस गोड पदार्थ फारसे दाखवूं नयेत. त्यांचें खाणें साधे व पोटभर असावें. साधे जेवणानें सुख असतें व तें बेतानें जातें. गोड पदार्थ खावयास दिले असतां दोन घास जास्त जातात, परंतु हेच पक्काशयास अपायकारक होऊन आजार येतो व वैद्याचें घर पाहावें लागतें.

मुलांस स्वच्छ हवेची फार जरूरी आहे. हवेचें महत्व पुष्कळ आईबापांस माहीत नसतें; कांहींस माहीत असते, परंतु ते आळशी असतात. सर्वांस स्वच्छ हवा मिळण्यास साधन नसतें ही गोष्ट खरी आहे. शहरांतील मोऱ्यांची व शौचकुपांची दुर्गंधी मोडण्यास कांहीं वर्षें लोटलीं पाहिजेत; परंतू कांहीं असलें, तथापी, मुलांस स्वच्छ हवेंत ठेवण्याची अथवा निदान नेण्याची तरी बापानें तजवीज ठेवावी. कारण, घाणेरड्या हवेनें मोठ्या माणसांपेक्षां लहान मुलांस लवकर अपाय होतो. स्वच्छ हवेसाठीं फारसा पैसा लागत नाहीं. बापास थोडे श्रम पडतील; परंतू हे श्रम घेणारे फार थोडे दृष्टीस पडतात. जरी याप्रीत्यर्थ थोडाबहूत पैसा लागला, तरी मुलां-

पेक्षां पैशाची किंमत जास्ती आहे काय? मुलांसाठीं पैसा जमवून ठेवणारे पुष्कळ सापडतात; त्यांच्या अंगावर डाग-डागिणे नसले म्हणजे, अथवा जवळ पैसा साठवून न ठेविला, तर लोक आपणांस दरिद्री म्हणतील, याबद्दल कित्येक आई-बापांस लाज वाटते. परंतू हातापायाच्या लेखण्या, ढेंबरें पोट, पंडुरोगी, अथवा निःशक्त अशी मुलांची स्थिती असतां तिजबद्दल आईबापांस लाज वाटूं नये, ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे! मुलांच्या अंगावर डागिणे घातल्यापासून त्यांस स्वतःस कांहीं तरी सूख होतें काय? असें करण्यानें आपल्या डोळ्यांची मात्र तृप्ती होते. हें करणें मुलांच्या हितासाठीं नसून आपल्या स्वतःच्या समाधानासाठीं आहे. लोकांनीं आप-णांस श्रीमंत म्हणावें म्हणून, अथवा डागिण्याच्या निमित्तानें दोन पैशांचा अर्थ असावा, यासाठीं मुख्यत्वें असा हव्यास असावा.

मुलांच्या अंगावरील डागिणे अनेक वेळां चोरीस जातात, व डागिण्यांसाठीं मुलांच्या जिवास अपाय झाल्याचीं पुष्कळ उदा-हरणें दृष्टीस पडतात. असें असून त्यांच्या अंगावर डागिणे घालण्यांत सूख मानणें, हें स्त्रियांचें वेड नाहीं काय? लहान-पणीं शेकडो मुलें मरण पावतात, हें जर आईबापांस माहीत आहे, तर त्यांच्या शरीरसंपत्तीची प्रथम काळजी घेणें ही मह-त्वाची गोष्ट, किंवा त्यांच्यांसाठीं दुसरी संपत्ती साठविण्या-साठीं अगोदर उद्योग करणें, ही महत्वाची गोष्ट? चांगलें अन्नपाणी, स्वच्छ हवा व व्यायाम हीं तीन शरीरसंपत्तीचीं मुख्य साधनें आहेत. या साधनांची काळजीपूर्वक योजना न करतां, लोक आपणांस गरीब म्हणतील, या लज्जेस्तव डाग-डागिण्यांबद्दल खर्च करणें असमंजसपणाचें काम नाहीं काय?

बापानें मुलांच्यामागें कांहीं व्यवसाय लावून दिला पाहिजे. हा उपयुक्त असून त्यापासून मुलांस करमणूकही वाटावी, असा असावा. खेड्यापाड्यांतून रिकामी जागा पुष्कळ असते. शहरांत तितकी नसते, तथापी, जी जागा असेल तेवढ्यांतच अथवा ज्यांस ऐपत आहे त्यांनीं जमीन घेऊन, मुलांकडून तींत निरनिराळ्या प्रकारचीं झाडें लाववावीं. बागेचा शोक असणें फार हितावह आहे; परंतू या संबंधाचा ओनामा बापानें हातांत कुदळ व खोरें घेऊन शिकविला पाहिजे; स्वतः कंबर बांधून त्यानें झाडांस पाणी घातलें पाहिजे; मी मोठा अशी त्यानें मिजास बाळगितां कामा नये; म्हणजे मुलेंही त्याचें अनुकरण करतील. निरनिराळ्या प्रकारचीं फुलझाडें, भाजीपाला, वगैरे वनस्पतींची माहिती त्यांस सहज मिळेल. झाडांस वेळच्या वेळेस पाणी घालून त्यांचें जतन करणें, व तीं लहानाचीं मोठीं करणें, हें मुलांस एक प्रकारचें शिक्षण आहे. हें शिक्षण शेतीच्या शिक्षणाचा ओनामा आहे. ज्या मानानें बाप ह्या गोष्टींत लक्ष घालील, त्या मानानें मुलांस उपयोग व करमणूक होईल. आम्हीं फक्त उद्योगाची दिशा दाखविली आहे. सर्वांसच हा उद्योग करण्यास सवड सापडणार नाहीं; सर्वांसच रिकामी जागा मिळणें कठीण आहे, हें आम्ही समजून आहों; तथापी, ज्यांस सवड सापडेल व ज्यांस साधन असेल, त्यांनीं ह्या कामीं आळस करूं नये. तात्पर्य हें कीं, मुलांकडून कांहीं तरी व्यायाम करविला पाहिजे; मग तो नमस्काराच्या रूपानें, कसरतीच्या रूपानें किंवा दुसऱ्या कोणत्या रूपानें असो.

---

कैलासवासी
सखाराम निळकंठ पटवर्धन
यांचे स्मरणार्थ,
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,
या संस्थेस ...
ग. स. पटवर्धन
[illegible]

# भाग दुसरा.

## मानसीक शिक्षण.

गृहशिक्षणाविषयीं विचार करावयाचा म्हणजे, मुलाचें शारीरसंगोपन, त्याचें मानसीक शिक्षण व त्याचें वर्तन ह्यांविषयीं विचार करावयाचा. ह्या तीन गोष्टींपैकीं पहिल्या गोष्टीच्या संबंधानें आईनें, अथवा बापानें, अथवा उभयतांनीं काय केलें पाहिजे, ह्याविषयीं मागील भागांत विचार झाला. आतां, मानसीक शिक्षणाच्या संबंधानें विचार करून नंतर स्वतंत्र भागांत सद्वर्तनाच्या संबंधानें विचार करूं.

मानसीक शिक्षणासंबंधानें विचार करतांना प्रथम ज्या गोष्टीविषयीं विचार केला पाहिजे, ती गोष्ट ही कीं, आपल्या मुलास कोणत्या गोष्टी समजणें अत्यावश्यक आहेत. वेळ थोडा व सोंगें फार, अशी आपणांपैकीं पुष्कळांची स्थिती आहे. मुलांचें शरीर सुदृढ राहावें, म्हणून ज्या गोष्टींविषयीं विशेष काळजी घेतली पाहिजे व ज्यांप्रीत्यर्थ विशेष खर्च केला पाहिजे, त्या गोष्टीच्या संबंधानें कमी लक्ष द्यावयाचें व कमी पैसा खर्च करावयाचा; व अलंकार व डामडौल ह्यांविषयीं जास्त काळजी करावयाची व त्यांप्रीत्यर्थ जास्त पैसा खर्च करावयाचा, हा जसा मुर्खपणा आहे, तसा खरें शिक्षण मिळण्याकरतां व तेणेंकरून मन सुदृढ करण्याकरतां ज्या गोष्टी आवश्यक त्यांसंबंधानें कमी लक्ष, व ज्या गोष्टींचा

भपका दाखविण्यापलीकडे दुसरा विशेष उपयोग नाहीं, त्यांविषयीं विशेष खबरदारी ठेवणें व त्यांप्रीत्यर्थ जास्त वेळ खर्च करणें, हाही कांहीं अंशीं मुर्खपणा आहे.

वेळ थोडा व सोंगें फार, अशी आपणांपैकीं पुष्कळांची स्थिती आहे, असें आम्हीं वर सांगितलें आहे; तेव्हां अत्यावश्यक गोष्टी कोणत्या ह्याविषयीं चांगला विचार केला पाहिजे. चार लोक करतात, म्हणून आपण करतों, हें म्हणणें ज्याप्रमाणें धर्मसंबंधाच्या बाबतींत योग्य नाहीं, त्याप्रमाणें समाजांत अमूक तऱ्हेचें शिक्षण प्रचलीत आहे, म्हणून मी तेंच शिक्षण देतों, हें म्हणणें योग्य नाहीं. शाळांतून जे विषय ज्या पद्धतीनें शिकविण्यांत येतात, त्यांसंबंधानें आपणास फारशी ढवळाढवळ करतां येत नाहीं; कारण, त्या बाबतींत आपले हातपाय बांधलेले असतात. परंतू गृहशिक्षणाची गोष्ट अशी नाहीं. घरीं आपली पूर्ण मुखत्यारी असते. आपली स्थिती लक्षांत आणतां आपल्या मुलास अमूक तऱ्हेचें शिक्षण दिलें असतां विशेष फायदा आहे, असें आपणांस दिसून येईल, तर तसें करण्यास आपणास स्वातंत्र्य असतें. ही गोष्ट जर खरी आहे, तर चार लोक करतात म्हणून मी करतों, हें म्हणणें उपयोगी नाहीं. चार लोक जें करतात तें उपयुक्त व फायदेशीर असेल, तर खुशाल करावें, परंतू तें जर परिणामीं फायदेशीर नसेल, तर तें कां करावें? लोकांच्या कांहीं वेडगळ समजुतींमुळें आधींच आपण जखडून गेलों आहों, तर मग ज्या बाबतींत आपणास स्वातंत्र्य आहे त्या बाबतींत स्वतंत्र रितीनें विचार कां करूं नये? आपणास भपका नको; पोकळ मानप्रतिष्ठा अथवा लब्ध प्रतिष्ठितपणा नको; लोकांवर कोरडी छाप

ठेवून बरें म्हणवून घ्यावयास नको;–खरा उपयोग पाहिजे, मग तो तत्काळ होवो किंवा अवधीनें होवो. जर आपणास डामडौल नको, तर जें शिक्षण बरेंच अंशीं अलंकारीक आहे, त्याकडे धाव घेण्यापूर्वीं चांगला विचार केला पाहिजे. अंगावर अलंकार असल्यानें ज्याप्रमाणें आपणास लोक श्रीमन्त समजतील, त्याचप्रमाणें अलंकारीक शिक्षण असलें म्हणजे, आपणास विद्वान समजतील व आपली प्रतिष्ठा वाढेल. ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत, परंतू आपणास नुसतें श्रीमान अथवा विद्वान म्हणवून घ्यावयाचें, किंवा खऱ्या उपयोगाकडे, खऱ्या हिताकडे व खऱ्या कर्तव्याकडे पाहावयाचें ? ज्यांजवळ पुष्कळ धन आहे, ते खुशाल अलंकार घालोत व श्रीमान म्हणवून घेवोत. ज्यांस वेळेची आणि द्रव्याची अनुकूळता आहे, ते अलंकारीक शिक्षण संपादन करून खुशाल आपणांस विद्वान म्हणवून घेवोत, त्याविषयीं आमचें कांहीं म्हणणें नाहीं. असे हरीचे लाल थोडे आहेत. त्यांस जें योग्य दिसेल तें ते करोत. आम्हास जें सांगावयाचें आहे तें जनसमूहाविषयीं आहे. जनसमूहाविषयीं विचार करतां, मुलांनीं कोणत्या गोष्टी अवश्य शिकल्या पाहिजेत, ह्याविषयीं चांगला विचार करून त्याप्रमाणें आचरण करणें फार महत्वाचें आहे, परंतू हें फार थोड्यांस समजतें, असें दिसून येतें.

वर जे विचार सुचविले त्यांसंबंधानें कांहीं लोक असें म्हणतील कीं, मुलांनीं शिकण्यासारख्या अवश्य गोष्टी पुष्कळ आहेत; मग त्यांत निवड कशी करावी ? ही शंका कांहीं अंशीं बरोबर आहे; परंतू ह्या बाबतींत एकच नियम घालून देतां येत नाहीं. प्रत्येक मनुष्याची स्थिती भिन्न आहे. एकास ज्या गोष्टी फार महत्वाच्या वाटतील, त्या दुस-

त्यास कमी महत्वाच्या वाटतील. असें जरी आहे, तरी शिक्षण देण्याचा हेतू काय आहे, हें लक्षांत आणलें असतां वरील शंकेचें बरेंच निवारण होईल. ही संसारयात्रा सुखानें करतां येण्यास सहाय्य व्हावें, म्हणून शिक्षणाची आवश्यकता आहे. आपआपलें पोट भरणें एवढाच संसार नाहीं. ह्या पलीकडे आपलें कांहीं कर्तव्य आहे, म्हणून एवढा खटाटोप आहे. आपलें शरीर सुदृढ ठेवणें, मानसीक शक्तींचा विकास करून त्या वाढविण्याविषयीं यत्न करणें, सन्मार्गानें चरितार्थाचें साधन मिळवून आपलें व आपल्या कुटुंबाचें संगोपन करणें, शेजारी व शहरवासी ह्या नात्यानें आपलीं जीं कर्तव्यें तीं करणें, खऱ्या सुखाचीं जीं साधनें उपलब्ध आहेत, त्यांचा उपयोग करणें व त्यांत भर घालणें, व वेळांत वेळ करून देशसेवा व परमेश्वराचें चिंतन करणें, ही जी महायात्रा ती करण्यास ज्या शिक्षणाचा विशेष उपयोग तें शिक्षण जरूर आहे. अशा प्रकारचें शिक्षण शाळांतून देण्यांत येत नाहीं व देतां येण्यासारखें नाहीं; म्हणून तें घरींच दिलें पाहिजे.

वर जो विचार सांगितला तो सामान्य विचार झाला. आपणास ह्या भागांत मानसीक शिक्षणाविषयीं मुख्यत्वें सविस्तर विचार कर्तव्य आहे. मानसीक शक्ती वाढवून मन सुदृढ कसें होईल, ह्याविषयीं विवेचन करावयाचें आहे. खाणें, पिणें, व्यायाम वगैरे गोष्टींनीं शक्ती वाढून शरीर सुदृढ होतें, त्याप्रमाणें मानसीक शक्ती ज्ञानानें वाढत जाऊन मन सुदृढ होतें. कोणताही मनुष्य जरी आपण घेतला, तरी त्याच्या मनांत एक प्रकारचा सजीव अंकूर असतो. ह्या अंकुरापासून खऱ्या

ज्ञानाची वृद्धी होते, ही गोष्ट बापानें पक्की लक्षांत ठेविली पाहिजे. ह्या अंकुरास इजा न करतां त्याचें पोषण करणें, हें महत्वाचें कर्तव्य असून तें विशेष नाजूक आहे. ह्या अंकुराच्या पोषणाविषयीं काळजी न घेतां वरवर शतशः उपाय केले, तरी तादृश उपयोग होणार नाहीं. आपणासभोंवतीं जे शतशः पदार्थ पसरलेले आहेत त्यांचें प्रेक्षण, अनुभव, मनन वगैरे गोष्टी हीं ज्ञानाचीं मुळचीं खरीं साधनें होत. पुस्तकांच्या द्वारें ज्ञान प्राप्त होतें; परंतू तें अप्रत्यक्ष रितीनें होतें. पुस्तकांपासून मदत होते; परंतू मुळांत कांहीं असेल, तर त्यांपासून उपयोग होतो. तेव्हां प्रेक्षण, मनन, अनुभव वगैरे गोष्टींच्या सहाय्यानें प्राप्त होणारें ज्ञान व पुस्तकांपासून मिळणारें ज्ञान ह्यांमध्यें अंतर आहे, व तें महत्वाचें आहे. प्रत्यक्ष व परोक्ष, अथवा मुख्य व सहाय्यकारी, ह्यांमध्यें जें अंतर तें अंतर वर सांगितलेल्या दोन प्रकारच्या ज्ञानांत आहे. दुसऱ्या प्रकारच्या ज्ञानापेक्षां पहिल्या प्रकारच्या ज्ञानाची विशेष मातब्बरी आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवून त्याप्रमाणें शिक्षण देण्यास बापानें प्रारंभ करावा. ह्यावरून पुस्तकीज्ञानाची कांहींच मातब्बरी नाहीं, असें मात्र त्यानें समजूं नये.

मुलगा जन्मल्याबरोबर त्याची प्रेक्षणक्रिया सुरू होते, व ह्या क्रियेचा संस्कार मनावर होऊन मनांतील सजीव अंकुराचें हळू हळू पोषण होऊन तो वाढत जातो. पुस्तकी ज्ञानानें जें पोषक द्रव्य मिळतें तें मागाहून. मूल जन्मल्याबरोबर त्याची प्रेक्षणक्रिया सुरू होते, असें आम्हीं सांगितलें; तेव्हां पदार्थांचें चांगल्या रितीनें प्रेक्षण करविणें हा मानसीक शिक्षणाचा ओनामा आहे. मनांतील अंकूर वाढत जाऊन त्याचा भव्य वृक्ष बनविण्यास पहिलें व महत्वाचें पोषक

द्रव्य प्रेक्षण आहे, हें ध्यानांत धरून, व पदार्थांचें अवलोकन करविणें हा अध्ययनाचा योग्य प्रारंभ आहे, असें समजून व्यवस्था करणें जरूर आहे.

मुलांकडून निरनिराळ्या पदार्थांचें प्रेक्षण करविणें हें पहिलें काम आहे, असें वर सांगण्यांत आलें. परंतू सृष्टींतील पदार्थ तर असंख्य आहेत; तेव्हां कोणकोणत्या पदार्थांचें अवलोकन करावयाचें व तें कसें करावयाचें, हा प्रश्न उत्पन्न होतो. घरांतील पदार्थ प्रथम दृष्टीस पडतात व ते वारंवार दृष्टीस पडतात; नंतर बाहेरचे. घरांतील पदार्थांबद्दल विशेष सांगण्यास नको. तथापी, ऐपतीप्रमाणें प्रत्येकानें आपलें घर पदार्थसंग्रहालय बनविणें इष्ट आहे. सर्वांस असें करतां येणें शक्य नाहीं हें खरें आहे; तथापी, इच्छा आहे, तर कांहींच करतां येणार नाहीं असें नाहीं. यदा कदाचित् जागेच्या, पैशाच्या, किंवा दुसऱ्या अडचणींमुळें कांहींच करतां आलें नाहीं, तर बाह्यसृष्टी अफाट आहे. थोड्या श्रमानें निरनिराळ्या वनस्पती, प्राणी, खनीज द्रव्यें, रसायनक्रियेनें बनलेले पदार्थ, इमारती व चित्रकलेच्या सहाय्यानें तयार केलेले पदार्थ, ह्यांचें प्रेक्षण हळू हळू जितकें करवितां येण्यासारखें असेल तितकें करवावें. प्रेक्षणीय पदार्थ पुष्कळ आहेत, तेव्हां त्यांचें वर्गीकरण करणें अवश्य आहे. म्हणजे, कोणकोणत्या पदार्थांत कोणतें सादृश्य दृष्टीस पडतें, व कोणत्या पदार्थांत कोणती विसदृशता दृष्टीस पडते, हें मुलांच्या लक्षांत आणून दिलें पाहिजे. सादृश्यावरून वर्गीकरण करण्याची सवय लागत चालली असतां विचार करण्याची सवय लागते; व 'असें कां' असा प्रश्न त्यांच्या डोळ्यांपुढें असतो. सहजगत्या चटदिशीं जें कारण मुलांच्या दृष्टीपुढें असतें, तेंच खरें कारण आहे,

असें त्यांस वाटावयास लागतें. असें न वाटूं देण्याविषयीं वेळेवर जपलें पाहिजे. असें न केलें, तर मुलांस वरवर विचार करण्याची सवय लागते व परिणामीं ती नुकसानीस कारण होते. ह्यासाठीं पदार्थांचें वर्गीकरण करवितांना त्यांचें निरीक्षण जितक्या सूक्ष्म रितीनें करवेल तितकें करविलें पाहिजे, व एकदम ते निर्णय करणार नाहींत, अशी खबरदारी घेतली पाहिजे. पदार्थ पाहिल्याबरोबर एकदम ठसा मनावर होतो; व तोच पुढें कायम राहतो. निर्णय करविण्यापूर्वीं दुसरी बाजू मुलांपुढें ठेवण्याची तजवीज न केली, तर दोन्ही बाजूंविषयीं विचार करण्याची जी सवय असणें फार महत्वाची आहे, ती न लागतां उतावीळपणानें उत्तर देण्याची सवय लागेल.

नवीन व चमत्कारीक पदार्थ पाहून कल्पनाशक्ती जागृत होते. विवेकशक्तीचीं व तिची सांगड असली, तर तिजपासून फारच उपयोग होतो; परंतू ती स्वतंत्र राहूं दिल्यानें भरारी मारते व अनावर होते, व त्यामुळें नुकसानीस कारण होतें. लहान मुलांचीं मनें फार कोवळीं असतात. चमत्कारीक पदार्थ पाहून त्यांच्या मनावर ठसा तेव्हांच उठतो. अशा वेळीं भलताच ठसा मनावर बठणार नाहीं, अशाविषयीं खबरदारी ठेविली पाहिजे. मुलांची कल्पनाशक्ती जागृत असली पाहिजे; परंतू तीस फाजील भरारी मारूं देतां कामा नये. फाजील भरारी मारूं दिली कीं, ती विकृत व्हावयास लागते. ती विकृत न होण्यास उपाय म्हटला म्हणजे भव्य, सुंदर, व उत्तम पदार्थ मुलांच्या नजरेस पडतील, व गूण ग्रहण करण्याची त्यांस सवय लागेल, अशी व्यवस्था केली पाहिजे. पदार्थांतील दोष मुलांनीं दाखवूं नयेत असें नाहीं; परंतू

गूण ग्रहण न करतां दोषांवर नजर देण्याचा हा काळ नाहीं; तो काळ पुढें आहे. ज्यावेळेस त्यांची विचारशक्ती कांहीं प्रगल्भ होईल व त्यांस कांहीं अनुभव येईल, त्यावेळेस गुण-दोषांचें विवेचन त्यांकडून करविणें योग्य आहे.

प्रेक्षण करविणें तें सुंदर, भव्य व उत्तम पदार्थांचे करविलें पाहिजे, व तें सूक्ष्म रितीनें केलें पाहिजे, व भलते ग्रह होऊं देऊं नयेत हें वर सांगितलें; परंतू दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, पदार्थ पाहून मुलांच्या मनांत कल्पना येऊं लागतात. अनेक पदार्थ अथवा अनेक विषय ह्यांविषयीं अर्धवट व अस्पष्ट कल्पना असण्यापेक्षां एकाच गोष्टीविषयीं कां होईना, परंतू तिजविषयीं पूर्ण व स्पष्ट कल्पना पाहिजे. एका विषयाच्या संबंधानें पुष्कळ, परंतू अपुरी माहिती असण्यापासून तादृश उपयोग नाहीं; स्मरणशक्तीवर ओझें मात्र विनाकारण असतें. ह्यापेक्षां एका विषयाच्या संबंधानें एक गोष्ट, परंतू ती पूर्ण व स्पष्ट समजली तरी चालेल. जास्ती गोष्टी समजल्या, तर चांगलेंच आहे; परंतू त्या पूर्ण समजल्या, तर विशेष उपयोग आहे. व्यक्ती असंख्य आहेत; वर्ग थोडे आहेत. ह्यासाठीं वर्गीकरण केलें असतां स्मरणशक्तीस फार सहाय्य होतें. त्यांत क्रम व पद्धतशीरपणा असेल, तर विशेष उपयोग होतो.

कित्येक गोष्टी घोकून घोकून लक्षांत राहतात; किंवा जी गोष्ट मुलांनीं लक्षांत ठेवावी अशी आपली इच्छा असते, ती गोष्ट लक्षांत ठेवण्याविषयीं त्यांची इच्छा वारंवार जागृत केल्यामुळें त्या लक्षांत राहतात. मुलांना घोकण्याचा प्रायः कंटाळा वाटतो. तेव्हां गोष्ट लक्षांत ठेवण्याविषयीं त्यांच्या मनांत इच्छा नेहमीं जागृत ठेवणें बरें; परंतू अशी इच्छा

जागृत ठेवण्यास त्यांच्या मनांत त्या गोष्टीच्या संबंधानें आनंद वाटला पाहिजे. शब्द पाठ करणें व कार्यकारणभाव व संबंध लक्षांत ठेवणें, ह्या दोन्ही गोष्टींची जरूरी असते; परंतू पहिली गोष्ट त्रासदायक वाटून फार कष्टसाध्य वाटूं लागली, तर बेताबातानें चालू ठेवावी. पण कार्यकारणभाव व संबंध समजण्याच्या बाबतींत हयगय होऊं देऊं नये. थोर पुरुषांचीं वचनें, कवींच्या उक्ती वगैरे गोष्टी अवश्य लक्षांत ठेविल्या पाहिजेत. त्यांपासून मनाला आनंद होऊन व्यवहारांत उपयोगही फार होतो. शब्दाची गोष्ट निराळी आहे, परंतू इतर गोष्टी उगीच पाठ करवून घेण्याच्या भरीस पडूं नये. त्या मुलांना आपल्या भाषेनें सांगतां आल्या म्हणजे झालें. आपणास शब्दज्ञान तर पाहिजेच; परंतू विचारज्ञान विशेष पाहिजे. शाळेंतून आल्यावर, अथवा दमून भागून स्वस्थ बसल्यावर, अथवा जेवल्यावर लागलींच मुलांना पाठांतर करण्यास सांगणें वेडेपणा आहे. कारण, अशा वेळीं त्यांचें मन क्षुब्ध असतें. आपल्या मुलाची स्मरणशक्ती चांगली असावी, अशी बापाची इच्छा असेल, तर खाणें, पिणें, झोप वगैरे गोष्टींच्या संबंधानें त्यानें नियमितपणा ठेवला पाहिजे. स्मरणशक्ती व मेंदू ह्यांचा निकट संबंध आहे. मेंदूला अपाय झाला, म्हणजे स्मरणशक्तीला धक्का बसतो. फार झोप घेण्यानें सुस्ती उत्पन्न होते; थोडी घेण्यानें मेंदू तापतो; म्हणून दोन्ही गोष्टी वर्ज्य. स्मरण ठेवण्यास एकाग्रता पाहिजे; गडबड उपयोगाची नाहीं. गडबडीनें सर्वच गडबड होते. तेव्हां शांत वेळीं व निवांत स्थळीं पाठांतर करविणें श्रेयस्कर. एके दिवशीं पुष्कळ, दुसरे दिवशीं कांहीं नाहीं, असें उपयोगाचें नाहीं. रोज थोडें थोडें, परंतू नियमीत रितीनें पाठ करवीत

गेलें, तर पुष्कळ कार्य होतें. वेळ थोडा व शिकण्यासारख्या गोष्टी पुष्कळ, तेव्हां निवड केली पाहिजे. वायफळ गोष्टी पाठ करविणें मुर्खपणा. आमच्या पाहण्यांत एक गृहस्थ आला. त्यास एक मुलगा होता. मुलगा अकरा वर्षांचा होतांच बापानें त्यास कौमुदी शिकविण्यास आरंभ केला. मुलगा कधीं बरोबर म्हणून दाखवी, कधीं चुके. परंतू चुकला कीं मार खाई. तो इतका कीं, शेजाऱ्यास कीव येत असे. हा क्रम तीन चार वर्षें चालला होता. आतां कौमुदीसारखा कठीण ग्रंथ लहान मुलांच्या हातीं देण्यांत अर्थ काय? तो नुसता एकसारखा पाठ म्हणवून घेण्यांत ज्यांस पुरूषार्थ वाटत असेल, त्यांस खुशाल वाटो. आम्हास त्यांत कांहींच अर्थ वाटत नाहीं. ही मेहनत व्यर्थ आहे. अशा प्रकारें मुलांकडून विनाकारण मेहनत करविणारे पुष्कळ बाप आहेत. कांहीं अज्ञानानें, कांहीं पोकळ अभिमानास्तव व कांहीं धर्मसंबंधी समजुतीमुळें अशी मेहनत करवून घेतात. ह्यासाठीं मुलांवर निष्कारण ओझें लादणें व त्यांच्यानें तें सहन झालें नाहीं, म्हणजे त्यांस धोपटीत सुटणें अविचार आहे. अर्थाशिवाय पाठांतर करविणें हें तर निवळ वेड आहे. समजून उमजून मुलांस भारवाहक कां करावें, हें समजत नाहीं. एकादी गोष्ट त्यानें अवश्य लक्षांत ठेवावी, अशी आपली समजूत आहे, तर आपण प्रथम त्यास ती समजून सांगावी व मग पाठ करवून घ्यावी.

बापानें एक महत्वाची गोष्ट नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे; ती ही कीं, ज्या गोष्टी ग्रहण करण्याविषयीं मुलांची शक्ती नाहीं, त्या त्याला सांगू नयेत. मुलांची धारणाशक्ती किती आहे, याविषयीं विचार करून ज्या गोष्टी त्यांस सांगणें अवश्य, त्या बापानें सांगाव्या. ही गोष्ट लक्षांत न ठेवल्यामुळें पुष्कळ

मुलांचें अहीत झालें आहे. शरिरावर जास्ती ओझें घातल्यानें अहीत होतें. लहानपणीं मुलें तरतरीत दिसतात, म्हणून बापास हवरेपणा सुटून, तो मुलाकडून पुष्कळ पाठांतर करवून घेतो; मुलगा जों जों पाठ म्हणून दाखवितो, तों तों बाप त्याच्या मनावर अधिकाधीक ओझें लादतो. त्याचें पांचवें वर्ष पुरें होत आहे तोंच घोकंपट्टी सुरू होते. त्यानें कांहीं इंग्रजी शब्द व कांहीं कविता म्हणून दाखविल्या, म्हणजे बापास मोठी प्रतिष्ठा वाटून त्याजकडून पोपटासारखी आणखी घोकंपट्टी करविण्याची त्यास हौस वाटते. ज्याप्रमाणें मुलांचें शरीर लहानपणीं कोवळें असतें, त्याप्रमाणें त्यांचें मनही कोवळें असतें. ज्याप्रमाणें शरिराची वाढ होऊन तें दृढ होण्याला कांहीं दिवस लागतात, त्याचप्रमाणें मनाची स्थिती होय. लहानपणीं मुलांच्या मनास जितका कमी त्रास देववेल तितका द्यावा. ज्यांना ऐपत आहे, त्यांनीं त्यांकडून नुसतीं नांवें पाठ करविण्यापेक्षां त्यांच्या डोळ्यांपुढें पदार्थ ठेवीत जावे. अगोदर प्रेक्षण व नंतर पाठांतर, अशी व्यवस्था जितकी होईल तितकी असावी. लहानपणीं मुलें जितकी खेळतील, उड्या मारतील, पदार्थ अवलोकन करतील, तितकें चांगलें. हा काळ व्यर्थ गेला, असें बापानें मानूं नये. दुसरीं मुलें चढाओढीस पेटून पुष्कळ पाठांतर करतात, म्हणून आपल्या मुलांस तसें करूं देऊं नये. यावरून मुलांकडून पुस्तकें वाचवूं नयेत, अथवा त्यांच्याकडून पाठांतर बिलकूल करवूं नये, असें नाहीं. वाचन व पाठांतर हीं सुरू असावीं, परंतू तीं बेतावातानें असावीं. ज्या ज्या गोष्टी त्यांच्या पाहण्यांत वारंवार येतात, त्या त्या त्यांच्या वाचण्यांत याव्या; ज्या त्यांनीं अक्षयीं लक्षांत ठेवावयाच्या, त्या प्रत्यक्ष दाखविण्यासारख्या

असल्यास त्या त्यांस दाखवाव्या; तसें होण्यासारखें नसल्यास त्या त्यांकडून ऐकवाव्या व नंतर पाठ करवून घ्याव्या. प्रत्यक्ष पदार्थ दाखविण्याचें सामर्थ्य नसेल, तर त्यांस त्यांचीं चित्रें दाखवावीं. निरनिराळे पक्षी, श्वापदें, किडे, हत्यारें, आउतें, यांचें प्रेक्षण चित्रांच्या द्वारें करवावें.

सर्व मनुष्यांची स्थिती सारखी नसते; त्यांचे उद्योग, त्यांचे धंदे व त्यांचें सामर्थ्य, हीं भिन्न भिन्न असतात. म्हणून गृह-शिक्षणाच्या संबंधानें एकच नियम सर्वांस सारखा लागू करतां येणार नाहीं; तथापी, उद्योगधंद्यासाठीं, व्यायामासाठीं, सार्व-जनिककामासाठीं अथवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या जरू-रीच्या कामासाठीं बापाचा जो वेळ बाहेर जाईल, त्याशिवाय इतर वेळीं त्यानें घरीं राहून, आपल्या उद्योगाचा व नेमस्त-पणाचा कित्ता आपल्या मुलांस घालून देणें; उधळेपणा, चैन, वगैरे गोष्टींविषयीं त्यांच्या मनांत बीजारोपण न होऊं देणें; नोकर चाकर अथवा दुसरीं माणसें यांस त्यांच्या आळ-साबद्दल अथवा लबाड्यांबद्दल आपण रागे भरतों, व त्यांच्या उद्योगाबद्दल व दक्षतेबद्दल त्यांची स्तुती करतों, हें मुलांक-डून ऐकविणें; आळशी व दुराचारी लोकांचा आपणास कंटा-ळा आहे, हें त्यांच्या नजरेस आणणें; आपले मनांत किडा, मुंगी, बैल, घोडें, गाढव वगैरे प्राण्यांविषयीं दया असते, हें त्यांच्या प्रत्ययास आणणें; आपण जें वाचतों त्याचा आपण कांहीं तरी चांगला उपयोग करतों, हें त्यांच्या नजरेस आणणें; पुस्तकसंबंधीं थोडेंबहूत शिक्षण देणें; लवकर निजून लव-कर उठण्याची त्यांस सवय लावणें; मुलगा शाळेंत जात असेल, तर तो काय शिकतो, काय नाहीं, वर्गांत त्या-चा नंबर कितवा आहे, याविषयीं आठ चार दिवसांनीं

तरी विचारपूस करणें; कधीं कधीं त्यास आपले बरोबर बाजा-रांत घेऊन जाऊन आपण जिनसापानसा कशा खरेदी करतों, हें त्यास दाखविणें; कधीं कधीं त्यास व्यवहारसंबंधी उप-युक्त माहिती सांगणें; या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या गोष्टी बापास करतां येण्यासारख्या आहेत. या करण्यास ज्यांस खरोखर सवड नाहीं, असे थोडे दृष्टीस पडतात. वेळे-च्या संबंधानें पुष्कळांची उगीच ओरड असते. गप्पा मारण्यांत, उशिरां उठण्यांत, निरर्थक पुस्तकें वाचण्यांत, स्वतःच्या करमणुकींत, व अशाच प्रकारच्या दुसऱ्या कामांत जो वेळ जातो त्याची गणती केली असतां, वेळेची सबब पोकळ आहे, असें कळून येईल. यदाकदाचित् वेळ न सापडला, तर बापानें या गोष्टी दुसऱ्या योग्य मनुष्यास करावयास सांगून त्यानें देखरेख ठेवावी. आपण आपल्या मुलास एकदां शाळेंत घातलें, महिन्याच्या महिन्यास त्याची फी भरीत गेलें व त्यास पुस्तकें घेऊन दिलीं, म्हणजे आपण आपलें कर्तव्य बजाविलें, असें मुलाच्या बापानें अथवा पालकानें समजूं नये. मुलांस रोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत फक्त मुलांचा सहवास असेल, तर त्यांचे आचारविचार पोरकट असणार आहेत. त्यांचे विचार प्रौढ होण्यास बराच काळ लोटला पाहिजे. शाळेंत पांच सहा तास शिक्षण व घरीं दोन तास शिक्षण हें सारखें आहे. कारण, शाळेंत एका व्यक्तीस तीस चाळीस मुलांकडे लक्ष द्यावें लागतें; घरीं एका व्यक्तीकडे, पराकाष्ठा दोन चार मुलांकडे लक्ष द्यावयाचें असतें. शाळेंत प्रति-बंधांत राहून शिकणें, व घरीं मोकळ्या मनानें शिकणें, यांत फरक आहे. शाळेंत विवक्षित

विषय विवक्षित रीतीनें विवक्षित काळपर्यंत शिकवावयाचे असतात; घरच्या शिक्षणाची अशी गोष्ट नाहीं. पहिल्या प्रकारच्या शिक्षणापासून एक फायदा आहे; दुसऱ्या प्रकारच्या शिक्षणापासून दुसरा फायदा आहे. ह्यासाठीं प्रस्तुतच्या स्थितीचा विचार करतां, गृहशिक्षण हें शाळेंतील शिक्षणास सहाय्यभूत होईल, अशी व्यवस्था बापानें अथवा पालकानें ठेवणें अगत्याचें आहे. आपल्या मुलींस शिक्षण देण्याचें सामर्थ्य आयांच्या अंगीं असणें जरूर आहे. आपल्या मुलींस शिकविणें हें त्यांचें मोठें कर्तव्य आहे. परंतू सध्यांच्या स्थितीचा विचार करतां पुष्कळ आयांस हें कर्तव्य बजावितां येत नाहीं; म्हणून आयांस हें काम करतां येईपर्यंत बापानें तें आपलेकडे घेतलें पाहिजे.

बापानें मुलांस शिक्षण द्यावें, असें आम्हीं सांगितलें; परंतू हें शिक्षण काय द्यावें, असा प्रश्न उत्पन्न होतो. मुलांच्या शिक्षणासंबंधानें पुस्तकांची मातब्बरी मुख्य नसून दुसऱ्या प्रतीची आहे, हें मागें सांगितलेंच आहे; परंतू ही गोष्ट फार थोड्यांच्या लक्षांत असते. घरांतील व बाहेरील पदार्थांविषयीं त्यांस माहिती करून दिल्यावर त्यांच्या हातीं पुस्तक द्यावें हें उत्तम. असें करण्यास बापास थोडे श्रम घ्यावे लागतील; परंतू ह्या बाबतींत चालढकल उपयोगाची नाहीं. मूर्तिमंत पदार्थांवरून अदृश्याविषयीं कल्पना होणें, हा साधारण क्रम आहे. पुस्तक अगोदर हातीं दिलें असतां त्यांतील गोष्टी ग्रहण करणें एवढेंच मुलांचें काम असतें; स्वतःची कल्पना चालविण्यास सवड कमी असते. मुलानें स्वतःची कल्पना चालविली पाहिजे, व होतां होईल तितकें तो स्वतःचा शिक्षक बनला पाहिजे. जेथें मुलास समजणार नाहीं अथवा

तो चुकेल, तेथें मात्र बापानें मदत करावयाची. नवशिक्या पोहणाराच्या संबंधानें जें वर्तन असावयाचें, तेंच मुलांच्या शिक्षणसंबंधानें असलें पाहिजे. नवीन पोहणारा कधीं कधीं गटांगळ्या खाईल; पण त्याबद्दल खेद मानण्याचें कारण नाहीं. तात्पर्य, मुलगा आपण होऊन आपला मार्ग पुढें काढील, अशाविषयीं बापानें जपलें पाहिजे.

वर जे विचार सुचविले त्यांवरून पुस्तकी ज्ञानाची आम्ही कांहींच मातब्बरी समजत नाहीं, असा कदाचित् कित्येकांचा समज होईल. तसा समज होऊं देऊं नये. लहानपणीं पुस्तकी विद्येवर भर कमी ठेवून मुलगा जसजसा मोठा होईल, तसतशीं त्याच्या हातीं पुस्तकें द्यावीं; पुस्तकी विद्येवर सगळी भर असणें, हें ज्याप्रमाणें साधारण लोकांस हितकर नाहीं, त्याप्रमाणें ह्या विद्येविषयीं हेळसांड करणें हेंही श्रेयस्कर नाहीं, असें सांगण्याचा आमचा हेतू आहे. साधारण प्रतीच्या लोकांस व्यवहारज्ञान पाहिजे व पुस्तकी विद्याही पाहिजे. पुस्तकी विद्येवाचून मनुष्याची स्थिती कांहीं अंशीं लहान मुलासारखी असते; तो व्यवहारांत अनेक वेळां फसतो; साधारण गोष्टींसाठीं त्यास दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहावें लागतें; माहिती करून घेण्याचें साधन नसल्यामुळें लोक सांगतील तेवढ्यावरच त्यास निर्वाह करावा लागतो; व ज्यास हें शिक्षण मिळालें आहे, त्यापेक्षां त्याची योग्यता कमी असते. पुस्तकी विद्येचा बराच उपयोग असतो असें सांगितलें; परंतू वाटेल तें पुस्तक मुलांच्या हातीं देणें चांगलें नाहीं. सगळींच पुस्तकें चांगलीं असतात असें नाहीं. कांहीं उपयोगी व कांहीं निरुपयोगी हा प्रकार असावयाचाच. कित्येक पुस्तकें वैराग्यपर, कित्येक शृंगारपर, कित्येक कल्पनातरंगांनीं भर-

लेखीं, कांहींत कांहीं गुणांची स्तुती व दुसऱ्यांत त्याच गुणांची विटंबना, अशीं असतात; कांहींची भाषा सभ्य, कांहींची ग्राम्य व पोरकट, असा प्रकार दृष्टीस पडतो. तेव्हां मुलांच्या हातीं पुस्तक देण्यापूर्वी तें कसें आहे, याबद्दल बापानें चांगला विचार करून मग तें त्यांच्या हातीं द्यावें. असें न केलें आणी त्यांच्या समजुती चमत्कारीक झाल्या, तर त्याबद्दल त्यांस दोष देऊन उपयोगी नाहीं. पुस्तकांतून ज्या गोष्टी मुलें वाचतात त्यांचा त्यांच्या मनावर बराच ठसा राहतो. यांत पुढें वारंवार बदल होतो, परंतू पुष्कळ वेळां पुस्तकांतील गोष्टी त्यांच्या मनांत बिंबून राहतात. यासाठीं बापानें पुस्तकांची निवड चांगली करावी.

सर्व पुस्तकांविषयीं एक नियम सांगतां येणार नाहीं. ज्या पुस्तकांचा मनरंजनापलीकडे दुसरा कांहींच उपयोग नाहीं, अशीं पुस्तकें मुलांस प्रथम देऊं नयेत. मागाहून म्हणजे ज्यावेळेस त्यांस स्वतः बरें वाईट कळूं लागतें, त्यावेळेस त्यांनीं तीं वाचलीं असतां चालेल. परंतू लहानपणीं तीं नसतील तर बरें. वेळ जात नसेल, तेव्हां मनरंजनाचीं पुस्तकें वाचावयाचीं; एरवीं नाहीं. जन्मास येऊन ज्यांस कांहीं कर्तव्य आहे, त्यांकरतां तीं विशेषतः नाहींत; आळशांकरितां आहेत. वेळ कसा घालवावा, ह्याबद्दल उद्योगी मनुष्यास पंचाईत पडत नाहीं. कादंबऱ्या वाचल्यानें लहान मुलांचें जितकें हीत आहे, त्यापेक्षां त्यांचें अहीत फार आहे. कारण, ज्या मनोविकारांस लहानपणीं उत्तेजन मिळूं नये, त्यांस उत्तेजन मिळतें. कादंबऱ्यांत कल्पनातरंग असल्यामुळें बहुतेक गोष्टी उज्ज्वलीत म्हणजे अतिशयोक्तीनें वर्णिलेल्या असतात; तशा प्रत्यक्ष व्यवहारांत नसतात. यामुळें मुलांस उज्ज्वलीत

गोष्टींविषयीं गोडी लागून, जगांतील प्रत्यक्ष गोष्टी निरस वाटतात. निवळ काल्पनीक गोष्टींविषयीं अभिरूची कमी होऊन, व्यवहारांतील प्रत्यक्ष गोष्टींविषयीं मुलांस प्रथम जास्त गोडी असणें इष्ट आहे. लहानपणीं कादंबऱ्या वाचण्याचा छंद असला म्हणजे, इतर विशेष उपयुक्त पुस्तकें वाचण्याकडे मनाची प्रवृत्ती कमी असते. उपयुक्त पुस्तकें वाचण्यानें मनास जें शिक्षण मिळावयाचें तें त्यांस कमी मिळतें. मनरंजन करणें एवढाच पुस्तकें वाचण्याचा हेतू नाहीं. कादंबऱ्या वाचून विचार उदात्त व्हावयाचे; परंतू ह्या हेतूनें वाचणारे थोडे. लहानपणीं तर ही गोष्ट साध्य नसते. ह्यावरून कोणत्याच प्रकारच्या कादंबऱ्या किंवा मनरंजनाचीं पुस्तकें मुलांनीं वाचूं नये, असें नाहीं. ऐतिहासीक कादंबऱ्या, अथवा ज्यांत लोकाचारांच्या संबंधानें असलेले दोष दाखविले आहेत अशा कादंबऱ्या, किंवा बाळमित्र, इसापनीती, हितोपदेश ह्यांसारखीं बोधपर गोष्टींचीं पुस्तकें वाचणें योग्य आहे. भाकड कथांची अथवा बाष्कळ गोष्टींचीं पुस्तकें नकोत.

दिवसेंदिवस नवीन नवीन पुस्तकें दृष्टीस पडत आहेत. त्यांपैकीं कोणतीं वाचावीं, व कोणतीं टाकावीं, असा प्रश्न उत्पन्न होतो. सगळींच पुस्तकें वाचण्यांत अर्थ नाहीं, अथवा तीं वाचण्यास वेळही नाहीं. जीं पुस्तकें हल्लीं दृष्टीस पडतात, त्यांविषयीं विचार करतां त्यांपैकीं कांहीं पुस्तकें छापखान्यांतून निवळ ओढून काढलेलीं आहेत, असें दृष्टीस पडतें; कांहीं इकडलें, कांहीं तिकडलें, असें मिळून सरासरी गोधडी बनवून जगापुढें ठेविलेली आहे, अशी कांहींची स्थिती दृष्टीस पडते. चांगलें वस्त्र न मिळालें, तर गोधडीवर निर्वाह करावयाचा, हें

सांगावयास नको. ज्या ग्रंथांत ग्रंथकाराचे स्वतःचे कांहीं विचार दृष्टीस पडतात व जे घेण्यासारखे आहेत, अशाबद्दल बापानें खात्री करून घेतली आहे, ते ग्रंथ मुलांच्या हातीं देणें विशेष श्रेयस्कर आहे. उत्तम ग्रंथ वाचण्याची गोडी लागली, म्हणजे ते होऊन भिकार ग्रंथ हातीं धरणार नाहींत. ज्या पुरुषांनीं मानवी प्राण्यांच्या विचारांस वळण लाविलें आहे अथवा ज्यांच्या विचारांमुळें लोकस्थितींत घडामोडी झाल्या आहेत, त्यांचे ग्रंथ प्रथम वाचले पाहिजेत. जनापवादाची पर्वा न करतां लोकांचे दोष दाखवून ज्यांनीं त्यांस सन्मार्गास लावलें आहे, त्यांचे ग्रंथ मुलांकडून वाचविणें योग्य आहे. ह्यावरून लहान किरकोळ पुस्तकें मुलांकडून कधींच वाचवून घेऊं नये, असें नाहीं. असल्या ग्रंथांची जरूरी आहे. ह्यांच्या सहाय्याशिवाय चालणार नाहीं. ह्या पायऱ्या आहेत. पायऱ्या वलांडून गेल्याशिवाय उंच स्थळीं जातां येणार नाहीं; परंतू पायऱ्यांवर थांबावयाचें नाहीं; वर जावयाचें आहे, व वर गेल्यावर मोक्ष आहे, हें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे.

मुलांनीं पुस्तकें वाचलीं पाहिजेत, व तीं पुस्तकें चांगलीं असलीं पाहिजेत, असें सांगितलें; परंतू तीं नुसतीं भरकटीत नेण्यांत अर्थ नाहीं. तीं वाचतांना मुलें विचार करीत आहेत किंवा नाहीं, हें पाहिलें पाहिजे. असें न केलें, तर कांहींच उपयोग होणार नाहीं. कित्येक लोक भाराभर पुस्तकें वाचून टाकतात व फुशारकी मिरवितात. खरी प्रतिष्ठा पुष्कळ पुस्तकें वाचून टाकण्यांत नाहीं; थोडीं पुस्तकें मनन करून वाचण्यांत आहे. पुस्तकें वाचतांना महत्वाच्या गोष्टी मुलांनीं लक्षांत ठेविल्या पाहिजेत; त्या विसरूं नये, म्हणून टिपण करणें चांगलें. साधारण माहिती मिळविण्याकरतां किरकोळ

पुस्तकें वाचण्यास हरकत नाहीं. परंतू, ज्याप्रमाणें कुतरा अनेक ठिकाणीं हुंगतो, पण त्याला लभ्यांश फार थोड्या ठिकाणीं सापडतो, त्याप्रमाणें पुस्तकें नुसती हुंगून उपयोगी नाहींत; त्यांपासून कांहीं लभ्यांश प्राप्त झाला पाहिजे.

पुस्तकांत मासीक पुस्तकांचा समावेश केला आहे, हें येथें सांगण्याचें कारण नाहीं. आतां, एका गोष्टीविषयीं विचार करणें राहिलें. ती वर्तमानपत्रांच्या संबंधानें होय. ज्याप्रमाणें कादंबऱ्यांच्या बाबतींत मतभेद आहे, त्याप्रमाणें वर्तमानपत्रें वाचण्याच्या बाबतींतही मतभेद आहे. कित्येकांचें असें मत आहे कीं, मुलांनीं वर्तमानपत्रें मुळींच वाचूं नये. कारण, “ त्यांत चालू राज्यव्यवहारसंबंधानें चर्चा केलेली असते; ह्या व्यवहारसंबंधानें कायमचीं मतें बनलेलीं नसतात; मुलांचीं मनें तर परिपक्व नसतात; तेव्हां भलत्याच मतांचा ते स्वीकार करतील, अशी भीती असते. शिवाय, आमचीं वर्तमानपत्रें बाष्कळपणाच्या मजकुरानें किंवा शिळ्या बातम्यांनीं किंवा विचारांनीं भरलेलीं असतात. तीं वाचण्यापासून उपयोग न होतां मुलांचें अहीत मात्र होतें, ” असा कांहींचा आक्षेप आहे. ह्या आक्षेपांत कांहींच अर्थ नाहीं, असें आम्ही म्हणत नाहीं; परंतू हा आक्षेप सर्व वर्तमानपत्रांस सरसकट लागू करणें अविचार आहे. पुस्तकांच्या संबंधानें ज्याप्रमाणें निवड करण्याची आवश्यकता आहे, त्याप्रमाणें वर्तमानपत्रांच्या संबंधानेंही निवड करणें जरूर आहे. पूर्वींचा इतिहास समजणें जसें अवश्य आहे, तसेंच चालू व्यवहार समजण्याकरतां वर्तमानपत्रें वाचलीं पाहिजेत. पूर्वींचा इतिहास वाचण्याचें कारण काय ? त्याचा उपयोग मुख्यत्वें प्रस्तुतच्या व्यवहारांस व्हावा, म्हणून तो वाचावयाचा नाहीं

काय ? जर चालू व्यवहारांकडे दुर्लक्ष करावयाचें आहे, तर पूर्वीच्या इतिहासाची फारशी मातब्बरी राहत नाहीं. पूर्वी झालेला व्यवहार व चालू असलेला व्यवहार ह्यांची सांगड पाहिजे. दोन्ही वेळचे व्यवहार व दोन्ही वेळच्या गोष्टी डोळ्यांपुढें पाहिजेत. चालू व्यवहारांवरून आठवण होऊन पूर्वीच्या गोष्टी समजून सांगण्यास सवड सापडते. भलत्याच गोष्टी अथवा भलतेच विचार वाचून मुलांचें मन भ्रमण पावेल, अशी भीती असते हें कांहीं अंशीं खरें आहे, परंतू बापाचें शिक्षण पाहिजे, असें जें आम्ही म्हणत आहों, तें असा प्रकार होऊं नये, म्हणून पाहिजे. कोणतीं वर्तमानपत्रें मुलांनीं वाचावीं, ही गोष्ट बापानें ठरवावी. असें ठरविल्यावर पुष्कळ काम झालें असें समजावें. असें केल्यावर ज्या गोष्टी मुलांनीं लक्षांत ठेवल्या असतील, त्यांबद्दल जेवणाच्या वेळीं किंवा संध्याकाळच्या शतपावलीच्या वेळीं झडती घ्यावी; व त्यावेळेस आपलें मत काय आहे तें कळवीत जावें. सर्वांस असें करतां न आल्यास ज्यांस तें करतां येण्यासारखें आहे, त्यांनीं तें करण्यास चुकूं नये.

सांप्रतच्या स्थितीविषयीं विचार करतां पुष्कळ ठिकाणीं लायब्र्या नाहींत. ज्या ठिकाणीं त्या आहेत, त्यांपैकीं बऱ्याच ठिकाणीं वाचणारांची संख्या फारच थोडी असते. सांप्रत काळीं लायब्र्या म्हणजे देवमंदिरासारख्याच झाल्या आहेत. परंतू ह्या मंदिरांत येण्याविषयीं फार थोडयांचा उत्साह दृष्टीस पडतो. फुरसत होत नाहीं, अशी कांहींची सबब असते; विशेष उपयोग होत नाहीं, असें कांहीं म्हणतात; पैसे नाहींत, असेंही कांहींचें म्हणणें आहे; कांहींस लाज वाटते. तात्पर्य, कांहीं ना कांहीं रडकथा दृष्टीस पडते.

ही स्थिती सुशिक्षित लोकांपैकीं बऱ्याच लोकांची दृष्टीस पडावी, ही शोचनीय गोष्ट आहे. बऱ्याच लोकांच्या स्थितीविषयीं विचार करतां वरील सबबी पुष्कळ अंशीं पोरकट आहेत. उत्साह कमी, ही गोष्ट खरी आहे. एकंदरीनें विचार करतां वाचनाची गोडी फार थोड्यांस असते. ही ज्यांस आहे, ते हजार अडचणी एकीकडे ठेवून वेळांत वेळ काढतात व कार्यभाग साधतात; रडकथा सांगत बसत नाहींत. ही गोडी मोठेपणीं थोड्यांस लागते; परंतू लहानपणापासून ही असली, म्हणजे हल्लीं जी शोचनीय स्थिती दृष्टीस पडते, ती पडणार नाहीं. घरोघर एक छोटेखानी लायब्ररी असली पाहिजे. जे अगदीच गरीब असतील त्यांस कदाचित् असें करतां येणार नाहीं; व त्यांसंबंधानें आमचें विशेष म्हणणें नाहीं. वर्तमानपत्रें व पुस्तकें हल्लीं थोड्या किंमतींत मिळूं लागलीं आहेत. तेव्हां दोन तीन वर्तमानपत्रें, एकादें मासीक पुस्तक, व चार पांच पुस्तकें सालीना घेणें पुष्कळांस शक्य आहे. ह्या प्रीत्यर्थ झालेला खर्च अनाठायीं नाहीं. हा सव्याज भरून येईल, अशी आमची पक्की खात्री आहे. हा खर्च भरून येणार नाहीं, अशी कल्पना केली, तरी माहिती मिळेल हा लाभ लहान नाहीं. आमच्यांपैकीं कांहींस गाण्याचा, कांहींस पोषाकाचा, कांहींस डागडागिण्यांचा व कांहींस सामानसुमानाचा शोक असतो; कांहींस पानसुपारीचें, कांहींस विड्यांचें, कांहींस तपकिरीचें व्यसन असतें; परंतू होमलायब्ररीचा ( गृहवाचनालयाचा ) शोक आहे, असे थोडे दृष्टीस पडतात; व लायब्ररीचें व्यसन आहे, असे तर फारच थोडे दिसून येतात. ही गोष्ट इष्ट नाहीं, परंतू फुकट शोकी नकोत; निदान लायब्ररीच्या बाबतींत तरी नकोत. हल्लींचा

काळ म्हणजे लोकमताचा काळ. लोकमतास वळण लावणारे जे आहेत, त्यांपैकीं वर्तमानपत्रकार व ग्रंथकार हे मुख्य होत; ह्यांच्या कृतीस जर उत्तेजन नाहीं, तर वर्तमानपत्रांचा व ग्रंथांचा प्रसार, व येणेंकरून ज्ञानाचा प्रसार कसा व्हावा? ज्ञानाचा प्रसार करण्यास आम्हांपैकीं प्रत्येकानें उत्तेजन दिलें पाहिजे. त्यांत, दुसऱ्याचें व आमचें हीत आहे; परंतू जें उत्तेजन पाहिजे, तें फुकट शोक करणाऱ्यांपासून कसें प्राप्त व्हावें? उदर भरणासाठीं भिक्षा मागणाऱ्यांची संख्या आमच्या देशांत यथास्थित आहे; तेव्हां ज्ञान वाढविण्यासाठीं भिक्षा मागणारे आतां नकोत. ह्यावरून प्रत्येकानें सर्व वर्तमानपत्रें व पुस्तकें विकत घ्यावीं व वाचावीं असें म्हणण्याचा आमचा हेतू नाहीं. असें करणें पुष्कळांस शक्य नाहीं, हें आम्ही समजून आहों. आमच्या म्हणण्याचा हेतू असा आहे कीं, प्रत्येकानें यथाशक्ती कांहीं वर्तमानपत्रें व पुस्तकें स्वतः विकत घ्यावीं, व मग फुकटावर नजर ठेवावी. चांगल्या कामासाठीं पदराला थोडा खार लावून घेण्याची सवय मुलांस लागली पाहिजे; परंतू बापासच जर ही सवय नसेल, तर मुलांस कोठून लागणार?

मुलांस वाचनाची गोडी लागण्यासाठीं, जगांत काय चाललें आहे हें थोडें बहूत समजण्यासाठीं, व अशाच प्रकारच्या ज्या महत्वाच्या गोष्टी त्यांसाठीं, होमलायब्ररी असणें आवश्यक आहे. अशी लायब्ररी असल्यानें स्त्रियांसही कांहीं उपयोग करून घेतां येईल. वर्तमानपत्रें मुलांनीं वाचावीं असें आम्हीं म्हटलें; परंतू ह्या कामांत त्यांस फार वेळ घालवूं देणें बरें नाहीं. त्यांस दुसरीं महत्वाचीं कामें करावयाचीं अस-

तात, व त्यांत व्यत्यय न येईल अशाबद्दल खबरदारी ठेविली पाहिजे. हें लायब्ररी—प्रकरण थोडें जास्त लांबलें; परंतू होम-लायब्ररीचें महत्व पुष्कळ लोकांस समजत नाहीं, किंवा समजून त्याविषयीं ते उदासीन असतात, अशी आमची स्थिती आहे; म्हणून ह्याविषयीं थोडा जास्त खुलासा करणें अगत्याचें वाटलें.

प्रस्तुत वस्तुस्थिती पाहतां घरबसल्यां ज्यांस निर्वेध उत्पन्न येतें, असे लोक फारच थोडे आहेत. पोटासाठीं उद्योगधंदा करण्याची आवश्यकता पुष्कळ लोकांस आहे. निरनिराळ्या प्रकारचे धंदे देशांत सुरू असल्याशिवाय पोट भरण्याची सोय चांगली होत नाहीं. परंतू हे धंदे शास्त्रांच्या ज्ञानाशिवाय चांगल्या रितीनें चालत नाहींत. आमचीं जीं षट्शास्त्रें आहेत त्यांचा उपयोग निराळ्या कामाकरतां आहे; धंद्याच्या कामांत त्यांचा उपयोग नाहीं. धंद्यास उपयोगी पडणारीं निराळीं शास्त्रें आहेत. पदार्थविज्ञान, रसायन वगैरे शास्त्रांची माहिती धंद्यांच्या बाबतींत फार आवश्यक आहे. ती फार थोड्यांस आहे. इंग्लंड, युनायटेड स्टेट्स वगैरे जे देश श्रीमान झाले आहेत, ते केवळ तरवारीच्या जोरावर श्रीमान झाले नाहींत. धंद्यास लागणारी शास्त्रांची जी माहिती तिच्या प्रसारामुळें मुख्यत्वें श्रीमान झाले आहेत. धंद्यास लागणारी जी शास्त्रांची माहिती, ती मिळविण्याच्या बाबतींत व तिचा उपयोग करण्याच्या बाबतींत तिकडे जो उद्योग चालू आहे, त्याच्या शतांशानेंदेखील येथें चालू नाहीं. ह्या बाबतींत सरकारावरच अवलंबून राहून उपयोग होणार नाहीं. शाळांतून अशा प्रकारच्या शिक्षणाची फार आवश्यकता आहे; परंतू अशी तजवीज होत नाहीं, म्हणून आम्ही स्वस्थ

असून उपयोग नाहीं. जी थोडी बहूत माहिती उपलब्ध आहे तिचा उपयोग करून घेतला पाहिजे. ज्या धंद्यांत मुलास घालवयाचें, त्या धंद्याच्या संबंधानें जीं पुस्तकें उपलब्ध असतील तीं वाचण्याविषयीं त्यांस उत्तेजन दिलें पाहिजे. धंद्यास लागणारी जी दुसरी सामुग्री तीही असली पाहिजे. पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रत्यक्ष ज्ञानही पाहिजे. ह्या दोन ज्ञानांची सांगड पाहिजे. तात्पर्य, ज्या धंद्याच्या योगानें मुलें चरितार्थ करणार, त्या धंद्याविषयीं त्यांस जितकी माहिती करून देतां येईल तितकी करून दिली पाहिजे.

जो धंदा मुलांनीं करावयाचा त्यासंबंधीं पुस्तकें वाचण्यास मुलांस उत्तेजन दिलें पाहिजे असें सांगितलें; परंतू एवढींच पुस्तकें वाचून उपयोग नाहीं. मुलांस धंद्यांत लवकर घातल्याशिवाय गत्यंतर नाहीं, अशी ज्यांची गृहस्थिती आहे, त्यांसंबंधानें विचार करावयाचा नाहीं. त्यांनीं आपल्या स्थितीप्रमाणें काय करणें तें करावें. परंतू ज्यांस कांहीं ऐपत आहे त्यांनीं मात्र चालढकल करूं नये. ज्यास साधारण शिक्षण ( जनरल एज्युकेशन ) विशेष न मिळतां फक्त धंद्याच्याच संबंधानें शिक्षण मिळालें आहे, तो एकमार्गी असतो. त्याचे विचार संकुचीत असतात, व ह्यामुळें त्याचें तेज पडत नाहीं. आमचे भिक्षूक, कथेकरी किंवा पुराणीक घ्या; किंवा सुतार, लोहार वगैरे कारागीर घ्या; ह्यांस साधारण शिक्षण न मिळाल्यामुळें त्यांचे विचार कसे असतात हें आपणांस माहीत आहे. ज्या वकिलांस उच्च प्रतीचें शिक्षण मिळालें नसून फक्त कायद्याचेंच ज्ञान असतें, व ज्यांस दोन्ही प्रकारचें शिक्षण मिळालें आहे त्यांचे विचार कसे असतात, हें आपणांस माहीत आहे. एकाचे विचार

बरेच कोते असतात, व दुसऱ्याचे तसे नसतात, ही गोष्ट तेव्हांच कळून येते. ह्यास कांहीं अपवाद सापडतील, परंतू सामान्य प्रकार वर सांगितल्याप्रमाणें दृष्टीस पडतो. ह्यासाठीं धंद्याचींच पुस्तकें वाचून इष्ट कार्य होत नाहीं. धंद्याचें शिक्षण पाहिजे व साधारण शिक्षणही पाहिजे. परंतू प्रथम साधारण शिक्षण, व मग धंद्याचें शिक्षण. असा क्रम न ठेविला, तर इष्ट हेतू सिद्धीस जाण्यास अडचण येईल.

ज्या धंद्यांत मुलांस घालावयाचें असेल, त्या धंद्याच्या संबंधानें जीं पुस्तकें उपलब्ध असतील, तीं पुस्तकें मुलांकडून वाचवून त्यांतील माहितीचा जितका उपयोग करवितां येईल, तितका करविण्याविषयीं प्रयत्न करावा. आतां, साधारण शिक्षण दिल्यावर धंद्याचीं पुस्तकें वाचण्यास मुलांस उत्तेजन द्यावें असें सांगितलें; परंतू ज्या शिक्षणानें विचार उदात्त होतात, असें शिक्षण कोणतें असा प्रश्न उत्पन्न होतो. रितीभाती, देखावे, वगैरे गोष्टी दृष्टीस पडाव्या, ह्या हेतूनें प्रवास करणें, हें एक प्रकारचें शिक्षण असून त्यामुळें कोत्या समजुती बऱ्याच कमी होतात. त्याचप्रमाणें इतिहास हें अनुभवाचें भांडार असल्यानें त्याच्या वाचनापासून फार फायदा होतो. तत्त्वज्ञानाचीं पुस्तकें म्हणजे थोर पुरूषांच्या विचारांचीं भांडारें. तेव्हां तीं वाचल्यापासून व त्यांतील विचारांचें मनन केल्यापासून मोठा लाभ होणार आहे, हें सांगावयास नको. ह्या पुस्तकांचें अध्ययन सवडीप्रमाणें करवितां येण्यासारखें असल्यास तें अवश्य करवावें. अशा प्रकारचें शिक्षण फक्त श्रीमंतांस असावें व गरिबांस नसावें, हें म्हणणें चुकीचें आहे. असें म्हणणें, म्हणजे श्रीमंतांचेच विचार श्रीमंत अथवा उदात्त असावे, व गरिबांचे भिकार अथवा कोते असावे,

असें कांहीं अंशीं म्हणणें आहे. विचार उदात्त होण्यास जीं साधनें अवश्य आहेत तीं नसलीं तर गोष्ट निराळी; परंतू होतां होईल तितकें करून विचार उदात्त होण्यास जीं साधनें आहेत, त्यांचा उपयोग करून घेण्याविषयीं यत्न करणें आपलें काम आहे. जर असें करणें शक्यच नसेल, तर मग गोष्ट निराळी.

पुष्कळ लोकांच्या स्थितीविषयीं विचार करतां, उच्च प्रतीचें शिक्षण देणें कठीण आहे; परंतू भाषाज्ञान, तसेंच गणीत; इतिहास व भुगोल वगैरे विषयांचें ज्ञान करून देणें सर्वांस शक्य आहे. ह्या विषयांचें ज्ञान अवश्य असलें पाहिजे. मनुष्यास ह्या विषयांचें ज्ञान नसेल, तर त्यांत फार कमीपणा असतो इतकेंच नाहीं, तर त्याचें तेज पडत नाहीं. पुष्कळ लोक हुशार असतात; ते बोलतात उत्तम, परंतू त्यांस चार ओळी शुद्ध लिहितां येत नसल्यामुळें त्यांचें अडतें. भाषाज्ञानासाठीं व्याकरणाची माहिती असावी लागते, व ही माहिती मिळविणें कांहींसें त्रासदायक वाटेल. त्याचप्रमाणें गणीत विषयही गोड वाटणार नाहीं. ह्या विषयावर सुबोध पुस्तकें असावीं तशीं नाहींत, हें खरें आहे; तथापी, ह्या विषयांचा कंटाळा करून उपयोग नाहीं. इतिहास व भुगोल हे विषय मनरंजक असून उपयुक्त आहेत. आतां हे जे विषय सांगितले त्यांसंबंधानें कांहीं गोष्टी सुचविणें अगत्याचें आहे.

**भाषाज्ञान**—सर्व शिक्षणास शिक्षकाची आवश्यकता आहे; मग तो शिक्षक शिक्षकाचा धंदा करणारा असो, किंवा दुसरा कोणी असो. मुलांस भाषेचें शिक्षण देण्यास चांगला शिक्षक पाहिजे. ह्या ठिकाणीं शाळेंतील शिक्षणाविषयीं आपणास

विचार करावयाचा नाहीं; गृहशिक्षणाविषयीं विचार करावयाचा आहे. घरीं भाषेचें ज्ञान देण्यास आई अथवा बाप अथवा दुसरे पालक हेच शिक्षक होत. हेच जर बेताबाताचे शिकलेले असतील, तर मुलांस भाषाज्ञानही बेताबाताचेंच मिळेल. कांहीं मुलांची भाषा अशुद्ध आढळून येते, ह्याचें मुख्य कारण आईबापांची भाषा अशुद्ध असते, हें होय. इतर चांगल्या मुलांच्या सहवासानें व शाळेंतील शिक्षकाच्या शिक्षणानें मुलांच्या भाषेंत फेरफार होतो; परंतू आईबापांच्या शिक्षणानें लवकर फेरफार होतो. जेथें सर्वत्र अनुनासीक वर्णांचा अथवा ‘ व्हय ’ ‘ म्हनूनशनी ’ ह्यांचा, अथवा पानी, लोनी, यनू, वंटा ह्यांचा अथवा पदोपदीं ग्राम्य शब्द उच्चारण्याचा बाजार आहे तेथें इलाज नाहीं. परंतू अशी सर्वत्र स्थिती नसेल, तर कांहीं तरी सुधारणा करण्यास मार्ग आहे. नोकर चाकर ह्यांची भाषा प्रायः अशुद्ध असते. तेव्हां त्यांच्या, किंवा ज्यांची भाषा अशुद्ध असेल त्यांच्या सहवासास जरूरीच्या कारणाशिवाय मुलांस ठेवणें इष्ट नाहीं. जेथें घरांतीलच मंडळी अशुद्ध बोलणारी आहे तेथें बोलावयासच नको. सांगण्याचें तात्पर्य हें कीं, मुलांस भाषाज्ञान चांगलें होण्यास ज्याची भाषा शुद्ध आहे त्याचा सहवास असल्यास चांगलें. असा सहवास असला, म्हणजे कार्य लवकर होतें; नाहीं तर पुढें उरस्फोड फार करावी लागते.

भाषेचें ज्ञान करून देणें हें निदान प्रथम फारसें कठीण नाहीं. भाषेचा संबंध पुस्तकांशीं अथवा मेंदूशीं नाहीं; जीभ व कान ह्यांशीं आहे. म्हणजे कानांनीं ऐकावयाचें व तोंडानें बोलावयाचें, हें प्रथम मुख्य काम आहे. घरांत अथवा आसपास बाहेर जे पदार्थ असतील त्यांसंबंधी काय बोलणें

असेल तें बोलावयाचें. मुलांच्या हातीं व्याकरण देऊन तें नुसतें पाठ करवून घेण्यांत अर्थ नाहीं. त्यांस प्रथम ठोकळ विभक्तिप्रत्यय सांगून त्यांकडून नामाचीं रूपें करवून घ्यावीं. नंतर कर्ता, कर्म व क्रियापद हीं सुचवून त्यांकडून लहान लहान वाक्यें बनवून घ्यावीं. अशा प्रकारें त्यांस लहान लहान वाक्यें बनवितां येऊं लागल्यावर विशेषणाचा उपयोग कसा करावयाचा हें शिकवावें. नंतर एकवचन सांगून त्याचें अनेकवचन कसें होतें, हें समजून सांगावें. ज्याप्रमाणें इंग्रजींत स्पेलिंग अनियंत्रित आहे, त्याप्रमाणें मराठींत लिंगविचार फार अनियंत्रित आहे. हा अभ्यासानेंच हळू हळू समजेल. त्याबद्दल आपण फारसा त्रास घेण्याचें किंवा मुलास त्रास देण्याचें कारण नाहीं. व्याकरणासंबंधी नियम प्रथम न सांगतां मुलाकडून तो बनवितां येण्याविषयीं यत्न करावा. नियम सांगण्याचेंच कारण पडलें, तर त्याबरोबर उदाहरणें देऊन त्या नियमाचा खुलासा करावा; नुसता नियम नको. मुलांची इतकी तयारी झाल्यावर त्यांस लहान लहान सोप्या गोष्टी सांगाव्या किंवा लहानसें संभाषण वाचून दाखवावें; व तें त्यांकडून म्हणवून घ्यावें. जेथें तो चुकेल तेथें त्यास समजून सांगावें, व चुक्या लक्षांत ठेवून तो पुनः बरोबर म्हणून दाखवितो किंवा नाहीं, हें पाहावें; परंतु असें वारंवार करवून घेऊं नये. तसें केलें असतां मुलांस आनंद न वाटतां शिक्षा वाटेल. प्रथमतः मुलें जितकें भाषण करतील तितकें चांगलें. त्यांस चांगलें भाषण करतां येऊं लागल्याशिवाय त्यांच्या हातीं पुस्तकें देण्याच्या भरीस पडूं नये. मुलांनीं जें ऐकावयाचें किंवा वाचावयाचें, त्यासंबंधानें त्यांस आनंद वाटला पाहिजे, हें येथें

सांगण्याचें कारण नाहीं. वाचतांना शद्बज्ञान व अर्थबोध ह्यांची जरूरी आहे; नुसतें वाचन उपयोगी नाहीं. परंतू, आई म्हणजे माता, व बाप म्हणजे पिता, अशा प्रकारचें शब्दज्ञान नको. शब्दाला शब्द देतां येणें, हें खरें शब्दज्ञान नाहीं; हा वेडेपणाचा बाजार आहे. शब्दापासून बोध कशाचा होतो, तें पाहिजे. हा बोध करून दाखविण्यासाठीं एकाहून अधीक शब्दांची योजना करावी लागली असतां हरकत नाहीं. मुख्य गोष्ट सांगावयाची ती ही कीं, नुसतें शाद्बिकज्ञान नको; अर्थबोध पाहिजे; व हा असेल तरच खरा उपयोग होईल. शब्दांची व्युत्पत्ती मुलांस समजून सांगतां येईल तर चांगलें; परंतू गम् म्हणजे जाणें व मृ म्हणजे मरणें, असल्या तऱ्हेच्या व्युत्पत्तीपासून तादृश फायदा नाहीं. शब्दाचा थोडक्यांत इतिहास पाहिजे. उदाहरणार्थ, ब्राह्मण ह्या शब्दाचा मूळ अर्थ काय होता, हल्लीं काय आहे, व त्यावरून काय अनुमान निघतें. प्राकृत, संस्कृत, फार्शी व अरबी भाषा मिळून मराठी भाषा बनली आहे. तेव्हां कोणत्या भाषेंतून कोणता शब्द आला आहे, व तो कसा प्रचारांत आला, हें मुलांस समजलें असतां विशेष उपयोग आहे.

भाषा शिकविणारांस निदान दोन भाषा अवगत असणें इष्ट आहे. असें असल्यानें तुलना करून समजून सांगण्यास उत्तम असतें, व तें ज्ञान चांगलें ठसतें. इलाज नसल्यास एक भाषा शिकविणें ठीक आहे; परंतू ज्यांस सवड आहे त्यांनीं मुलांस दुसरी भाषा शिकविण्यास आळस करूं नये. मराठी भाषा शिकणारांस थोडें संस्कृत येऊन गुजराथी, कानडी किंवा हिंदी भाषेचें ज्ञान होईल, तर विशेष फायदा होईल. हें ज्ञान फक्त स्वभाषेच्याच संबंधानें उपयोगी पडेल

इतकेंच नाहीं, तर दळणवळण ठेवण्यास व परस्परांचे विचार परस्परांस कळविण्यास फार उपयोगी पडेल.

इंग्लंड, फ्रान्स वगैरे सुधारलेल्या देशांची स्थिती व आमची स्थिती निराळी आहे. ह्या देशांत देशी भाषा चोहोकडे एक आहे; आमच्या देशांत अनेक आहेत. सर्वांस गुजराथी, कानडी, तेलगू, टयामिल, बंगाली वगैरे भाषा शिकणें सोपें नाहीं. ह्या भाषा बोलणारे आपले देशबंधू आहेत. त्यांची भाषा आपणास व आपली त्यांस समजणें अवश्य आहे; तसा योग लवकर घडून येण्याचा संभव कमी दिसतो; तेव्हां प्रत्येकानें निदान आपआपल्या शेजारच्या प्रांतांतील लोकांची भाषा शिकणें जरूर आहे. इंग्रजांच्या हातीं राज्यसूत्रें व व्यापार असल्यामुळें, व इंग्रजी शिकल्यानें नोकरी मिळते म्हणून, इंग्रजी भाषा शिकण्याची पुष्कळांस आवश्यकता आहे. आमच्या प्रांतांतील बराच व्यापार गुजराथी भाषा बोलणाऱ्यांच्या हातीं आहे, ते आमचे शेजारी आहेत, ह्या व दुसऱ्या कारणांकरतां आमच्या मुलांनीं गुजराथी भाषा शिकली पाहिजे. ह्या भाषेचें मराठी भाषेशीं बरेंच साम्य असल्यामुळें ती लवकर अवगत करून घेतां येईल.

पुष्कळ मुलांना शुद्ध, सोप्या व चटकदार भाषेंत लिहितां येत नाहीं. मुलांना लिहितां येत नाहीं, ह्यांत विशेष नवल नाहीं; परंतू मोठ्यांपैकींही कित्येकांना लिहितां येत नाहीं. चांगलें भाषण करतां येणें, हें ज्याप्रमाणें अभ्यासावर अवलंबून आहे, त्याप्रमाणें चांगलें लिहितां येणें, हेंही अभ्यासावर अवलंबून आहे. हा अभ्यास थोडा थोडा लहानपणापासून चालला तर चांगलें. भाषण करतां येऊं लागलें, म्हणजे लेखनास सुरुवात करावयाची, हें सांगावयास नकोच.

ज्या गोष्टी आपण तोंडानें सांगितल्या असतील व मुलांनीं म्हणून दाखविल्या असतील, त्याच त्यांस लिहून दाखविण्यास सांगाव्या; किंवा ज्या गोष्टी आपण त्यांस दाखविल्या असतील किंवा त्यांनीं होऊन पाहिल्या असतील किंवा वाचल्या असतील, त्यांविषयींची हकिकत प्रथम त्यांजकडून लिहून घ्यावी. ज्या विषयाची त्यांस मुळींच माहिती नाहीं, त्यासंबंधाची हकिकत लिहावयास सांगणें वेड आहे. अशा प्रकारें मुलांस थोडें लिहितां येऊं लागलें, म्हणजे दोन तीन मुद्दे अथवा गोष्टी सुचवून सबंध पत्र अथवा छोटासा निबंध त्यांजकडून तयार करवून घ्यावा.

मुलांस भाषा लिहिण्यास शिकविणें, म्हणजे टापटिपीचें व व्यवस्थितपणाचें शिक्षण देणें होय. आचरण शुद्ध व साधे व विचार उदात्त असणें, ह्यांची जरूरी फार आहे. हे गूण प्रत्येकांत पाहिजेत; मग तो श्रीमंत असो, किंवा गरीब असो. त्याचप्रमाणें, भाषा शुद्ध व साधी असून तींत विचार उदात्त आहेत किंवा नाहींत, हें पाहिलें पाहिजे. केव्हां केव्हां मुलें उगीच मोठमोठालीं वाक्यें लिहितात, किंवा अलंकारीक अथवा लांबलचक शब्द वापरतात. तसें त्यांस करूं देऊं नये. त्यांनीं सोपीं व लहान लहान वाक्यें लिहावीं, हें चांगलें. एका शब्दांत काम होत असल्यास अधीक शब्दांची योजना न करणें, सोप्या शब्दानें कार्य होत असतां कठीण शब्द न वापरणें, ज्या शब्दाचें मुळींच कारण नाहीं तो न योजणें, ग्राम्य शब्द कधींही न वापरणें ह्याकडे, व विचार प्रगल्भ आहेत किंवा कसे ह्याकडे त्यांनीं लक्ष दिलें पाहिजे.

भाषाज्ञानाच्या संबंधानें जे विचार सांगितले, ते वाचून

कांहीं म्हणतील कीं, आपल्या मुलांनीं वक्ते अथवा ग्रंथकर्ते व्हावें, अथवा परीक्षेंत पास होऊन त्यांनीं नोकरी मिळवावी, अशी ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं एवढा खटाटोप करावा. सर्वच मुलें वक्ते बनतील, ग्रंथकर्ते होतील किंवा परीक्षेंत पास होऊन दिग्विजय लावतील असा संभव नाहीं; तेव्हां जिवास त्रास कां करून घ्यावा ? ही समजूत कांहीं अंशीं चुकीची आहे. भाषाज्ञान संपादन करावयाचें, तें केवळ परीक्षा पास होण्यासाठीं किंवा वक्ते अथवा ग्रंथकर्ते बनण्यासाठीं नाहीं. भाषाज्ञान चांगलें असलें म्हणजे, हा हेतू सिद्धीस नेण्यास सहाय्य होतें; परंतू मुख्य हेतू हा नाहीं. मुख्य हेतू आपल्या स्वतःची करमणूक व सुधारणा करणें हा होय. भाषाज्ञानाशिवाय वाचनाची गोडी नसते. वाचनाची गोडी असल्यानें माहिती मिळते इतकेंच नाहीं, तर कालक्षेप चांगल्या रितीनें करण्यास मोठें साधन असतें. चांगलीं पुस्तकें वाचण्याची गोडी मुलांस लागली नाहीं, तर इष्ट कार्य झालें नाहीं, व दिलेलें सर्व शिक्षण फुकट आहे, असें बापानें समजावें. घाणेरडीं अथवा निरुपयोगीं पुस्तकें वाचण्याची गोडी लागली, किंवा वाचनाची मुळींच गोडी न लागली, तर आपल्या शिक्षणाची दिशा चुकली असें बापानें समजावें. हें समजण्यास मोठें शहाणपण नको; मुलगा कोणतीं पुस्तकें विशेष वाचतो व त्यांचा उपयोग काय करतो, हें पाहिलें म्हणजे कळून येणार आहे.

**अंकगणीत**—कोणताही विषय शिकविण्याचे मुख्य दोन उपयोग असतात. एक प्रत्यक्ष व दुसरा अप्रत्यक्ष. प्रत्यक्ष उपयोग म्हटला म्हणजे—जो विषय शिकवावयाचा, तो

आवश्यक असून त्यापासून व्यवहारात उपयोग करून घेतां येणें; व दुसरा—तो विषय शिकण्यानें मानसीक शक्तींचा विकास होऊन मन सुदृढ होणें. अंकगणीत शिकविण्यानें दोन्ही कार्यें होतात, म्हणून शिक्षणाच्या बाबतींत त्याची मातब्बरी फार आहे. व्यवहारांत फक्त ज्या विषयाचा तत्काळ उपयोग होतो तेवढाच विषय चांगला, हें समजणें चुकीचें आहे. मानसीक शक्तींचा विकास होणें, हा लहानसहान उपयोग नाहीं. विचार करून तत्त्व शोधून काढतां येणें, ही लहान गोष्ट नाहीं. परंतू पुष्कळ लोकांस अंकगणिताचा हा खरा उपयोग कळून येत नाहीं; कारण, तो लागलींच त्यांच्या अनुभवास येत नाहीं. कित्येक मुलें चंचल वृत्तीचीं असतात. अशांस अंकगणितापासून बराच फायदा होतो. बेरीज, गुणाकार, वगैरे करतांना चित्त स्थिर ठेवावें लागतें. त्रैराशीक सम कां अथवा व्यस्त कां, हें ठरवितांना विचारशक्तीचा फार उपयोग करावा लागतो. हे व अशाच प्रकारचे आणखी कांहीं उपयोग अंकगणितापासून आहेत. परंतू तें जसें शिकवावें तसें शिकविण्याची आपण तजवीज करीत नाहीं; व मुलगा ढ, त्याला कांहीं येत नाहीं व यावयाचें नाहीं, अशी ओरड मात्र करीत असतों. स्वस्थ बसून कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं, किंवा शिक्षणाचा जो योग्य मार्ग त्याचें अवलंबन केल्याशिवाय इष्ट हेतू सिद्धीस जावयाचा नाहीं. जर आपण स्वतः श्रम न केले, तर मुलगा कांहीं तरी शिकेल व कांहीं तरी होईल; त्याबद्दलचा दोष मुलाकडे नाहीं, बापाकडे आहे.

घरांतील व आसपासच्या पदार्थांचें प्रेक्षण करून त्यांचीं नांवें, त्यांचें रूप, त्यांचा रंग वगैरे सांगतां येणें, हा जसा

भाषाज्ञानाचा ओनामा, त्याचप्रमाणें हे पदार्थ मोजत. येणें, हाही अंकगणिताचा ओनामा आहे. दारें, खिडक्या, पेट्या, ताटें, वाट्या, पाट वगैरे निरनिराळ्या जिनसा मोजावयास सांगणें, ही पहिली गोष्ट. गोट्या किंवा खडे मुलांपुढें ठेवून ते मोजविणें, त्यांतून कमजास्त करून मोजविणें, म्हणजे बेरीज व वजाबाकी ह्यांचें शिक्षण देणें होय. मुलांस हा एक प्रकारचा खेळ वाटून आनंद होतो, व सहजगत्या शिक्षण मिळतें. शाळेंत अशा प्रकारें शिक्षण देण्यास सवड कमी असते; ह्मणून अशा रितीचें शिक्षण घरींच देणें जरूर आहे; परंतू हें फार वेळ उपयोगी नाहीं. दोन आणि तीन पांच, पांच आणि सहा अकरा, अशा प्रकारच्या रकमा त्यांस समजावयास लागल्याबरोबर वरील खेळास रजा दिली पाहिजे. अशा प्रकारें पदार्थ मोजतांना किंवा बेरीज अथवा वजाबाकी करतांना मुलगा स्वतःवर जितका अवलंबून राहील, तितकें चांगलें. उपाय नाहीं, तेव्हां बापानें मदत करणें योग्य आहे. अशा वेळीं दुसऱ्याची मदत घेण्याची सवय लागली असतां ती पुढें नडते. ‘ कापी ’ केल्याशिवाय त्याचा गाडा ढकलत नाहीं; व कापी करणें हें हलकें काम आहे व तें फसविणें आहे, असें त्यास वाटत नाहीं.

अलीकडे एक मुर्खपणाचा प्रकार फार जारीनें चालू आहे. शालोपयोगीं एकादें पुस्तक तयार झालें, म्हणजे शब्दांचा व वाक्यांचा अर्थ, वगैरे बरीच सामुग्री तयार करून देण्यास मंडळी एका पायावर सिद्ध असते. त्याचप्रमाणें गणितांतील उदाहरणें सोडवून विद्यार्थ्यांस मदत करण्याची बरीच तयारी असते. हा सर्व प्रकार फायदेशीर नाहीं; परंतू ह्याचेही कांहीं कैवारी दृष्टीस

पडावें, ही दुःखाची गोष्ट आहे. ज्या अनेक कारणांनीं शिक्षणाची खराबी होत आहे, त्यांपैकीं वरील प्रकार एक होय. सर्व गोष्टींची आयती सिद्धता असल्यावर मुलांस बुद्धी खर्च करण्याची अथवा श्रम करण्याची इच्छा कमी असणार, हें उघड आहे. मुलांनीं अडचणींतून आपला मार्ग आपण होऊन काढला पाहिजे. असें झालें, तर त्यांची बुद्धी सुदृढ होईल. परावलंबी अथवा ऐदी बनून उपयोग नाहीं. मुलगा थोड्या ठेचा खाईल; परंतू ती गोष्ट मनांत आणणें योग्य नाहीं. मुख्य गोष्ट त्यानें स्वतःवर होतां होईल तितकें अवलंबून राहिलें पाहिजे; व अंकगणिताच्या संबंधानें तर ही गोष्ट सक्तीनें अमलांत आणली पाहिजे. शब्दार्थ, अन्वयार्थ अथवा वाक्यार्थ ह्यांचीं पुस्तकें मुलांच्या हातीं देणें ज्याप्रमाणें मुर्खपणा आहे, त्याप्रमाणें 'की' ( गणिताचीं उदाहरणें सोडविण्याची किल्ली! ! ) मुलांच्या हातीं देणें मुर्खपणा आहे. ही गोष्ट बापानें लक्षांत ठेवली पाहिजे. ज्या मुलांस श्रम करावयास नकोत, त्यांचा ओढा वरील पुस्तकांकडे फार असतो. कांहीं शिक्षकही ह्या घाणेरड्या प्रकारास प्रत्यक्ष मदत करतात किंवा त्याकडे कानाडोळा करतात, परंतू बापानें कानाडोळा करणें चांगलें नाहीं. एकादी गोष्ट समजून सांगण्यास ज्या सामुग्रीची जरूरी आहे, ती पैदा करून तिचा उपयोग करण्यास बापास मोकळीक असावी, मुलास ती नसावी.

तोंडचे हिशेब शिकविण्याची जरूरी आहे; परंतू ते प्रदर्शनासाठीं नकोत; किंवा ते ठरीव नकोत. त्यांत वैचित्र्य पाहिजे. ह्या बाबतींत पुस्तकाचें कारण मुळींच नाहीं. जो सवदा बापानें केला असेल, त्या संबंधानें प्रश्न विचारणें

चांगलें, किंवा जिनसा विकत घेत असतां मुलास प्रश्न विचारणें त्याहून चांगलें. तोंडचे हिशेबाचें शिक्षण, हें मनास एका प्रकारचें कवायतीचें शिक्षण आहे.

निरनिराळ्या प्रकारचीं मापें, वजनें, नाणीं व टेप हीं सर्व संग्रहीं ठेवतां येतील, तर बरें. हें शक्य नसेल, तर थोडीं तरी असावीं. ज्याप्रमाणें इतर कांहीं बाबतींत आमच्याकडे घोटाळा आहे, त्याप्रमाणें वजनें व मापें वगैरे संबंधानेंही घोटाळा आहे. मुंबईचें माप एक, पुण्याचें दुसरें, नगरचें तिसरें, धुळ्याचें चौथें, अशा प्रकारें एकाचा मेळ दुसऱ्याशीं नाहीं. ह्या योगानें मुलांचाच काय, परंतू मोठ्यांचासुद्धां केव्हां केव्हां घोटाळा होतो. वजनें, मापें वगैरे बाबतींतील बखेडा मोडून सारखीं वजनें व मापें ज्या दिवशीं होतील तो सुदीन समजावयाचा. तोंपर्यंत ह्या घोटाळ्याच्या स्थितींत जें कर्तव्य तें केलें पाहिजे. तें हें कीं, मुलांकडून जिनसा वजन करून घेतल्या पाहिजेत व त्या मापवून घेतल्या पाहिजेत. नुसतीं कोष्टकें लवकर लक्षांत राहत नाहींत; म्हणून वजनें मापें वगैरे प्रत्यक्ष डोळ्यांपुढें ठेवून त्यांचा उपयोग करविणें व वजन व माप टिपून ठेवविणें उत्तम. असें केलें असतां मुलांस कर्मणूक वाटून शिक्षणही मिळेल.

ज्याप्रमाणें वजनें व मापें ह्यांचा उपयोग करण्यानें कर्मणूक व शिक्षण मिळतें, त्याप्रमाणें घराची, दाराची व पेट्यांची लांबी, रूंदी व उंची, उघड्या जमिनीची व बागेची लांबीरूंदी, व विहिराचा घेर, 'टेपानें' अथवा टेप नसेल, तर पांढऱ्या नवारीवर खुणा करून तिनें मोजून जें माप येईल, तें मूलांकडून टिपून ठेविलें असतां त्यांस करमणूक व उपयोग हीं दोन्हीं होतील.

आपला जो खटाटोप चालू आहे, तो जीवनकलहासाठीं आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे; परंतू सत्य कोणतें हें समजून घेण्यासाठींही आहे; व शिक्षण संपादन करण्याचा हेतू तरी सत्य समजून घेतां येणें हा आहे. अनेक गोष्टी नुसत्या माहीत असून उपयोग नाहीं; त्यांचा परस्पर संबंध समजला, तर उपयोग आहे; झाडाचें फळ वर न जातां जमिनीवर पडणें, लाकूड पाण्यावर तरंगणें व धोंडा बुडणें वगैरे शतशः गोष्टी रोजच्या रोज घडून येतात; परंतू त्या कांहीं सिद्धांतास अथवा सत्यास अनुसरून घडत असतात. तेव्हां जी गोष्ट घडून येते ती तशी कां घडून येते, हें समजणें अगत्याचें आहे. परंतू अशा प्रकारें सिद्धांत समजण्यास विचाराची सवय पाहिजे. ती अंकगणिताच्या अभ्यासानें सहज लागते. इतर कांहीं विषयांच्या संबंधानें कांहीं गोष्टी गृहीत घेऊन चालावें लागतें; परंतू अंकगणिताची गोष्ट तशी नाहीं. तर्कशास्त्राच्या अभ्यासास अंकगणिताच्या शिक्षणाचा बराच उपयोग होतो. कारण, दोहोंत विचाराचें कारण पडतें; विश्वासाचा उपयोग होत नाहीं. अंकगणिताच्या संबंधानें इतका पाल्हाळ करण्याचें कारण कीं, नुसता विश्वास ठेवण्याच्या सवयीपासून मुलांस विशेष उपयोग होत नाहीं; सूक्ष्म रितीनें विचार करण्याच्या सवयीपासून फार फायदा होतो. एका पायरीवरून दुसरीवर, दुसरीवरून तिसरीवर, अशा प्रकारें क्रमाक्रमानें जाणें, दिलेल्या प्रमेयांवरून अनुमान काढणें, कारणावरून कार्याकडे जाणें, वगैरे गोष्टींच्या शिक्षणाचा व्यवहारांत किती उपयोग आहे, हें सांगण्याचें कारण नाहीं. हें शिक्षण मुलांना अंकगणिताच्या अभ्यासानें सहज प्राप्त होण्यास मार्ग असतो, तें शिक्षण जसें देण्यांत

यावें तसें देण्यांत येत नाहीं; ह्यासाठीं बापानें ह्या बाबतींत चांगलें लक्ष पुरविलें पाहिजे.

**इतिहास**-गणीत विषय बरेच अंशीं रूक्ष आहे. तशी गोष्ट इतिहास व भुगोल ह्यांची नाहीं. हे विषय फार मनरंजक आहेत. मुलांस लिहितां वाचतां येणें, तोंडचे हिशेब येणें वगैरे गोष्टी पुष्कळ लोकांस पसंत आहेत; परंतू इतिहास व भुगोल ह्यांची ते फारशी मातब्बरी समजत नाहींत. हे विषय शिकविण्याचें कारण नाहीं, अशीही कित्येकांची समजूत आहे. हल्लीं ज्या प्रकारचीं पुस्तकें दृष्टीस पडतात व ज्याप्रकारें तीं शिकविण्यांत येतात, त्या प्रकारांमुळें विशेष फायदा होत नाहीं, ही गोष्ट कांहीं अंशीं खरी आहे; व कांहीं फायदा दृष्टीस पडत नाहीं, म्हणून लोकांची चमत्कारीक समजूत झाली असावी. राजेरजवाडे ह्यांचे जनन, मरण, बायका, लढाया, तह, ह्या व अशाच सारख्या दुसऱ्या गोष्टींचें कथन हा खरा इतिहास नाहीं. लोकांस ह्यांचा उपयोग आहे, परंतू फार थोडा आहे. लोकांस लोकांच्या इतिहासाचें ज्ञान पाहिजे. आमच्या स्वतःच्या कुटुंबांत कोणते पुरूष झाले, त्यांनीं काय केलें, त्यांचा उर्जितकाळ कसा झाला, विपन्नदशा आली असल्यास ती कशानें आली, त्यांच्या चुका कोठें झाल्या, त्या चुकांचा परिणाम काय झाला, वगैरे गोष्टी मुलांस प्रथम समजल्या पाहिजेत. इतिहासाच्या शिक्षणास प्रथम येथून प्रारंभ झाला पाहिजे. प्रत्येक कुटुंबाचा कांहीं तरी इतिहास असतो. दुसऱ्याचे वाडवडील कोण होते व त्यांनीं काय केलें, हें समजण्यापूर्वीं आपले वाडवडील कोण होते व त्यांनीं काय केलें, हें प्रथम समजणें जरूर आहे. आमच्या वाडवडिलांच्या इतिहासाची मातब्बरी

दुसऱ्यास कदाचित् वाटणार नाहीं, परंतू ती आम्हांस वाटली पाहिजे. शाळांतून कुटुंबाचा इतिहास समजून सांगण्यास सवड नाहीं; व तसें होणें शक्यही नाहीं. तेव्हां ही गोष्ट आमची आम्हींच केली पाहिजे. असें करण्यास जेथें साधनाचा अभाव आहे, तेथें बोलावयास नको; परंतू जेथें साधनें आहेत, तेथें ही गोष्ट होणें अवश्य आहे. परंतू एक हात लाकूड व नऊ हात धलपी, असला प्रकार नको. पोकळ गौरव नको. जी वास्तवीक स्थिती असेल, तिचें यथार्थ कथन पाहिजे. आपल्या कुटुंबाचा इतिहास माहीत झाल्यावर आपल्या शहराचा, नंतर आपल्या प्रदेशाचा म्हणजे महाराष्ट्राचा, नंतर आपल्या देशांतील इतर लोकांचा इतिहास समजून घेणें जरूर आहे. गुजराथी, कानडी, बंगाली, मद्रासी वगैरे लोकांच्या आचारविचारांची व रितीभातींची माहिती असणें अगत्याचें आहे. अशी माहिती फार थोड्यांस असते. हजारांत एक, असें प्रमाण निघेल किंवा नाहीं, ह्याबद्दल शंका आहे. ही जी शोचनीच स्थिती दृष्टीस पडते, तिजबद्दल सामान्य लोक बिलकूल दोषास पात्र नाहींत. ज्या प्रकारच्या इतिहासाचा निर्देश केला, तसा इतिहास थोडक्यांत उपलब्ध नाहीं. आमच्या विद्वानांची विशेष धाव राजेरजवाड्यांच्या इतिहासाकडे आहे. आमच्या देशांतील राजेरजवाड्यांचा इतिहास आम्हांस नको, असें आम्ही म्हणत नाहीं. ज्या इतिहासांत लोकांची स्थिती काय होती, व हल्लीं काय आहे, ह्याविषयीं यथार्थ वर्णन केलें आहे, तसला इतिहास प्रथम वाचण्यास मिळाला पाहिजे. ज्यांत फक्त राजांच्याच कृतीचें कथन आढळतें, तो मागाहून पाहिजे. लोकांस लोकस्थितीची

व लोकाचारांची माहिती मिळून जितका फायदा होण्याचा संभव आहे, तितका राजांचा इतिहास वाचून फायदा होण्याचा संभव नाहीं. इंग्लंड देशाचा व आपला निकट संबंध आहे, म्हणून त्या देशांतील लोकांची, त्यांच्या आचार-विचारांची व मुख्यत्वें तेथील कारखान्यांची व राज्यपद्धतीची माहिती असणें फार अवश्य आहे; कारण, आपणास आपल्या देशाच्या संबंधानें ह्या माहितीचा बराच उपयोग करून घेतां येईल. ब्रम्हदेश आपल्या देशांत नुकतांच सामील झाला आहे. तो आपल्याच देशांपैकीं एक प्रदेश झाल्यासारखा आहे, तेव्हां त्याविषयीं माहिती पाहिजे. ही माहिती मिळाल्यावर इतर देशांकडे वळणें इष्ट आहे. इतर देशांपैकीं इटली देशाचा इतिहास प्रथम माहीत पाहिजे व तो विशेषें अली-कडला पाहिजे. नंतर जपान, युनायटेडस्टेट्स, फ्रान्स, जर्मनी असा अनुक्रम पाहिजे. सर्वांस वरील सर्व देशांचा इतिहास वाचण्यास सवड सापडणें कठीण आहे, हें खरें आहे. तथापी, ज्यास जितकी सवड असेल, तीप्रमाणें त्यानें माहिती करून घेणें—निदान ठोकळ माहिती मिळविणें—अवश्य आहे. इतिहासाच्या संबंधानें एक गोष्ट सांगणें अवश्य वाटते. ती विशेषें हिंदूंस लागू आहे; ती ही कीं, भारत व रामायण हीं दोन पुराणें मुलांनीं वाचणें इष्ट आहे. निदान तीं त्यांच्या कानावरून जाणें जरूर आहे. आमचीं पुराणें म्हणजे शिमगा, असें म्हणणारे कांहीं आहेत. त्यांत असं-भाव्य गोष्टींचें कथन आढळतें, असें पुष्कळांचें म्हणणें आहे. अशी स्थिती असतां पुराणें वाचण्यांत काय अर्थ आहे, असा कदाचित् कित्येकांचा आक्षेप निघेल. शिमग्यांत बीभत्स प्रकार असतो, तशा सारखें थोड्या पुराणांत कांहीं बीभत्स

गोष्टींचें कथन आढळून येतें; परंतू रामायण व भारत ह्यांस ही गोष्ट लागू नाहीं. सामान्य विचार करतां हीं दोन पुराणें बीभत्स प्रकारांपासून अलिप्त आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अतिशयोक्ती व असंभाव्य गोष्टी, ह्या ज्याप्रमाणें इतर पुराणांत आहेत त्याप्रमाणें त्या ह्याही पुराणांत आहेत. ही गोष्ट नाकबूल करणें वेड आहे; परंतू एवढ्याच कारणावरून त्यांचा अव्हेर करणें उक्त नाहीं. ह्यांत अतिशयोक्ती आहे; परंतू ती एकीकडे ठेविली असतां पुष्कळ गोष्टी घेण्यासारख्या आहेत. प्राचीन काळच्या आचारविचारांच्या संबंधानें पुष्कळ खुलासा होतो. ज्याप्रमाणें कीर्तनाची संस्था आमच्यांत चांगल्या संस्थांपैकीं एक आहे, त्याप्रमाणें पुराणाची संस्थाही चांगली आहे. रामायण, भारत वगैरे थोडीं पुराणें कायम ठेवून बाकींच्या पुराणांस पाहिजे तर फाटा द्यावा. रामायण, भारत वगैरे थोडीं पुराणें कायम ठेवून इतर पुराणांच्या ऐवजीं ऐतिहासीक पुराणें प्रचारांत येतील, तर बरें होईल. निवड ही प्रत्येक ठिकाणीं पाहिजे. त्याप्रमाणें रामायण, भारत वगैरे संबंधानेंही पाहिजे. इतिहासावरील इतर पुस्तकांबरोबर रामायणभारत वाचलें असतां मुलांच्या मनांत असंभाव्य गोष्टी स्थिर होऊन बसण्याची भीती बाळगावयास नको. इतिहास म्हणजे अनुभवाचें भांडार. हें भांडार बरेंच अंशानें रामायण व भारत ह्यांत सापडतें. मनुष्य तरूण असून त्यानें इतिहास बरोबर रितीनें वाचला आहे, तर त्याचे विचार पोक्त होऊन तो वृद्धच समजावयाचा, असें एका ग्रंथकारानें म्हटलें आहे, तें यथार्थ आहे. इतकेंच कीं, इतिहासावरील पुस्तकें मात्र चांगलीं असलीं पाहिजेत; व तीं पद्धतशीर रितीनें शिकविलीं पाहि-

जेत. ज्याप्रमाणें इतर गोष्टी सांगण्यांत येतात, त्याप्रमाणें बापानें इतिहासांतील गोष्टी सांगाव्या व नंतर मुलांनीं पुस्तकें वाचावीं, असा क्रम निदान प्रथम तरी ठेवला पाहिजे.

**भुगोल**–सृष्टी अवाढव्य असून तींत चमत्कारीक देश, नद्या, पर्वत वगैरे अनेक गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. हीं पाहणें सर्वांस शक्य नाहीं; परंतू त्यांविषयीं ठोकळ माहिती तरी पाहिजे. इंग्रज लोकांचा व आमचा संबंध झाल्यास बरेच दिवस झाले; परंतू त्यांचा देश केवढा आहे, कसा आहे व किती लांब आहे, ह्या गोष्टीदेखील कित्येकांस माहीत नाहींत. आमच्यांवर राज्य करणारे साहेब आहेत, व त्यांचा देश विलायत आहे, ही कायती माहिती पुष्कळांस आहे. पाऊस व दव, हीं दरवर्षास पडतात, परंतू तीं कां पडतात; एके ठिकाणीं तीं कमी कां व दुसरे ठिकाणीं जास्त कां, हें समजणारे फार थोडे आढळून येतात. हे सृष्टि चमत्कार नित्यांतले; परंतू त्यांविषयींसुद्धां आमच्यांपैकीं कित्येकांस माहिती असूं नये, ही शोचनीय गोष्ट आहे.

भुगोलाविषयीं विचार करतां, पुष्कळ मुलांस चिनांत पेकीन राजधानी, नांकीन हें मोठें शहर आहे, व कंतान हे मोठें बंदर आहे, हें सांगतां येतें; परंतू त्यांस आपल्या जन्म-भूमीच्या आसपासच्या स्थळांविषयीं तादृश माहिती नसते. हा दोष मुलांचा नाहीं, बापाचा आहे. ज्या गावीं मुलाचा जन्म झाला असेल तेथली; नंतर जेथें घरदार कायमचें असेल किंवा कायमचें वास्तव्य असेल तेथली; किंवा ज्या ठिकाणीं नोकरीच्या किंवा उद्योग धंद्याच्या संबंधानें राहणें असेल तेथली; नंतर तालुक्याची, जिल्ह्याची, इलाख्याची, व देशाची माहिती असावी. इंग्लंड देशाचा व आपला अनेक

प्रकारें संबंध आहे, म्हणून त्या देशाच्या भुगोलाविषयीं, चिनाशीं अफू व कापड ह्यांचा व्यापार चालतो, आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्याशीं कापडाचा व्यापार चालतो, अफगाणिस्थान देश आपल्या सरहद्दीवर असून त्याचा व आपला व्यापाराचा संबंध आहे, म्हणून ह्या सर्व ठिकाणची माहिती आपणास पाहिजे. तात्पर्य, स्वतःच्या देशाविषयीं व ज्या देशांशीं राजकीय कारणामुळें किंवा व्यापारामुळें प्रत्यक्ष संबंध आहे, त्या देशाच्या भुगोलाविषयीं निदान ठोकळ माहिती अगोदर पाहिजे; व सवडीप्रमाणें इतर देशांविषयीं असावी; परंतू ही माहिती नकाशाशिवाय उपयोगाची नाहीं. ज्या चित्रापासून अथवा तसबिरीपासून तादृश उपयोग नाहीं, अशीं चित्रें किंवा तसबिरी बाळगणारे कांहीं लोक दृष्टीस पडतात; परंतू नकाशाचीं चित्रें बाळगणारे फारच थोडे दृष्टीस पडतात. नकाशे नेहमीं टांगलेले ठेवल्यानें मुलांस पुष्कळ स्थळांविषयीं व तेथील लोकांविषयीं माहिती सहज देण्यास साधन असतें. ही गोष्ट लोकांच्या लक्षांत येत नाहीं, किंवा लक्षांत येऊन ते तिजबद्दल फिकीर बाळगीत नाहींत. आमच्या कमिट्या सिटी सर्व्हेबद्दल ( शहर मोजणीबद्दल ) बरेच पैसे खर्च करतात; परंतू पैसे खर्च करून तयार केलेल्या नकाशाचा उपयोग लोकांस व्हावा, ह्याकडे त्यांचें लक्ष नाहीं. खेड्यापाड्यांचे नकाशे थोडक्यांत मिळणें सध्यां कांहींसें शक्य आहे; परंतू शहराचा नकाशा थोड्या किमतींत मिळणें विशेष जरूर आहे. त्याचप्रमाणें जिल्ह्याचा, इलाख्याचा, हिंदुस्थानदेशाचा, इंग्लंडचा व जगाचा नकाशा फार थोड्या किमतींत मिळणें जरूर आहे. ह्या प्रीत्यर्थ पैसा खर्च करणें अनाठायीं नाहीं; त्यापासून फार उपयोग होईल.

वर जे चार विषय सांगितले त्यांची माहिती असून मुलांस जमाखर्चाची माहिती असणें फार आवश्यक आहे. नुसती माहिती असावी असें नाहीं, तर जमाखर्च लिहिण्याची त्यांस सवय पाहिजे. रोज चार आणे मिळवावे व पोटासाठीं खर्च करावे, अशी ज्यांची स्थिती आहे त्यांची गोष्ट निराळी; त्यांचा जमाखर्च तोंडांत असतो. परंतू ज्यांचें उत्पन्न साधारण बरें आहे व खर्चही निरनिराळ्या प्रकारचा आहे, त्यांस ही गोष्ट लागू नाहीं. त्यांनी जमाखर्च ठेवण्याच्या बाबतींत आळस करतां कामा नये. आमचा जमाखर्च तोंडांत आहे, तो ठेवून काय करावयाचें आहे, तो कोणास दाखवावयाचा आहे, असें कित्येकांचें म्हणणें असतें. हें म्हणणें कांहीं अंशीं पोरकट आहे. जमाखर्च ठेवावयाचा, तो लोकांस दाविण्यासाठीं ठेवावयाचा, असें नाहीं. तो मुख्यत्वें आपल्याच फायद्याकरतां ठेवावयाचा. प्रपंचांत देण्याघेण्याचे अनेक वेळां प्रसंग येतात. सर्वच गोष्टी बरोबर लक्षांत राहतात, असें नाहीं. जवळ टिपण असलें, म्हणजे फार उपयोग होतो, त्यामुळें नेहमीं जागृती राहते. जमाखर्च ठेवणें हा एक प्रकारचा आपणापुढें आरसा ठेवणें आहे. त्यामुळें, पैसे आपण मिळविले किती, व कोणत्या कारणासाठीं कसे खर्च केले, वगैरे गोष्टी समजतात. परंतू त्यांत कांहीं सुधारणा केली पाहिजे. भोजन व वस्त्रप्रावरण, डागडागिणे, सामानसुमान, मुलांचें शिक्षण, होमलायब्ररी, धर्मादाय, लग्नकार्य, सार्वजनीक काम, संचय व किरकोळ ह्या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या बाबींच्या संबंधानें काय खर्च केला, ह्याबद्दल महिन्याच्या अखेर टिपण केलें पाहिजे; व एका महिन्याचें टिपण दुसऱ्या महिन्याच्या टिपणाशीं ताडून

पाहिलें पाहिजे. ही गोष्ट मुलांकडून करविणें चांगलें. निदान हें त्यांस समजून सांगणें आवश्यक आहे. दोन महिन्यांच्या अथवा दोन तिमाहींच्या अथवा दोन वर्षांच्या तक्त्यांत कांहीं तरी कमजास्त असणार, हें उघड आहे. कमजास्त स्थिती दृष्टीस पडण्याचीं कारणें कोणतीं, हें मुलांच्या लक्षांत आलें पाहिजे. असें करण्यानें माहिती मिळून एका प्रकारचा वचक राहील. इतकेंच नाहीं, तर मुलांस सर्व गोष्टी समजून तो माहितगार होईल. कुटुंबाचा जमाखर्च थोडा, म्युनिसिपालिटीचा त्याहून मोठा, आपल्या प्रांताचा त्याहून मोठा व देशाचा फारच मोठा. कराच्या रूपानें आपण पैसा देतों; परंतू ह्याबद्दल व्यवस्था काय होते, ह्याविषयीं चौकशी करणारे किती आहेत! हजारांत एक, असें प्रमाण सापडेल का? प्रत्यक्ष रोख रुपये मुलगा, बायको, अथवा नोकर चाकर यांस खर्चावयास आपण देतों. त्याबद्दल त्यांपासून वेळच्या वेळीं हिशेब घेणारे जर थोडे निघतात, तर केव्हां केव्हां प्रत्यक्ष व केव्हां केव्हां पर्यायानें जे पैसे कमिटीस अथवा सरकारास आपण देतों, त्याबद्दल त्यांस जाब पुसणारे थोडे निघतात, ह्यांत नवल नाहीं. वेळच्या वेळीं हिशेब देणें व घेणें हें व्यवहारांत किती महत्वाचें आहे, हें फार थोड्यांस समजतें. पुष्कळांचा कारभार हलगर्जीपणाचा असतो. आपलें घर हें एक प्रकारें सरकारी आफीस आहे, असें प्रत्येकानें समजून चाललें पाहिजे. आपणास आपल्या कृतीबद्दल कोणी विचारणारा आहे व आपणास जाब द्यावा लागेल, असें समजून प्रत्येकानें वागलें पाहिजे, म्हणजे मुलांसही तेंच वळण लागेल. एका पैशापासून तों लाख रुपयांपर्यंत हिशेब

पाहिजे. योग्य प्रसंगीं विशेष खर्च करण्यास हरकत नाहीं, परंतु तो हिशेबानें झाला पाहिजे. आमच्या म्हणण्याचें तात्पर्य, प्रत्येकानें हिशेबी असलें पाहिजे. हिशेब दाखविण्याचे प्रसंग येवोत अथवा न येवोत; त्याचा विचार करावयाचा नाहीं. वाटेल तेव्हां चार्ज (जबाबदारीचें काम) देण्याची आपली तयारी असली पाहिजे इतकेंच नाहीं, तर हा चार्ज घेण्याची व प्रसंग पडला, तर काम वहिवाटण्याची मुलाचीही थोडी तयारी राहील, अशी तजवीज बापानें केली पाहिजे. ज्यांचे व्यवहार लबाडीचे अथवा घाणेरडे असतात त्यांस आपले जमाखर्च लोकांच्या दृष्टीस पडूं नये, अशी इच्छा होऊन ते कदाचित् मुलांस समजून सांगण्यास भितील; परंतु ज्यांचा व्यवहार चोख आहे, त्यांस भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. व्यवहारांत अनेक वेळां देण्याघेण्याचे प्रसंग येतात; त्याबद्दल वाईट वाटण्याचें कारण नाहीं. त्याचप्रमाणें कधीं कधीं नफानुकसान होतें, त्याबद्दलही मनांत कांहीं आणण्याचें कारण नाहीं. जसा व्यवहार झाला असेल, तसा तो जमाखर्चांत दाखल होणें चांगलें. लबाडीचा अथवा चोरटा जमाखर्च नको; चोरटा जमाखर्च ठेवण्यापेक्षां नसलेला पुरवला.

जमाखर्चाच्या संबंधानें एक गोष्ट सांगणें अवश्य आहे. ती ही:—प्रत्येकानें जमा व खर्च ह्यांबद्दल अंदाज उर्फ बजेट तयार केलें पाहिजे. आली ती जमा व होईल तो खर्च, हा व्यवहार प्रशस्त नाहीं. कांहीं तरी अटक पाहिजे; व ती आपली आपण लावून घेतली पाहिजे. भोजनखर्च, वस्त्रप्रावरण वगैरे ज्या बाबी सांगितल्या त्यांप्रीत्यर्थ किती खर्च करावयाचा, ह्याविषयीं अंदाज करून नंतर त्याप्रमाणें

वागणें इष्ट आहे. ज्याच्या त्याच्या स्थितीप्रमाणें असलें बजेट मासीक, त्रैमासीक, षण्मासीक, किंवा वार्षीक असणार, हें उघड आहे. असें करण्यास हरकत नाहीं, परंतू बजेट करण्याची पद्धत फार चांगली आहे. तिचें अवलंबन फक्त म्युनिसिपालिटीनें अथवा सरकारानें मात्र करावें, असें नाहीं. म्युनिसिपालिटीनें व सरकारानें तर केलेंच पाहिजे; व तीं तें करीत आहेत, परंतू तें प्रत्येक संस्थेच्या चालकांनीं व प्रत्येक कुटुंबी गृहस्थानें केलें पाहिजे. बजेटप्रमाणें सर्व खर्च नेहमीं बरोबर होईल असें नहीं. विशेष प्रसंगासाठीं स्वतंत्र तरतूद असली पाहिजे, हें उघड आहे; परंतू होतां होईल तितकें करून बजेटप्रमाणें खर्च करण्याची सवय असली पाहिजे. कुटुंबाची व्यवस्था करणें हा लहान प्रपंच करणें; कमिटीचा कारभार करणें हा मोठा प्रपंच करणें, व राज्यकारभार करणें हा सर्वांत मोठा प्रपंच करणें होय. आज जीं लहान मुलें आहेत, तींच उद्यां मोठीं माणसें होणार व कारभारांत पडणार. ह्यासाठीं मुलांस लहानपणापासून जमाखर्चाचें व बजेटाचें शिक्षण मिळालें तर चांगलें. ह्याचा उपयोग लहानपणीं झाला नाहीं, तरी मोठेपणीं फार होईल. यथा कदाचित् कांहींच उपयोग झाला नाहीं, तरी व्यवस्थितपणाचें थोडें तरी वळण लागेल, ह्यांत कांहीं संशय नाहीं. हा लाभ लहान आहे असें समजणें चुकीचें आहे. आपला आदा किती व आपण खर्च किती करतों, ह्याविषयीं जे बिलकूल चौकशी करीत नाहींत, त्यांपैकीं बरेच लोक पस्तावा पावतात असें आढळून येतें. जमाखर्च ठेवण्यास व बजेट तयार करण्यास पैसा लागत नाहीं, किंवा फार वेळही लागत नाहीं. रोज दहा वीस मिनिटें

खर्च केलीं तरी काम होतें. असें करण्यास ज्यांस सवड होत नाहीं, किंवा सवड होऊन कंटाळा येतो त्यांनीं अठवड्यांतून थोडा वेळ जरी खर्च केला, तरी काम होईल.

मुलांच्या अक्षरासंबधानें पुष्कळ लोकांची हयगय दिसून येते, ही गोष्ट चांगली नाहीं. अक्षर लहानपणीं चांगलें घटतें. याविषयीं शाळेंतून तजवीज चालू आहे; परंतू तेवढ्यावरच स्वस्थ राहूं नये. अक्षरावर बापाची नजर पाहिजे. अक्षर, गणीत व भाषाज्ञान हीं साधारणपणें मुलांस बरीं येऊं लागल्याशिवाय, बापानें त्यांस इंग्रजीसारखी परभाषा शिकण्यास लावूं नये. पुष्कळ मुलांचें अक्षर बरें नसतें. कित्येक लोकांचें अक्षर वाचण्यास त्रास पडतो; दोघे चौघे लोक लागून तें वाचण्याचा प्रसंग येतो; कित्येक वेळां ज्याचें त्याससुद्धां तें वाचतां येत नाहीं. आपलें अक्षर दुसऱ्यांस वाचतां येऊं नये, हें आपण भूषण समजूं नये. मुलें चाराचारानें लिहीत असलीं, तर तो प्रघात बंद करावा. कारकुनीचें काम करावयाचें असेल तरच अक्षर चांगलें असावें, व एरवीं कसेंही असलें, तरी हरकत नाहीं, ही समजूत चमत्कारीक आहे. चांगलें अक्षर असणें हें भूषण आहे. लहानपणीं अक्षर घटविल्यानें हात बसतो; त्यामुळें हाताला शिक्षण मिळून अंगीं टापटीप येते. अक्षर चांगलें असलें, म्हणजे मुलांस शाळेंत फार उपयोग होतो; यासाठीं बापानें मुलांच्या अक्षराविषयीं पहिल्यापासून खबरदारी ठेवावी.

आतां शिक्षणाच्या संबंधानें एक गोष्ट राहिली. ती ही कीं, बापानें आपले मुलांस कोणते तरी एका कलेचें शिक्षण द्यावें. हल्लीं शाळांतून चित्रकला शिकविण्याची चांगली सोय

झाली आहे; परंतू तिचा फायदा जितका करून घ्यावा तितका लोक करून घेत नाहींत. सुतार, लोहार, तांबट, सोनार, गंवडी वगैरे कारागीर लोकांस या कलेचा त्यांचे धंद्यांत फार उपयोग आहे. या लोकांनीं या कलेचें शिक्षण आपले मुलांस अवश्य द्यावें. नमुन्याप्रमाणें काम देण्यांत व घेण्यांत त्यांची सोय असून, जे त्यांस काम करावयास सांगतील त्यांचीही सोय आहे. चित्रकलेचा जों जों फैलाव होईल, तों तों काम सुबक होईल. ही कला शाळेंत शिकली असतां ती कायम ठेवण्याविषयीं बाप तजवीज ठेवीत नाहीं, ही दुःखाची गोष्ट आहे. शाळेंत या कलेचें जें ज्ञान मिळतें तें वाढविणें व दृढ करणें हें बापाचें कर्तव्य आहे. बापानें मुलांस फक्त चित्रकलेचें शिक्षण द्यावें असें नाहीं. त्यांस ज्या कलेची गोडी असेल त्या कलेचें शिक्षण द्यावें. कलेचें जें शिक्षण द्यावयाचें, तें केवळ फायदा व्हावा एव-ढ्याच साठीं नाहीं, तर, अध्ययनाच्या योगानें अथवा कामा-मुळें पुष्कळ वेळां डोकें चढून जातें, अशा वेळीं सतार सारंगीच्या मधूर नादानें, अथवा चित्र काढीत बसल्यानें, अथवा खोदींव व कातींव काम केल्यानें डोकें उतरून मनास आराम वाटतो. फार वेळ तक्क्याशीं टेकून स्वस्थ बसण्यांत अथवा मऊ बिछान्यावर लोळत पडण्यांत खरी विश्रांती नाहीं. ही विश्रांती आळशी लोकांकरतां आहे. खरा आराम उद्योगवैचित्र्यांत आहे; मात्र हें उद्योगवैचित्र्य शहाणपणाचें असावें. मनाच्या निरनिराळ्या शक्ती आहेत, त्या सर्वांचा विकास झाला पाहिजे. केवळ विचारशक्तीचाच विकास होऊन उपयोग नाहीं; कल्पनाशक्तीचाही विकास झाला पाहिजे. ही गोष्ट कलेच्या शिक्षणानें साध्य होते. या शिक्ष-

णानें आपल्यापुढें उत्तम नमुने ठेवून त्यांचें अनुकरण करण्याची सवय लागते; व येणेंकरून उत्तम गोष्टींविषयीं गोडी लागते; विचारशक्तीस उत्तेजन मिळतें, व सूक्ष्म दृष्टीनें विचार करण्याची सवय लागते. चांगल्या गोष्टीचें अनुकरण करण्याची सवय लागली, म्हणजे अर्थात् सन्मार्गाचें वळण लागण्याचा संभव आहे; व याच दृष्टीनें पाहतां कलांचा अभ्यास फार उपयोगी आहे. वाद्यकलेच्या संबंधानें पुष्कळ लोकांचा गैरसमज आहे. मुलें वाद्य वाजविण्यास शिकलीं असतां तीं हौशी व चैनी निपजतील, अशी त्यांस भीती वाटते; म्हणून ते या शिक्षणाविषयीं उदासीन असतात. परंतू बाकीचें गृहशिक्षण नीटपणें चालेल, तर ही भीती बाळगण्यास कांहीं एक कारण नाहीं, इतकेंच नाहीं, तर सुखाचीं साधनें जीं वृद्धिंगत करावयाचीं, तीं न करतां उलट तीं आपण कमी करीत आहों, असें होतें. नुसत्या टवाळ्या करीत बसण्यापेक्षां अथवा उगीच गप्पा मारण्यापेक्षां वाद्य-कलेचे अभ्यासापासून विशेष हीत आहे. यापासून वाजविणारास व श्रोत्यांस चांगली कर्मणूक असते. वाद्य-श्रवणानें भ्रमण करणारे विचार स्थिर होऊन मन स्थिर होतें; व पुनः काम करण्यास हुशारी येते. अशा प्रकारें मनाला आनंद देणें हें शरिराला उत्तम औषध आहे. आनं-दरूपी औषधाची योग्यता साधारण औषधापेक्षां जास्त आहे. हल्लीं या कलेचा सुशिक्षित लोकांमध्यें फारसा प्रचार नाहीं. तिचा अशिक्षित लोकांमध्यें प्रचार असल्यामुळें व त्यांपैकीं कांहीं चैनी निघाल्यामुळें लोक नाक मुरडीत अस-तील. असो. वरील सर्व गोष्टींचा विचार करून बापानें मुलांस कोणत्यातरी एका कलेचें शिक्षण द्यावें, हें योग्य आहे.

---

# भाग तिसरा.

## सद्वर्तन.

-:o:-

शारीरसंगोपन व मानसीक शिक्षण ह्या संबंधानें आई-बापांनीं किंवा पालकांनीं काय केलें पाहिजे, ह्याविषयीं मागील दोन भागांत निरूपण झालें. आतां ह्या भागांत मुलाच्या सद्वर्तनाच्या बाबतींत त्यांनीं काय केलें पाहिजे, ह्याविषयीं विचार करावयाचा आहे. संगोपन व शिक्षण ह्या संबंधानें बापानें खबरदारी घेणें अवश्य आहे; परंतू सद्वर्तनाच्या संबंधानें विशेष खबरदारी घेतली पाहिजे. ह्या बाबतींत यत्किंचित्‌ही हयगय उपयोगी नाहीं. मुलाची शरीरप्रकृती साधारण असेल, तर एक वेळ चालेल; त्याचें शिक्षण बेतावाताचें असेल, तर एक वेळ चालेल; परंतू त्याच्या वर्तनांत कमीपणा असणें योग्य नाहीं; तें चोखच पाहिजे. मुलाची शरीरप्रकृती चांगली नसेल, तर त्याबद्दल त्यास, पराकाष्ठा त्याच्या आई-बापांस प्रत्यक्ष थोडा त्रास सोसावा लागेल. त्याच प्रमाणें त्यास चांगलें शिक्षण मिळालें नसेल, तर त्याचें व त्याच्या आईबापांचें केव्हां केव्हां प्रत्यक्ष नुकसान होण्याचा संभव आहे. ह्यामुळें इतरांचें नुकसान झालें, तर तें पर्यायानें व अवधीनें होईल; परंतू वर्तनाच्या संबंधानें अशी गोष्ट नाहीं. मुलाचें वर्तन चांगलें नसेल, तर त्याचें तर नुकसान आहेच,

परंतू त्यापासून आईबापांस ताप होऊन इतरांसही ताप होतो, व तो प्रत्यक्ष आणि तत्काल होतो. मुलगा शरिरानें सुदृढ व विद्वान आहे, परंतू दुराचारी आहे, तर त्याच्या कृतीपासून जें नुकसान होईल, त्या मानानें पाहतां तो अशक्त व अक्षरशत्रू असून सदाचारी आहे, तर जें नुकसान होईल तें कांहींच नाहीं. ह्यावरून हें उघड आहे कीं, सद्वर्तनाची थोरवी फार आहे. नुसत्या शरीरसंपत्तीची मातब्बरी जे कोणी मानीत असतील ते खुशाल मानोत; नुसत्या विद्वत्तेचें गौरव जे कोणी करीत असतील ते खुशाल करोत; शहाण्यानें त्याची मातब्बरी मानूं नये. एकाद्या मनुष्याचें वर्तन शुद्ध नसून तो श्रीमंत अथवा विद्वान असेल, तर त्याचें प्रस्त माजविणारे बरेच सापडतात; परंतू तोच सदाचारी असून जर गरीब अथवा बेताबाताचा शिकलेला असेल, तर त्याचे गौरव करणारे थोडे सापडतात, ही शोचनीय स्थिती आहे. गौरव करणें एकीकडे राहूं द्या; परंतू नुसती पसंती दर्शविणारेसुद्धां थोडे दृष्टीस पडतात. नुसत्या संपत्तीला, नुसत्या अधिकाराला अथवा नुसत्या विद्वत्तेला मान देणारे आजपर्यंत बरेच होऊन गेले, हल्लीं आहेत व पुढेंही होतील. त्याविषयीं विचार करावयाचा नाहीं. ज्या एका गोष्टीची विशेष फिकीर बाळगावयाची, ती गोष्ट श्रीमंती नाहीं, अधिकार नाहीं, किंवा विद्वत्ता नाहीं; ती गोष्ट शरीरसंपत्तीही नाहीं. आपलीं मुलें सदाचारी असावीं, ह्या गोष्टीकडे बापानें विशेष लक्ष पुरविलें पाहिजे, ही त्याची महत्वाकांक्षा असली पाहिजे, व ह्याविषयीं त्याला अभिमान असला पाहिजे. ह्यावरून संपत्ती, विद्वत्ता, अधिकार वगैरे गोष्टींची आम्ही कांहींच मातब्बरी समजत नाहीं, असें कांहीं लोक समजतील; पण

तसें नाहीं. त्यांची मातब्बरी आहे, परंतू एक एकटयाची नाहीं. मनुष्य सदाचारी असून त्याजवळ संपत्ती, अधिकार, व विद्वत्ता ह्यांपैकीं एक असेल तर चांगलें, दोन असतील तर विशेष चांगलें, तिन्हीं असतील तर उत्तम. अशांचें गौरव खुशाल करावें; त्याबद्दल वादच नाहीं. मुख्य गोष्ट सांगावयाची ती ही कीं, मुलांचें वर्तन अगोदर शुद्ध पाहिजे. वर्तन शुद्ध असून तीं शरिरानें सुदृढ व विचारांनीं पोक्त असावीं. इतकें साध्य करून घेतल्यावर लक्ष्मी प्राप्त करून घेणें व अधिकार मिळविणें, म्हणजे दुधांत साखर घालणें होय.

हवा, पाणी, पैशाची टंचाई, वगैरे कांहीं अपरिहार्य कारणांमुळें शरीरप्रकृती चांगली ठेवण्यास कित्येकांस व्यत्यय येतो. त्याप्रमाणें पैशाच्या अडचणीमुळें सांप्रत काळीं चांगलें शिक्षण देण्यास पुष्कळांस अडचण येते. सदाचरणाच्या संबंधानें विचार करतां हवा, पाणी व पैसा हीं आड येत नाहींत. श्रीमंतासच सदाचरणानें वागतां येतें, गरिबांस वागतां येत नाहीं; किंवा विद्वानासच वागतां येतें, अज्ञानास वागतां येत नाहीं, असा प्रकार नाहीं. मनुष्य कितीही गरीब, कितीही अशिक्षित, अथवा कितीही अशक्त असो, त्यास सदाचारानें वागतां येणार नाहीं, असें नाहीं. इतकेंच कीं, विकारास वश होतां कामा नये, मोहास गुंततां कामा नये, व क्षणीक सूख व क्षणीक लाभ हीं परिणामीं अहितकर असतील, तर त्यांवर नजर ठेवतां कामा नये. तात्पर्य, त्याच्या अंगीं आत्मसंयमन पाहिजे. त्याचें मन त्याच्या स्वाधीन पाहिजे. कोणता पदार्थ पाहून मन केव्हां भकेल, हें सांगणें कठीण आहे. तें आवरून धरलें, तर मोठें हीत होतें, बेफाम झालें

तर अहीत होतें. तरबेज केलेल्या घोडयांच्या, खेचरांच्या, व कबुतरांच्या अथवा इतर पशुपक्ष्यांच्या शर्यतींप्रीत्यर्थ हजारो रुपये खर्च करणारे कित्येक सापडतात, त्या पाहावयास जाणारे शेकडो दृष्टीस पडतात व शर्यत जिंकणाऱ्या इसमांचें कौतूक करणारेही पुष्कळ आढळतात. घोडा, खेचर कबुतर आदी प्राण्यांच्या गतीपेक्षां मनाची गती फार; असें असून मनाच्या शर्यतीचे भोक्ते फार थोडे दिसून यावे हें आश्चर्य आहे. घोडा हुकमांत ठेवणाऱ्यांचें आम्हीं कौतूक करावें व मन हुकमांत ठेवणाऱ्यांचें तितकें कौतूक करूं नये, ही किती तरी आश्चर्याची गोष्ट आहे ?

मुलांचें वर्तन बरोबर नाहीं, म्हणून कुरकूर करणारे पुष्कळ आढळतात; परंतू आपलें स्वतःचें वर्तन कितपत बरोबर आहे, ह्याबद्दल विचार करणारे किती आहेत ? आम्हांस वाटते फार थोडे आहेत. आमचें वर्तन ज्याप्रमाणें असतें त्याप्रमाणेंच प्रायः मुलांचें असतें. आम्ही ज्या गुणास विशेष मान देतों, त्यास ते प्रायः मान देतात. आमच्या वर्तनाबद्दल केव्हां केव्हां कांहीं विशेष कारणें असतात; परंतू आमचीं कारणें मुलांस दिसत नाहींत. आमची कृती दिसते व तिचें अनुकरण ते करतात. श्रीमंतीशिवाय दुसरा विशेष गुण ज्याच्या अंगीं नाहीं, असा एकादा श्रीमान मनुष्य आमच्या घरीं आला असतां आम्ही त्यास चांगला मान देतों; विद्वान आला असतां त्यास पूज्य समजून मान देतों; अधिकारी आला असतां त्याचा सत्कार करतांना आमच्या जिवाची एकच धांदल होते; त्याचप्रमाणें भपकेदार साधू आला असतां त्याचाही मान ठेवणारे बरेच आढळतात. पण ज्याच्या अंगीं श्रीमंती, अधि-

कार आणि विद्वत्ता ह्यांपैकीं एकही गुण नाहीं, परंतू ज्याचें वर्तन मात्र शुद्ध आहे, असा मनुष्य घरीं आला असतां त्यास योग्य मान देणारे आमच्यांपैकीं कितीजण आहेत ? फार थोडे. अशी जर वास्तवीक स्थिती आहे, तर मुलांना कोठच्या तोंडानें दोष द्यावा ? नुसत्या श्रीमन्तीस, नुसत्या विद्वत्तेस, अथवा नुसत्या अधिकारास मान देणारे आजपर्यंत शेकडो लोक होऊन गेले, हल्लीं आहेत व अशीच स्थिती राहील, तर पुढेंही सापडतील, हें खरें आहे. जगाची अशीच रहाटी आहे, असा वेदांत सांगणारे पुष्कळ सापडतील, हेंही आम्हो समजून अहों; तथापी, लाभाची आशा, दांभिकपणा व नुकसान होण्याचें भय, ह्यांपैकीं कोणत्या तरी गोष्टीचा पगडा आमच्या मनावर असतो, किंवा निवळ अंध-परंपरेनें आम्ही वागतों, असें म्हणावें लागतें. ज्याजवळ सदा-चाराशिवाय दुसरें कांहीं नाहीं, त्यापासून नफा किंवा नुकसान होण्याचा संभव नाहीं. अशी गोष्ट श्रीमंतांची अथवा अधिका-ऱ्यांची नाहीं. त्यांच्यापासून लाभाची आशा किंवा नुकसान होण्याचें भय असतें. ह्यावरून श्रीमंती, अधिकार अथवा विद्वत्ता ह्यांस मान देणें चांगलें नाहीं, किंवा सदाचारास कोणीच मान देत नाहीं, असें म्हणण्याचा आमचा हेतू नाहीं. आमच्या म्हणण्याचा हेतू इतकाच कीं, सदाचाराची व वरील तीन गुणांपैकीं एका गुणाची जेव्हां सांगड असते, तेव्हां सदा-चाराचें गौरव करणारे पुष्कळ आढळतात; परंतू नुसत्या सदा-चाराचें गौरव करणारे थोडे सापडतात. शिवाय, नुसत्या श्रीमंती-स, अथवा अधिकारास, अथवा विद्वत्तेस मान देणारे जसे पुष्कळ आढळतात, तसे नुसत्या सदाचारास मान देणारे आढळत नाहींत. ही जर वस्तुस्थिती आहे, तर त्याबद्द-

ळचा दोष मुलांकडे नसून आमच्याकडे आहे. ज्या ज्या मानानें ज्या ज्या गोष्टींचें महत्व लोक मानतात, त्या त्या मानानें त्या त्या गोष्टीकडे मनाची धाव असते, असा सामान्य सिद्धांत आहे. सदाचाराचें महत्व जितकें मानावें, तितकें आम्ही मानीत नाहीं. आमच्या मुलांचें आचरण शुद्ध असावें अशी जर आमची इच्छा आहे, तर प्रथम शुद्धाचरणाची योग्यता इतर गोष्टींपेक्षां जास्त आहे हें तत्व त्यांच्या मनांत ठसलें पाहिजे, व तसें करण्यास आम्हीं स्वतः त्याची मातब्बरी मानून त्याप्रमाणें आचरण केलें पाहिजे. आमच्या स्वतःच्या उदाहरणानें जितकें लवकर कार्य होईल, तितकें इतर उपायांनीं होणार नाहीं.

सदाचरणानें वागणें हें एका दृष्टीनें सोपें व दुसरे दृष्टीनें अवघड आहे. पैसा, बळ, शहाणपण, अधिकार व विद्वत्ता ह्यांपैकीं कोणत्याही गोष्टीची जरी अनुकूलता नसली, तरी सदाचरणानें वागतां येतें; म्हणून तें राखणें सोपें आहे. परंतू मनाची धाव वासना तृप्त करण्याकडे असते; सर्व वासना चांगल्या नसतात; तेव्हां मन आवरून धरावें लागतें व तें करण्यास निग्रह लागतो. हा निग्रह एकाएकी करतां येत नाहीं, म्हणून सदाचरणानें वागणें हें कांहींसें कठीण आहे. असा निग्रह अभ्यासानें येतो. हा अभ्यास करविणें हें बापाचें महत्वाचें कर्तव्य आहे. साधू तुकारामांनीं मोक्षाच्या संबंधानें जी गोष्ट सांगितली आहे, तीच गोष्ट अक्षरशः सदाचारास लागू आहे.

नाहीं देवापाशीं मोक्षाचें गाठोळें ।

आणून तें द्यावें तुम्हापाशीं ।

नये मोल देतां धनाचिया राशी ।
नाहीं तें आकाशीं पाताळीं तें ।
तुका म्हणे आहे आपुल्या तें आंगीं ।
गवसेना जगीं दुजे ठायीं ॥

तुकारामबोवांची ही जी उक्ती तिचा भाव लक्षांत आणला असतां सदाचाराचें देखील गाठोडें देवापाशीं नाहीं, कीं तो तें आपणास आणून देईल; तें पैसे देऊन प्राप्त करून घेतां येण्यासारखें नाहीं; तें बाजारांत किंवा एकांत स्थळीं धुंडाळून मिळण्यासारखें नाहीं; तें आकाशांत नाहीं किंवा पाताळांत नाहीं. तात्पर्य, तें दुसरे कोठेंही मिळावयाचें नाहीं. तें आपल्याजवळच आहे व तें मिळविणें आपणाच-कडे आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवून बापानें योग्य वर्तन-क्रम ठेवला पाहिजे.

सदाचारानें जें वागावयाचें, तें लोकांसाठीं नाहीं; तें आत्मोन्नत्तीसाठीं आहे. सदाचारानें वागल्यानें लोक बरें म्हणतील व त्याविरुद्ध वागलें असतां लोक नांवें ठेवतील, म्हणून सदाचारानें वागावयाचें असें नाहीं; म्हणजे निवळ प्रतिष्ठेच्या किंवा लाभाच्या आशेनें सदाचारानें वागावयाचें असें नाहीं. ही गोष्ट प्रत्येकानें लक्षांत ठेविली पाहिजे. तसेंच सदाचारानें वागावयाचें, म्हणजे लोकाचारास सर्वांशीं गुंडाळून ठेवून बेपर्वाईनें अथवा एककल्लीपणानें वागावयाचें असें नाहीं. 'आमचे हेतू चांगले असले म्हणजे झालें, आम्हांस लोकांशीं काय करावयाचें आहे ? आमचें वर्तन शुद्ध असलें म्हणजे झालें, लोक कांहीं म्हणोत.' हे विचार दिसण्याला बरे दिसतात; परंतू ते योग्य नाहींत. जे लोकांचा संबंध तोडून एकांत स्थळीं राहण्यास

तयार आहेत, त्यांनीं तसें खुशाल करावें. आमच्या मुलांचे हेतू निर्दोष असले म्हणजे झालें, असें म्हणून स्वस्थ बसणें योग्य नाहीं. त्यांची कृती निर्दोष असून तिजबद्दल गैर-समज होण्यास त्यांनीं सवड देतां कामा नये. त्यांस लोकांत राहावयाचें आहे, त्यांस आपली उन्नति करावयाची आहे व लोकांचीही करावयाची आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचें तत्व ठीक आहे, परंतू त्यास यत्ता आहे. कांहीं तत्ववेत्ते त्याचें अवलंबन करण्यास सांगतात, म्हणून आमचे मुलगे सर्वांशीं तसें करूं लागले असतां नुकसान होण्याची भीती आहे. जगाची पर्वा न करणें हा मोठा पुरुषार्थ आहे, असें समजणारे कांहीं दृष्टीस पडतात; हें नैतीक धैर्य समजून त्याचें गौरव करणारे कांहीं दृष्टीस पडतात; परंतू हे लोक सूक्ष्म रीतीनें विचार करीत नाहींत असें दिसतें. जगाची पर्वा न कर-ण्याचे खरे प्रसंग थोडे असतात. महातत्त्वभंग, सत्यभंग, अथवा वचनभंग होण्याची, अथवा राष्ट्रीय हितास धक्का बसण्याची जेव्हां खरोखर भीती असते, तेव्हां जगाची पर्वा न करण्याचा वास्तवीक प्रसंग आहे, असें समजावें. ज्या बाबतींत ढवळाढवळ करण्यास लोकांस यत्किंचितूही अधिकार नाहीं, त्या बाबतींत ते खोड-साळ बुद्धीनें ढवळाढवळ करूं लागले असतां त्यांची पर्वा न करणें एक वेळ योग्य. त्यांच्या स्वातंत्र्याच्या आड येत नसतां, अथवा त्यांचें नुकसान करीत नसतां, ते आमच्या खऱ्या स्वातंत्र्याच्या आड येत असतील, अथवा आम-चें नुकसान करण्यास प्रवृत्त होतील, तर त्यांची पर्वा न करणें एक वेळ योग्य. लोकांत राहावयाचें आहे, तर निष्कारण त्यांवि-रुद्ध बंड करणें, म्हणजे समाजाचीं बंधनें शिथील करणें आहे.

लोकांचें वर्तन नीतिबाह्य आहे, व त्यांच्या कृतीनें देशाचें नुकसान होण्याची भीती आहे, तर त्यांवर खुशाल शस्त्र धरावें; इतर प्रसंगीं, सामोपचाराच्या अथवा तडजोडीच्या गोष्टीस न जुमानतां केवळ ते दुराग्रहानें वागतील तेव्हां तसें करावयाचें; मध्यें नाहीं. दरम्यान जे तसें करण्यास प्रवृत्त होतात ते अविचारी आहेत असें समजावें. मुख्य गोष्ट सांगावयाची ती ही कीं, सत्यभंग अथवा वचनभंग ह्यासारखें जेव्हां महाकारण असेल, तेव्हां जगाची पर्वा करावयाची नाहीं व तडजोड करावयाची नाहीं; परंतू सामान्य कारणांसाठीं त्यांची पर्वा न करणें उचीत नाहीं. प्रथम सामदाम करण्याविषयीं दीर्घ प्रयत्न केला पाहिजे; व तडजोड करण्यास उद्युक्त झाले पाहिजे. कोणत्याही प्रकारें तडजोड होत नाहीं, असें जेव्हां दिसून येईल तेव्हां मार्ग खुला आहे. अल्प स्वल्प कारणें वारंवार उपस्थित होतात; त्यांसाठीं आम्ही बंड करूं लागलों, तर बंडाळी होऊन समाज विसस्वळीत होईल. ह्या बाबतींत इतका पाल्हाळ करण्याचें कारण नव्हतें. परंतू पाश्चात्य ग्रंथकारांचे ग्रंथ वाचून आमच्या तरूण लोकांच्या मनाची चलबिचल झाली आहे. प्रस्तुतचा काळ संक्रमणकाळ असल्यामुळें अशी चलबिचल होणें स्वाभावीक आहे. तरूण मुलांचे विचार स्थिर झालेले नसतात. तिकडल्या प्रसिद्ध पुरूषांनीं देशाच्या उन्नतीसाठीं ज्या रितीनें आचरण केलें त्या रितीनें आपण आचरण करावें, असें कांहींस वाटत आहे. व्यक्तिस्वातंत्र्यासंबंधी तिकडील कांहीं तत्त्ववेत्त्यांचे जे विचार आहेत त्यांचेंच अवलंबन करणें कांहींस प्रशस्त वाटूं लागलें आहे. ही स्थिती चांगली किंवा वाईट ह्याविषयीं निरूपण करण्याचें हें स्थळ नाहीं. आम्हांस जें सांगावयाचें

तें हें कीं, तिकडील स्थितीप्रमाणें तिकडील थोर पुरुषांचे विचार व आचार होते व आहेत. आमची स्थिती काय आहे, ह्याविषयीं पोक्त विचार करून व तिकडील थोर पुरुषांचे विचार लक्षांत आणून आम्हीं आचरण केलें पाहिजे.

सदाचाराच्या संबंधानें वर जे विचार सांगितले त्यांत विशेष कांहीं नाहीं. ते विचार ठीक आहेत व सदाचारानें वागावें हेंही म्हणणें ठीक आहे, परंतू सदाचाराच्या गोष्टी कोणत्या, असा प्रश्न निघणें स्वाभाविक आहे. शारीर संगोपन व मानसीक शिक्षण ह्यासंबंधानें ज्या गोष्टींचें निरूपण करण्यांत आलें आहे, त्यांसंबंधानें बरीच एकवाक्यता होईल, परंतू सदाचाराच्या संबंधानें तितकी होण्याचा संभव नाहीं. सत्य भाषण, आज्ञाधारकता, सत्संगती, उद्योगप्रीती, आत्मसंयमन, नैतिकधैर्य, दृढनिश्चय वगैरे गोष्टींच्या बाबतींत बरीच एकवाक्यता असण्याचा संभव आहे. ह्या बाबतींत मतभेद असल्यास थोडा आहे; परंतू स्पर्शास्पर्श, पेयापेय, भक्ष्याभक्ष्य, त्याचप्रमाणें कांहीं आचारविचार ह्यांच्या बाबतींत बराच मतभेद आढळून येतो. आमचे लोक पेयापेय, भक्ष्याभक्ष्य वगैरे गोष्टींचा समावेश सदाचारांत करतात. ह्या बाबतींत त्यांची नजर फार करडी आहे. इतर लोक ह्या गोष्टींचा सदाचारांत समावेश करीत नाहींत, व त्यांची नजर करडी नाहीं, इतकेंच नाहीं, तर त्यांविषयीं ते विशेष विधिनिषेधही बाळगीत नाहींत. अशी सामान्य स्थिती दृष्टीस पडते. अशी स्थिती असतां स्पर्शास्पर्श, पेयापेय, भक्ष्याभक्ष्य वगैरे गोष्टींचा समावेश सदाचारांत करावयाचा किंवा नाहीं, असा प्रश्न साहजीक उत्पन्न होतो. ह्याविषयीं सविस्तर विचार करण्याचें हें स्थळ नाहीं. ह्याविषयीं स्वतंत्र रितीनें

विचार करणें जरूर आहे. हा प्रश्न धर्मविषयक आहे, असें आमचे लोक समजतात; तेव्हां धर्मसंबंधी प्रकरणाविषयीं विचार करतांना ह्या प्रश्नाविषयीं सविस्तर विचार करणें योग्य आहे. तथापी, कित्येक कारणांस्तव ही एक गोष्ट सांगणें जरूर आहे कीं, स्पर्शास्पर्शाविषयींचे आमच्या लोकांचे विचार बरेच अंशीं चमत्कारीक आहेत, असें म्हणणें भाग पडतें. असल्या विचारांचें मुख्य बीज वेडगळ स्वाभिमानाशिवाय दुसरें दिसत नाहीं. 'ऐसें कैसें रे सोवळें शिवतां होतसें ओवळें' हें जें समर्थांचें महावचन तेंच प्रस्तुतचे प्रश्नास लागू पडतें. सदाचाराची इमारत भक्कम पायावर असणें योग्य आहे. स्पर्शास्पर्श हा डळमळीत पाया आहे. प्रस्तुतची स्थिती लक्षांत आणतां स्पर्शास्पर्शाविषयींचे विचार फार दिवस चालू राहण्याचा संभव नाहीं; तेव्हां ह्या सर्व कारणांविषयीं विचार करून काय करावयाचें तें बापानें करावें.

स्पर्शास्पर्शाविषयीं जे विचार सुचविले, ते पेयापेय व भक्ष्याभक्ष्य ह्या विषयास लागू करतां येत नाहींत. पेयापेय व भक्ष्याभक्ष्य ह्याचा जो व्यापक अर्थ आहे, त्या अर्थानें कोणी विचार करीत नाहीं. मद्यपान व मांसभक्षण ह्या अर्थानेंच विचार करण्याचा प्रघात आहे व त्याच अर्थानें वरील दोन शब्दांचा उपयोग आम्ही करीत आहों. स्पर्शास्पर्शाच्या संबंधानें योग्य कारण दाखविण्यांत येत नाहीं. तसा प्रकार मद्यपान व मांसभक्षण ह्या दोन बाबतींत नाहीं. ह्या दोन बाबींचा समावेश सदाचारांत करण्यांत आमच्या लोकांचा स्तुत्य हेतू होता व तो योग्य आहे. अशा प्रकारें समावेश केवळ अभिमानामुळें अथवा पोरकट समजुतीमुळें करण्यांत

आला नव्हता. जीवित्व व वित्त ह्यांची हानी होऊन मनुष्यपण नाहींसें होणें, हा मद्यपानाचा परिणाम. मांसभक्षण म्हणजे गरीब प्राण्यांचा नाश व येणेंकरून भूतदयेचा संकोच, अथवा उपयुक्त प्राण्यांचा नाश व येणेंकरून संपत्तीचा संहार. आतां जे जे मद्य प्राशन करतात, अथवा मांस भक्षण करतात, ते ते सर्व पशुवत आचरण करतात अथवा निर्दय असतात, असा प्रकार नाहीं. तथापी, सामान्य विचार करतां दोन्ही गोष्टी चांगल्या नाहींत व त्यांपासून पराङ्मुख असणें हितावह आहे. ह्या बाबतींत पाश्चात्य लोकांच्या समजुतींत बदल पडत चालला आहे. आमच्याप्रमाणेंच त्यांचे विचार हळू हळू होऊं लागले आहेत. तेव्हां ह्या बाबतींत आमच्या पूर्वजांचे जे विचार तेच कायम ठेवून, ह्या दोन गोष्टी निषिद्ध समजणें चांगलें. तत्वतः ह्या दोन गोष्टींचा समवेश सदाचांत करतां येईल, असें जरी नाहीं, तरी ह्या गोष्टी निषिद्ध समजून सदाचाराच्या सदरांत घालणें व त्यांसंबंधानें नैतीक निर्बंध ठेवणें विशेष हितकर आहे. निदान आमच्या लोकांनीं तरी त्या निषिद्ध समजाव्या. ह्या मताविरुद्ध कांहीं लोक निघतील; परंतू प्रस्तुतच्या ओघांवरून त्यांचें मन कांहीं दिवसांनीं बदलेल, असा संभव दिसूं लागला आहे.

पाश्चात्य विचारांमुळें किंवा दुसऱ्या कारणांमुळें आमच्या मंडळीपैकीं कांहींच्या पोषाकांत व रितीरिवाजांत फरक दृष्टीस पडूं लागला आहे. ही गोष्ट जुन्या समजुतीच्या लोकांस पसंत न पडून ते नवीन मंडळीस आचारभ्रष्ट समजतात, ही कांहीं अंशीं चूक आहे. खर्चाच्या संबंधाचा विचार कर्तव्य नसेल, तर ह्या गोष्टीचें विशेष महत्व नाहीं. बाकीच्या गोष्टी ठीक

आहेत, तर ह्या बाबतींत स्वातंत्र्य ठेविल्यानें अहीत होण्याची भीती नाहीं. चोहोंकडून सर्व बाबतींत हात पाय बांधून टाकणें इष्ट नाहीं. अशल्या किरकोळ बाबतींत स्वातंत्र्य असावें, हें बरें. महत्वाच्या गोष्टींत लगाम हातीं धरला असतां बस आहे. सर्वच गोष्टींत प्रतिबंध असल्यानें मनास त्रास होतो व वाईटाबरोबर चांगल्याही गोष्टी झुगारून देण्याकडे मनाची प्रवृत्ती होण्याचा संभव असतो, ही गोष्ट चांगली लक्षांत ठेवली पाहिजे.

सदाचाराच्या ज्या गोष्टी आहेत त्यांपैकीं कांहींच्या संबंधानें मतभेद आहे, व कांहींच्या संबंधानें बरेंच ऐक्य आहे, असें वर सांगितलें आहे. आम्हांपैकीं फारच थोड्या लोकांस अखेरपर्यंत गृहशिक्षण देतां येतें. अनेक कारणांस्तव मुलांस शाळेंत पाठविल्याशिवाय त्यांस गत्यंतर नसतें. तेव्हां मुलांस चांगलें शिक्षण मिळून, त्यांचें हीत व्हावें, अशी जर आमची इच्छा आहे, तर बाप व शिक्षक ह्यांचें सघट्टन असणें व परस्परांची मदत परस्परांस असणें इष्ट आहे. ज्या ठिकाणीं असें करण्यास अडचण आहे, त्या ठिकाणीं बोलावयास नको. आमच्या शाळांतील व कालेजांतील मुलांचें वर्तन जसें असावें तसें नाहीं, अशी कांहीं लोकांनीं थोडे वर्षांपूर्वीं ओरड केली होती. त्यावरून नीतिशिक्षणाच्या बाबतींत काय केलें पाहिजे, ह्याविषयीं त्या वेळीं बरीच चर्चा झाली. मुलांचें वर्तन चांगलें असावें, अशी सर्वांची इच्छा दिसून आली; परंतू त्यांचें वर्तन जसें असावें तसें आहे किंवा नाहीं, व वर्तन सुधारणें झाल्यास तें कसें सुधारतां येईल, ह्या बाबतींत मतभेद बराच दिसून आला. मिशनरी लोकांचें म्हणणें—सरकारी शाळांतून धर्मशिक्षणा-

ची सोय नसल्यामुळें त्यांतील मुलांचें वर्तन चांगलें नसतें. दुसऱ्या कांहीं लोकांचें म्हणणें कीं, मिशनरी लोकांस अभिमान बाळगण्यास कारण नाहीं; दोहोंची स्थिती सारखीच आहे. आमच्या इकडील मुलांत ज्याप्रमाणें गुण-दोष आहेत, त्याप्रमाणें इंग्लंड वगैरे सुधारलेले देशांतील शाळांतील मुलांच्याही अंगीं गुणदोष आहेत. एकमेकांनीं एक-मेकांस हसावें असें नाहीं; परंतू तिकडे गृहशिक्षणाची मात-ब्बरी चांगली असून त्याचा परिणाम प्रत्ययास येत आहे. आम्ही चांगले, का दुसरे चांगले, हें सध्यां आम्हास ठरवा-वयाचें नाहीं. ग्रहण करण्यासारख्या गोष्टी कोणत्या, हें आप-णास पाहावयाचें आहे. शाळांतील व कालेजांतील मुलांचें वर्तन सुधारण्याच्या बाबतींत जे उपाय सुचविण्यांत आले, ते लोकांपुढें ठेवणें अवश्य आहे. गृह व शाळा, बाप व शिक्षक ह्यांचा एक प्रकारचा संबंध आहे. परस्परांनीं परस्परांस सहाय्य करून इष्ट हेतू सिद्धीस न्यावयाचा आहे. ‘ शाळेंतील व्यवहारांशीं मला काय करावयाचें आहे ? मी आपल्या घरा-पुरतां विचार करीन–’ असें म्हणून बापानें स्वस्थ राहणें योग्य नाहीं. जी गोष्ट शाळेंत करण्यास अडचण आहे, ती बापास घरीं करतां येण्यासारखी असल्यास त्यानें करावी. त्याचप्रमाणें एकादी गोष्ट घरीं करण्यास अडचण असून शाळेंत होण्यासारखी असल्यास, ती शाळेंत व्हावी. सांगाव-याची गोष्ट ही कीं, एकाची दिशा एक व दुसऱ्याची त्याच्या उलट, असा प्रकार न होतां दोहोंचा जितका मेळ ठेवतां येईल तितकें चांगलें. एकाची उणीव ती दुसऱ्याची उणीव व एकाचें बळ तें दुसऱ्याचें बळ, असें समजून परस्परांचें परस्परांस पाठबळ असलें पाहिजे. इतकें सांगून मुलांचें वर्तन

सुधारण्याच्या बाबतींत जे उपाय सुचविण्यांत आले ते सांगतोंः—

१. शिक्षणकलेंत जे लोक तयार झाले आहेत व ज्यांचें वर्तन शुद्ध आहे, अशांची शिक्षकांच्या जागीं योजना करणें महत्वाचें आहे. असें झालें असतां मुलांचें वर्तन सुधारेल.

२. कित्येक शाळांकरतां असावीं तशीं शालागृहें नाहींत. कित्येकांच्या वाट्यास भिकार जागा आली आहे. ही स्थिती वाईट आहे. शालागृहांच्या संबंधाची सुधारणा ही प्रथमची सुधारणा.
शाळांतून मोठमोठाल्या खोल्या, लायब्ररी, पदार्थसंग्रहालय व चांगलें सामान, हीं असावीं.

३. प्रत्येक कालेज, प्रत्येक हायस्कूल, प्रत्येक प्राथमीक शिक्षणाची शाळा, हीस जोडून खेळण्याची जागा असावी व त्या जागेंत आट्यापाट्या, क्रिकेट वगैरे खेळ मुलांकडून खेळवावे. शिक्षकांनीं मुलांबरोबर असावें, त्यांबरोबर खेळावें, त्यांस उत्तेजन द्यावें व चांगल्या खेळणारास बक्षीस द्यावें. शिक्षकांचीं जीं कामें आहेत त्यांपैकीं हें एक आहे, असें समजण्यांत यावें.
तसेंच मुलांनीं ड्रिल उर्फ कवाईत अवश्य केली पाहिजे. येणेंकरून शरीरप्रकृती नीट राहून मुलांच्या अंगीं व्यवस्थितपणा येईल.

४. ज्याप्रमाणें लोकमताचा लोकांना कांहींसा वचक असतो, त्याप्रमाणें विद्यार्थीमताचा विद्यार्थ्यांस वचक राहील, असें विद्यार्थीमत जागृत झालें पाहिजे.

५. मुलांच्या सद्वर्तनाबद्दल त्यांस अधीक मार्क अथवा बक्षीस द्यावें.

६. धर्मशिक्षणाशिवाय नीतिशिक्षणाचा उपयोग होणार नाहीं. तेव्हां शाळांतून कांहीं वेळ धर्मशिक्षण पाहिजे.

७. ठिकठिकाणीं बोर्डिंगें असून त्याठिकाणीं फार सक्ती नसावी; लष्करी साधेपणा असावा. ठरलेल्या वेळीं जेवणखाण, व्यायाम, अभ्यास, वगैरे असावीं.

८. शाळेंत मुलांनीं वेळच्या वेळीं येणें, व्यवस्थित रितीनें वागणें, वरिष्ठांस मान देण्याचे जे बाह्य प्रकार आहेत त्यांसंबंधानें हयगय न करणें, सोबत्यांबरोबर सभ्यपणानें वागणें व ग्राम्य शब्द न वापरणें, ह्या बाबतींत लक्ष दिलें पाहिजे.

९. कालेजचे प्रिन्सिपाल व प्रोफेसर हे पहिल्या प्रतीचे शिकलेले असून, त्यांपैकीं एक दोघांनीं तरी कालेजाच्या जवळ राहणें जरूर आहे. असें झालें असतां मुलांस त्यांचा कांहीं वचक राहील व अन्य रितीनें पुष्कळ उपयोग करून घेतां येईल.

१०. विद्याखात्यांतील अधिकारी हे केवळ चालू कामाचा बोजा उठविणारे नसून, सुधारणा करण्याकडे त्यांचें लक्ष असावें. असें नसेल, तर शाळाखात्यांत ज्या सुधारणा होणें अवश्य आहेत, त्या व्हावयाच्या नाहींत.

११. ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थ्यांस संस्कृत शिकवावें व त्यांस पुराण सांगतां यावें. असें झालें असतां शिक्षकांचें वजन खेडेगावांतून विशेष वाढून नीतिसंबंधानें विशेष उपयोग होईल.

१२. कालेजांत शिकणारे विद्यार्थ्यांनीं कालेजांत राहिलें पाहिजे.

१३. नीतिविषयक पुस्तक तयार करवून, तें शाळांतून शिकवावें. अशा पुस्तकांत नुसतीं शुष्क वचनें असून उपयोगी नाहींत. भाषा चटकदार असावी. असल्या पुस्तकापासून कांहीं फायदा होणार नाहीं, असें कांहींचें मत आहे.

१४. मॉनिटर व प्रीफेक्ट नेमण्याची वहिवाट इंग्लंडांत कांहीं ठिकाणीं चालू आहे. ही व्यवस्था येथें चालू करून पाहावी. उपयोग होईलच, असें खात्रीनें सांगतां येत नाहीं. कांहींचें म्हणणें कांहींच उपयोग होणार नाहीं.

१५. मुलांच्या वयाच्या संबंधानें कांहीं अटक असावी— कांहींचें म्हणणें नसावी.

१६. युनिव्हर्सिटी ( विश्वविद्यालय ) संबंधानें सुधारणा प्रथम झाली पाहिजे.

१७. शाळांतून चालू असणाऱ्या परीक्षांच्या संबंधानें कडकपणा पाहिजे.

१८. शाळांतून अथवा पाठशाळांतून जीं पुस्तकें हल्लीं चालू आहेत, त्यांत फेरफार झाला पाहिजे. चांगल्या पुस्तकांच्या अभ्यासापासून मुलांच्या नीतीवर परिणाम चांगला होतो.

१९. शिक्षणाच्या बाबतींत काय काय फेरफार केले पाहिजेत, ह्याविषयीं विचार करण्याकरतां हेडमास्तर व मास्तर ह्यांच्या वारंवार सभा भरविण्यांत याव्या. हेडमास्तरांनीं उपयुक्त विषयांवर व्याख्यानें देण्याचा क्रम ठेवावा.

२०. शिक्षक व पालक ह्यांमध्यें दळणवळण असलें पाहिजे.

२१. इंग्लंडांत कांहीं गोष्टी चालू आहेत, म्हणून त्या गोष्टी येथें सुरू करणें चांगलें नाहीं. येथील लोकांचा धर्म व त्यांचे आचारविचार ह्यांसंबधोंन जी स्थिती दृष्टीस पडते, तिकडे लक्ष देऊन काय करणें तें करावें. लोकांस युरोपियन न बनवितां नेटीवच ठेवून त्यांची सुधारणा कर्तव्य आहे. समाज सुधारण्यास ज्या अनेक गोष्टी साधनीभूत आहेत, त्यांपैकीं शाळा एक साधन आहे. ग्रंथ, धर्म, कलाकौशल्य, सरकार, वर्तमानपत्रें, सार्वजनीक कर्मणुकी वगैरे दुसऱ्या अनेक गोष्टींत सुधारणा पाहिजे. घाणेरडे ग्रंथ, घाणेरडीं वर्तमानपत्रें व घाणेरडीं नाटकें हीं कमी होऊन चांगल्या ग्रंथांचा, चांगल्या वर्तमानपत्रांचा व चांगल्या कर्मणुकींचा जों जों जास्त प्रसार होईल, तों तों लोकांचें व तेणेंकरून मुलांचें आचरण सुधारेल.

२२. पुष्कळ गोष्टींत सरकारचे हातपाय बांधलेले असतात. तशी गोष्ट लोकांची नाहीं. सरकारापेक्षां लोकांस पुष्कळ काम करतां येईल. नीतिसंबंधानें लोकांचें आचरण सुधारावयाचें, म्हणजे प्रथम त्यांचे पुढारी, त्यांतील प्रमूख लोक, त्यांचे उपाध्ये, त्यांतील विद्वान लोक व त्यांच्या संस्था ह्यांचे आचार व विचार उदात्त पाहिजेत.

२३. हाजी हाजी करण्याची सवय व साधारण ढिलाई ही जाऊन, तिच्या ऐवजीं सत्याची व मानसीक धैर्याची पूर्ण अभिरुची असणें इष्ट आहे.

वर ज्या गोष्टी सांगितल्या त्यांपैकीं सर्वच घेण्यासारख्या असून त्या बापास करतां येतील असें नाहीं. ह्या गोष्टींविषयीं विचार करून ज्या त्यास करतां येण्यासारख्या आहेत, त्या त्यानें करावयास लागावें. ज्या गोष्टी सांगितल्या त्यांसंबंधानें सर्वांची एकवाक्यता नाहीं. कांहीं बाबतींत मतभेद आहे तेव्हां त्याविषयीं विचार करून, घेण्यासारख्या असतील त्या गोष्टी त्यानें अमलांत आणविण्याविषयीं उद्योगास लागावें. ही गोष्ट तर त्यानें केलीच पाहिजे; परंतू एवढेंच करून त्यानें स्वस्थ बसावयाचें नाहीं. त्याजवर दुसरी जबाबदारी आहे. ती ही कीं, वरील गोष्टींविषयीं त्यानें आपल्या मित्रमंडळींत वारंवार खल केला पाहिजे; व ज्या गोष्टी पसंत ठरतील त्या अमलांत आणविण्याबद्दल त्यानें सतत चळवळ ठेवली पाहिजे, व जे कोणी अमलांत आणावयास लागतील, त्यांस त्यानें द्रव्यद्वारें किंवा अन्य रितीनें मदत केली पाहिजे. मुलांचें आचरण सुधारण्याचें काम एकट्याचें नाहीं; सर्वांचें आहे. तेव्हां प्रत्येकानें ह्या बाबतींत मनोभावानें मदत केली पाहिजे. सांसर्गिक रोगाचा उद्भव झाला असतां एकट्यानेंच आपलें घर साफ ठेवून उपयोग होत नाहीं; इतरांनींही आपापलीं ठेविलीं पाहिजेत; व ते ठेवीत नसतील, तर योग्य उपायांची योजना करून तसें करण्यास त्यांस भाग पाडलें पाहिजे. असें केलें, तर रोगाचा उपशम होईल. दुर्वर्तन हा एक प्रकारचा सांसर्गिक रोग आहे, असें म्हटलें असतां हरकत नाहीं. ह्याचा प्रतिकार करून सर्वत्र शुद्धी करावयाची आहे, तर आपल्या घरापुरती व्यवस्था करून मी स्वस्थ बसेन, असें म्हणणें बरोबर नाहीं. कांहीं अज्ञान किंवा दुराग्रही असतात, त्यांस

ताळ्यावर आणावें लागतें. असें न केलें, तर इष्ट हेतू सिद्धीस जात नाहीं. तेव्हां ह्या बाबतींत माझें, तुझें असा कोता विचार एकीकडे ठेवून प्रत्येकानें मुलांचें आचरण सुधारण्यासाठीं सतत चळवळ ठेवली पाहिजे. इतकें सांगून सदाचाराच्या संबंधानें जे विचार सुचवावयाचे ते सुचवितों.

**सत्यप्रीती**—सदाचाराच्या संबंधानें ज्या गोष्टीचें विशेष महत्व समजावयाचें ती गोष्ट सत्यप्रीती ही होय. सत्य हा सद्गुणांचा पाया आहे. मुलांच्या अंगीं बाकीचे गूण असून हा जर गूण नसेल, तर त्या गुणांची कांहींच किंमत नाहीं. इतर कोणतेही गूण अंगीं नसून जर हा एकच गूण अंगीं आहे, तरी एक वेळ चालेल; परंतू ह्याशिवाय इतर गूण व्यर्थ होत. अमक्या प्रसंगीं सत्य भाषण करावें व अमक्या प्रसंगीं करूं नये, अमक्यानें सत्य भाषण करावें व अमक्यानें न केलें तर हरकत नाहीं, असली घाणेरडी तडजोड सत्याच्या संबंधानें नाहीं. लबाडी ती लबाडी व सत्य तें सत्य. ह्यांची यत्किंचितूही भेसळ उपयोगी नाहीं. सत्य ही नेहमीं शुद्ध धातू असली पाहिजे. असत्य भाषणानें आपले स्वतःचें अथवा दुसऱ्याचें कल्याण होतें, म्हणून तें करण्यास प्रत्यवाय नसावा, हें म्हणणें उपयोगी नाहीं. कल्याण अथवा अकल्याण ह्यांशीं सत्याचा बिलकूल संबंध नाहीं. मोह उत्पन्न होऊन असत्य भाषण करण्याची इच्छा होते; परंतू ती उपयोगाची नाहीं. 'सत्यव्रत' हें धर्मराजास नांव होतें. अनेक संकटें त्यावर ओढवलीं, परंतू त्यानें सर्व आयुष्यांत कधींही असत्य भाषण केलें नव्हतें, पण मोहास गुंतून एक्या प्रसंगीं "नरो वा कुंजरो वा" असें द्व्यर्थी तो बोलला. त्याबद्दल स्वर्गारोहण करतांना त्याचा

अंगठा पतन पावला. हें सांगण्यांत व्यासांचा असा मुख्य हेतू दिसतो कीं, ईश्वराच्या घरीं सत्याच्या बाबतींत यत्किंचित्ही लटपट नाहीं; त्या बाबतींत यत्किंचित्ही क्षमा नाहीं. मी पुष्कळ वेळां सत्य बोललों, तेव्हां एकदां असत्य बोललों म्हणून काय झालें, हें म्हणणें उपयोगी नाहीं. ज्या गोष्टींपासून कोणाचें नफानुकसान नाहीं, त्यासंबंधानें थोडें खोटें बोललों म्हणून काय झालें, हें म्हणणें मुर्खपणाचें आहे.

" सत्येन पूयते साक्षी धर्मः सत्येन वर्धते ॥
सत्यमेवेश्वरो लोके सत्ये धर्मः सदाश्रितः ।
सत्यमूलानि सर्वाणि सत्यान्नास्ति परं पदम् " ॥

" सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तेंची परब्रह्म " अशी जी सत्याची थोरवी गाइली आहे, ती यथार्थ आहे. हीच थोरवी आमच्या मुलांनीं गाइली पाहिजे. " मातृदेवो भव, पितृदेवो भव " असा उपदेश उपनिषद्कारांनीं केलेला आहे. " सत्यदेवो भव " हा उपदेश बापानें मुलांस केला पाहिजे व मुलांनीं सत्याची मातब्बरी फार समजली पाहिजे, व " नैव लोभान्न मोहाद्वा न चाज्ञानात्तमोन्वितः । सेतुं सत्यस्य भेत्स्यामि गुरोः सत्यप्रतिश्रवः । " म्हणजे लोभामुळें, मोहामुळें अथवा अज्ञानामुळें कधींही सत्याचें अतिक्रमण मी करणार नाहीं, असें रामानें जाबालीस सांगितलें, त्याप्रमाणें आमच्या मुलांनीं सत्याच्या संबंधानें कडकडीत व्रत पाळलें पाहिजे. इतर पुष्कळ व्रतें आहेत, परंतू जें महाव्रत त्यांनीं मुख्यत्वें पाळावयाचें, तें सत्यव्रत होय. लोकांनीं आपणास लबाड म्हणणें, ही त्यांना मोठी चीड असली पाहिजे; व त्यांस रागावण्यास हें मोठें कारण असलें

पाहिजे; परंतू तें रागावणें नाटकी नको. खरोखर कृती पाहिजे. या जगांत खोटा जमाखर्च, खोटी फिर्याद, खोटी साक्ष, खोटा पुरावा व एकंदरीनें खोटा व्यवहार बराच चालू असतो. त्याकडे लक्ष दिलें असतां व त्यापासून होणारे दुष्परिणामांचा विचार केला असतां सत्याची आवश्यकता किती आहे, हें लक्षांत येईल. सत्य बोलावें म्हणून सांगणारे पुष्कळ आहेत; परंतू त्याप्रमाणें आचरण करणारे किती आहेत ? फार थोडे. मी परमेश्वरास स्मरून खरें बोलेन, खोटें बोलणार नाहीं, अशी प्रतिज्ञा करून जें खरें आहे तेवढेंच सांगणारे किती दृष्टीस पडतात ? वरील वचन केवळ नमुन्यादाखल झालें नाहीं काय ? मृत्यूचा फार्स! सामाजीक सुधारणेचा फार्स ! धर्माचा फार्स ! असे फार्स रंगभूमीवर पुष्कळ लोक पाहत आले आहेत, त्याचप्रमाणें हा सत्याचा फार्स नाहीं काय ? ह्याबद्दल दोषी कोण ? नमुना करणारे, किंवा प्रतिज्ञाभंग करणारे, किंवा दोघे? ह्या गोष्टीचा उलगडा करण्याचें हें स्थळ नाहीं. आम्हांस सांगावयाचें तें हें कीं, सत्याची मातब्बरी जितकी मानावी तितकी मानणारे थोडे सापडतात व त्याचा फार्स करून मातेरें करून टाकणारे फार दृष्टीस पडतात. आमचा बाजार म्हणजे कांहीं अंशी असत्याचा बाजार. जी किंमत योग्य असेल तीच सांगून तीच घेणारे शेकडा दहा निघतील किंवा नाहींत, ह्याविषयीं शंका आहे. खरें सांगू किंवा खोटें सांगू, असें विचारूनसुद्धां खोटें सांगणारे निघतात. आणा शपथा वाहूनही खोटें बोलणारे कांहीं आढळतात. कोणत्याही कारणास्तव अथवा कोणत्याही प्रसंगीं थाप मारणें वाईट आहे; परंतू नफानुकसानीची बाब नसतांही

थापा मारणारे, व हातावर तुरी दिल्याबद्दल फुशारकी मारणारे लोक सापडावे, हें आश्चर्य आहे. हा सत्यापलाप होतो, हें थोड्यांच्या लक्षांत येतें. औषधें, पुस्तकें, घड्याळें वगैरे गोष्टींचा खप व्हावा, ह्या हेतूनें वर्तमानपत्रांत जाहिराती देण्यांत येतात. ह्यांपैकीं बऱ्याच जाहिरातींत भपका फार असतो; सत्यांश थोडा असतो. स्वस्त व रामबाण औषध ! चार दिवसांत हटकून गूण! अनेक रोगांवर उपयोगी पडणारें औषध ! घेतल्याबरोबर गूण !! फारच उपयुक्त पुस्तक! संग्रहीं ठेवण्यासारखें पुस्तक! प्रती संपत आल्या ! संधी घालवूं नका !–वगैरे अर्थाच्या जाहिराती वाचून अनेक लोक फसतात. असल्या जाहिरातींची किंमत हल्लीं कळून येऊं लागली आहे. आपण जें म्हणतों त्याचें मंडन करण्याकरतां, किंवा दुसरे जें म्हणतात त्याचें खंडन करण्याकरतां, किंवा लोकांचें मन वेधून टाकण्याकरितां कांहीं ग्रंथकार व वर्तमानपत्रकार खऱ्याचें खोटें व खोट्याचें खरें करून लिहितात, असें आपण वारंवार पाहतों. त्याचप्रमाणें बरेच व्यापारी फायद्याकरतां खऱ्याचें खोटें व खोट्याचें खरें करतात, हेंही आपण पाहतों. स्वार्थ साधण्यासाठीं लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकणारे बरेच लोक दृष्टीस पडतात. असलें आचरण दोषास्पद आहे हें निर्विवाद आहे. ह्या लोकांस कांहीं हेतू साधावयाचा असतो, म्हणून ते खोटें कर्म करतात, असें दिसतें. परिणामीं सूख आहे, तर वाटेल त्या उपायांची योजना करण्यास कोणती हरकत आहे, असें कांहीं लोकांचें म्हणणें असतें. हें तत्त्व चुकीचें आहे इतकेंच नाहीं, तर तें फार भयंकर आहे. खोट्याचें खरें व खऱ्याचें खोटें करण्यांत व लोकांच्या डोळ्यांत धूळ टाक-

ण्यांत लोकांचा कांहीं तरी हेतू असतो; परंतू कांहीं एक फायदा नसूनही जे असत्य कथन अथवा असत्याचरण करतात त्यांची कृती अतर्क्य आहे. कित्येक म्हणतील कीं, कितीही पदार्थ गोड असला, तरी तिखटमिठाचा पदार्थ तोंडीं लावावयास असल्याशिवाय त्याचा वीट येतो; तेव्हां गोडाबरोबर आंबट, तुरट, खारट कांहीं असलें पाहिजे. त्याप्रमाणें सत्यासत्याच्या मिश्रणानें एकाद्या विषयाविषयीं एक प्रकारची चमत्कारीक गोडी असते. सत्याची गोडी लागावी, म्हणून त्यांत असत्याचें मिश्रण करावयाचें, हा प्रकार कांहीं लोकांस संमत असेल; परंतू तो चांगला नाहीं. सत्यासत्याचें मिश्रण झालें असतां शहाणे लोकांस त्यांची निवड करतां येते; परंतू अज्ञान लोकांस तसें करतां येत नाहीं; ह्यामुळें सत्याचें मातेरें होतें. आमच्या जुन्या ग्रंथांची मातब्बरी कमी होण्यास जीं कांहीं कारणें आहेत, त्यांपैकीं सत्यासत्याचें मिश्रण हें एक होय. सत्याला उपमाच द्यावयाची आहे, तर साखरेच्या गोड पदार्थाची उपमा देण्यापेक्षां आम्र फळाची उपमा देणें योग्य. आंबा हा अवीट पदार्थ आहे, त्याप्रमाणें सत्याची गोष्ट आहे. ज्याची रूची बिघडली आहे किंवा ज्यास रूचीच नाहीं, त्यास चव आणण्याकरितां अनेक पदार्थ सेवन करावे लागतात. ज्यास सत्याची रूची लागली आहे त्यास त्याचा वीट कधींही येत नाहीं, इतकेंच नाहीं, तर उलट असत्याचें मिश्रण झालें असतां त्यास तिटकारा वाटतो.

कित्येक म्हणतील कीं, जगांत ज्या उलाढाली चालल्या आहेत त्यांच्या मुळाशीं पाहूं गेलें असतां आशा व इच्छा ह्या दृष्टीस पडतात. आशा व इच्छा नसल्या, म्हणजे मनु-

ण्यास सर्व व्यवहार शून्य वाटतील. आपल्या आशा व इच्छा ज्याप्रमाणें असतात त्याप्रमाणें सर्व गोष्टी घडून येत नाहींत; त्यांत सत्यांश नसतो हेंही खरें आहे; परंतू आशा दाखवूं नये कीं काय? उत्तेजन देऊं नये कीं काय? ही शंका दिसण्याला योग्य दिसते, परंतू हींत विशेष अर्थ नाहीं. आशा दाखवूं नये किंवा उत्तेजन देऊं नये, असें कोणाचें म्हणणें नाहीं. आशा करीत असावें व उत्तेजन देत असावें; परंतू भलतीच आशा करणें किंवा दाखविणें किंवा भलत्याच गोष्टींविषयीं उत्तेजन देणें, हें आपणास अथवा दुसऱ्यास फसविणें होय; व समजून उमजून असें करणें हा मोठा दोष आहे. दुसऱ्याशीं सत्यानें वागणें जरूर आहे, इतकेंच नाहीं, तर प्रत्येकानें आपणा स्वतःशीं सत्यानें वागलें पाहिजे. आपलें स्तोम माजविण्यासाठीं आपल्या कृतीचे फाजील गौरव करून लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकणारे कांहीं गृहस्थ सापडतात. त्याचप्रमाणें लोकांनीं आपणास नम्र म्हणावें, म्हणून आपणाकडेस नसता कमीपणा घेणारे कांहीं दृष्टीस पडतात. पहिला प्रकार तर मुर्खपणाचा व दोषास्पद आहे; परंतू दुसरा प्रकारही बरोबर नाहीं. आपण होऊन आपला स्तुतिपाठ गाणें वाईट आहे, परंतू दुसऱ्यानें खरी हकीकत विचारली असतां खरा प्रकार सांगणें जरूर आहे. दुसऱ्यांशीं असत्य व्यवहार करणें दोष आहे, असें मानणारे कांहीं सापडावे, परंतू स्वतःशीं असत्य व्यवहार करणें दोष आहे, असें मानणारे थोडे सापडावे, ही आश्चर्याची गोष्ट आहे. स्वतःशीं सत्यानें वागणें, ही महत्वाची गोष्ट असूनही आम्ही तें विसरतों ह्यास काय म्हणावें, हें समजत नाहीं. स्वतःशीं सत्यानें वागा, म्हणजे तुम्ही इतरांशीं

असत्यानें कधींही वागणार नाहीं—असें महाकवी शेक्सपीयर ह्यानें म्हटलें आहे, तें खरें आहे. लोकांस गोड वाटावें, म्हणून होस हा देऊन असत्य बोलणारे कांहीं सापडतात. तोंडापुरतें गोड बोलून वेळ मारून नेणारेही कांहीं दृष्टीस पडतात. त्याचप्रमाणें बढाई मिरविण्यासाठीं असत्य कथन करून सत्याचें मातेरें करणारे कांहीं आढळतात. स्वार्थ साधण्यासाठीं अथवा दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न होऊन त्याचें नुकसान करण्यासाठीं एकाचे दोन करून सांगणारे कांहीं सापडतात. चमत्कार हा कीं, अशा प्रकारें सत्याचा अपलाप होत असतां ती गोष्ट पुष्कळांचे गांवींही नसते. असा प्रकार अनेक वेळां होत जाऊन लोकांस एका प्रकारची सवय लागते, व असत्य कथनाविषयीं त्यास विधिनिषेध वाटेनासा होतो. एका ग्रंथकारानें केवळ स्वार्थासाठीं आपल्या ग्रंथात सरकारची फाजील स्तुती व लोकांची विनाकारण नालस्ती केली, परंतू दुसऱ्या प्रसंगीं त्यानें लोकांची स्तुती केली; तेव्हां तुम्ही असें कसें केलें, म्हणून कोणी त्यास विचारल्यावर तो म्हणाला, "आम्हा ग्रंथकारांचे खावयाचे दात एक असतात व दाखवावयाचे दुसरे असतात!!" अशाप्रकारच्या लबाड ग्रंथकारांस काय म्हणावें, हें समजत नाहीं.

सांप्रतचा काळ अतिशयोक्तीचा अथवा अद्भुत चमत्कारांचा नाहीं; सत्यान्वेषणाचा, सत्यपरीक्षणाचा व खडखडीत बोलण्याचा आहे. लोकांच्या खोट्या समजुतींवर पांघरूण घालण्याचा किंवा आपलें वजन कमी होईल, ह्या भीतीनें कानाडोळा करण्याचा हा काळ नाहीं. 'सत्यमेव जयते' हें खरें आहे. आज नाहीं, तरी उद्यां सत्याचा जय होणार आहे. तेव्हां वेळ मारून नेण्याकडे किंवा क्षणीक लाभाकडे

लक्ष देणें मुर्खपणा आहे. आज लपवून ठेवलेली गोष्ट उद्यां उघडकीस येईल; तेव्हां सरळ मार्ग सोडून वाकडा मार्ग स्वीकारणें गर्हणीय आहे. सत्याचा मार्ग शाश्वतचा व फायद्याचा आहे, तेव्हां त्याचेंच अन्वेषण केलें पाहिजे. सत्य शोधून काढणें पुष्कळ वेळां सोपें काम नसतें. तें शोधून काढण्यासाठीं त्रास पडतो, परंतू तो सोसला पाहिजे. ह्या कामास दम धरावा लागतो; परंतू तो धरला पाहिजे. सत्यान्वेषण करण्यास सत्यप्रीती पाहिजे. सत्याची भक्ती असेल, तर त्रासाचें कांहींच वाटणार नाहीं. अनेक जीं दैवतें आहेत त्यांत सत्यदैवत हें प्रधान दैवत आहे. तेव्हां ह्याची अगोदर उपासना केली पाहिजे; ह्याविषयीं अगोदर भक्ती असली पाहिजे. ही भक्ती लहानपणापासून असणें इष्ट व आवश्यक आहे. ही गोष्ट बापानें लक्षांत ठेवावी; व 'सत्यं चर, सत्यदेवो भव' ह्या महामंत्राचा उपदेश करून मुलाकडून सत्याचें व्रत पाळवावें, व त्यास 'सत्यव्रत' हा किताब मिळाला, म्हणजे आपणास धन्य मानावें. स्वर्ग कोठें लांब आहे असें नाहीं. तो येथेंच आहे. परमेश्वरावर भरंवसा ठेवून त्याचें चिंतन करणें, लोकांवर उपकार करणें व सत्यावर प्रीती करणें व त्याप्रमाणें आचरण करणें, हाच मृत्युलोकीं स्वर्ग आहे. खरा स्वर्ग तो हाच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सत्याविषयीं वर जें विवेचन केलें, त्यावरून सत्यावर किती दिशांनीं टाकी चालू आहे, व ह्या टाकीमुळें सत्याचा कसा भंग होत आहे हें समजेल. मोठा ज्वर आला असतां आम्ही जागे होतों व उपाय करण्यास लागतों, त्या वेळेस पैशाची बिलकूल पर्वा करीत नाहीं; परंतू बारिक ज्वराकडे तितकें लक्ष देत नाहीं. त्याविषयीं फिकीर बाळगून वेळींच

औषधोपचार करणारे थोडे सापडतात. ज्वर जीर्ण होऊन विकोपास जातो, तेव्हां आम्ही शुद्धीवर येतों. बाहेरून मोठें अरिष्ट येईल, ह्या भीतीनें तजवीज करणारे कांहीं दृष्टीस पडतात; परंतू घरांतील स्थितीविषयीं ते तितकी काळजी बाळगीत नाहींत. मोठया क्रांतीचा समय आला, म्हणजे मग दीर्घ प्रयत्नास लागावें व ज्या लहानसहान कारणांनीं क्रांतीचा समय येतो त्यांकडे दुर्लक्ष करावें, हा प्रमाद आहे. त्याप्रमाणें ढळढळीत मोठी लबाडी दृष्टीस पडली, म्हणजे आपण जागे व्हावें, व ज्या बारीकसारीक लबाडयांमुळें मोठी लबाडी करावीशी वाटते तिजकडे फारसें लक्ष देऊं नये, हाही प्रमाद आहे. मोठा रोग होऊन अथवा क्रांती होऊन नाश होऊं नये, अशी जर आपली इच्छा आहे, तर प्रथमपासून सावधगिरी ठेविली पाहिजे. त्याप्रमाणें सत्यभंग करून मुलांनीं आपली हानी करून घेऊं नये, व सत्याविषयींची भक्ती ठेवून त्यांनीं आपलें कल्याण करून घ्यावें, अशी जर बापाची इच्छा आहे, तर त्यानें प्रथमपासून जपलें पाहिजे; परंतू अशा प्रकारें प्रथमपासून जपणारे किती दृष्टीस पडतात ? फार थोडे. लबाडी करण्याचें शिक्षण कोण देतो, असें कोणीं विचारलें, तर हें शिक्षण आईबाप देतात, असें म्हणणें भाग पडतें. हें म्हणणें कित्येकांस चमत्कारीक वाटेल; परंतू वस्तुस्थिती अशी आहे. सत्याला जी टाकी लागते - ती लहानपणापासून लागते. आईबाप लबाडीस प्रत्यक्ष अथवा बुद्धिपुरःसर उत्तेजन देतात, असें नाहीं. परंतू त्यांच्या कृतीचा परिणाम असा होतो कीं, टाकी लागून लागून सत्याचा संकोच होतो. लहानपणीं मुलें किरकीर करतात, हें पुष्कळांस माहीत असेल. तीं किरकीर करतात,

ती कांहीं कारणांवरून करतात. भूक लागते म्हणून, किंवा थंडी वाजते म्हणून, किंवा झोप येते म्हणून, किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्या तरी कारणावरून तीं किरकीर करतात. कांहीं वेळां कारण समजतें, कांहीं वेळां समजत नाहीं, व कांहीं वेळां समजून कानाडोळा होतो. मुलें फारच किरकीर करूं लागलीं, म्हणजे त्यांस दाबून दडपून उगी करण्याविषयीं आयांचा यत्न चालतो. येथवर सर्व प्रकार ठीक असतो. परंतू इतकें करून तीं उगी राहिलीं नाहींत, म्हणजे बागुलबोवाचें अथवा वाघोबाचें भय दाखवून त्यांस उगी करण्याचा त्यांचा यत्न सुरू होतो. मुलें दूध पिईतनाशीं झालीं, किंवा भात जेवीतनाशीं झालीं, म्हणजे मंगू आली, येग काऊ, येग हंमा, असें बोलून त्यांची कशी तरी समजूत त्या करीत असतात. किरकीर करण्याचीं अथवा दूध न पिण्याचीं किंवा भात न खाण्याचीं वास्तवीक कारणें कोणतीं, ह्यांचा सूक्ष्म रीतीनें विचार न करतां कोणत्या तरी रितीनें त्यांस भेडाविण्याचा अथवा त्यांची समजूत घालण्याचा त्यांचा क्रम असतो. वस्तुतः पाहतां बागुलबोवा, वाघोबा, काऊ, मंगू व हंमा ह्यांपैकीं एकही प्राणी जवळ नसतो, परंतू ह्या प्राण्यांची बुजकावणी दाखवून मुलांचें लक्ष दुसरीकडे लावून आपला हेतू सिद्धीस नेण्याच्या खटपटींत त्या असतात. हें करणें एका प्रकारें मुलांस फसविणें आहे, हें त्यांस कळत नाहीं. मुलांस निजविण्याची, अथवा दूध पाजण्याची, किंवा भात खाऊं घालण्याची पाळी जेव्हां वडील बहिणीवर अथवा भावावर येते, तेव्हां ती अथवा तो आईचें अनुकरण करून वाघोबा, बागुलबोवा वगैरे मंडळीस पाचारण करून सोपविलेलें काम बजावितो. आपण

फसवीत आहों, असें ज्याप्रमाणें आईस वाटत नाहीं, त्याप्रमाणें मुलाच्या बहिणीस अथवा भावासही वाटत नाहीं. असल्या उपायांची योजना करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें त्यांस वाटणें साहजीक आहे. अशा रितीनें सवय होत होत निरुपद्रवी उपायांची योजना करण्याविषयीं त्यांच्या मनाची प्रवृत्ती होते, व त्या उपायांचें त्यांस कांहींच वाटत नाहीं. सत्यावर हा प्रथमचा घाव होय. हा अल्प आहे, परंतू अशा रितीनें त्याचा संकोच होतो, ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. निरुपद्रवी उपायांची योजना करून इष्ट हेतू सिद्धीस नेण्यास हरकत नाहीं, हें तत्त्व एकदां घेऊन चाललें, म्हणजे थट्टेनें असत्य कथन करण्यास काय हरकत आहे, असें म्हणावें लागेल.

मुलास खाऊ देण्याची लालूच अनेक वेळां दाखविण्यांत येते; त्यानें मागितलेल्या जिनसा देण्याविषयीं अनेक वेळां वचनें देण्यांत येतात; परंतू ह्यांपैकीं किती वचनें पाळण्यांत येतात? एकचतुर्थांश तरी पाळण्यांत येतात का? मुलांनीं जास्त त्रास देऊं नये, म्हणून वचनें देण्यांत आपण सढळ असतों, परंतू तीं पाळण्याच्या बाबतींत खबरदारी घेत नाहीं. मुलांस हें एक प्रकारचें फसविणें होय. तुम्ही देतों म्हणतां, परंतू देत मात्र नाहीं, असे उद्गार मुलांच्या तोंडून आम्हीं अनेक वेळां ऐकिले आहेत.

खेळ खेळण्याची, इकडे तिकडे बागडण्याची किंवा कांहीं खोडी करून नासधूस करण्याची मुलांस हौस असते. ह्याबद्दल आईबाप त्यांस शिक्षा करतात. अभ्यास करावयाचे सोडून देऊन खेळावयास कां गेलास, असें विचारलें असतां, खरी गोष्ट न सांगतां कांहीं तरी खोटें

सांगून मुलें मार चुकवितात. नासधूस कोणी केली, असें विचारलें असतां तीं कानावर हात ठेवून शिक्षा चुकवितात. कारण, अनुभवावरून त्यांस कळून आलें असतें कीं, खरें कारण सांगितलें असतां शिक्षा होते, खोटें सांगितलें असतां मार टळतो. खरें बोलण्याबद्दल शिक्षा करणें मुर्खपणा आहे. मुलें फार करून शिक्षेच्या भयानें खोटें बोलतात, ही गोष्ट चांगली लक्षांत ठेविली पाहिजे. खरें बोललें असतां आपण शिक्षा करीत नाहीं, खोटें बोललें असतां मात्र आपण शिक्षा करतों, कितीही नुकसान झालें, तरी आपणास खरें पाहिजे व खऱ्यास आपण उत्तेजन देतों, असें मुलांच्या प्रत्ययास आणून दिलें पाहिजे. कामांत असतां अथवा खेळत असतां कोणी अपरिचीत गृहस्थ आला, तर निजले आहेत, घरांत नाहींत, असा निरोप मुलाबरोबर पाठवून आलेल्या गृहस्थास वाटेस लावणारे कांहीं लोक दृष्टीस पडतात. घरांत असून घरांत नाहीं असें म्हणणें, निजले नसून निजले आहेत असें म्हणणें, हें असत्यकथन आहे, हें ते समजत नाहींत असें वाटतें. बरें, हे लोक स्वतः लबाडी बोलतात—व मुलास बोलावयास सांगतात ! ! बाप घरीं आहे, निजलेला नाहीं, हें मुलास माहीत असतें; परंतू बापाचा घाणेरडा हुकूम पाळणें भाग पडून तो लबाडी बोलण्यास प्रवृत्त होतो.

वर जे प्रकार सांगितले तसेच दुसरे अनेक प्रकार आहेत, त्यांवरून समजून येईल कीं,सत्याची मातब्बरी मुलांस दिसून येत नाहीं, तीस आईबापांचें वर्तन कांहीं अंशीं कारणीभूत असतें. सहवासानें किंवा दुसऱ्या कारणांनीं मुलांचे लांब कान पुढें होतात; परंतू लबाडीचें शिक्षण पुष्कळ वेळीं घरींच प्रथमतः मिळतें.

ह्यासाठीं आईबापांनीं प्रथमच फार जपलें पाहिजे. सत्यप्रीती हा गुण मुलांच्या अंगीं येण्यासाठीं जरी थोडें नुकसान झालें व त्रास सोसावा लागला, तरी तो सोसण्यास त्यांनीं तयार असलें पाहिजे; कारण, ह्या दुनियेंत सत्यासारखी दुसरी अमोल चीज नाहीं. सत्याच्या संबधानें आम्हीं जो पाल्हाळ केला आहे, त्याचें कारण हेंच कीं, सत्य हा सदाचाराचा पाया आहे. हा पाया जर मुस्तकीम आहे, तर इतर गुणांची मातब्बरी आहे. ‘सत्य हा राज्याचा पाया आहे, सर्व जग सत्यावर अवलंबून आहे; देवता व ऋषी सत्यास मान देतात, जो मनुष्य सत्य बोलतो त्यास उत्तम व अविनाशी लोक प्राप्त होतो, ह्या जगांत सद्गुणांतील मुख्य तत्त्व सत्य होय, व सद्गुण हा सत्यावर अवलंबून आहे, सत्यापेक्षा ह्या जगांत दुसरें कांहीं एक श्रेष्ठ नाहीं,’ अशी सत्याविषयीं श्रीवाल्मिकी ऋषींनीं रामायणांत थोरवी गाइली आहे ती यथार्थ आहे. तात्पर्य, सत्याचें गौरव जितकें करावें तितकें थोडेंच आहे. परंतू जगांतील व्यवहार पहावा तो लबाडीचा फार. ही गोष्ट कित्येकांस चमत्कारीक वाटेल, म्हणून कसकसा व्यवहार चालला आहे, ह्याचें स्पष्टीकरण करणें जरूर वाटलें. जी स्थिती दृष्टीस पडते ती समाधानकारक नाहीं. ती स्थिती जाऊन शुद्ध व्यवहार सुरू होणें अवश्य आहे; परंतू असें करण्यास मुळापासून जपलें पाहिजे; व असें जपणें बापाचें मुख्य कर्तव्य होय.

**वचनासक्ती**—सत्यप्रीतीशीं ज्या गुणाचा विशेष संबंध आहे, असा गूण वचनासक्ती हा होय. दोन्ही गुणांचें बरेंच तादात्म्य आहे. सत्यप्रीती नाहीं, तर वचनासक्ती असावयाची नाहीं. सूक्ष्म रितीनें विचार करतां दोन्हीही गोष्टी

एकच आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां सत्याची जी मातब्बरी तीच वचनाची मातब्बरी आहे. रामायणभारतांत वचन पाळल्याविषयींच्या अनेक कथा आहेत. आपली बायको कैकेयी हिला जें वचन दिलें तें पूर्ण करण्याकरतां दशरथराजानें, आपला प्रिय पुत्र राम ह्यास वनवासास पाठविलें व तो पुत्रशोकानें मरणही पावला. बापानें जें वचन दिलें तें आपणच दिलें, असें समजून रामानें १४ वर्षें वनवास भोगला. हरिश्चंद्र राजानें आपली प्रियपत्नी तारामती व पुत्र रोहिदास ह्यांसह अनेक विपत्ती भोगिल्या, परंतू वचनभंग होऊं दिला नाहीं. पुण्यश्लोक नलराजानें आपली पत्नी दमयंती हिजसह हाल अपेष्टा भोगिली, परंतू जो करार केला तो मोडला नाहीं. स्त्रियांवर शस्त्र उचलावयाचें नाहीं, हें व्रत पाळण्यासाठीं भिष्मांनीं आपला नाश होऊं दिला. धर्मराजानें आपलें वचन पाळण्यासाठीं आपल्या बंधूंसह १२ वर्षें वनवास भोगिला. वचनभंग होऊं नये, ह्या हेतूनें शिबीराजानें आपलें मांस अर्पण केलें. श्रियाळ राजानें वचन राखण्यासाठीं आपला पुत्रसुद्धां बळी दिला, परंतू वचनभंग होऊं दिला नाहीं. अशा प्रकारें रामायणभारतादी ग्रंथांत अनेक कथा आहेत. ह्या सर्व कथांचें सार पाहूं गेलें असतां हें आहे कीं, आपणावर कसलाही प्रसंग आला असतां थोर पुरूष वचनभंग होऊं देत नाहींत. जें वचन आपण दिलें तें पाळण्यासाठीं आपणास दारा, पुत्र व बंधू ह्यांचा वियोग होत असला तरी होऊं देतात, आपले हाल झाले तरी होऊं देतात, दुःख भोगावें लागलें तरी ते भोगतात, परंतू दिलेलें वचन परत घेत नाहींत. धमकीमुळें, भयामुळें, गैरस-

मजामुळें, असावधपणामुळें, अज्ञानामुळें किंवा नाइलाजामुळें वचन देणें मला भाग पडलें, तेव्हां अशा स्थितींत दिलेलें वचन मी कसें पाळूं, असें रडगाणें गाऊन आपली दुर्बलता जगास व्यक्त करीत नाहींत. तें सुखावर पाणी सोडतात, प्रसंग पडल्यास देहावर पाणी सोडतात, परंतू वचनावर पाणी सोडीत नाहींत. थोर पुरूष वचनाची जितकी खातब्बरी मानतात तितकी सुखाची मानीत नाहींत. ' न च प्रसादः पुरुषेषु मोघः ' म्हणजे थोर पुरुषांचा प्रसाद कधींही वायफळ जावयाचा नाहीं. त्यांचें वचन नेहमीं अमोघ असावयाचें. तोंडांतून एकदां शब्द गेला कीं गेला; त्याप्रमाणें चालावयाचेंच. अशा प्रकारें ते करारी पुरूष असतात.

सत्य भाषण करावें, असें म्हणणारे ज्याप्रमाणें पुष्कळ आहेत, त्याप्रमाणें वचन पाळावें, असेंही म्हणणारे पुष्कळ आहेत. वचने किं दरिद्रता, ह्या न्यायानें वचनें देण्यांत रेलचेलपणा फार असतो, परंतू वचनाप्रमाणें म्हणजे बोलल्याप्रमाणें चालणारे थोडे असतात. वस्तुस्थिती पाहतां रावापासून रंकांपर्यंत सर्वांची स्थिती प्रायः सारखी आहे. वचन पाळणारे थोडे, थापा मारणारे पुष्कळ. थोडक्या लाभासाठीं, अथवा सुखासाठीं, किंवा थोडा त्रास अथवा नुकसान होऊं नये म्हणून, लाख रुपये किंमतीच्या वचनावर पाणी सोडणारे जर कांहीं लोक दृष्टीस पडतात, तर मोठ्या लाभासाठीं अथवा सुखासाठीं वचनभंग करणारे पुष्कळ आढळावे, ह्यांत नवल नाहीं. ही जी स्थिती दृष्टीस पडते तीस अशिक्षित कारण असून सुशिक्षित कारण नाहींत, किंवा गरीब कारण असून श्रीमंत कारण नाहींत,

किंवा जुन्या समजुतीचे लोक कारण असून नव्या समजुतीचे लोक कारण नाहींत,—तात्पर्य, अमूक एक प्रकारचे लोक ह्या स्थितीस कारण आहेत व अमूक लोक कारण नाहींत, असें नाहीं. वर ज्या प्रकारचे लोक निर्दिष्ट केले त्यांपैकीं बहुतेक कमजास्त दोषी आहेत, असें म्हणणें भाग पडतें.

वरील स्थितीचें कारण पाहूं गेलें असतां, वचनाची मातब्बरी जितकी मानावी तितकी आम्ही मानीत नाहीं. नुकसानीची किंवा त्रासाची, अथवा लाभाची किंवा सुखाची बाब येऊन ठेपली, म्हणजे आम्ही सदसद्विचारशक्तीची व तिजबरोबर सर्व उत्तम गुणांची रजा घेऊन वचनावर पाणी सोडतों. आम्हीच जर वचनाचें महत्व समजत नाहीं, तर मुलें समजत नाहींत, ह्यांत आश्चर्य नाहीं. वचन पाळ-ण्याची खबरदारी जर आम्ही घेत नाहीं, तर ती मुलांनीं घ्यावी, असें म्हणण्याचा आम्हास अधिकार पोहोचत नाहीं. ज्याप्रमाणें आम्ही बोलतों त्याप्रमाणें आम्ही प्रथम आच-रण करून दाखविलें पाहिजे, नंतर त्यांवर सक्ती केली पाहिजे. जो व्यवहार तीं पाहतात किंवा ऐकतात, त्याप्रमाणें प्रायः तीं आचरण करतात. "समजूत करण्यासाठीं किंवा थट्टेंत जी गोष्ट करण्याचें कबूल केलें, ती केली नाहीं म्हणून काय झालें? ज्यापासून नफा नुकसान नाहीं, ती गोष्ट केली काय किंवा न केली काय, त्याची मातब्बरी सारखीच. जर आम्ही कोणाचें नुकसान करीत नाहीं, तर थाप मारली म्हणून काय झालें! दुसरे जर वचन मोडतात, तर आम्हीच तें कां पाळावें!" हे व अशाच सारखे दुसरे विचार पोरकट आहेत. वचनाच्या संबंधानें

नफानुकसानीचा प्रश्न किंवा थट्टेची अथवा विनोदाची बाब किंवा पोकळ सबबीची गोष्ट पुढें आणणें मुर्खपणा आहे. वचनाच्या बाबतींत थाप नको, थट्टा नको किंवा लंपडाव नको. ज्यांस वचन पाळावयाचें नाहीं त्यांसाठीं, किंवा ज्यांनीं आपल्या आयुष्याची थट्टा मांडली आहे त्यांसाठीं वरील प्रकार आहेत; त्यांस वरील म्हणणें शोभतें. वरील गोष्टी दिसण्याला क्षुल्लक दिसतात; परंतू हळू हळू त्यांनीं मन घट्ट होत जातें. तोंडांतून जो जाब गेला तेंच वचन. वचन, वचन, म्हणजे कांहीं निराळी चीज नाहीं. त्यासाठीं विधी नको, संस्कार नको, किंवा समारंभ नको. चारचौघांच्या देखत जें वचन देण्यांत येतें तेवढेंच वचन, व एकांतीं बोललें तें वचन नाहीं, असें नाहीं. ज्याप्रमाणें सत्याच्या संबंधानें तडजोड नाहीं, त्याप्रमाणें वचनाच्या संबंधानें तडजोड नाहीं. करार करणें, कबूल करणें, विश्वास दाखविणें, आश्वासन देणें व सही करणें, हे निराळे शब्द आहेत, परंतू खरोखर पाहतां हे वचनाचेच प्रकार होत. हीं सर्व वचनें होत. हीं वचनें विधिपूर्वक दिलेलीं असोत किंवा तशींच दिलेलीं असोत; एकांतीं दिलेलीं असोत किंवा चारचौघांत दिलेलीं असोत; डोळे मिटून दिलेलीं असोत किंवा डोळे उघडून दिलेलीं असोत; तोंडी असोत किंवा लेखी असोत; नोंदलेलीं असोत किंवा नोंदलेलीं नसोत; सदाचार संपन्न पुरुषांच्या दृष्टीनें त्यांची योग्यता सारखीच आहे. कोणत्या स्थितींत अथवा कशा प्रकारें वचन देण्यांत आलें, ही महत्वाची गोष्ट नाहीं. तोंडांतून जाब गेला किंवा नाहीं, हातानें लेख लिहून दिला किंवा नाहीं, किंवा स्वतःच्या कृतीनें विश्वास उत्पन्न केला किंवा नाहीं, ही गोष्ट महत्वाची

आहे. जर जाब गेला असेल, किंवा लेख गुंतला असेल, किंवा विश्वास उत्पन्न केला असेल, तर त्याबद्दलची जबाबदारी आपणावर आहे. अशा प्रकारें वचन देण्यापूर्वी एक वेळ सोडून शंभरवेळां विचार करणें योग्य. वचनाप्रमाणें चालतां येईल किंवा नाहीं, ह्याविषयीं संशय वाटल्यास तें न देणें योग्य; परंतु तें एकदां दिलें, म्हणजे त्याप्रमाणें वागणें उत्तम आहे, इतकेंच नाहीं, तर अवश्य आहे; त्याप्रमाणें न चालणें गर्हणीय आहे. आकस्मिक व अनिवार्य अडचणींमुळें किंवा विस्मरणामुळें वचन पाळण्यास केव्हां केव्हां व्यत्यय येतो, हें खरें आहे; परंतु "बेटर लेट दॅन नेव्हर" म्हणजे कांहींच न करण्यापेक्षां उशिरां करणें बरें, ह्या न्यायानें अडचण दूर झाल्याबरोबर किंवा स्मरण झाल्यावरोबर वचन पूर्ण करण्यास उद्युक्त झालें पाहिजे. जी अडचण उत्पन्न होण्याचा संभव आहे असें माहीत आहे, ती आकस्मिक नहीं, व जी यत्नानें टाळतां येण्यासारखी आहे ती अनिवार्य नाहीं, हें सर्वांस माहीत आहेच. जी अडचण येईल, अशाविषयीं स्वप्नही नव्हतें, व जी दूर करण्याविषयीं यत्न करूनही दूर करतां यावयाची नाहीं, अशी अडचण उत्पन्न झाली असतां व योग्य खबरदारी घेऊनही विस्मरण पडलें असतां वरील न्याय लागू आहे; एरवीं नाहीं.

वचन पाळण्याच्या संबंधानें वर जीं उदाहरणें दिलीं त्यांवरून आमचे आर्य वचनाची मातब्बरी फार मानीत असावे, असें दिसतें. हें केवळ आमच्याच ग्रंथांवरून म्हणावयाचें, असें नाहीं; तर ह्याबद्दल परकीय लोकांचीही साक्ष आहे. 'सत्य बोलणें महत्पुण्य आहे असें हिंदू लोक सम-

नतात व त्यांच्यांत चोऱ्या क्वचित् दृष्टीस पडतात '—असें मिग्यास्थनीज ह्याचें म्हणणें आहे; ' लबाडीच्या गुन्ह्यांत हिंदू फार करून सापडलेले दृष्टीस पडत नाहींत '—असें एरियन म्हणतो; ' हिंदू लोकांचें वर्तन सरळ व प्रामाणिकपणाचें आहे व ते अन्यायानें पैसा हरण करीत नाहींत ' असें ह्यूएनसंग ह्याचें मत आहे; ' विश्वासुकपणा, प्रामाणिकपणा व जें वचन दिलें असेल तें पाळण्याविषयीं दक्षता, ह्या गुणांबद्दल हिंदू लोकांची इतकी प्रसिद्धी आहे कीं, परकी लोक चोहोकडून त्यांच्या देशांत येतात '—असें मुसलमान लोकांपैकीं इद्रिस ह्या गृहस्थानें आपले भूगोलग्रंथांत म्हटलें आहे. ' ब्राह्मण हे उत्तम व सचोटीनें व्यवहार करणारे आहेत, ते कांहीं झालें तरी खोटें भाषण करीत नाहींत '-असें प्रसिद्ध प्रवाशी मार्कोपोलो ह्याचें म्हणणें आहे; अबूल फाजल ह्यानें ऐनअकबारी ह्या ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, ' हिंदू लोक धार्मिक असून न्यायावर प्रीती करणारे आहेत; ते हुशार असून सत्यावर प्रीती करणारे आहेत; ते कृतज्ञ असून विश्वासूक आहेत. अशाप्रकारें सत्यप्रीती, वचनासक्ती, विश्वासुकपणा, सचोटी वगैरे गुणांबद्दल अनेक लोकांनीं हिंदू लोकांना सर्टिफिकिटें दिलीं आहेत. ज्या त्या लोकांस आपणांतील थोर पुरुषांचें गौरव करावेसें वाटतें, म्हणून वरील कथा दृष्टीस पडत असाव्या असें म्हणावें, तर मिग्यास्थनीज, एरियन, ह्यूएनसंग, इद्रिस, मार्कोपोलो, अबूल फाजल वगैरे निरनिराळ्या परकी लोकांची साक्ष दृष्टीस पडते. आमची उगीच स्तुती करण्याचें त्यांस कांहीं कारण नव्हतें. सदाचाराच्या संबंधानें आमची चांगली स्थिती फक्त रामायण

भारत काळीं होती, असें म्हणावें, तर वरील गृहस्थ ह्या काळानंतर निरनिराळे वेळीं होऊन गेले. तेव्हां स्थूल मानानें विचार करतां आमच्या लोकांत पूर्वीं सत्यप्रीती व वचनासक्ती बरीच असावी व त्यांचा व्यवहारही बराच चोख असावा, असें दिसतें. अशी स्थिती हल्लीं आहे काय? आमची नालस्ती करण्यांत कांहीं मिशनरी लोकांचा, जेम्स मिल प्रभृती कांहीं ग्रंथकारांचा व आणखी कांहीं परकीय लोकांचा हेतू असेल, तथापी, रामायणभारतांतील कथांवरून व मिग्यास्थनीज, ह्यूएनसंग वगैरे परकीय लोकांच्या साक्षीवरून सत्यप्रीती व वचनासक्ती ह्या गुणांच्या संबंधानें आमची पूर्वींची स्थिती जितकी समाधानकारक होती, तितकी हल्लीं नाहीं, असें मोठ्या दिलगिरीनें म्हणावें लागतें. हल्लीं जी स्थिती दृष्टीस पडते, तीस कांहीं अंशीं आमच्या स्वतःचें वर्तन कारण आहे, व कांहीं अंशीं दुसऱ्यांचें वर्तन कारण आहे. दुसऱ्यांच्या वर्तनाबद्दल आम्ही जबाबदार नाहीं, हें म्हणणें एक वेळ शोभेल, परंतू आमच्या स्वतःच्या कृतीबद्दल आम्ही जबाबदार नाहीं, असें कसें म्हणतां येईल? पोटच्या मुलांस अथवा दुसऱ्यांस जीं वचनें आम्ही देतों, त्यांपैकीं किती वचनें आम्हीं पाळलीं आहेत? ज्याप्रमाणें विश्वास अथवा आश्वासन दिलें त्याप्रमाणें किती वेळां आम्हीं आचरण केलें? वचन दिल्याप्रमाणें आमच्या हातून क्रिया न झाल्यामुळें किती वेळां आम्हास खरोखर पश्चात्ताप झाला आहे? व पश्चात्ताप होऊन कितीजणांनीं आपलें वर्तन सुधारलें आहे? असा आमचा कोणी जाब घेतल्यास आम्हांपैकीं बरेच लोक दोषी आहेत, असें निःसंशय म्हणावें लागेल. सूक्ष्म रितीनें विचार करतां आमचा व्यवहार समाधा-

नकारक नाहीं, असेंच म्हणावें लागतें. ' धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि, नातिचरामि, नातिचरामि, ' अशी विधियुक्त घनघोर त्रिवार प्रतिज्ञा करून त्याप्रमाणें आचरण करणारे किती दृष्टीस पडतात ? आमच्या बापानें लहानपणीं आमचें लग्न करून दिलें, तेव्हां लहानपणीं जें वचन देण्यांत आलें त्याबद्दल आम्ही जबाबदार नाहीं, असें कांहीं म्हणतील. हें म्हणणें दिसण्याला ठीक दिसतें. लहानपणीं मुलांचें लग्न करून देणें हें चांगलें नाहीं, असें आतां बऱ्याच समंजस लोकांस वाटूं लागलें आहे. परंतू मुलांच्या संबंधानें जीं आपलीं कर्तव्यें आहेत, त्यांपैकीं लग्न करून देणें हें एक आहे, असें समजून व लहानपणीं लग्न करून देणें हें दोषास्पद नाहीं, अशा समजुतीनें जर बापानें लग्न करून दिलें, तर त्याबद्दल बाप दोषी आहे किंवा नाहीं, ही शंका आहे. जरी तो दोषी असला, तरी त्याच्या दोषाबद्दल अबलांस शासन कां असावें ? त्यांचा दोष नसतां त्यांची अवहेलना करणें दोषास्पद नाहीं का ? स्त्रियांचा कधींच दोष नसतो, असें नाहीं. कांहीं स्त्रिया कृत्या अथवा द्वाष्ट असतात, हें खरें आहे; परंतू ह्या त्यांच्या दोषामुळें वरील वचनाचा भंग करणें मुर्खपणा आहे. स्त्रियांचा मोठा दोष म्हटला, म्हणजे पातिव्रत्यभंग होय. ह्याबद्दल क्षमा उपयोगाची नाहीं. त्यांस शासन असावयाचें, तें मुख्यत्वें ह्या दोषाबद्दल होय; त्यांचा धिक्कार करावयाचा, तो ह्या अपराधाकरतां. परंतू ज्यांनीं एकपत्नीव्रत कडकडीत रितीनें पाळलें आहे त्यांस असें करण्यास नीतिदृष्ट्या अधिकार पोहोचतो; दुसऱ्यांस पोहोचत नाहीं. ह्यावरून नवऱ्यानें आपलें वचन पाळलें नाहीं, म्हणून आपले

व्रताचा भंग करावयास स्त्रियांस हरकत नाहीं, असें ससज्जावयाचें नाहीं. त्यांनीं आपलें व्रत पाळलेंच पाहिजे; त्यांचें कर्तव्य त्यांनीं केलेंच पाहिजे. वाचाळपणा, वेडगळपणा, कजागपणा वगैरे त्यांच्यांमध्यें इतर अल्प दोष असतात; परंतू त्यांबद्दल सढळ नजर करणें योग्य, वचनभंग करणें अयोग्य. बापाच्या मालमत्तेबद्दल मात्र आम्हीं हक्क सांगावा, व आमच्या बऱ्याकरतां म्हणून जी गोष्ट त्यानें आपल्या समजुतीप्रमाणें केली, तिजबद्दल जबाबदारी घेण्यास मात्र आम्हीं पराङ्मुख व्हावें, हें सत्पुत्रांचें लक्षण नाहीं, इतकेंच नव्हे, तर हें करणें नीतिदृष्ट्या व व्यवहारदृष्ट्या दोषास्पद आहे.

रावापासून रंकापर्यंत वचन पाळण्याच्या बाबतींत सारखी ढिलाई आहे, हें इतिहास वाचला असतां कळून येणार आहे. तेव्हां राज्यप्रकरणाविषयीं येथें उल्लेख न करतां प्रत्यक्ष व्यवहाराविषयीं विचार करूं. प्रत्यक्ष व्यवहाराविषयीं स्थूळ विचार केला, तर पुष्कळ लोक वचनाची मातब्बरी समजत नाहींत, इतकेंच नाहीं, तर त्याची थट्टा करीत आहेत असें दिसतें. सोनार, शिंपी, सुतार, परीट वगैरे लोकांचा व्यवहार, म्हणजे थापांचा व्यवहार. बोलल्या वेळीं डागिने तयार करणारे, कपडे शिवून देणारे, सामान तयार करणारे, अथवा कपडे धुऊन देणारे, शेकडा दहा मिळण्याची मारामार पडते. नव्वद जण वायदे करून निव्वळ थापा मारतात. ‘ सरकार, गळा कापावयाचा राहिला आहे, असें सांगून चांभार लोक जोडा तयार करण्यास कांहीं दिवस लावतात. आमचे गाडीवाले म्हणजे पहिल्या प्रतीचे थापा मारणारे; बोललेल्या वेळीं गाडी घेऊन येणारे विरळा. पुढें

ऱ्हा, मी आपले मागोमाग आलोंच समजा, असें सांगून दोन दोन, चार चार घटकांनीं आले, म्हणजे भाग्य समजावयाचें. कित्येक वेळां मनुष्य पाठविल्याशिवाय इलाजच नसतो. बैल पाण्यावर गेले आहेत, घोडीं चंदी खात आहेत, अशा थापांवर ते गिऱ्हाइकांस फसवीत असतात. सोनार, शिंपी, धोबी, गाडीवाले वगैरे लोकांचीं मनें इतकीं घट्ट झालीं असतात कीं, थापा मारण्याचें व बोलून घेण्याचें त्यांच्या अंगवळणीं पडून गेलेलें असत. ' सेल्फ रिस्पेक्ट ' म्हणजे स्वतः-चा बोज ठेवणें ही गोष्ट त्यांच्या गावींही नसते. कराराप्रमाणें चालणें हें आपलें कर्तव्य आहे इतकेंच नाहीं, तर हा मोठा पुरुषार्थ आहे, असें समजणारे फारच क्वचित् दृष्टीस पडतात. ह्यामुळें त्यांचें नुकसान होतें व गिऱ्हाइकांस त्रास होतो. त्यांच्यांशीं व्यवहार ठेविल्याशिवाय चालत नाहीं, व व्यवहार ठेवण्याचें कारण पडलें असतां व्यवहार सुखानें वेळेवर होत नाहीं. सोनार, शिंपी वगैरे कांहीं लोक बोलल्याप्रमाणें तर चालत नाहींतच, परंतू दरवडा घालून गिऱ्हाइकांचा लचका तोडण्यांत अगदी कमी करीत नाहींत. " सोनार, शिंपी, कुळकर्णीअप्पा—ह्यांची संगत नको रे बापा " ही देशी म्हण पुष्कळ अंशीं खरी असून वरील कारणावरूनच पडली असावी.

थापा मारून वचनभंग करण्याबद्दल सोनार शिंपी वगैरे लोकमात्र दोषी आहेत असें नाहीं. उधार मालाचे पैसे, भाड्याचे पैसे, सावकाराचे पैसे, अथवा उसनवार घेतलेले पैसे देतांना वायदे अनेक वेळां होत असतात. दरएक खेपेस नवीन वायदा व नवीन करार, अशी कित्येकांची स्थिती दृष्टीस पडते. हा व्यवहार घाणेरडा आहे, असें सम-

जणारे थोडे; दुकानदार अथवा सावकार ह्यांस कसें तरी वाटेस लावून देणारेच फार. दुकानदार अथवा सावकार जेव्हां विराट स्वरूप धारण करतात, तेव्हां कांहींच्या देहांत उजेड पडतो. तोंपर्यंत कांहीं मंडळी स्वस्थ असते. शिव्या-गाळीचा अथवा फिर्यादीचा प्रसंग आला, म्हणजे कांहीं धडफडत जागे होतात व कांहीं हरिभक्त तर कशासही मोजीत नाहींत! वचनें वगैरे साफ गिळून स्वस्थ बसतात!

सत्याची थट्टा ज्यास पाहणें असेल त्यानें ती कोर्टांत पाहावी. त्याप्रमाणें वचनाची अथवा कराराची थट्टा कशी होत असते, हेंही ज्यास पाहणें असेल त्यानें तें कोर्टांत जाऊन पाहावें. दस्तऐवज लिहून नाकबूल जाणारे कांहीं दृष्टीस पडतात; रोखा लिहून दिला, तो सही साक्षीनिशीं पुरा झाला, परंतू ऐवज पोहोचला नाहीं, अशी कांहीं तकरार करतात; मला देणें कबूल आहे, परंतू सबंध ऐवज कबूल नाहीं, असें कांहींचें म्हणणें असतें; कांहीं म्हणतात, मीं दस्तऐवज लिहून दिला, रुपये देऊन टाकले, परंतू दस्तऐवज घ्यावयाचा राहिला; " हा दस्तऐवज मीं राजीखुषीनें व अक्कलहुशारीनें लिहून दिला सही " असें स्पष्ट लिहून देऊन कांहीं म्हणतात कीं, मला फसवून दस्तऐवज लिहून घेतला!! देणें मुदतीबाहेर गेलें आहे, सबब मला तें कबूल नाहीं, अशी कांहींची तकरार असते. ही कुळांची स्थिती झाली. उलट पक्षीं सावका-रलोकांचा व्यवहार पाहावा तोंही घाणेरडा असतो. रुपये दिले असून जमा न करणारे, बेचन देण्याचें कबूल करून न देणारे, सूट देईन म्हणून सांगून न देणारे, व जमा-खर्चांत घोटाळा करणारे, असें बरेच सावकार आढळतात.

तात्पर्य, उभयपक्षीं व्यवहार घाणेरडा असतो. सर्वच कुळें किंवा सावकार लबाड असतात असें नाहीं; तथापी लबाडांची संख्या फार; कराराप्रमाणें चालणारांची संख्या थोडी. करार केला असून तो केला नाहीं म्हणणें, व मुदतीची तकरार सांगणें वगैरे जो प्रकार दृष्टीस पडतो, तो अयोग्य आहे. मुदतीची तकरार सांगणें सज्जनाचा धर्म नाहीं. मुदतीचा कायदा लबाडांकरतां आहे; सज्जनांकरतां नाहीं.

कोर्टांतून अथवा कचेऱ्यांतून काम करणारे मुखत्यार, व वकिलांस कामें आणून देणारे अथवा कोर्टांसभोंवतीं घिरट्या घालणारे टौट उर्फ दलाल, ह्यांविषयीं तर बोलावयासच नको. ह्यांनीं आजपर्यंत थापा किती मारल्या व येणेंकरून वचनभंग किती वेळां केला, ह्याविषयीं अंदाज केला, तर एकंदर बेरीज फार भयंकर आहे, असें दिसून येईल. थापा न मारतां पैसे मिळविणारे मुखत्यार अथवा दलाल सापडले, तर शेकडा दोन ह्याप्रमाणें सापडतील किंवा नाहीं ह्याविषयीं संशय आहे. अशी स्थिती आहे, तर असल्या लोकांशीं व्यवहार ठेवावा किंवा कसें, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. ठग लोकांचा इतिहास पुष्कळांस माहीत आहे. ह्यांच्या तडाक्यांत जे गरीब लोक सापडले, त्यांपैकीं चांगला चट्टा लागल्याशिवाय निसटून गेलेले फारच थोडे लोक असावेत. त्याप्रमाणें दलालांच्या अथवा मुखत्यारांच्या तावडींत सापडून चट्टा लागल्याशिवाय निसटून गेलेले फारच थोडे असतील. मुखत्यारांची अथवा दलालांची गोष्ट आपण एकीकडे ठेवूं; परंतू ज्यांस शिक्षण मिळालें आहे, अशा वकिलांपैकीं कांहींनीं थापा माराव्या, पैसे उपटावे व पक्षकाराचें नुकसान करावें,–एका पक्षाकडून पैसे घेतले असतां

दुसऱ्याकडूनही आणखी घ्यावे,—काम करतों म्हणून सांगून हलगर्जीपणा दाखवावा,—जास्त टाऊक असेल, तर विशेष लक्ष द्यावें, कमी असेल, तर चालढकल करावी व कशी तरी वेळ मारून न्यावी, हा प्रकार प्रशस्त नाहीं. वकिलीच्या धंद्यांत दोन पैसे अधीक मिळतात व त्यांत स्वतंत्रताही कांहीं असते, परंतू सदसद्विवेकशक्तीस गुंडाळून ठेवण्याचे प्रसंग वारंवार येतात, असें कांहीं वकिलांचे तोंडून ऐकण्यांत येतें. जे पैशाचे विशेष लोभी आहेत त्यांस असले प्रसंग येत असतील; थापा न मारतां जेवढे पैसे मिळतील तेवढ्यावर निर्वाह करणाऱ्यांवरही वरील प्रसंग येत असतील, असें वाटत नाहीं. वचनभंग न करतां वकिलीचा धंदा करतांच येत नाहीं, हें म्हणणें पोरकट आहे. थापा मारून केव्हां केव्हां जास्त पैसा मिळवितां येतो, हें खरें आहे; परंतू अशा प्रकारें पैसा मिळविणें नको. सदाचारानें राहून थोडा पैसा मिळालेला पुरवला. थापा मारणाऱ्यांपेक्षां सरळ रितीनें वागणाऱ्यांची योग्यता शतपट अधीक आहे. त्याचप्रमाणें न्यायाधिशाच्या डोळ्यांत धूळ टाकून पैसे मिळविणारांपेक्षां न्यायास मदत करणाऱ्यांची योग्यता शतपट अधीक आहे, ही गोष्ट सुशिक्षित लोकांनीं समजूं नये, तर कोणीं समजावी ? डोळ्यांत धूळ टाकणाऱ्या वकिलांचें आम्हीं गौरव करावें, हा आमचा मुर्खपणा आहे. हीच स्थिती वैद्य व डाक्टर ह्यांपैकीं कांहींची दृष्टीस पडावी, हीही शोचनीय गोष्ट आहे.

असो. वर जो प्रकार सांगितला त्यावरून वचनाच्यासंबंधानें कशी थट्टा होते हें समजेल. ह्याबद्दल जबाबदार कोण, हें समजणें अगत्याचें आहे, असें समजून खुलासा कर-

णें जरूर वाटलें. हा विषय येथेंच सोडून देणें प्रशस्त नाहीं. वर ज्या प्रकारचे लोक सांगितले तेवढेच वचनभंगाबद्दल दोषी आहेत असें नाहीं. त्यांच्या मालिकेंत बसविण्यास पात्र असे आणखी कांहीं लोक आहेत. तेही कमी दोषी आहेत असें नाहीं. कांहीं वर्तमानपत्रकार एकादा विषय हातीं घेतात; स्थलसंकोचास्तव जास्त विवेचन करतां येत नाहीं, असें सांगून पुढें सवडीप्रमाणें ह्या विषयाकडे वळूं, असें आश्वासन देतात; आठवडे जातात, महिने जातात, वर्षेंही जातात; परंतू दिलेल्या आश्वासनाचा ठिकाण नसतो. ही ढिलाई आहे; व एक प्रकारची थाप आहे. काळ अनंत आहे, तेव्हां वचनाची मुदत संपली नाहीं, असें जर त्यांचें म्हणणें असेल, तर मग आमचें कांहीं म्हणणें नाहीं.

वर्तमानपत्रकारांच्या संबंधानें आणखी एक गोष्ट सांगणें अवश्य आहे. ज्या वेळेस नवीन वर्तमानपत्र काढण्यांत येतें त्यावेळेस पहिल्या अंकांत " आम्ही " ह्या सदराखालीं किंवा जाहिरातींत, जीं वचनें देण्यांत येतात त्यांपैकीं किती अमलांत येतात ? ' राज्यव्यवहार, सामाजीक गोष्टी, व्यापार, नीती, धर्म, वगैरे अनेक विषयांवर कोणाची भीड मुर्वत न धरतां, आमच्या पत्रांत विचारपूर्वक लेख येत जातील; जें सत्य आहे त्याचेंच अवलंबन करण्यांत येईल; आमच्या पत्रास चांगल्या लोकांची मदत आहे; हीं व अशाचसारखीं दुसरीं आश्वासनें देऊन त्यांप्रमाणें शेवटपर्यंत चालणारे किती आहेत ? फार थोडे. सामाजीक गोष्टी, व्यापार, नीती व धर्म ह्या विषयांवर स्वतंत्र लेख किती वेळां दृष्टीस पडतात ?

त्यांची दाद घेणारे तर फारच थोडे दृष्टीस पडतात. हा तरी एक थापा मारण्याचा व येणेंकरून वचनभंग करण्याचा प्रकार आहे, असें समजणारे किती आहेत हें माहीत नाहीं.

विश्वासानें कांहीं गोष्टी सांगितल्या असतां त्या न फोडणें, हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे; परंतू कांहींच्या तोंडांत त्या राहत नाहींत. त्या ते लागलींच बोलून दाखवितात. असल्या माणसांजवळ विश्वासानें एकादी गोष्ट सांगण्याचीसुद्धां पंचाईत पडते. असले लोक नारोशंकरी घाटा होत. विश्वासानें सांगितलेल्या सर्व गोष्टांत नेहमीं अर्थ असतो असें नाहीं. त्यांत सारासार विचार पाहण्याचें कारण असतें. महत्वाच्या गोष्टी कोणत्या व भिकार गोष्टी कोणत्या, ह्याचा निर्णय करणें अवश्य असते; व असा निर्णय केल्यावर विश्वासाची एकादी गोष्ट प्रगट करणें हा वचनभंग आहे. आपल्या स्वतःच्या खाजगत गोष्टी सांगणें हा कदाचित् मनमोकळेपणा होईल, परंतू दुसऱ्याच्या खाजगत व विश्वासाच्या गोष्टी सांगणें, हा मनमोकळेपणा नव्हे. पहिलें वर्तन म्हणण्यासारखें दोषास्पद नाहीं; परंतू दुसरें वर्तन गर्हणीय आहे.

अलीकडे सामाजीक प्रश्नाविषयीं बरीच चर्चा होऊं लागली आहे ही गोष्ट चांगली आहे, परंतू तिजबरोबर सह्या देण्याचें खूळ माजत चाललें आहे. ह्यावरून सही देऊं नये असें आमचें म्हणणें नाहीं, परंतू सहीप्रमाणें आचरण करणें असेल तरच ती द्यावी. सही देणें म्हणजे वचन देणें होय. सही देण्यापूर्वीं एक वेळ सोडून शंभर

---

१ सामाजीक प्रश्नाच्या वाट्यास वर्षांतून एकादा दुसरा दिवस आला तर भाग्य. मग गरीब बिचाऱ्या नीतीविषयीं व धर्माविषयीं तर बोलावयासच नको.

वेळां विचार करावा. आपणास शंका वाटल्यास सही देऊं नये; परंतू ती एकदां दिली, म्हणजे त्याप्रमाणें वागणें अवश्य आहे; पोकळ सबबी सांगण्यांत अर्थ नाहीं; असें करणें मुर्खपणा आहे. भिडेस पडून सही देणें हा वेडे-पणा आहे; परंतू त्याप्रमाणें वर्तन न करणें हा दोष आहे. जे गृहस्थ भिडस्त आहेत त्यांच्या स्वभावाचा फायदा करून घेणारे लोक लबाड आहेत असें समजावें. जे वचन-भंग करतात ते ज्याप्रमाणें दोषी आहेत, त्याप्रमाणें वचन-भंग करण्यास जे सहाय्य करतात तेही दोषी आहेत.

सह्या देण्याचें खूळ फक्त सामाजीक प्रश्नाच्या-बाबतींतच आहे असें नाहीं. म्युनिसिपालिटीच्या, लोकलबोर्डाच्या अथवा कायदे कौन्सिलच्या सभासदांची निवड-णूक चालू असतांही वरील प्रकार दृष्टीस पडतो. उमेदवार अथवा त्यांचे स्नेही मतदारांस घेरतात, सही घेतात व चा-लते होतात. हा साधारण प्रकार झाला. कित्येक वेळां असें होतें कीं, दुसरा उमेदवार अथवा त्याचे स्नेही भिडस्त मत-दार पाहून त्याच्या पाठीस लागतात, थापा मारतात व सही उपटून चालते होतात. असमंजस लोकच असें करतात असें नाहीं; समंजस लोकही असें करतात, ही आश्चर्याची गोष्ट आहे. कांहीं शहाणेसुर्ते असे दृष्टीस पडतात कीं, एक-दां एकास वचन दिल्यावर दुसऱ्यास देण्यास कांकूं करीत नाहींत, इतकेंच नाहीं, तर आपल्या स्वतःच्या बचावाबद्दल असें सांगतात कीं, “ दुसरा चांगला उमेदवार येईल, असें आम्हास माहीत नव्हतें, म्हणून पहिल्यास वचन दिलें होतें. दुसरा त्यापेक्षां चांगला आहे, तेव्हां त्यास वचन देण्यास हरकत कोणती ? तिसरा त्याहून चांगला आला, तर त्यासही

मत देऊं." आपल्या मतें जो चांगला ठरेल त्यासच वचन देणें अथवा मत देणें योग्य आहे; परंतू सर्व उमेदवार कळल्याशिवाय व त्यांची माहिती चांगली समजल्याशिवाय वचन देणें अविचार आहे. हा पोरखेळ आहे, इतकेंच नाहीं, तर हें वर्तन दूषणीय आहे. सर्व माहिती कळल्याशिवाय कोणतीही गोष्ट करावयास प्रवृत्त होणें, यास शहाणपणा कोण म्हणेल?

. ज्याप्रमाणें मुखत्यार लोक थापा मारून पैसे उपटतात, त्याप्रमाणेंच कांहीं म्युनिसिपल कमिशनर, अथवा लोकलबोर्ड मेंबर अथवा त्यांचे स्नेही थापा मारून मतें उपटतात. तीं हातीं पडेपर्यंत ते वाटेल तीं वचनें देतात; परंतू पुढें त्या वचनांची आठवणसुद्धां नसते. हा सर्व प्रकार वाईट आहे. जी गोष्ट आपल्या एकट्याच्या स्वाधीन नाहीं, ती आपण करूं असें सांगणें हें फसविणें होय. निवडणुकीच्या संबंधानें कांहीं अधिकप्रसंगी लोक नुकसानीची धमकी देऊन, अधिकार चालवून, आयत्या वेळेस कर्ज परत मागून, अथवा जोराचें नातें दाखवून किंवा जोराचा वशिला लावून वचनभंग करण्यास लावतात. हा गर्हणीय प्रकार आहे. दुर्बळ स्थितीचा फायदा करून घेण्यास प्रवृत्त होणें, हा हलकटपणा आहे. कांहीं लोक म्हणतील कीं, निवडणुकीच्या वेळीं वरील प्रकार व्हावयाचेच; असले प्रकार पाश्चिमात्य देशांत नेहमीं चालू असतात, तेव्हां त्याबद्दल विशेष विचार करण्याचें कारण नाहीं. वरील प्रकारांचें अवलंबन मुर्ख लोक करोत; परंतू शहाण्या माणसांनीं तसें करणें उचीत नाहीं. आमचे पूर्वज जें जें करीत आले त्या त्याप्रमाणें आम्ही करतों, हें म्हणणें जसें वेडगळपणाचें आहे, तसेंच पाश्चिमात्य लोक

अमूक करतात, म्हणून आम्ही करतों, हें म्हणणें वेडगळ-पणाचें आहे. अगोदरचे दोष पुष्कळ आहेत; ते निघतां निघतां पुरेवाट झाली आहे; त्यांत आणखी नव्यांची भरती नको.

वर जेवढे प्रकार सांगितले तेवढेच असते, तरी प्रकृत विषयाविषयीं विशेष विचार करण्याचें कारण नसतें. हे प्रकार असून आणखीही बरेच आहेत; व त्यांतही वचन पाळण्याच्या संबंधानें बरीच ढिलाई दृष्टीस पडते. तेव्हां त्याविषयीं चार शब्द सांगून हें लांबलेलें प्रकरण पुरें करूं.

आम्हीं एकदां एकादी कामगिरी पतकरली, म्हणजे तिजसंबंधानें चालढकल करणार नाहीं, हलगर्जीपणा दाख-विणार नाहीं, आमच्या सामर्थ्याप्रमाणें आमच्या हातून जें करतां येण्यासारखें आहे तें आम्ही करूं, पैशाच्या संबंधानें आम्ही गडबड करणार नाहीं किंवा पैसे खाणार नाहीं,—तात्पर्य, योग्य दक्षतेनें व इमानेंइतबारें काम करूं, असें आम्ही वचन देतों, हें थोड्यांच्या लक्षांत येतें; व लक्षांत येऊन दक्षतेनें, करारानें व नेकीनें वागणारे फारच थोडे दृष्टीस पडतात. एकदां कामगिरी पतकरली, म्हणजे त्या काम-गिरीच्या संबंधानें जी जबाबदारी असेल ती पतकरली, व ती कामगिरी सामर्थ्याप्रमाणें व इमानेंइतबारें बजावूं, अशाविषयीं आम्हीं आपणास बद्ध करून घेतलें, असें सम-जावें. मग ही कामगिरी सरकारची असो, प्रजेची असो, व्यापाऱ्याच्या दुकानची असो, कमिटीची असो, सभेची असो किंवा दुसऱ्या कोणाची असो. ह्या कामगिरीबद्दल आम्हांस वेतन मिळो किंवा न मिळो; ह्या कामगिरीबद्दल

व्हावा होवो किंवा न होवो, आमच्यावरची जबाबदारी कमी होत नाहीं. सरकारची नोकरी तेवढी खरी नोकरी, व इतरांची नांवाची नोकरी; वेतन घेतलें, तर जास्त जबाबदारी, न घेतलें तर कमी जबाबदारी, हें म्हणणें असमंजस लोकांस शोभतें; शहाण्यांस शोभत नाहीं. पगारी व बिनपगारी कामगिरी ह्यांमध्यें फरक इतकाच कीं, पहिलींत प्राय: पगार देणाराची सवड पाहावी लागते, दुसरींत कांहीं अंशीं आपल्या सवडीप्रमाणें काम केलें असतां चालण्यासारखें असतें; परंतु काम केलें पाहिजे; व तें दक्षतेनें व इमानानें केलें पाहिजे. वस्तुस्थिती पाहतां हे विचार लक्षांत आणून वागणारे फार थोडे. आमच्या लोकांच्या प्रयत्नास कमी यश येतें व सभा, कारखाने, गिरण्या वगैरे आमच्या संस्थांची स्थिती समाधानकारक नसते, ह्याचेंही मुख्य कारण आमची ढिलाई होय. कामगिरीबद्दल ज्यांस पगार मिळत नाहीं, त्यांकडून ढिलाई व्हावी ह्यांत विशेष आश्चर्य नाहीं; परंतु ज्यांस पगार मिळतो त्यांच्या हातूनही ढिलाई व्हावी, व कित्येकांस मोठा पगार मिळत असतां त्यांनीं अन्य रितीनें तुंबडी भरण्यास प्रवृत्त व्हावें, ही लांछनाची गोष्ट आहे. अनीतीनें पैसे मिळवून नाक धरून बसणें व धर्माचा टेंभा मिरविणें हें तर मोठेंच धाडस आहे. " जळो तयांचा आचार " असें जें तुकारामबोवांनीं दांभीक लोकांच्या संबंधानें म्हटलें आहे, तेंच असल्या लोकांच्या संबंधानें म्हणणें योग्य आहे. ज्यांनीं इमान सोडलें, ते काय करतील, हें सांगतां येत नाहीं.

कोणीं आमच्यापाशीं विश्वासानें ठेव ठेवली असतां ती जशीच्या तशी परत करूं, असें आम्ही वचन देतों. हें वचन शब्दांनींच द्यावयास नको. असें असून

विश्वासास गुंडाळून ठेवून, अथवा स्नेहधर्म, दया, माया वगैरे सर्वांस झुगारून देऊन, आपला तळीराम गार करणारे व ढेकर देऊन स्वस्थ बसणारे लोक, अथवा अज्ञानाचें पालन करण्याकरतां म्हणून नेमिलें असतां त्यास धाब्यावर बसवून स्वतःचें कोटकल्याण करणारे लोक, लुच्चेगिरीचें दिवाळें काढून खाका वर करणारे लोक, व सोडत काढून पैशाचा अपहार करणारे लोक, हे विश्वासघातकी होत. असें असून अशांस देखील लोक प्रतिष्ठित समजतात, हें आश्चर्य आहे. अशा प्रकारें विश्वासघात करून द्रव्याचा अपहार करणारे लोक नीच होत व त्यांस यत्किंचितूही मान मिळूं नये, इतकेंच नाहीं, तर फटके मारण्याची शिक्षा करावयाची असेल, तर असल्या विश्वासघातकी लोकांस प्रथम केली पाहिजे.

व्यक्तीच्या संबंधानें विश्वासघात करणारे लोक नीच होत; परंतू देशाच्या संबंधानें विश्वासघात करणारे तर नराधम होत. आपलें व आपल्या पोराबाळांचें पोट जाळण्याकरतां जे देशाच्या संबंधानें विश्वासघात करतात ते देशाचे शत्रू होत, इतकेंच नाहीं, तर महापातकी होत. असल्या लोकांपासून ज्यांचा फायदा होईल ते त्यांचें गौरव करतील, हें स्वाभावीक आहे. परंतू ज्यांचें सर्वस्वी नुकसान झालें आहे, त्यांनीं त्यांचें गौरव करावें किंवा त्यांशीं सहवास ठेवावा, हा जर मुर्खपणा नाहीं, तर मुर्खपणा कोणता ? ज्या लोकांचा खरोखर कांहीं अपराध नव्हता त्यांच्या, किंवा ज्यांचा अपराध असल्यास वरील अपराधाच्या मानानें पाहतां फारच कमी होता त्यांच्या संततीस आम्हीं हलकें समजावें, व ज्यांनीं देशाच्या संबंधानें विश्वासघात करून महापातक गाठीं बांधलें त्यांच्या संततीस

प्रतिष्ठित समजावें, हा केवढा प्रमाद ? ज्या लोकांचा अपराध असल्यास साधारण आहे, त्यांची संतती कोणत्याही रितीनें पुनीत होऊं नये, व ज्यांचा अपराध लहानसहान नसून देहान्तप्रायश्चित्तास योग्य, ते व त्यांची संतती सदा पुनीत समजण्यांत यावी, हा कोठचा न्याय ? एका व्यक्तीचा—पराकाष्ठा एका कुटुंबाचा—घात करणाऱ्या व्यक्तीस अथवा त्याच्या संततीसही केव्हां केव्हां जबरदस्त शिक्षा असावी, पण देशांतील शेकडो कुटुंबांचा घात करण्यास जे प्रवृत्त झाले त्यांस, अथवा त्यांच्या संततीस, शिक्षा होण्याचें एकीकडे राहून त्यांस लोकांनीं प्रतिष्ठित समजून मान द्यावा, ही खेदाची गोष्ट आहे. धिंड काढण्याची शिक्षा प्रचारांतून गेली. जर ती पुनः अमलांत आणावयाची आहे, तर अशा लोकांच्या बाबतींत ती अमलांत आणणें उचीत होईल. असो.

सत्यप्रीतीचें व वचनासक्तीचें हें प्रकरण फार लांबलें. कदाचित् हें कंटाळवाणेही झालें असेल. परंतू सत्य बोलत जा, वचन पाळीत जा, असें सांगून विशेष उपयोग नाहीं. सत्यावर टाकी कशकशी चालू आहे व वचनाची थट्टा कसकशी होत आहे, हें समजून घेऊन बापानें मुलांस मार्ग दाखविला पाहिजे. खाचखळगे कोठकोठें आहेत, हें दाखवून ते टाळण्याविषयीं त्यास उपदेश केला पाहिजे.

सदाचरणाचा खरा पाया सत्यप्रीती व वचनासक्ती होय. ह्या भक्कम पायावर सदाचरणाची इमारत असल्यावर नुकसान होण्याची तादृश भीती नको. सत्यव्रत ही पदवी मुलांस मिळाल्यावर आपण धन्य आहों, असें बापानें समजावें, असें मागें सांगितलें आहे; त्याप्रमाणें आपला मुलगा करारी आहे, हें समजल्यावर त्यानें आपणास कृतकृत्य सम-

जावें. मुलांनीं दुसऱ्या अनेक पदव्या मिळविल्यावर आपणांस धन्य मानणारे कांहीं दृष्टीस पडतात; परंतू वरील दोन पदव्यांच्या अभावीं दुसऱ्या पदव्यांची मातब्बरी नाहीं, असें त्यांनीं समजावें. विद्वत्तेबद्दल पदव्या देण्याकरतां संस्था आहेत व त्या आपलें काम करीत आहेत; परंतू सदाचरणाबद्दल पदवीदान करणें, निदान गौरव करणें, हें लोकांकडे आहे. सत्यव्रत व करारी माणसें फारशीं सापडत नाहींत. त्यांची जरूरी फार आहे. तेव्हां आपलीं मुलें अशीं बनावीं, अशी इच्छा धरून बापानें शिक्षणाचा व आपल्या वर्तनाचा क्रम ठेवावा, म्हणजे कालेंकरून तरी इष्ट हेतू सिद्धीस जाईल.

**प्रेमवृत्ती**–जन्मास येऊन जीं कर्तव्यें करावयाचीं तीं करण्यास अंगीं पात्रता यावी, हा शिक्षणाचा मुख्य हेतू आहे. हा हेतू लक्षांत ठेवून बापानें वर्तन ठेवावयाचें आहे. मुलांच्या अंगीं ही पात्रता येण्यास बराच काळ लागतो. ह्यासंबंधानें बापावर जी जबाबदारी आहे ती सामान्य नाहीं. गृहशिक्षणाच्या बाबतींत आईबापांच्या ज्या समजुती आहेत त्या चमत्कारीक आहेत. त्या जाण्यास बराच काळ लोटला पाहिजे. ज्या कांहीं चुका होतात त्या मुलांच्याच असतात, आईबापांच्या नसतात, असें मानणें वेड आहे. चूक झाली असतां अथवा अनिष्ट कार्य झालें असतां, त्याचें खापर दुसऱ्याच्या मस्तकावर फोडावयाचें, असा मनुष्यस्वभावच दिसून येतो. हाताखालचे लोक मात्र दोषी, आम्ही चांगले, असें अधिकारी म्हणत असतात; शिष्य मात्र वाईट, आम्हांकडे दोष नाहीं, असें शिक्षक म्हणत असतात. त्याचप्रमाणें आईबाप म्हणतात कीं, मुलें द्वाड निघालीं, ह्यास आम्हीं

काय करावें ? ही रडकथा नेहमींची आहे. ह्यावरून हाताखालचे लोकांकडे अथवा शिष्यांकडे अथवा मुलांकडे कांहींच दोष नसतो, असें म्हणण्याचा आमचा हेतू नाहीं. आमच्या म्हणण्याचा हेतू इतकाच आहे कीं, दोषाचा बराच अंश वरील त्रयीकडे असतो. कारण, अधिकार बजाविण्याचें काम त्यांकडे असतें. सक्तीनें अधिकाराची बजावणी झाली असतां तिजपासून इष्ट कार्य होत नाहीं. मुलांच्या दोषाबद्दल त्यांस तडातड मारणें, डाग देणें वगैरे शिक्षा रानटी होत. त्या रानटी लोकांच्या मुलांस कदाचित् योग्य असतील; सभ्य गृहस्थांच्या मुलांस योग्य नाहीत. त्यांस प्रेमानें वागवून त्यांच्या दोषांचा परिणाम त्यांस भोगावयास लावणें, हीच त्यांस योग्य शिक्षा होय. आईनें अथवा बापानें शिक्षा दिली असतां मुलांच्या मनांत त्यांविषयीं अप्रीती उत्पन्न होते. परंतू स्वतःच्या कृतीपासून दुःख अथवा गैरसोय उत्पन्न झाली असतां मुलांस शिक्षा होऊन इष्ट कार्य व्हावयाचें तें घडून येण्यास चुकत नाहीं. जरी ह्या उपायानें एकादे वेळेस इष्ट कार्य झालें नाहीं, तरी मुलांच्या मनावर वाईट परिणाम होणार नाहीं, ही निर्विवाद गोष्ट आहे. त्यांस वारंवार दापण्यापासून, शिव्या देण्यापासून अथवा मारीत सुटल्यापासून हें कार्य होत नाहीं. असें करण्यानें मुलांच्या मनांत शिक्षा करणारांविषयीं अप्रीती तर होतेच; शिवाय मुलें कोडगीं होतात, व स्वतःच्या मानाविषयीं त्यांस कांहींच वाटेनासें होतें. मुलांस आपल्या स्वतःच्या मानाविषयीं कांहींच वाटूं नये, व त्यांनीं गुलामांसारखें निमुटपणें सर्व सोसून घ्यावें, अशी आईबापांची इच्छा असणें मुर्खपणा आहे. वर जे विचार सुच-

विले त्यांच्या स्पष्टीकरणार्थ आपण एक उदाहरण घेऊं. समजा, मुलानें टोपी अथवा पुस्तक हरवलें, तर त्याबद्दल त्यास शिव्या देणें व झोडपीत सुटणें, किंवा नवीन टोपी अथवा पुस्तक लागलींच विकत घेऊन देणें, हा शहाणपणाचा प्रकार नाहीं. टोपी अथवा पुस्तक नसल्यापासून काय अडचण उत्पन्न होते, हें त्यांस समजलें पाहिजे. टोपी अथवा पुस्तक हरवलें, ह्याबद्दल दुसरा कोणी जबाबदार नसून आपले आपणच जबाबदार आहों, व ती जिन्नस नसल्यापासून जें नुकसान आहे त्याबद्दलचा दोष दुसऱ्याकडे नसून, त्याचें प्रायश्चित्त आपणास निमुटपणें सोसलें पाहिजे, ही गोष्ट त्यांच्या मनावर चांगली बिंबली पाहिजे. तात्पर्य, कार्यकारणभाव त्यांच्या लक्षांत आला पाहिजे.

ज्याप्रमाणें अक्षयीं शिव्या देणें, रागे भरणें, मारहाण करणें, किंवा फाजील लाड करणें अप्रशस्त आहे, त्याप्रमाणें नेहमीं उपदेश करीत सुटणें हेंही अप्रशस्त आहे. आम्हीं सर्वच गोष्टी नेहमीं मुलांस समजून सांगाव्या व त्यांनीं त्या सर्वच विश्वासानें ऐकत बसाव्या, हेंही श्रेयस्कर नाहीं. त्यांच्या स्वतःच्या अनुभवानें जितक्या गोष्टी त्यांस कळून येतील तितक्या चांगल्या. त्यांपासून त्यांच्या आचरणांत जसा कायमचा बदल होईल, तसा नुसत्या उपदेश श्रवणापासून होणार नाहीं. ह्यावरून, अनुभव यावा म्हणून मुलांस मुद्दाम आपण होऊन अडचणी उत्पन्न करून त्यांस शिक्षण द्यावें, किंवा ते अडचणींत पडतील, असें आपणांस माहीत असतां त्यांस आपण मदत करूं नये, किंवा उपदेश करूं नये, असें आम्ही म्हणत आहों असें नाहीं. कृत्रिम अडचणी अथवा शिक्षा असूं नये, किंवा अप्रासंगिक

उपदेश असूं नये. अशा रितीनें वर्तन ठेविलें असतां जें कार्य होणें इष्ट असतें, तें होतें:—म्हणजे चांगलें वर्तन कोणतें व वाईट वर्तन कोणतें, हें त्यांचे त्यांस समजूं लागतें. आपल्या वाईट कृतीबद्दल जी योग्य शिक्षा तेवढीच मिळाली आहे, जास्त नाहीं, असें समजून धुसपुसण्याचें त्यांस कारण राहत नाहीं. आईबापांसही संतापण्याचें कारण न राहून त्यांची वृत्ती शांत राहते; व आईबाप व मुलें ह्यांमध्यें सलोखा व प्रेम राहून मुलांचें वर्तन बरें असण्याचा पुष्कळ संभव असतो.

वर जो उपाय सुचविला त्यापासून मुलांच्या लहानसहान दोषांसंबंधानें तर उपयोग होतोच, ही गोष्ट पुष्कळांस अनुभवावरून कळून येण्यासारखी आहे. मुलांकडून जे मोठमोठाले गुन्हे घडून येतात त्यांस तरी कांहीं कारण असतें. दुसऱ्याची वस्त चोरणें, लबाडी बोलणें, वगैरे ज्या घाणेरड्या सवयी, त्या त्यांस कां जडाव्या ? अशा सवयी उगीच्या उगीच जडत नाहींत. खरें बोललें असतां अथवा गुन्हा कबूल केला असतां कांहीं शासन होतें व लबाडी सांगितली असतां तें शासन होत नाहीं, असें मुलांच्या अनुभवास येऊं लागलें, तर तीं अर्थात लबाडी सांगतील. मुलांस एकादी जिन्नस हावी असली, व ती देतां येण्यासारखी असून न दिली, किंवा न देण्याबद्दल सौम्यपणानें कारणें न सांगितलीं, तर मुलांच्या मनांत ती वस्तू मिळविण्याविषयीं इच्छा होण्याचा विशेष संभव असतो. हेंच जर आईबाप व मुलें ह्यांमध्यें विशेष प्रेम असेल, तर जिन्नस मागण्यास अथवा गुन्हा कबूल करण्यास मुलांच्या मनांत तादृश शंका येणार नाहीं. त्यांचें वर्तन सरळपणानें राहील. तात्पर्य हें कीं,

सक्तीनें अथवा निर्दयपणानें मुलांस वागविलें असतां तीं तिरसट, तापट अथवा फटकून राहणारीं होतात. त्यांस सौम्यपणानें, सरळपणानें व प्रेमानें वागविलें नाहीं, तर त्यांच्यांत आईबापांविषयीं, अथवा इतर माणसांविषयीं कळवळा नसतो; व त्यांबरोबर तीं सरळपणानें वागत नाहींत. कित्येक आईबापांची अशी समजूत असते कीं, मुलांस प्रेमानें वागविलें असतां चांगलें काम होत नाहीं. सक्तीनें वागविलें असतां तीं तेव्हांच ताब्यावर येतात, व त्यांच्या हातून चुका अथवा गुन्हे होत नाहींत; परंतू ही समजूत अगदीं चमत्कारीक आहे. उलट पक्षीं, खरी स्थिती अशी आहे कीं, सौम्य व उदारपणाच्या वर्तनानें मुलें संतुष्ट राहून नीतीचा अतिक्रम होण्यास फारशी जागा राहत नाहीं.

लहानपणीं मुलें कोंवळीं असल्यामुळें त्यांकडून विशेष त्रासदायक व्यायाम अथवा कसरत करवून घेणें, हें श्रेयस्कर नसतें. मनाची शक्ती वाढली नसतां फाजील ओझें मनावर लादणें हा शहाणपणा नाहीं. ही गोष्ट लक्षांत न ठेविली, तर शरीर पिचणें व मनाची भावी गती कुंठीत होणें, हीं अनिष्टकार्यें घडून येतात. तोच प्रकार मुलांच्या वर्तनाच्या संबंधानें होय. अतिशय सद्गुणी व वयस्क माणसाच्या अंगीं जें वर्तन दृष्टीस पडतें, तेंच आपल्या मुलाच्या अंगीं दृष्टीस पडावें, अशी इच्छा आईबाप मनांत धरतील, तर तो त्यांचा वेडेपणा आहे. लहानपणीं कांहीं कांहीं गोष्टींत मुलांकडून वर्तनाच्या संबंधानें अतिक्रम होणारच; त्याबद्दल विशेष विषाद मानण्याचें कारण नाहीं. वळण भलतें लागलें आहे किंवा कसें, व एकाद्या वाईट कृत्याची सवय लागत आहे कीं काय, हें

नेहमीं पहात असावें, व रोज थोडथोडी जरी सुधारणा दृष्टीस पडली, तरी तेवढ्यानें संतोष मानावा. तात्पर्य हें कीं, पुस्तकांतून थोर पुरुषांविषयीं ज्या कथा आपण वाचतों, किंवा जगांत त्यांच्या कृती आपण पाहतों, त्याप्रमाणें आपलीं मुलें लहानपणींच शरिरानें, मनानें अथवा सद्वर्तनानें बनलीं पाहिजेत, अशी इच्छा करणें, व ती इच्छा पूर्ण झाली नाहीं, म्हणून विषाद मानणें, हें समंजसपणाचें लक्षण नाहीं. तिन्हीही बाबतींत क्रमाक्रमानें वृद्धी झाली, म्हणजे पुरें आहे. क्रमाक्रमानें वृद्धी झाली असतां ती दृढतर होऊन बरेच दिवस टिकते. ही वृद्धी कायमची पुढें राहावी, हेंच खऱ्या शिक्षणाचें फळ होय. मुलगा अल्प वयांत असतां त्याचें शरीर सुदृढ दिसत आहे, परंतू अंमळ मोठा झाल्यावर उतारवयाचा दिसत आहे, किंवा लहानपणीं बुद्धीच्या संबंधानें फार चलाखी दाखवीत आहे, व मोठेपणीं मंदत्व दाखवीत आहे, तर शिक्षणाच्या बाबतींत चूक झाली आहे, असें समजावें. त्याचप्रमाणें लहानपणीं तो सद्गुणी दिसून मोठेपणीं त्याचे कान लांब दिसून येऊं लागले, तर चूक झाली आहे, असें समजलें पाहिजे. तिन्हीही बाबतींत क्रमाक्रमानें वृद्धी होत जाऊन गुण दृष्टीस पडूं लागला, म्हणजे शिक्षण चांगलें चाललें आहे, असें समजण्यास हरकत नाहीं.

मुलें अगदीं लहान असतां त्यांसाठीं आईबापांस प्रत्येक गोष्ट करावी लागते, व असें करणें हें आवश्यक आहे. परंतू त्यांस समजूं लागलें, म्हणजे एक एक गोष्ट त्यांकडून करवून घेणें श्रेयस्कर असतें. मग आपण प्रत्येक गोष्टींत त्याचें नियमन न करतां त्यांस आपल्या स्वतःचें नियमन

करण्यास सवड देणें इष्ट आहे. स्थानीक स्वराज्याचा ओ-नामा शिकविण्यास येथपासून सुरवात केली पाहिजे. लहान-पणीं मुलांचें नियमन तर केलेंच पाहिजे; परंतू त्याचा अति-रेक होऊं देतां कामा नये. मुलांच्या संबंधाच्या प्रत्येक गोष्टींत ढवळाढवळ करण्याची कांहीं आईबापांस सवय असते, हें चांगलें नाहीं. मोकळीक ही लहानांस काय, किंवा थोरांस काय, सारखी प्रिय असते. ती किती व केव्हां द्यावयाची, एवढ्या गोष्टीविषयीं विचार करून आईबापांनीं आपलें वर्तन ठेविलें पाहिजे.

मुलांनीं वाईट कृत्य केलें असतां त्याबद्दल नापसंती दा-खविणें तर जरूर आहे; परंतू ती यत्तेबाहेर असूं नये. तीस कांहीं मर्यादा आहे. मुलें वाईट कृत्यें करतात, म्हणून त्यांचें नांव सोडून देऊन आपण त्यांच्यापासून अलग राहूं लागलों, तर तीं आपल्या समागमाची अपेक्षा करणार नाहींत, इतकेंच नाहीं, तर उदासीन राहतील. मग आपल्या समाग-मापासून त्यांस जो लाभ व्हावयाचा तो होणार नाहीं. मुलांकडून दोष झाला असतां कांहीं आया संतापानें त्यांस रागें भरण्यास प्रवृत्त होतात, व त्यांनीं केविळवाणी मुद्रा केली असतां लागलींच त्यांस पोटाशीं धरतात. हेंही एका अर्थानें गैर आहे; ही तरी मनाची दुर्बलता होय.

आईबापांनीं मुलांस उठल्यां बसल्यां हुकूम करीत सुटणें, हें अप्रशस्त होय. हुकूम केला असतां तो मुलांनीं ऐकलाच पाहिजे. हुकूम अमान्य करण्याचा त्यांस यत्किंचित्‌ही प्रसंग आणून देतां कामा नये. ह्याविषयीं फारच खबरदारी घेतली पाहिजे; परंतू प्रसंगाचें महत्व लक्षांत न आणतां व हुकूम पाळतां येण्यासारखा आहे किंवा नाहीं, ह्याविषयीं

विचार न करतां, वाटेल त्या वेळीं वाटेल तसा हुकूम केला, तर तो अमान्य होण्याचे प्रसंग वारंवार येण्याचा संभव आहे. असे प्रसंग अनेक वेळां आले असतां हुकूम पाळण्याच्या संबंधानें चालढकल करण्याची सवय मुलांस जडण्याची भीती असते. ही सवय किती घातूक आहे, हें सांगावयास नको. ह्यासाठीं हुकूम करण्याचे प्रसंग जितके कमी येतील तितकें बरें. हुकमाची बजावणी फक्त लष्करी खात्यांत सक्तीनें असावी व इतर ठिकाणीं ती असण्याचें तितकें कारण नाहीं, ही समजूत चुकीची आहे. प्रत्येक गोष्टींत आपण मुलास हुकूम करून त्याप्रमाणें त्यास वागावयास लाविलें, तर तो नुसता होयबा बनून त्यास आचार-स्वातंत्र्यास फाटा द्यावा लागेल; व ह्यामुळें संतोष राहणार नाहीं. हुकूम करणें हें काम सोपें असतें, परंतू तो पाळणें कठीण असतें, ही गोष्ट विसरतां कामा नये. इतर मार्ग खुंटले आहेत, असें जेव्हां समजून येईल, तेव्हां मात्र योग्य हुकूम करावयाचा, व असा हुकूम एकदां केला, म्हणजे त्याची बजावणी झाली आहे किंवा नाहीं, हें पाहिल्याशिवाय स्वस्थ बसावयाचें नाहीं, ही गोष्ट चांगली लक्षांत ठेविली पाहिजे. जुलमाचें वर्तन जुलमी अधिकाऱ्यास एक वेळ शोभेल; आईबापांस शोभणार नाहीं. हुकूम करण्याचे प्रसंग कारणपरत्वें अनेक वेळां उत्पन्न झाले असतां, जे हुकूम आपण करतों ते परस्परांशीं विसंगत नाहींत, हें प्रथम पाहिलें पाहिजे. हें न पाहतां हुकूम सोडीत गेलें, तर आपला मुर्खपणा दिसून येऊन हुकूम अमान्य होईल, व हुकमाची मातब्बरी राहणार नाहीं. पुढचा मागचा सर्व विचार करून एकदां हुकूम केला,

म्हणजे तो अमलांत आलाच पाहिजे; मग तो बजावतांना कचरतां उपयोगी नाहीं. हुकूम अमान्य झाला असतां त्याबद्दल शिक्षा करणें ती गुन्ह्याचें स्वरूप लक्षांत आणून केली पाहिजे, हें सांगावयास नको.

आतांपर्यंत जे विचार सुचविण्यांत आले, त्यांवरून कांहीं लोकांचा कदाचित् असा समज होईल कीं, मुलांस वाटेल तसें वर्तन करावयास सोडून देऊन बापानें स्वस्थ बसावें. अशी समजूत कोणाची असेल, तर ती चुकीची आहे. बापानें स्वस्थ बसणें, ही तर मोठीच चूक होय. त्यानें तटस्थ तर राहूं नये, परंतू पदोपदीं फाजील ढवळाढवळ न करतां मुलांस जेथें जेथें मदत लागेल, तेथें तेथें ती देण्यास तयार असलें पाहिजे, इतकेंच नाहीं, तर वेळेवर पसंती अथवा नापसंती प्रदर्शित करून त्यांस सुमार्गास लाविलें पाहिजे. तात्पर्य हें कीं, गाडा सुयंत्र चालला आहे किंवा नाहीं हें बापानें पाहावें, व त्यांत कमीपणा दिसून आल्यास तो सुयंत्र चालण्याच्या कामीं मदत करावी. मुलांस चांगलें वळण लावणें, हें काम पुष्कळ लोकांस सोपेंसें वाटतें; परंतू खरा प्रकार तसा नाहीं. आपल्या मुलांचे स्वभाव भिन्न भिन्न असतात. सर्वांबरोबर सारखें वर्तन ठेवून चालत नाहीं. प्रत्येकाचा स्वभाव कसा आहे, हें लक्षपूर्वक पाहून त्याप्रमाणें बापानें शिक्षणाचें धोरण ठेवावयाचें आहे. आपले मनोविकार बाजूला ठेवून मुलाच्या शाश्वतच्या हिताची गोष्ट करण्यास त्यानें नेहमीं उद्युक्त असलें पाहिजे; म्हणजे इष्ट कार्य होण्यास फारसा काळ लागणार नाहीं. शिक्षणाची ही जी पद्धत सांगितली तिजमुळें त्रास पडेल, गुण येत नाहीं, असेंही प्रथम वाटेल; परंतू कांहीं दिवस हिचें अवलंबन

केलें असतां ही मुलांस व आपणास सुखकारक आहे, असें कळून येईल. आपटधोपट करून आपण कष्टी होतों व मुलांस कष्टी करतों; प्रेमाच्या वर्तनानें आपली शांतवृत्ती कायम राहते व मुलांचीही राहते. ही गोष्ट पुष्कळांच्या लक्षांत आलीच असेल; तेव्हां ह्याविषयीं विशेष विवरण करावयास नको.

**उद्योगप्रीती**—सद्वर्तनास ज्या अनेक गोष्टी साधनीभूत आहेत, त्यांपैकीं उद्योगप्रीती ही महत्वाची गोष्ट आहे. निरुद्योगी लोक आपण शंभर घेतले व तितकेच उद्योगी घेतले, तर नीतीच्या दृष्टीनें अतिक्रमण झालें आहे, असे उद्योगी लोकांपैकीं दहा निघाले, तर निरुद्योगी लोकांपैकीं निदान पन्नास सापडतील. मनुष्याच्या मागें कांहीं उद्योग असला, म्हणजे त्याचें मन व्यापृत असतें व त्यास कोरड्या उठाठेवी सुचत नाहींत. समाजांत कोरड्या उठाठेवी करणारे लोक फार भयंकर असतात. पदरच्या भाकरी खाऊन चकाट्या पिटणारे लोकांपासून, व ह्याचें पागोटें त्याच्या डोक्यावर, त्याचें पागोटें ह्याच्या डोक्यावर, असा ज्यांचा नेहमीं क्रम चालू असतो अशा लोकांपासून समाजाचें हीत होण्याचें तर एकीकडे राहतें, परंतू उलट त्यांपासून नुकसान मात्र फार होतें. असले गावकुटाळ प्रत्येक ठिकाणीं सापडतात. परंतू ज्या ठिकाणच्या लोकांस उद्योग फारसा नसतो त्या ठिकाणीं हे फार दृष्टीस पडतात, व जेथें उद्योगाचीं साधनें विशेष असतात तेथें ते कमी दृष्टीस पडतात. पाठीमागें उद्योग नसला, म्हणजे मन भकतें व भलत्याच विचारांच्या भोवऱ्यांत सापडून मनुष्याच्या हातून नीतीचें अतिक्रमण होण्याचा विशेष संभव असतो. ह्यासाठीं बापानें अथवा पालकानें मुलाच्या मागें

उद्योग लावून देणें फार अवश्य आहे. उद्योग लावून द्यावयाचा, म्हणजे कांहीं तरी उद्योग लावून द्यावयाचा असें नाहीं. ज्यापासून आज नाहीं, तरी उद्यां हीत होईल, असाच उद्योग लावून द्यावयाचा, हें सांगावयास नको. कित्येकांचा असा समज आहे कीं, ज्या उद्योगापासून दोन पैसे प्रत्यक्ष कमावतां येतात तेवढा काय तो खरा उद्योग, बाकीच्यांत कांहीं अर्थ नाहीं. कांहींचा असा समज आहे कीं, अध्ययन करणें किंवा कामधंदा करणें, एवढाच कायतो खरा उद्योग; व्यायामासाठीं किंवा कर्मणुकीसाठीं मर्दानी खेळ खेळणें वगैरे प्रकार निरुद्योगीपणाचीं लक्षणें आहेत. हे दोन्ही समज अगदी चुकीचे आहेत. दोन पैसे मिळविणें, हा उद्योग करण्याचा एक हेतू आहे; परंतू उद्योग करावयाचा तो केवळ पैसे मिळविण्यासाठींच नाहीं. उद्योग करीत असतां पैसे मिळाले, तर दुधांत साखर, ह्या न्यायानें चांगलेंच आहे; परंतू पैसे मिळविण्याशिवाय आणखी दुसरे हेतू आहेत, व ते फार महत्वाचे आहेत. ते स्वतःची उन्नती व दुसऱ्यांची उन्नती हे होत. ह्यांची किंमत पैशाच्या किंमतीपेक्षां अधीक आहे. ज्या सद्गृहस्थांनीं अनेक दिवस सतत परिश्रम करून नवीन शोध केले आहेत, कल्पना काढिल्या आहेत व सिद्धांत ठरविले आहेत, त्यांनीं जर पैशावरच नजर ठेविली असती, तर हल्लीं मानवी जातीस जे लाभ झाले आहेत ते झाले असते किंवा नाहीं, ह्याविषयीं संशय आहे.

अध्ययन किंवा कामधंदा करण्यांत नेहमीं वेळ घालविणें, एवढाच खरा उद्योग आहे असें नाहीं. शरीर व मन हीं दोन्हीं सुदृढ राहण्यासाठीं व्यायामाची व कर्मणुकीची आव-

श्यकता आहे, व ज्यास मेंदूचें अक्षयीं काम असतें त्यास तर विशेष आहे. व्यायाम कोणता असावयाचा व कर्मणूक कोणती असावयाची, हा प्रश्न बापानें अथवा पालकानें ठरवावयाचा आहे. अध्ययन किंवा कामधंदा करण्यांत जो वेळ जातो, त्याशिवाय व्यायाम व कर्मणूक ह्यांत गेलेला काळ व्यर्थ नाहीं. व्यायाम अथवा कर्मणूक ही तरी अवश्य उद्योगांपैकीं एक उद्योगच आहे. इतकेंच कीं, त्याचें प्रमाण बेताचें पाहिजे. उद्योगामध्यें पद्धत व व्यवस्थितपणा अवश्य असला पाहिजे; म्हणजे अध्ययन, कामधंदा, व्यायाम व कर्मणूक वगैरे अनेक गोष्टी नित्य करण्यास सवड सापडते. वेळ सापडत नाहीं, ही तकरार बहुशः अव्यस्थित लोकांची असते. जो व्यवस्थित असतो व कोणत्या कामास किती वेळ द्यावयाचा, हें ज्यांस चांगलें समजतें, त्याची वेळेच्या संबंधानें प्रायः कुरकूर नसते.

कांहीं एक हेतू मनांत न धरतां वाटेल तो उद्योग अव्यवस्थितपणें करण्यास प्रवृत्त होणें, हा खरा उद्योग नसून आळसाचा एक प्रकार आहे. जन्मास येऊन आपणास कांहीं तरी उपयुक्त गोष्ट करावयाची आहे, हें प्रत्येक मनुष्यानें लक्षांत ठेविलें पाहिजे. आपणास अमरपट्ट मिळाला नाहीं; जीं साधनें उपलब्ध आहेत व जी संधी सांपडली आहे त्यांचा उपयोग करून घेण्यास चुकणें, हा महामुर्खपणा आहे, ही गोष्ट बापानें मुलांच्या लक्षांत आणून देऊन त्यांकडून उद्योग करविणें योग्य आहे

**आत्मसंयमन, सौजन्य इ०**—गृह हें सुखाचें स्थान असण्यास प्रत्येक मनुष्याच्या अंगीं आत्मसंयमन हा गूण

उद्योग लावून देणें फार अवश्य आहे. उद्योग लावून द्यावयाचा, म्हणजे कांहीं तरी उद्योग लावून द्यावयाचा असें नाहीं. ज्यापासून आज नाहीं, तरी उद्यां हींत होईल, असाच उद्योग लावून द्यावयाचा, हें सांगावयास नको. कित्येकांचा असा समज आहे कीं, ज्या उद्योगापासून दोन पैसे प्रत्यक्ष कमावतां येतात तेवढा काय तो खरा उद्योग, बाकीच्यांत कांहीं अर्थ नाहीं. कांहींचा असा समज आहे कीं, अध्ययन करणें किंवा कामधंदा करणें, एवढाच कायतो खरा उद्योग; व्यायामासाठीं किंवा कर्मणुकीसाठीं मर्दानी खेळ खेळणें वगैरे प्रकार निरुद्योगीपणाचीं लक्षणें आहेत. हे दोन्ही समज अगदी चुकीचे आहेत. दोन पैसे मिळविणें, हा उद्योग करण्याचा एक हेतू आहे; परंतू उद्योग करावयाचा तो केवळ पैसे मिळविण्यासाठींच नाहीं. उद्योग करीत असतां पैसे मिळाले, तर दुधांत साखर, ह्या न्यायानें चांगलेंच आहे; परंतू पैसे मिळविण्याशिवाय आणखी दुसरे हेतू आहेत, व ते फार महत्वाचे आहेत. ते स्वतःची उन्नती व दुसऱ्यांची उन्नती हे होत. ह्यांची किंमत पैशाच्या किंमतीपेक्षां अधीक आहे. ज्या सद्गृहस्थांनीं अनेक दिवस सतत परिश्रम करून नवीन शोध केले आहेत, कल्पना काढिल्या आहेत व सिद्धांत ठरविले आहेत, त्यांनीं जर पैशावरच नजर ठेविली असती, तर हल्लीं मानवी जातीस जे लाभ झाले आहेत ते झाले असते किंवा नाहीं, ह्याविषयीं संशय आहे.

अध्ययन किंवा कामधंदा करण्यांत नेहमीं वेळ घालविणें, एवढाच खरा उद्योग आहे असें नाहीं. शरीर व मन हीं दोन्हीं सुदृढ राहण्यासाठीं व्यायामाची व कर्मणुकीची आव-

श्यकता आहे, व ज्यास मेंदूचें अक्षयीं काम असतें त्यास तर विशेष आहे. व्यायाम कोणता असावयाचा व कर्मणूक कोणती असावयाची, हा प्रश्न बापानें अथवा पालकानें ठरवावयाचा आहे. अध्ययन किंवा कामधंदा करण्यांत जो वेळ जातो, त्याशिवाय व्यायाम व कर्मणूक ह्यांत गेलेला काळ व्यर्थ नाहीं. व्यायाम अथवा कर्मणूक ही तरी अवश्य उद्योगांपैकीं एक उद्योगच आहे. इतकेंच कीं, त्याचें प्रमाण बेताचें पाहिजे. उद्योगामध्यें पद्धत व व्यवस्थितपणा अवश्य असला पाहिजे; म्हणजे अध्ययन, कामधंदा, व्यायाम व कर्मणूक वगैरे अनेक गोष्टी नित्य करण्यास सवड सापडते. वेळ सापडत नाहीं, ही तकरार बहुशः अव्यस्थित लोकांची असते. जो व्यवस्थित असतो व कोणत्या कामास किती वेळ द्यावयाचा, हें ज्यांस चांगलें समजतें, त्याची वेळेच्या संबंधानें प्रायः कुरकूर नसते.

कांहीं एक हेतू मनांत न धरतां वाटेल तो उद्योग अव्यवस्थितपणें करण्यास प्रवृत्त होणें, हा खरा उद्योग नसून आळसाचा एक प्रकार आहे. जन्मास येऊन आपणास कांहीं तरी उपयुक्त गोष्ट करावयाची आहे, हें प्रत्येक मनुष्यानें लक्षांत ठेविलें पाहिजे. आपणास अमरपद मिळाला नाहीं; जीं साधनें उपलब्ध आहेत व जी संधी सांपडली आहे त्यांचा उपयोग करून घेण्यास चुकणें, हा महामुर्खपणा आहे, ही गोष्ट बापानें मुलांच्या लक्षांत आणून देऊन त्यांकडून उद्योग करविणें योग्य आहे

**आत्मसंयमन, सौजन्य इ०**—गृह हें सुखाचें स्थान असण्यास प्रत्येक मनुष्याच्या अंगीं आत्मसंयमन हा गुण

अवश्य असला पाहिजे. घरांत एकादा मनुष्य तामसी अथवा माथेफिराऊ असला, म्हणजे तेथें शांतता नसते. अशा तामसी मनुष्यापासून बाकीच्या मंडळीस त्रास होतो. आपल्या मनाप्रमाणेंच सर्व गोष्टी झाल्या पाहिजेत, असा घरांतील प्रत्येकजण हट्ट धरून बसेल, व मनाप्रमाणें झालें नाहीं म्हणून चडफडेल, तर घरीं राहण्यापासून कोणास सूख न होतां उलट दुःख होईल. परंतू मुलांच्या अंगीं हा गूण येण्यास तो बापाच्या अंगीं असला पाहिजे. हा विचारानें व फार दिवसांच्या सवयीनें प्राप्त होतो. आपला राग अथवा आपलें दुःख आवरून न धरतां बाप अक्षयीं संतापूं लागला, अथवा दुर्मुखलेला राहूं लागला, तर घरांत शांती न राहतां मुलांस आत्मसंयमन करण्याची सवय लागण्याचा कमी संभव आहे. राग येण्यास खरीं कारणें थोडीं असतात. गैरसमज, उताविळपणा, अविचार, वगैरे कारणांमुळें पुष्कळ वेळां तो उत्पन्न होतो. कित्येकांस विनाकारण टोचून बोलण्याची सवय लागली असते; परंतू असल्या बोलण्यानें दुसऱ्याच्या मनास किती दुःख होतें, याचा त्यांस विचार नसतो. बाहेर कसेंही संतापाचें कारण असो, हा संताप बापानें घरांतील मंडळीवर न काढतां तो आवरून धरून आनंदवृत्तीनें घरांत पाऊल टाकावें. कुटुंबाचा भार बहुतकरून बापावर असतो; त्यास नेहमीं बोलण्याचे व बोलून घेण्याचे प्रसंग येतात. बायकामुलें व सोयरेधायरे यांस न दिल्यामुळें तीं रुसतात व फुगतात. अशा प्रसंगीं बापानें आपणही त्यांच्याबरोबर रूसून फुगून न बसतां, आपले मनाची समतोल वृत्ती ठेविली पाहिजे; व बहुतेक मंडळीस कोणती गोष्ट आवडण्यासारखी आहे, याविषयीं विचार करून ती करण्यासारखी असल्यास त्यानें ती

करावी; म्हणजे मुलांस या सवयीचें वळण लागेल. असें न केलें, तर मुलांसही बोलणें खपेनासें होतें; तींही नाकावर माशी बसू देत नाहींत व कित्येक वेळां डोक्यांत राख घालूं पाहतात.

आत्मसंयमन हा गुण असल्यानें जितकें सर्वांस सुख होतें, तितकेंच अंगीं सौजन्य व सभ्यपणा असल्यानें सर्वांस संतोष होतो. हा गुण बापाच्या अंगीं अवश्य असला पाहिजे. इष्ट-मित्र, सोयरेधायरे व बायकामुलें यांशीं सौजन्यानें व सभ्यपणानें वागलें असतां मुलांसही हाच कित्ता लागतो. आल्यागेल्याचा मान न ठेवितां संपत्तीच्या धुंदीनें, अधिकाराच्या मदानें, अथवा विद्येच्या गर्वानें जर बाप दुसऱ्याचा अपमान करूं लागला, तर मुलेंही त्याचप्रमाणें आचरण करूं लागतील. आपली संपत्ती, आपला अधिकार, आपली विद्वत्ता हीं मनांत न आणितां तो जर नम्रपणानें व मर्यादेनें वागेल, तर मुलेंही त्याचें अनुकरण करतील; परंतू अशा रितीनें वागणारे बाप थोडे दृष्टीस पडतात. प्रथम मुलांचीं नांवें गोड ठेवावयाचीं; पण मागाहून त्यांस हाक मारतांना बाळ्या, नाऱ्या, लख्या, सख्या, या नांवानें हाक मारावयाची; त्यांस शिव्या द्यावयाच्या; लुच्चा, लबाड, गाढव या उपपदांची तर रोजचे रोज सोमवतीच वाहावयाची. असें पुष्कळांचें वर्तन दृष्टीस पडतें. या गोष्टी दिसण्यांत क्षुल्लक दिसतात; परंतू मुलांस घरीं अशा प्रकारचें शिक्षण मिळाल्यामुळें तीं शेजाऱ्यापाजाऱ्याच्या मुलांशीं अथवा नोकरचाकरांपाशीं असभ्यपणानें बोलतात, व त्यांबरोबर बीभत्स भाषण करतात. यामुळें वेळ प्रसंग आला असतां आईबापांस आपले शिक्षणाबद्दल प्रायश्चित्त मिळाल्याशिवाय राहत नाहीं; कारण इतर मुलें एकत्र

वेळूं लागलीं, म्हणजे दिवसांतून एक दोन वेळां तरी आई-बापांचा उद्धार थोडाफार होत असतो. हा उद्धार शिमग्याच्या दिवसांत फार होतो; शिमग्यांत बीभत्सपणाची तर कमाल होते. मुलें या दिवसांत तोंडाचें सूख जितकें घेववेल तितकें घेण्यास आळस करीत नाहींत. चमत्कार हा कीं, या वर्तनाकडे आईबाप कानाडोळा करतात. शिवाय, असल्या वर्तनाचेसुद्धां कांहीं लोक कैवारी आहेत; व तेही मुलांप्रमाणें आचरण करतात. हा प्रकार न झाला, तर शिमगा गाजला नाहीं, असें त्यांस वाटतें. या स्थितीमुळें वाईट परिणाम होतात. यासाठीं आईबापांनीं व विशेषें बापानें या गोष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे. बापाची वर्तणूक नेहमीं सभ्यपणाची असली पाहिजे; कोणतेही प्रसंगीं आपले तोंडांतून बीभत्स भाषण अथवा शिव्या येणार नाहींत, अशाविषयीं त्यानें सदोदीत खबरदारी ठेवावी.

कांहींच्या अंगीं आत्मसंयमन व सभ्यपणा हे दोन्ही गूण असतात, पण त्यांची वृत्ती अक्षर्या फारच गंभीरपणाची असते. मुलांबरोबर फार बोललें असतां तीं अमर्यादा करतील अशी त्यांस भीती वाटते. बाप बसला असतां तेथें मुलें फिरकावयाचीं नाहींत, अशांतच कित्येक लोकांस मोठी प्रतिष्ठा वाटते. परंतू अशा वर्तनानें मुलांच्या मनावर काय परिणाम होतो, याचा ते फारसा विचार करीत नाहींत असें वाटतें. अशा वर्तनानें बापाविषयीं मुलांचा पूज्यभाव कायम राहिल, परंतू प्रेमभाव राहणार नाहीं. मुलें मोकळ्या मनानें आपले विचार त्यास कळविणार नाहींत; तींही दूरदूर राहून आपणास वाटेल तें करतील. ह्यास्तव ज्याप्रमाणें आईची आनंदवृत्ती असणें जरूर आहे, त्याप्रमाणें बापाचीही नेहमीं

आनंदवृत्ती असली पाहिजे. बापानें संसार संबंधी अथवा दुसरी काळजी बाळगून अक्षयीं चिरचीर करीत बसूं नये, किंवा नेहमीं रागीट मुद्रा अथवा गंभीर वृत्ती धारण करूं नये. त्याची आनंदवृत्ती असली, म्हणजे मुलें त्यापाशीं येऊन बसूं लागतील; त्याजपाशीं बसून त्याचें शिक्षण ग्रहण करण्याविषयीं त्यांस शिक्षा न वाटतां उलट आनंद वाटेल; तीं फारशी बाहेर न जातां घरांत राहून कर्मणूक करतील; व बाप बाहेर केव्हां जाईल व आपण मोकळे केव्हां होऊं, असे विचार त्यांच्या मनांत येण्याचें कारण राहणार नाहीं. गोड शब्द बोलण्याला कांहीं पैसा लागत नाहीं; परंतू त्यापासून दुसऱ्यांस आनंद होतो. ही गोष्ट ज्याप्रमाणें आईनें लक्षांत ठेविली पाहिजे त्याप्रमाणें बापानेंही ती लक्षांत ठेविली पाहिजे. बापाची आनंदवृत्ती असावी व त्यानें नेहमीं मुलांशीं गोड बोलावें असें सांगितलें, परंतू हें वर्तन फक्त वरवर उपयोगी नाहीं. मुलांविषयीं त्याची आस्था व कळकळ असली पाहिजे; त्याचें त्यांजवर प्रेम असलें पाहिजे. गृह हें सुखाचें स्थान असावें; घरांतील माणसें हीं एक असावीं; म्हणजे एकाचें सूख तें दुसऱ्याचें सूख; एकाचा आनंद तो दुसऱ्याचा आनंद; एकाचें दुःख तें दुसऱ्याचें दुःख, अशी वस्तुतः स्थिती असावी; लाभालाभौ जयाजयौ हीं सर्वांस सारखीं वाटावीं; परंतू ही स्थिती थोडे ठिकाणीं दृष्टीस पडते. बापापेक्षां आईकडे मुलांचा विशेष ओढा कां बरें असतो ? आईच्या आस्थेमुळें व प्रेमामुळें नव्हे काय ? हाच गूण बापाच्या अंगीं असला पाहिजे; त्याचें वर्तन सडेतोलपणाचें असूं नये. प्रेम भावानें सर्वांचीं मनें एक असतात. हा नसेल, तर परस्परांविषयीं परस्परांचा गैरसमज

होतो; एकमेकांचा एकमेकांस विश्वास नसतो; एकाचें तोंड पूर्वेस तर दुसऱ्याचें पश्चिमेस; बापाचा व्यवसाय मुलांस पटत नाहीं, मुलांचा व्यवसाय बापास आवडत नाहीं. कित्येक वेळां आयांचे असमंजसपणामुळें, कित्येक वेळां बापाच्या दुराचारामुळें अथवा दुराग्रही स्वभावामुळें, कित्येक वेळां मुलांच्या स्वेच्छाचारी वर्तनामुळें व पुष्कळ वेळां पैशावरून घरांत कलह माजतात; व ज्यांमध्यें खरोखर ऐक्य असावयाचें त्यांमध्यें वैरभाव उत्पन्न होऊन एकमेकांनीं एकमेकांचें तोंड पाहूं नये, अशी स्थिती होते. घरांत निरनिराळ्या प्रकृतीचीं निरानिराळीं माणसें असावयाचीं; या सर्वांनीं सलोख्यानें वागणें योग्य आहे; परंतू सर्वांनीं एक दिलानें वागणें फार कठीण आहे, असें अनुभवावरून समजतें. क्वचित् ठिकाणीं हें ऐक्य दृष्टीस पडतें. पैशाची गोष्ट आली, म्हणजे बंधू बंधुत्वाचें नातें विसरतात अथवा पुत्र बापास ओळखीतनासे होतात, ही सर्व स्थिती लक्षांत आणून बापानें फार शहाणपणानें वागलें पाहिजे. त्यानें क्षुल्लक गोष्टींसाठीं कुटुंबांतील माणसांचें मन मोडूं नये; प्रसंग पाहून कधीं ममतेनें, कधीं निःपक्षपातानें, कधीं निस्पृहपणें वागलें पाहिजे. केवळ दुराग्रहानें एकाविषयीं एक प्रकारचें, व दुसऱ्याविषयीं दुसरे प्रकारचें, असें त्याचें वर्तन असूं नये. तथापी, आळसास उत्तेजन व उद्योगाबद्दल शासन, हाही प्रकार उपयोगी नाहीं. कुटुंबांतील माणसांत क्षुल्लक कारणांवरून अनेक वेळां कुरबूर चालू असते. अशा क्षुल्लक गोष्टींत मन न घालतां आपणास जें योग्य व शहाणपणाचें वाटेल, व ज्यांत सर्वांचें कल्याण आहे, तेंच त्यानें केलें पाहिजे. हें वर्तन प्रथमपासून असलें, म्हणजे वरील शोचनीय स्थिती दृष्टीस पडण्याचा कमी संभव आहे.

इतकें करून व मुलांस शुद्धीवर येण्यास कांहीं वेळपर्यंत सवड देऊनही ही स्थिती प्राप्त होईल, तर बापानें आपणास मायापाशांत गुंतवून न घेतां, व लोकापवादास न भितां, योग्य तेंच करावें. कारण, एकाच्या चैनीसाठीं किंवा दुर्वर्तनासाठीं कुटुंबांतील इतर माणसांस भिकेस लावणें, हें शहाणपणाचें काम नाहीं; व एकाच्या दुर्वर्तनासाठीं इतरांस दुर्वर्तनाचें अनुकरण करण्यास सवड देणें हितावह नाहीं. आमच्या पाहण्यांत एक गृहस्थ आला होता. त्यानें हुद्याचीं मोठमोठीं कामें केलीं, व पैशाचा बराच संचय केला. त्यास दोन मुलगे होते. थोरला मुलगा वाईट चालीचा होता. त्यानें आपल्या स्वतःच्या चैनीप्रीत्यर्थ बापाचे सुमारें तीस चाळीस हजार रूपये उडविले; तथापी बाप त्यास पोटाशीं धरून होता. मुलगा गावाबाहेर बंगल्यांत राहत असे. तेथें त्याच्या जेवणाखाण्याची व्यवस्था बापास ठेवावी लागत असे. जेवणाखाण्याच्या अथवा ऐषआरामाच्या व्यवस्थेंत कांहीं उणे पडलें असतां मुलगा उलट बापावर रागावत असे. बापानें मिळवावें व मुलानें उडवावें. हा क्रम कित्येक वर्षें एकसारखा चालू होता. पुष्कळ लोकांनीं बापाची कानउघाडणी केली; परंतू मुलाचा संबंध तोडला असतां लोक आपणास नांवें ठेवितील, हें मनांत येऊन व मायेस गुंतून तो सर्व निमुटपणें सोशीत असे. शेवटीं बहुतेक जिंदगी जाऊन घरदार गहाण ठेवण्याचा प्रसंग आला, तरी तो शुद्धिवर आला नाहीं. असो. एकंदरींत सांगावयाचें हें कीं, बापानें फार शहाणपणानें वागलें पाहिजे. दुराचारी मुलें पोटाशीं धरून कुटुंबांतील इतर माणसांस भिकेस लावणें, हें जितकें वाईट आहे, तितकेंच त्यांविषयीं उदासीन असणें हितकारक नाहीं. बाप सर्व मुलांविषयीं मनः

पूर्वक सारखी आस्था करीनासा झाला, तर मुलेंही त्याविषयीं फिकीर बाळगीत नाहींत व यामुळें कुटुंबांत बिघाड होतो.

आपण हल्लीं असें पाहतों कीं, फार थोडे लोकांस चांगलें भाषण करतां येतें. ज्याच्या भाषणापासून करमणूक होऊन बोध होईल, असे फारच थोडे लोक दृष्टीस पडतात. संभाषण करतां येणें, ही एका प्रकारची कला आहे; हीं अभ्यासानें साध्य आहे. जेवणाच्या वेळीं उगीच एकमेकांच्या तोंडाकडे पाहत बसण्यापेक्षां, अथवा संध्याकाळीं जेवण झाल्यावर वायफळ गप्पा मारण्यांत वेळ घालविण्यापेक्षां, मुलांस बोलावून त्यांस समजेल अशा विषयांवर बापानें स्वतः बोलण्याचा प्रघात ठेविला असतां मुलांस स्वल्पायासानें उपयुक्त माहिती मिळेल; व त्यांसही एक प्रकारची करमणूक वाटेल. जसजसी त्यांस गोडी लागेल तसतसें त्यांसही बोलण्याची उमेद येईल. मुलांच्या अंगीं ग्राहकशक्ती किती आहे व त्यांमध्यें दोष कोणते आहेत हें बापास समजून येईल. त्यांस बापाचे देखत मर्यादेनें बोलण्याचें वळण लागून पुढें तीं सभेमध्यें अथवा स्नेही मंडळींत अचावचा बोलणार नाहींत. मुलें मुखदुर्बळ उपयोगी नाहींत. व्यवहारांत चांगले बोलणाऱ्या माणसांचा उपयोग फार असतो. मार्मिक बोलण्यानें लोकांच्या मनावर छाप बसते, हें पुष्कळांच्या लक्षांत आलें असेल. पुष्कळ लोकांस उपयुक्त माहिती असते; परंतू तिजपासून चार लोकांचें मनरंजन होईल, अशा रितीनें ती सांगण्याची त्यांस सवय नसल्यामुळें, किंवा त्यांच्या अंगीं धीटपणा नसल्यामुळें, त्यांच्या माहितीचा तादृश उपयोग होत नाहीं. कित्येक लोक विद्वान असून उत्तम लिहितात;

परंतु त्यांस समाजांत बोलतां येत नाहीं, ही गोष्ट पुष्कळ लोकांस कळून आली असेल. अभ्यासाशिवाय चांगलें भाषण करतां येत नाहीं; हा अभ्यास घरीं सुरू ठेविला असतां विशेष फायदा आहे.

घरीं जें संभाषण करायाचें, तें एक हात लाकूड व नऊ हात धलपी, या धर्तीवर अथवा बाष्कळपणाचें असूं नये; तें शहाणपणाचें व मार्मिक असावें. एकानेंच गप्पाष्टकास सुरवात करून चऱ्हाट वळीत बसूं नये. असें केल्यानें बाकीच्या मंडळीस बोलण्यास सवड न राहून त्यांस जी सवय असली पाहिजे ती लागणार नाहीं. घरीं जें भाषण करावयाचें, तें केवळ आपली विद्वत्ता अथवा शहाणपणा दाखविण्यासाठीं नाहीं; त्याचा हेतू केवळ दुसऱ्यांस हसवून त्यांचें मनरंजन व्हावें, हा नाहीं. सर्वांस मार्मिक रितीनें उपयुक्त माहिती सांगतां येण्याचें शिक्षण मिळावें, हा संभाषणाचा खरा हेतू आहे. जो खरा भाषण करणारा आहे तो एकटाच बोलत नाहीं. तो आपल्या मार्मिक भाषणानें श्रोत्यांचीं मनें आपणाकडे ओढून घेतो; त्यांस शांतपणें ऐकण्याची सवय लावितो; त्यांच्या मनांत जिज्ञासा उत्पन्न करतो; व त्यांस स्वस्थ बसूं न देतां बोलावयास लावतो.

अलीकडे आपण असें पाहतों कीं, चांगलें भाषण करतां यावें, म्हणून ठिकठिकाणीं वक्तृत्वसभा स्थापन कराव्या लागत आहेत. सर्वच लोकांचें भाषण चांगलें होतें, असें नाहीं. पुष्कळ लोकांस दुसऱ्याचें भाषण शांतपणें ऐकण्याची सवय नसल्यामुळें ते साधारण बोलणारा बोलूं लागला, म्हणजे उतावीळ होतात. ज्याप्रमाणें धीटपणानें शहाणपणाचें भाषण करण्यास सवय असली पाहिजे, त्याप्रमाणें कसाही

बोलणारा असला, तथापि, त्याचें भाषण स्थिरपणें ऐकण्याची सवय असली पाहिजे. या दोन्हीही गोष्टींचें शिक्षण मिळण्यास गृह ही शाळा आहे. कित्येक लोक म्हणतील कीं, रोजच्या रोज भाषणासाठीं नवीन विषय कोठून आणावे? यावर आमचें असें म्हणणें आहे कीं, वर्तमानपत्रांतून प्रस्तुत अनेक विषयांची चर्चा चालू असते; यांपैकीं कोणते तरी विषय, निरनिराळ्या ठिकाणचें स्थलमाहात्म्य, निरानिळ्या लोकांचे आचारविचार, नवीन शोध, खाण्यापिण्याच्या पदार्थांविषयीं माहिती, गांवांतील व इतर ठिकाणची कमजास्त खबरबात, निरनिराळ्या मनुष्यांवर आलेले प्रसंगाची हकिकत, धान्याचे भाव, यंत्रांविषयीं माहिती, रसायनक्रियेचे चमत्कार, शारीरकाविषयीं माहिती, असे अनेक विषय आहेत. या विषयांवर बोलत असतां बोलणें कंटाळवाणे होऊं नये; त्यांत आपली स्वतःची फुशारकी फारशी असूं नये; त्यांत मधन मधून विनोद असावा; परंतू धर्म, नीती, राज्यकारणें, थोर पुरूष, महत्वाचीं कामें, विपत्तींत असणारे पुरूष व स्त्रिया यांसंबंधानें बोलत असतां थट्टेचा यत्किंचित्‌ही भाग नसावा व कोणत्या एकाद्या व्यक्तीस उद्देशून भाषण करण्याचा प्रसंग वारंवार आणीत जाऊं नये.

मनुष्याच्या भाषणावरून पुष्कळ वेळां त्याच्या वर्तनाची परीक्षा होते, ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. पुष्कळ लोक तोंडाचे मोठे फटकळ असतात; कित्येकांचें भाषण बाष्कळपणाचें असतें. अशा लोकांस आपले मनांतील उद्‌गार बोलून दाखविल्याशिवाय चैन पडत नाहीं; मनांत जे विचार येतात ते त्यांस आवरून धरतां येत नाहींत; हे विचार ते बोलून जातात, व त्यामुळें त्यांची

परीक्षा होते. कित्येक फटकळ लोक प्रथम बोलून जातात व नंतर पस्तावा पावतात; त्यांस लहानपणापासून वाक्-संयमन करण्याचें शिक्षण नसतें; म्हणून हा परिणाम होतो. वाक्स्वातंत्र्य असणें हें इष्ट आहे; तरी त्यास कांहीं यत्ता आहे. त्याचा दुरुपयोग होणें उपयोगी नाहीं. छद्मी भाषण बोलून लोकांच्या मनास दुःख द्यावयाचें, किंवा आपण स्पष्टवक्ते आहों असें लोकांनीं आपणास समजावें, म्हणून स्थळ, काळ, परिणाम, वगैरे गोष्टींविषयीं कांहीं एक विचार न करतां तोंड सोडावयाचें, हा वाक्स्वातंत्र्याचा खरा उपयोग नाहीं. कित्येक लोक बोलत असतां त्यांच्या भाषणांत शपथा येतात. गळ्याशपथ, देवाशपथ, वगैरे शब्द ते वारंवार उच्चारतात. ही सवय अज्ञान लोकांस फार असते. कारणावाचून देवाला भाषणांत ओढणें वाईट आहे. ही सवय नसावी हें चांगलें.

कित्येकांस लहानपणापासून कीं, कनी, म्हटलें म्हणजे, म्हणे, साला, अगबाई, हा मेल्यानो, अरे बेट्या, असे शब्द बोलण्याची लकब लागून गेली असते. ही लकब नसणें चांगलें. कित्येकांच्या बोलण्यांत पदोपदीं बीभत्स शब्द येतात; पण असल्या शब्दांमुळें त्यांच्या भाषणावर विरजण पडतें, हें त्यांस समजत नसावें असें दिसतें. सुज्ञ लोक असलें भाषण ऐकण्याचा कंटाळा करतात. हे शब्द वारंवार बोलण्यांत आल्यानें थट्टेस कारण होतें. मनुष्याचें भाषण एरवीं जरी चांगलें असलें, तरी त्यास वरील सवयींपैकीं एखादी सवय असली, म्हणजे तो थट्टेस पात्र होतो; म्हणून ही अथवा अशाच प्रकारची दुसरी सवय मुलास लागणार नाहीं,

अशी बापानें तजवीज ठेवावी. वरील शब्द अथवा त्यां-सारखे दुसरे शब्द उच्चारतांना अथवा शपथ वाहतांना मुलें आढळून आल्यावरोबर त्यावद्दल त्यांस रागे भरावें. तोंडांतून एकदां शब्द गेला कीं, तो परत येत नाहीं. जर हा मर्मभेदक असेल, तर त्याची जन्मभर आठवण राहते व मित्राचे शत्रू बनतात, असें आपण पाहतों. वाणीपासून कार्य मोठें होतें, परंतू ती घोटाळाही फार करते. यासाठीं बापानें मुलांस वाक्संयमन करण्याची सवय लहानपणापासून लावली पाहिजे.

संभाषणाचा विषय थोडासा जास्त लांबला; पण याचें महत्व लक्षांत आणिलें असतां लांब वाटणार नाहीं. ज्यांस संभाषण करण्याची सवय असते त्यांचें ज्ञान नेहमीं जागृत असतें, असें म्हटलें आहे तें यथार्थ आहे. संभाषणाच्या अभ्यासानें मनुष्यास नेहमीं चतुरस्त्र-पणा येतो. असलीं माणसें वेळ योग्य प्रकारें मारून नेणारीं असतात; तीं गांगरत नाहींत. शिवाय, दुसरी गोष्ट अशी कीं, कामामुळें कित्येकांस वाचण्यास सवड नसते; कित्ये-कांस आळस येतो. अशा लोकांस थोडया वेळांत व थोडया श्रमानें उपयुक्त माहिती मिळण्यास संभाषण हें मोठें साधन आहे. संभाषणाच्या द्वारें चार चौघांची माहिती ऐकावयास सांपडून अंगीं बहुश्रुतपणा येतो. कित्येक विषय मुलांस अथवा दुसऱ्यांस समजण्यास कठीण असतात. अशा विष-यांवर मधून मधून बापानें सोप्या रितीनें माहिती सांगितली असतां ती मुलांस समजेल, व त्यांस त्या विषयांचा अभ्यास करण्याविषयीं हुरूप वाटेल. तात्पर्य, हरतऱ्हा करून बापानें मुलांस संभाषण करण्याची सवय लाविली पाहिजे. जर

त्यांस ही सवय लहानपणापासून असेल, तर पुढें त्यांचें फार हीत होईल. संभाषणापासून प्रत्येकास थोडया फार अंशानें फायदा होतो, म्हणून प्रत्येकानें आपला वाटा उचलण्यास आळस करूं नये.

**व्यवस्थितपणा**—मुलांस सकाळीं लवकर उठण्याची व रात्रीं लवकर निजण्याची सवय असणें चांगलें, परंतू आईबापांनीं लवकर उठण्याचा स्वतः परिपाठ ठेविला पाहिजे. कित्येक गृहस्थ असे दृष्टीस पडतात कीं, आठ आठ नऊ नऊ वाजेपर्यंत अंथरूणांत असतात, मग डोळे चोळीत चोळीत बाहेर येतात, व पुनः गप्पा मारीत बसतात. रात्रीं विनाकारण जाग्रण करावयाचें व सकाळीं उशिरां उठावयाचें, हा वेडेपणा आहे. लवकर निजलें असतां झोप येत नाहीं, अशी कित्येकांची कुरकूर असते; परंतू हा त्यांच्या वेडगळ सवयीचा परिणाम आहे, हें ते विसरतात. जशी सवय लावून घ्यावी, तशी लागते. वाईट सवय घालविण्यास कांहीं वेळ लागेल, हें खरें आहे; परंतू ती घालविली पाहिजे. जे उशिरां निजतात व उशिरां उठतात, ते प्रायः अव्यस्थित असतात व आपल्या मुलांस अव्यवस्थितपणाचें वळण लावून देतात. सकाळच्या वेळेचें महत्व किती आहे, हें तें समजत नाहींत, असें दिसतें. स्वतः पहाटेस उठून नंतर मुलांस उठवून त्यांस कामास लावणें, ही पहिली गोष्ट. परंतू बापच आळशासारखा लोळत पडेल, व रात्रीं शुष्क गप्पा मारण्यांत वेळ घालवील, तर मुलांस रागे भरण्यास तोंड राहणार नाहीं. रात्रीं दहा वाजतां निजण्याचा व पहाटेस पांच वाजतां उठण्याचा त्यानें स्वतः क्रम ठेविला पाहिजे, प्रसंगविशेषीं

मात्र फेरफार करावयाचा. असा नियम ठेवल्यानें बराच व्यवस्थितपणा राहतो व त्याचा मुलांच्या वर्तनावर परिणाम होतो; म्हणून ह्या बाबतींत खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे.

मुलांनीं घरीं असावें, दारोदार उगीच हिंडत असूं नये, व चकाट्या पिटवीत बाहेर निष्कारण वेळ घालवूं नये, अशी बापाची इच्छा असेल, तर स्वतःच्या चैनीसाठीं भटकत फिरणें त्यानें प्रथम बंद केलें पाहिजे. कांहीं लोक असे दृष्टीस पडतात कीं, रात्रीं एकदां शहरांतून फेरफटका केल्याशिवाय त्यांस चैन पडत नाहीं. ज्या वेळेस जरूरीचें काम असेल त्या वेळेस बाहेर जाण्यास हरकत नाहीं; परंतू केवळ स्वतःच्या चैनीसाठीं बाहेर जाणें, मुर्खपणा आहे. जरूरीच्या कामाशिवाय इतर वेळीं बापानें घरीं असणें चांगलें. त्यापासून मुलांचें हीत फार होतें. मुलांवर नजर ठेवण्यास व त्यांस भूतदयेचें शिक्षण देण्यास लहानपण हाच योग्य काळ असतो. मुलें मौजेनें किडा, मुंगी वगैरे गरीब प्राणी चिरडून टाकतात; गमतीखातर मांजराचें शेपूट धरून त्यास फरफर ओढतात; कुत्र्याला अथवा गाढवाला उगीच धोंडे मारतात. ह्या गोष्टी दिसण्याला क्षुल्लक दिसतात, परंतू काळेंकरून ह्या व ह्यांपेक्षां अधीक निर्दयपणाच्या गोष्टी करतांना त्यांच्या मनांत शंका येत नाहीं. अशा गोष्टी करतांना मुलें दृष्टीस पडलीं असतां त्यांस वेळचे वेळेवर दापीत गेलें पाहिजे. असें न केलें, तर मनाची वृत्ती कठोर होत जाऊन जी भूतदया त्यांस असली पाहिजे ती कमी कमी होत जाईल. असें होणें इष्ट नाहीं.

**मिजास न वाढविणें**—बापानें एक महत्वाची गोष्ट लक्षांत

ठेवावयाची ती ही कीं, त्यानें आपलीं मुलें मिजासी होऊं देऊं नये. ही गोष्ट मध्यम स्थितींतील लोकांनीं विशेष ध्यानांत ठेवणें जरूर आहे; कारण, त्यांनीं मिजास वाढवूं दिली, तर त्यांचें नुकसान होईल. हल्लीं पुष्कळ ठिकाणीं असें पाहण्यांत येतें कीं, मुलांस वाण्याच्या दुकानीं जाऊन हातांत तुपाचें अथवा तेलाचें भांडें घेण्यास, भाजीचें गाठोडें खांद्यावर घेऊन भर रस्त्यांतून जाण्यास, कारणपरत्वें विहिरीची घागर काढण्यास, प्रसंगानुसार स्वयंपाक करण्यास, अथवा अशाच प्रकारचीं दुसरीं कामें करण्यास लाज वाटते. दोन अक्षरें येऊं लागलीं कीं, तीं आपणांस मोठे समजूं लागतात. त्यांस गरिबीची लाज वाटते; गरीब परंतू प्रत्यक्ष जन्म देणाऱ्या बापाचीसुद्धां लाज वाटून त्याचा धंदा सांगण्याची त्यांस शरम वाटते. अशा मुलांस दोन पैसे मिळूं लागले, तर त्यांस दोन बोटें स्वर्ग उरतें व तीं आईबापांचा उपमर्द करतात. एका गृहस्थाची अशी गोष्ट सांगतात कीं, तो लहानपणीं फार गरीब होता. पुढें दोन पैसे मिळवून त्यानें घरदार बांधलें. तो मोठा खर्चिक होता. संपत्तिवान गृहस्थ खर्चिक असला, म्हणजे त्याच्या घरीं मित्रमंडळी जमावयाचीच; मग हा गृहस्थ ज्ञानशून्य असो किंवा त्याचें आचरण कसेंही असो. चमत्कार हा कीं, विद्वान लोकसुद्धां अशा लोकांचा समागम करतात. असो. एके दिवशीं या गृहस्थाच्या घरीं दिवाणखान्यांत त्याची स्नेहीमंडळी बसली होती. त्याचा बाप आपल्या गावाहून आला होता, तोही तेथेंच बसला. हा मनुष्य कोण आहे, हें मंडळीस माहीत नव्हतें. एकानें या मनुष्याविषयीं वरील गृहस्थापाशीं विचारपूस केली. बाप जुन्या काळचा भोळसट मनुष्य होता; त्याचा पोषाक साधा-

रण होता; आपला श्रीमान मुलगा मंडळींत बसला असतां, आपण तेथें बसूं नये, हें त्यास सुचलें नाहीं. हा मनुष्य कोण, म्हणून एकानें विचारल्यावर मुलानें उत्तर केलें कीं, हा आमच्या येथें पुजारी ब्राम्हण आहे. हे शब्द बापास ऐकूं गेले. त्यास फार राग आला; व राग आवरून धरण्याचें भान राहिलें नाहीं; म्हणून मुलास तो टाकून दोन शब्द बोलला. हा मनुष्य त्या गृहस्थाचा बाप आहे, हें ऐकून मंडळीस मोठें आश्चर्य वाटलें. अशा प्रकारच्या पुष्कळ गोष्टी आहेत. यासाठीं बापानें प्रथमपासून सावधगिरी ठेवावी. कोणत्या वेळीं कसा प्रसंग येतो, हें सांगतां येत नाहीं. जसा प्रसंग गुदरेल तसें त्यास तोंड देण्याची सवय असली पाहिजे; म्हणून प्रथमपासून मुलांस सर्व प्रकारचीं कामें स्वतः करण्याची सवय असली पाहिजे; त्यांच्या मनांत स्वतःच्या मोठेपणाविषयीं मुर्खपणाची कल्पना येणार नाहीं, अशाविषयीं बापानें खबरदारी घेतली पाहिजे. क्षुल्लक कारणावरून त्यांचा विनाकारण पाणउतारा करणें, अथवा लाडांत येऊन अथवा संतापानें त्यांस शिव्या देणें, हें जितकें वाईट आहे, तितकेंच त्यांचे वाजवीपेक्षां फाजील स्तोम वाढविणें अथवा दंभ माजविणें, हेंही वाईट आहे. हींच गोष्ट मुलींस लागू आहे.

गृहशिक्षणसंबंधी ज्या गोष्टींचें आम्हीं येथवर निरूपण केलें त्या गोष्टी आईबापांनीं लक्षांत ठेऊन त्याप्रमाणें आचरण करण्याचा यत्न केला असतां, मुलें चांगली निपजण्याचा पुष्कळ संभव आहे. वर ज्या गोष्टी सांगितल्या त्या पुष्कळांस करतां येण्यासारख्या आहेत. दुर्दैवेंकरून कांहीं मुलांच्या आया लहानपणींच मरण पावतात; कांहींचे बाप मरण पावतात; कांहींस तर हीं दोन्हीं नसतात.

कित्येक आईबापांस पोटपाण्याच्या संबंधानें मुलांपासून दूर राहणें भाग पडतें; कित्येकांची घरीं सोय नसल्यामुळें मुलांस शहरांत शिकण्यास पाठवावें लागतें. अशा स्थितींत आईच्या पश्चात् सर्व जबाबदारी बापावर आहे; बापाच्या पश्चात् आईवर आहे; उभयतांच्या अभावीं मुलांच्या आप्तांवर अथवा पालकांवर आहे; मुलें अगदींच निराश्रित असलीं, तर त्यांचा सांभाळ करणें सर्वांचें कर्तव्य आहे. हें करणें महत्पुण्य आहे. अशा कामीं पैसा खर्च करणें सत्पात्रीं दान आहे. आपण सर्व एकाच नौकेंत आहों; कांहीं अडचणींमुळें अथवा गैरसोयींमुळें अथवा दुर्दैवामुळें कित्येकांस आज गैरसोय प्राप्त झालेली आहे; अथवा कित्येकांवर प्रसंग येऊन गुदरला आहे. अशा प्रकारची आपणास गैरसोय होणार नाहीं म्हणून कशावरून? आपणांपैकीं कांहींचीं मुलें निराश्रित राहणार नाहींत म्हणून कशावरून? जोंपावेतों ही गैरसोय उत्पन्न झाली नाहीं, अथवा प्रसंग गुदरला नाहीं, तोंपावेतों आपण आपल्या पोटच्या गोळ्याकरतां वेळेवर तजवीज करणें जरूर आहे.

जीं मुलें शिकण्यासाठीं गावोगाव राहतात, त्यांवर बरोबर देखरेख नसल्यामुळें तीं बिघडतात, असा अलीकडे बोभाटा ऐकूं येतो. या मुलांपैकीं कांहींस खाणावळींत जावें लागत असल्यामुळें खाण्यापिण्याच्या बाबतींत त्यांचे हाल होतात. मुलांच्या खाण्यापिण्याचे हाल होऊं नयेत व त्यांवर देखरेख ठेवतां यावी, म्हणून प्रथम शहरांतून मुलांच्या संख्येच्या मानानें व पैशाच्या तजविजीप्रमाणें एक, दोन, तीन, चार, बोर्डिंगें असावीं. कांहीं ठिकाणीं भाड्यानें घरें मिळतील व इतर ठिकाणीं तीं बांधावीं लागतील. या संबंधानें प्रथम पैसा

खर्च करावा लागेल, परंतू मुलांस नेहमींचा खर्च फारसा लागणार नाहीं. गावांतील चार प्रतिष्ठित लोक इतर सार्वजनीक कृत्यांप्रमाणें हें सत्कृत्य समजून मुफत देखरेख करण्यासाठीं आपला वेळ खर्च करतील. प्रस्तुत, असल्या बोर्डिंगांची फार जरुरी आहे. यांची व्यवस्था नीट चालली, तर पुढें ठिकाठिकाणीं जास्ती स्थापन करण्यास लोकांस उत्तेजन वाटणार आहे. प्रथमतः हा उपाय करण्यास लागावें; नंतर दुसरा उद्योग हातीं घ्यावा. व्यवस्थित रितीनें चालू असलेल्या बोर्डिंगांमध्यें मुलें राहिल्यानें त्यांचें वर्तन चांगलें असण्याचा फार संभव आहे. जीं मुलें आईबापांपासून दूर राहिलीं आहेत, त्यांस तर वर सांगितलेल्या प्रकारच्या बोर्डिंगांपासून फार उपयोग आहे.

**खरा गृहस्थाश्रम**--आतां गृहशिक्षणसंबंधानें एका गोष्टीविषयीं विचार करावयाचा आहे. ती विशेषें आपल्या हिंदू कुटुंबास लागू आहे. ही गोष्ट हिंदू कुटुंबाची सांप्रतची स्थिती. स्थूल मानानें पाहतां एकत्र राहणें ही हल्लीं हिंदू कुटुंबाची स्थिती होय. ही स्थिती चांगली किंवा निराळें राहणें चांगलें, हा प्रश्न जरी महत्वाचा आहे, तरी त्याविषयीं सविस्तर विचार करण्याचें हें स्थळ नाहीं. ह्या प्रश्नाविषयीं स्थूल मानानें विचार करतां सांप्रतच्या स्थितींत ज्याप्रमाणें नफे आहेत त्याप्रमाणें तोटेही आहेत. परंतू देशस्थितींत जे फेरफार झाले आहेत व होत आहेत ते लक्षांत आणून नफा जास्त आहे किंवा तोटा जास्त आहे, ह्याविषयीं विचार केला पाहिजे. ह्या दृष्टीनें पाहतां सांप्रतच्या स्थितींत नफ्यापेक्षां तोटा जास्त आहे असे म्हणावें लागतें. एकत्र राहिल्यानें कुटुंबांतील माण-

सांचें परस्पराविषयीं प्रेम असतें; एकाच्या शिरावर भार असल्यामुळें बाकीच्यांस काळजी वाहण्याचें बहुतकरून फारसें कारण नसतें. जरी एकाद्यानें श्रम केले नाहींत, तरी त्यास उपाशीं मरण्याची बहुधा पाळी येत नाहीं; परतंत्र स्थितींत राहावें लागतें, म्हणून हुकूम पाळण्याचें वळण लागतें; एकाच्या सदाचरणाचें अनुकरण दुसऱ्यास करावयास सापडतें; एकाची मदत दुसऱ्यास होते; श्रमविभाग होऊन मोठें फळ मिळण्याचा संभव असतो; एकत्र राहिल्यानें खर्च बेताबातानें होतो. हे व अशाच सारखे दुसरे फायदे एकत्र राहिल्यापासून होतात हें खरें आहे; तथापी एकत्र राहिल्यानें भावाभावांमध्यें, बापलेकांमध्यें, सास्वासुनांमध्यें अथवा जावाजावांमध्यें भांडणकज्जे उत्पन्न होण्याचे अनेक प्रसंग येतात; व कुटुंबाचा भार वाहणारा व विशेषें त्याची बायको शहाणी नसेल, तर असले प्रसंग वारंवार उत्पन्न होण्याची भीति असते. घरांत ऐक्यभाव व प्रेम हीं दृष्टीस पडावीं, परंतू असें न होतां कित्येक वेळां परस्परांचीं मनें परस्पराविषयीं शुद्ध राहत नाहींत व केव्हां केव्हां, तर मनें विटून जाऊन एकमेकांनीं एकमेकांचें तोंड पाहूं नये, येथवर मजल येऊन ठेपते. स्त्रियांची आपआपसांतील धुसफूस, घालून पाडून भाषण करण्याची सवय, व त्यांच्यांतील मत्सरभाव वगैरे प्रकार सुरू होण्यास सवड असते. एकत्र राहण्यांत दुसरा असा तोटा आहे कीं, आळशी व निरुद्योगी मनुष्यास उत्तेजन मिळतें. बाप, अथवा आई अथवा भाऊ मोहपाशांत गुंतून अथवा अब्रूस भिऊन त्याचें पोषण करतो; परंतू रात्रंदिवस त्याविषयीं तो फिकिरींत असतो; रात्रंदिवस त्याच्या मागें हृद्रोग असतो.

एकादा मुलगा चैनी निघाला, तर त्याच्या चैनीबद्दल बाकी-च्यांस निष्कारण प्रायश्चित्त मिळतें, अशींही कांहीं उदाहरणें दृष्टीस पडतात.

ज्या तोट्यांविषयीं वर दिग्दर्शन केलें त्यांहून विशेष महत्वाचा तोटा हा आहे कीं, एकत्र राहिल्यानें स्वावलंबन व विचारस्वातंत्र्य ह्या दोन गुणांची अभिवृद्धी व उत्कर्ष होण्यास अडचण असते. कारण, मुलाच्या मनांत पुष्कळ गोष्टी करावयाच्या आल्या, तरी त्यास आपला उत्साह व हिंमत हीं जागच्या जागीं ठेवावीं लागतात. स्वतंत्र राहून बुद्धीचा विकास करण्यास व आपल्या मताप्रमाणें वागण्यास जितकी मोकळीक सापडते, तितकी परतंत्र राहिल्यानें सापडत नाहीं. ज्यांनीं आपणास कडेवर व खांद्यावर घेऊन लहानाचें मोठें केलें त्यांच्या मनास दुःख होऊं नये, ज्यांबरोबर आपण जेवलों, खेळलों व आनंदांत दिवस घालविले त्यांस आपल्या आचरणानें वाईट वाटूं नये, व वडिलांचा उप-मर्द केल्याबद्दल अथवा दुसऱ्या माणसांचा अपमान केल्या-बद्दल व आपणासाठीं दुसऱ्या माणसांनीं जी खस्त खाल्ली तिजबद्दल उपकार न स्मरतां आपण स्वेच्छाचारी, उच्छृं-खळ अथवा कृतघ्न बनलों, असा आपणावर दोष येऊं नये, म्हणून मनांतील विचार मनांत ठेवणें पुष्कळांस भाग पडतें. आम्ही प्रस्तुत जो विचार करीत आहों, तो लहान मुलां-विषयीं नाहीं. जीं मुलें मोठीं झालीं आहेत व ज्यांस आपलें हिताहीत समजूं लागलें आहे त्यांविषयीं आहे. अशा मुलां-विषयीं विचार करतां त्यांची स्थिती कांहीं अंशीं नोकरांसारखी असते. अधिकाऱ्यास ज्या गोष्टी अथवा जीं मतें प्रिय असतात त्यांत नोकर लोकांस बरीच मोकळीक

असते; परंतू ज्या गोष्टी त्यास अप्रिय असतात त्यांसंबंधानें नोकरांस फार सावधगिरीनें वागावें लागतें. आपण विरुद्ध वागलों असतां आपणांवर इतराजी होईल कीं काय, अशी त्यांस भीती असते, व ह्यामुळें कित्येक वेळां त्यांस आपले विचार गुंडाळून ठेवावे लागतात. अधिकारी समंजस व उदार मनाचा असला, तर फारसा त्रास होत नाहीं; परंतू तोच त्रासीक, दीर्घद्वेषी, हेकट, कुढ्या मनाचा, हलक्या कानाचा, मत्सरी अथवा फटकळ असला, म्हणजे फार त्रास होतो. त्याप्रमाणें बाप शहाणा असला, म्हणजे बरेंच सूख होतें; परंतू त्यांत वरील दोष असले म्हणजे त्रास होतो. स्वतंत्र धंदा करणारे व नोकर ह्यांची जी स्थिती असते, तीच बरेच अंशीं स्वतंत्र राहणारांची व एकत्र राहणारांची असते. ज्यावर कुटुंबाचा भार असतो त्यावर जबाबदारी असते व जबाबदारीचें काम कसें करावें, समयास उचीत आचरण कसें करावें, अडचणींतून कसें पार पडावें वगैरे गोष्टींचें शिक्षण त्यास मिळण्याचे प्रसंग वारंवार येतात. बाकीचे बहुशा सांगकामे अथवा बोजा उठविणारे बनतात. थोडया लोकांजवळ पैसा असून बाकीचे केवळ पोटभरू मजूर बनणें किंवा थोडे लोक विद्वान होऊन बाकीचे अज्ञान व भोळसट असणें, हें ज्याप्रमाणें देशाचे शाश्वतच्या कल्याणास अपायकारक असतें, त्याप्रमाणें वरील शिक्षण थोडयांस मिळणें व बाकीचे ऐदी व दुर्बळ राहणें इष्ट नाहीं. अशी स्थिती असणें फारच वाईट आहे. देशांतील प्रत्येक मनुष्यास शिक्षण मिळालें पाहिजे व बुद्धी खर्च करण्याचे व सामर्थ्य दाखविण्याचे त्यास प्रसंग आले

पाहिजेत. हें शक्य नाहीं हें आम्ही समजून आहों; म्हणून बहुसमाजाच्या संबंधानें, निदान जितक्या व्यक्तींच्या संबंधानें शक्य असेल तितक्या व्यक्तींच्या संबंधानें ही गोष्ट झालीच पाहिजे. कुटुंबांतील एका व्यक्तीच्या बुद्धीचा व उत्साहाचा उपयोग होणें व बाकीच्या लोकांच्या बुद्धीचा व सामर्थ्याचा तादृश उपयोग न होतां तीं तशींच राहूं देणें शहाणपणाचें नाहीं. हिंदू लोक गरीब आहेत व ते सर्व सोसून घेतात ह्या गोष्टीचें कांहीं लोक कौतूक करतात, हा चमत्कार आहे. स्थूल मानानें पाहतां हिंदुस्थानची हवा दुर्बलता आणणारी व ह्यामुळें उत्साह कमी करणारी आहे. इतर दुसऱ्या कांहीं कारणांनीं दुर्बल स्थिती झालेली आहे. ती कोणाच्या दोषांमुळें झाली आहे, ह्याविषयीं येथें विचार कर्तव्य नाहीं. जर अशी स्थिती आहे, तर आणखी दुर्बलता आणण्यास, उत्साह कमी करण्यास व बुद्धीचा उपयोग करण्यासाठीं कमी सवड ठेवण्यास आम्हीं होऊन साहाय्यभूत व्हावें. हें योग्य नाहीं, असें आम्हास वाटतें. विचारस्वातंत्र्याविषयीं प्रेम व स्वावलंबन हे दोन गुण मनुष्याच्या अंगीं अवश्य असले पाहिजेत. जोंपावेतों हे दोन गुण लोकांमध्यें येणार नाहींत, तोंपावेतों त्यांची निकृष्ट अवस्था असावयाची. स्वतंत्र राहून हे दोन गूण चांगल्या रितीनें संपादन करतां येतील किंवा कुटुंबांत दाबांत व कचाटींत राहून संपादन करतां येतील? हे गूग अंगीं चांगले वास करण्यास शिक्षणच पाहिजे; व हें शिक्षण मिळण्यास स्वतंत्र राहून ज्याची त्याजवर जबाबदारी असली पाहिजे, ज्याचा त्यास अनुभव आला पाहिजे, ज्याच्या त्यास ठेचा लागल्या पाहिजेत, व ज्याचा त्यानें मार्ग पुढें काढला पाहिजे; मरेपर्यंत पोटाशीं धरून उप-

योग नाहीं. मरेपर्यंत कचाटींत धरून वरील दोन गूण चांगल्या रितीनें अंगीं येणार नाहींत. हे दोन गूण अंगीं येण्यासाठीं थोडेंसें नुकसान झालें, त्रास सोसावा लागला, अथवा हालअपेष्टा झाली, तरी कांहीं हरकत नाहीं. ह्या गोष्टी थोडा वेळपर्यंत होतील व झाल्याच पाहिजेत. त्यांशिवाय वरील गूण चिरकाल राहणार नाहींत.

एकत्र राहिल्यानें थोडक्यांत निर्वाह होतो, व थोडक्यांत गरजा भागतात, हें खरें आहे. कारण, निराळा संसार मांडला, म्हणजे पुष्कळ निराळ्या गोष्टींबद्दल जास्त खर्च करावा लागतो; परंतू ह्याबद्दल वाईट वाटण्याचें कारण नाहीं. थोडक्यांत निर्वाह करतां आला, म्हणजे मोठा पुरुषार्थ साधला, असें समजतां कामा नये. मनुष्याच्या गरजा जों जों वाढत जातात तों तों त्यास अधीक अधीक श्रम करणें व अधीक अधीक बुद्धी खर्च करणें भाग पडतें, व ह्यामुळें राष्ट्राचें पाऊल पुढें पडावयास सहाय्य होतें. लौकीक मिळविण्यासाठीं, अध्ययन करण्यासाठीं अथवा तत्त्व ठरविण्यासाठीं कांहीं लोक श्रम करतात; परंतू ही गोष्ट थोड्या व्यक्तींस लागू आहे. पुष्कळ लोक जे श्रम करतात, ते निर्वाहाचे तजविजोसाठीं करतात. ही तजवीज झाली, म्हणजे ते स्वस्थ असतात. बहुसमाजाविषयीं विचार करतां चरितार्थासाठीं दोन पैसे मिळविणें, हा श्रम करण्याचा मुख्य हेतू असतो. जर ही गोष्ट खरी आहे, तर ज्या योगानें लोक जास्त श्रम करावयास लागतील व बुद्धी जास्त खर्च करतील तें करणें श्रेयस्कर, किंवा त्यांस स्वस्थ बसूं देणें श्रेयस्कर. प्रथम कदाचित् त्रास पडेल व हाल होतील; परंतू ह्याकडे लक्ष देण्यांत अर्थ नाहीं. मुख्य गोष्ट

परिणामावर नजर देणें, ही होय. हें म्हणणें कठोर आहे असें कदाचित् कांहीं लोकांस वाटेल; परंतू प्रथम थोडेंसें दुःख व परिणामीं सूख व्हावयाचें आहे, तर कोरडी दया करण्यांत काय अर्थ आहे ? निर्वाहाची तजवीज थोडक्यांत होऊं लागली असतां आळस व अल्पसंतुष्टता वाढण्याची भीती असते. सुधारणेस हे दोन महा शत्रू असतात. तेव्हां ज्या योगानें ह्या दोन रिपूंचा नाश होईल, निदान त्यांचा जोर कमी होईल, तें करणें चांगलें किंवा ज्या योगानें ते जोरावतील तें करणें शहाणपणाचें ? निर्वाहाची तजवीज थोडक्यांत होणें व गरजा थोडक्यांत भागणें, हें एका अर्थानें चांगलें नाहीं. ह्या देशास ज्या कारणांमुळें निकृष्ट स्थिती प्राप्त झाली त्यांपैकीं निर्वाहाची तजवीज थोडक्यांत होणें, हें एक होय. ह्याविषयींचा खुलासा आम्हीं स्वतंत्र ग्रंथांत केला आहे; म्हणून ह्या ठिकाणीं एवढेंच सांगतों कीं, जमिनीच्या सुपीकपणामुळें थोडक्यांत निर्वाह होऊं लागला, म्हणजे लोकसंख्या वाढत जाते, लोकसंख्येच्या वृद्धीमुळें मजुरीचा दर कमी होतो व ह्यामुळें लोकांची निकृष्ट स्थिती होते. स्वतंत्र राहिल्यानें निर्वाहास जास्त खर्च लागेल व ह्यामुळें लोकसंख्येच्या वृद्धीस थोडा तरी प्रतिबंध होईल. हें आम्ही कांहीं काल्पनीक सांगत आहों, असें नाहीं. इतर सुधारलेल्या देशांतील लोकांची स्थिती मनांत आणिली असतां वरील विचारांची सत्यता कळून येईल.

आजचा दिवस लोटला, उद्यांचें कसें होईल, आपले दिवस कसे तरी लोटतील; परंतू मुलांचें कसें होईल, ही विवंचना बहुतेक लोकांस थोडी फार असते; परंतू ज्याचा तो मिळविता झाला व ज्याचा तो आपली व्यवस्था पाहूं

लागला, म्हणजे तितकी काळजी करण्याचें कारण राहत नाहीं, इतकेंच नाहीं, तर मनाला थोडें समाधान असतें. स्वतंत्र राहिल्यानें निर्वाहाची व इतर गोष्टींची व्यवस्था ज्याची त्यास करणें भाग पडतें. ह्यामुळें बापावरचा तितकाच भार कमी होतो. पुष्कळ वेळां असें पाहण्यांत येतें कीं, मुलें स्वतंत्र रितीनें व्यवस्था करण्यास समर्थ असतात; परंतू बापास भरंवसा न वाटून तो काळजीच करीत असतो. मुलगा स्वतंत्र राहिल्यानें ही काळजी करण्याचें विशेष कारण राहणार नाहीं.

आतां ही गोष्ट खरी आहे कीं, मुलगा स्वतंत्र राहिला, म्हणजे त्याच्या जवळ असणारीं माणसें निराळीं, त्याचा व्यवसाय निराळा, व त्याचे हेतू निराळे असावयाचे. ह्यामुळें बापावरील, आईवरील अथवा दुसरे माणसांवरील त्याच्या प्रेमांत अंतर पडण्याचा संभव आहे. कित्येक वेळां तो अगदीच अलग राहून आईबापांचा अथवा बहीणभावंडांचा समाचार घेणार नाहीं, असाही संभव आहे; परंतू जे मुलगे कृतघ्न, मतलबी अथवा अदूरदर्शी आहेत त्यांस ही गोष्ट लागू आहे. बापानें आपणास लहानाचें मोठें केलें, याबद्दल त्याच्या संबंधानें आपलें कांहीं कर्तव्य आहे, व आपल्या कृतघ्नपणाच्या कृतीनें त्यावर जो प्रसंग आला आहे तोच प्रसंग कदाचित् आपणावर येईल, व आपणच बापास ओळखीतनासे झालों, तर आपलीं मुलेंही आपणास विचारणार नाहींत, ही गोष्ट जे लक्षांत आणणार नाहींत, त्यांच्या हातून वरील गोष्ट होण्याचा संभव आहे; किंवा सर्वस्वी स्त्रैण होऊन ज्यांनीं स्वत्व घालविलें आहे, त्यांच्या हातून मुर्खपणाचें वर्तन होण्याचा संभव आहे; इतरांच्या हातून नाहीं. स्वावलंबन व विचारस्वातंत्र्य ह्यां-

विषयींचें प्रेम व त्यामुळें पुढें होणारें मुलाचें व देशाचें हीत, ही जी मुख्य गोष्ट तिजवर नजर देणें, व आपल्या हिताहिताची गोष्ट बाजूस ठेवणें, बापास अवश्य आहे.

स्त्रियांची स्थिती सुधारल्याशिवाय देशाची स्थिती सुधारावयाची नाहीं व त्यांची उन्नती झाल्याशिवाय देशाची उन्नती व्हावयाची नाहीं; परंतू त्यांची स्थिती सुधारावयाची, म्हणजे त्यांवर जास्त भरंवसा ठेवावयाचा, त्यांकडे जास्त जबाबदारीचें काम सोपवावयाचें, त्यांस जास्त शिक्षण द्यावयाचें व त्यांस जास्त स्वातंत्र्य द्यावयाचें. हिंदू कुटुंबाच्या प्रस्तुतच्या स्थितीविषयीं विचार केला असतां स्वतंत्र राहिल्यानें ह्या गोष्टी जितक्या सुलभ रितीनें करतां येतील तितक्या कचाट्यांत ठेवून करतां येणार नाहींत. स्त्रियांस वागविण्याच्या संबंधानें कांहीं लोकांच्या समजुती चमत्कारीक आहेत. ह्यामुळें त्यांस स्वातंत्र्य देणें कांहींसें कठीण झालें आहे.

वर ज्या नफ्यातोट्यांविषयीं विवेचन केलें त्यावरून प्रस्तुतच्या स्थितींत स्वतंत्र राहण्यापासून जास्त फायदा आहे, हें कळून येईल. एकत्र राहण्यापेक्षां स्वतंत्र राहण्यांत विशेष फायदा व सूख आहे असें आम्हीं म्हटलें, परंतू मुलास वाटेल तेव्हां स्वतंत्र ठेवावयाचें, असें नाहीं. या गोष्टीस तरी यत्ता आहे व ह्या गोष्टीचा तरी काळ आहे. प्रस्तुतच्या एकंदर स्थितीविषयीं विचार करतां मुलास पंचविसावें वर्ष लागलें, म्हणजे एकत्र राहण्याची यत्ता संपली असें समजावें. कांहीं स्वाभावीक अथवा कृत्रिम कारणांनीं मुलगा दुर्बळ झाला असेल, अथवा बापाची, आईची अथवा बहिणभावंडांची स्थिती मनांत आणितां, मुलानें एकत्र राहणें अवश्य आहे असें दिसेल, तर गोष्ट निराळी. नाहीं तर, मुलास २५ वें वर्ष लागलें,

म्हणजे बापानें त्यास स्वतंत्र ठेवावें हें बरें. आठवे वर्षी उपनयन झाल्यावर ब्रम्हचारी राहून गुरुगृहीं अध्ययन करावयाचें व हें अध्ययन संपलें, म्हणजे गृहस्थाश्रम स्वीकारावयाचा, अशी प्राचीन काळीं चाल असे. आतांचा मनू निराळा, अध्ययन निराळ्या प्रकारचे व गुरुही निराळ्या प्रकारचे आहेत. असा जरी प्रकार आहे, तरी, प्राचीन वहिवाटीप्रमाणें कांहीं अंशीं चालण्यास हरकत दिसत नाहीं. बाप गुरुस्थानीं आहे व शाळेंतील अथवा पाठशाळेंतील शिक्षकही गुरुस्थानीं आहेत; तेव्हां बाप व शिक्षक ह्या उभयतांपासून जें शिक्षण मिळण्यासारखें असेल, तें मिळाल्यावर स्वतंत्र रितीनें गृहस्थाश्रमांत प्रवेश करावयास सवड द्यावी, हें चांगलें. हें शिक्षण संपण्याचा काळ बहुतकरून वीसपासून पंचवीस पर्यंत होय. लग्न झाल्याबरोबर स्वतंत्र राहण्याची चाल युरोपियन लोकांमध्यें आहे. परंतू हिंदू समाजाविषयीं विचार करतां हा प्रकार सुरू होण्यास अनेक अडचणी आहेत; शिवाय, तो आम्हास प्रशस्तही वाटत नाहीं. लग्न झाल्यावर मुलीनें कांहीं दिवस सासूच्या, अथवा कांहीं कारणांनीं जिच्याकडे सासूचा अधिकार आला आहे तिच्या हाताखालीं असणें फार जरूर आहे. आईबापांच्या घरीं मुलीस चांगलें शिक्षण मिळालें आहे, अशी जरी कल्पना केली, तरी, सासरीं कांहीं दिवस घालविणें हें तरी एक प्रकारचें शिक्षणच आहे, व तें महत्वाचें व आवश्यक आहे. माहेरीं मुलीस पुष्कळ स्वतंत्रता असते. ह्या स्थितींतून स्वतंत्रतेच्याच स्थितींत लागलींच प्रवेश न होतां कांहीं दिवस परतंत्र स्थितींत राहिल्यानें मनाची उद्दाम वृत्ती कांहीं अंशीं कमी होऊन हीत होणार आहे. दुसरें असें कीं,

नवऱ्याच्या घरची रीतभात, कुलाचार वगैरे गोष्टी भिन्न असल्यास त्यांची माहिती होऊन नवऱ्यास काय आवडतें व काय आवडत नाहीं, हें पाहण्यास संधी सांपडते व त्याप्रमाणें वागण्यास तीस बरें पडतें. त्याचप्रमाणें आपल्या बायकोचा स्वभाव कसा आहे व तिच्यांत गुणदोष कोणते आहेत हें समजून घेऊन त्या धोरणानें आपल्या वर्तनांत बदल करण्यास नवऱ्यास संधी सापडते. ही गोष्ट थोडे दिवसांत होत नाहीं. ज्या माणसांच्या जन्माच्या गाठी पडावयाच्या, त्यांस परस्परांच्या स्वभावाविषयीं स्वतंत्र राहिल्यावर तोंडाशीं तोंड देऊन माहिती मिळण्यापेक्षां ती माहिती अगोदर मिळणें चांगलें, असें आम्हास वाटतें.

मुलांचें आईबापांविषयींचें प्रेम कमी होण्यास कांहीं अंशीं बायको कारण असते, असें ऐकूं येतें. नवऱ्याचा ओढा आपल्या माणसांकडे व बायकोचा ओढा माहेरच्या माणसांकडे, असा बहुधा प्रकार असतो; व असें असणें स्वाभावीक आहे. दोघे दोहोंकडे ओढीत असतात, असें अनेक वेळां पाहण्यांत येतें, व ज्याप्रमाणें उभयतांच्या मनाची स्थिती असते त्याप्रमाणें नवरा किंवा बायको आपला हेका चालविते किंवा हात टेकते. दोघेही जण शहाणीं असलीं, तर तडजोड होऊन गाडा सुरळीत चालतो. एकदम स्वतंत्र राहिलें असतां नवऱ्याच्या माणसांविषयीं बायकोचें प्रेम हें कांहीं अंशीं ऐकीव माहितीवरून असतें, म्हणजे नवऱ्याच्या तोंडून त्याच्या आईबापांची अथवा बहिणभावंडांची माहिती ऐकून अथवा त्यांनीं त्याच्यासाठीं जें जें केलें असेल त्याची कल्पना मनांत येऊन जें प्रेम उत्पन्न व्हावयाचें तें. नवऱ्याच्या माणसांचा प्रत्यक्ष परिचय

होऊन, त्यांच्यांत राहून व त्यांच्या सुखदुःखाचे वाटेकरी होऊन, तात्पर्य, अनुभवानें जें प्रेम उत्पन्न होईल त्यापेक्षां ऐकीव गोष्टींवरून उत्पन्न झालेलें प्रेम कमी असणार, हें उघड आहे. आपणाविषयीं बापाची कळकळ, आईची माया, व बहिणभावंडांचें प्रेम ह्यांविषयींच्या गोष्टींपासून मनाला आनंद वाटतो. ह्या गोष्टींविषयीं नायकोस कांहींच माहिती नसेल अथवा अनुभव नसेल, तर तिला त्या ऐकण्यांत विशेष आनंद वाटणार नाहीं, व ती आनंदाची वाटेकरी होणार नाहीं.

पुष्कळ लोकांच्या स्थितीविषयीं विचार करतां स्वातंत्र्य एकदम मिळणें व स्वतंत्र अधिकार देणें हितावह नसतें. कामाची माहिती, परतंत्र स्थितींतील सुखदुःखाचा अनुभव, स्वतंत्र रितीनें काम करण्याचें सामर्थ्य व स्वातंत्र्याविषयीं औत्सुक्य हीं असल्याशिवाय स्वातंत्र्यापासून हीत न होतां अहीत होण्याचा संभव जास्त असतो. हें समजून हाताखालची नोकरी केल्यावर कांहीं अंशीं स्वतंत्र नोकरी देण्याची वहिवाट असते. ह्या वहिवाटीमुळें कच्या कामाची माहिती होते, परतंत्र स्थितींतील सुखदुःखें कळतात, मनुष्य थोडासा नरम होतो, व स्वातंत्र्याचा दुरुपयोग होण्याचा कमी संभव असतो. स्वतंत्रता एकदम देऊं नये, व कांहीं दिवस परतंत्र स्थिती असणें चांगलें, असें आम्हीं म्हटलें; परंतू परतंत्र स्थिती फार दिवस असूं नये, हें सविस्तर सांगावयास नको. फार दिवस पारतंत्र्य असल्यानें समंजस व तेजस्वी पुरुषांस त्रास व्हावयास लागतो, जुलूम भासतो, व त्यांच्या मनाची चलबिचल होते. परतंत्र स्थिती असावयाची, ती स्वतंत्र राहून पुढें चांगल्या रितीनें कालक्षेप करण्यासाठीं ज्या शिक्षणाची जरुरी आहे, तें शिक्षण

मिळण्याकरतां आहे. परतंत्र स्थिती ही फक्त शिक्षणासाठीं व ह्यामुळें आपल्या हितासाठीं आहे, आपणास शिक्षण मिळालें म्हणजे, व आपल्या अंगीं पात्रता आली म्हणजे, आपणास स्वतंत्रता मिळणार, हें समजल्यापासून बापलेकांचा अथवा सास्वासुनांचा बेबनाव होण्याचा संभव कमी आहे. थोड्या दिवसांसाठीं व थोड्या गोष्टींसाठीं आपण मुलांस अथवा सुनेस कां त्रास द्यावा, असें बापास व आईस वाटावयास लागून त्यांच्या आचरणांत बदल पडण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणें मुलाच्या व त्याच्या बायकोच्या मनांत तेच विचार येऊन तीं वडील माणसांस नाखूष न ठेवण्याविषयीं जपतील.

परतंत्र स्थितीस कांहीं यत्ता पाहिजे व ती थोडे दिवसांची असावी. असें नसलें, म्हणजे बापाची दक्षता कदाचित् ढिली होईल. आज करूं, उद्यां करूं, असें त्याच्या मनास वाटून, जें शिक्षण देणें अवश्य आहे तें देण्यांत कदाचित् सुस्ती होईल. नियमीत मुदतींत आपण योग्य शिक्षण दिलें नाहीं, तर स्वतंत्र राहण्यासाठीं ज्या सामर्थ्याची जरूरी आहे तें सामर्थ्य मुलांत नसेल, तर मुलाचें नुकसान होईल व त्याबद्दल आपण दोषास पात्र होऊं, असें त्यास वाटण्याचा संभव आहे; निदान जो बाप शहाणा आहे त्यास वाटल्यावाचून राहणार नाहीं. त्याचप्रमाणें, नियमीत मुदतींत शिक्षण संपादन करण्याविषयीं आपण आळस केला, तर आपलें अहीत होईल व आपणास लोकांच्या तोंडाकडे पाहण्याचा अथवा मोलमजुरी करण्याचा प्रसंग येईल, जों पावेतों आपण बापाच्या अथवा दुसऱ्या पालकाच्या छायेखालीं आहों, तों पावेतों गोष्ट निराळी; परंतू स्वतंत्र राहिल्यावर

आपलें आपणास पाहिलें पाहिजे, असें मुलास वाटून कांहीं जबाबदारी वाटेल अशी आमची समजूत आहे. हीच गोष्ट कांहीं अंशीं सास्वासुनांच्या संबंधानें होय.

येथवर आम्हीं जो विचार केला, तो हिंदू समाजाच्या सांप्रत स्थितींत काय करतां येण्यासारखें आहे, ह्याविषयीं झाला. ह्या संबंधानें आणखी कांहीं प्रश्न उत्पन्न होतात; परंतू त्यांविषयीं विचार करण्याचें हें स्थळ नाहीं. ह्या प्रश्नांपैकीं एक प्रश्न फार महत्वाचा आहे. तो हा कीं, मुलाची व सुनेची परतंत्र स्थिती थोडे दिवस असावयाची आहे, तर लग्न उशिरां होणें हें फारच इष्ट आहे. असें झाल्यानें मुलीची परतंत्र स्थिती फार दिवस राहणार नाहीं. परंतू असें झालें नाहीं, तरी येथवर ज्या गोष्टींविषयीं विचार झाला त्यास या प्रश्नामुळें फार अडचण येईल असें नाहीं.

वरील सर्व गोष्टींचा विचार करून मानसीक शिक्षण, स्वतंत्र रितीनें चरितार्थ करण्याचें साधन, व्यवहाराची माहिती, समयास उचीत वर्तन, काटकसरीनें खर्च करण्याची सवय, प्रसंगांतून पार पडण्याचें सामर्थ्य, उद्योगप्रीती, सदाचाराविषयीं आसक्ती वगैरे गोष्टींचें शिक्षण देऊन मुलास स्वतंत्र ठेवणें चांगलें. कांहीं दिवस वर सांगितल्याप्रमाणें शिक्षण मिळाल्यावर मुलास स्वतंत्र ठेविलें, तर अहीत न होतां हीतच होईल. स्वतंत्र राहण्यास पात्रता यावी, ह्या हेतूनें बाप शिक्षण देऊं लागेल, तर हल्लीं जी गृहस्थिती दिसत आहे तिजपेक्षां निराळी दिसेल, आईबाप व मुलें ह्यांस आपआपल्या कामांत विशेष दक्षता व विशेष आस्था दाखविणें भाग पडून सर्वांचें हीत होईल; व शिक्षण देऊन स्वतंत्र ठेवणें हा खऱ्या गृहस्थाश्रमांत प्रवेश करविणें आहे असें समजावें.

---

# थोर पुरुषांचीं वचनें.

## तुकाराम.

(१)

नाहीं संतपण मिळत हे हाटीं ॥ हिंडतां कपाटीं रानीं वनीं
नये मोल देतां धनाचिया राशी ॥ नाहीं तें आकाशीं पाताळीं तें
तुका म्हणे आहे आपल्या तें आंगीं ॥ गवसेना जगीं दुजे ठायीं

(२)

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ॥ देह कष्टविती उपकारें
भूतांची दया हें भांडवल संतां ॥ अपूल्या ममता नाहीं देहीं
तुका म्हणे सूख पराचिया सूखें ॥ अमृत हें मुखें स्रवतसे

(३)

सद्गुरुवाचुनी सांपडेना सोय ॥ धरावे ते पाय आधीं त्याचे
आपणासारिखे करिती तात्काळ ॥ कांहीं काळ वेळ न लागे त्यांशीं
लोहपरीसाशीं न साहे उपमा ॥ सद्गुरु–महीमा अगाधची
तुका म्हणे ऐसे आंधळे हे जन ॥ गेले विसरून खऱ्या देवा

(४)

धन्य तोचि प्राणी क्षमा ज्याचे अंगीं ॥ न भंगे प्रसंगीं धैर्य बळ
न म्हणे कोणासी उत्तम वाईट ॥ महत्व वरिष्ठ नसे जेथें
अंतरीं सबाह्य सारिखे निर्मळ ॥ हृदय कोमळ गंगारूप
तुका म्हणे काया कुरवंडीं तया ॥ ठेवीन मी पायां मस्तक हें

( ५ )

क्षमा शस्त्र जया नराचिया हातीं ॥ दुष्ट तया प्रती काय करी
तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि ॥ जाय तो विझोनी आपसया
तुका म्हणे क्षमा सर्वांचें स्वहित ॥ धरा अखंडित सुखरूप

( ६ )

नीचपण बरवें देवा ॥ न चले कोणाचाही हेवा ॥ १ ॥
महापुरें झाडें जातीं ॥ तेथें लोहाळें राहतीं ॥ २ ॥
येती सिंधूच्या लहरी ॥ नम्र होतां जाती वरी ॥ ३ ॥
तुका म्हणे हेंचि फळ ॥ पाय धरिल्या न चले बळ ॥ ४ ॥

( ७ )

शांतीपरतें नाहीं सुख ॥ येर अवघेंची दुःख ॥ १ ॥
म्हणउनी शांति धरा ॥ उतराल पैल तीरा ॥ २ ॥
खवळिया कामक्रोधीं ॥ अंगीं भरती आधिव्याधी ॥ ३ ॥
तुका म्हणे त्रिविध ताप ॥ जाती मग आपेआप ॥ ४ ॥

( ८ )

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें ॥ उदासविचारें वेंच करी ॥
उत्तमची गती तो एक पावेल ॥ उत्तम भोगील जीवखाणी ॥
परउपकारी नेणें परनिंदा ॥ परस्त्रिया सदां बहिणी मायी ॥
भूतदया गायी-पशूंचें पाळण ॥ तान्हेल्या जीवन वनामाजी ॥
शांतिरूप नव्हे कोणाचें वाच्यत्व ॥ वाढवी महत्व वडीलांचें ॥
तुका म्हणे हेंची आश्रमाचें फळ ॥ परमपदबळ वैराग्याचें ॥

( ९ )

आंधळ्यासी जन अवघेंची आंधळें ॥ आपणासी डोळे दृश्य नाहीं
रोगियासी विषतुल्य हें मिष्टान्न ॥ तोंडासी कारण चवी नाहीं
तुका म्हणे शुद्ध नाहीं जो आपण ॥ तया त्रिभुवन अवघें खोटें

( १० )

कन्येचा जे नर करीती विकरा ॥ ते जाती अघोरा नरकपाता
नाम गाउनीयां द्रव्य जे मागती ॥ नेणो तयां गती कैसी होय
कैसें होईल त्यांचें तेच हो जाणती॥आम्हांसी सांगती नलगे त्यांची
आमुचा सांगाती आहे तो श्रीहरी ॥ नलगे दुराचारी तुका म्हणे

( ११ )

कई वाहावें जीवन ॥ कई पलंगीं शयन ॥ १ ॥
जैसी जैसी वेळ पडे ॥ तैसें तैसें होणें घडे ॥ २ ॥
कई भोज्य नानापरी ॥ कई कोरडया भाकरी ॥ ३ ॥
कई बैसावें वाहनीं ॥ कई पाई अनवाणीं ॥ ४ ॥
कई उत्तम प्रावर्णे ॥ कई वसनें तींही जीर्णें ॥ ५ ॥
कई सकळ संपत्ती ॥ कई भोगणें विपत्ती ॥ ६ ॥
कई सज्जनासीं संग ॥ कई दुर्जनासीं योग ॥ ७ ॥
तुका म्हणे जाण ॥ सुखदुःख तें समान ॥ ८ ॥

( १२ )

परद्रव्य परनारी ॥ अभिलाषुनी नाक धरी ॥ १ ॥
जळो तयाचा आचार ॥ व्यर्थ भार वाहे खर ॥ २ ॥
सोवळयाची स्फीती ॥ क्रोधें विटाळला चित्तीं ॥ ३ ॥
तुका म्हणे सोंग ॥ दावी बाहेरील अंग ॥ ४ ॥

( १३ )

अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ ॥ त्याचे गळां माळ असो नसो
परद्रव्या अंध निंदेसी जो मूका॥ तोची संत देखा तुका म्हणे

( १४ )

आलीया भोगासी असावें सादर ॥ देवावरी भार घालूनिया
तोची कृपानीधी वारील साकडें ॥ येर ते बापुडे काय रंक

भक्ताचीया पायीं दुःखाचीया राशी । शरण देवासी जातां भलें॥
तुका म्हणे जया भार घातलीया । उपेक्षिना तया दीन-बंधू ॥

( १५ )

हिरा ठेवितां ऐरणीं ॥ वांचे मारितां जो घणीं ॥ १ ॥
तोचि मोल पावे खरा ॥ ऐरणीचा होय चुरा ॥ २ ॥
मोहरा होय तोचि अंगें ॥ सूत न जळे ज्याचे संगें ॥ ३ ॥
तुका म्हणे तोचि संत ॥ सोसी जगाचे आघात ॥ ४ ॥

( १६ )

आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा
सकळांच्या पायां माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ।
हित तें करावें देवाचें चिंतन । करूनियां मन एकविध ॥
तुका म्हणे लाभ होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें

( १७ )

जेणें घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावीं तीं ॥
येर प्रिया पुत्र धना कोण लेखा । करिती तीं दुःखा पात्र शत्रु ॥
प्रल्हादें जनक बिभीषणें बंधू । राज्य माता निंदु भरतें केली ॥
तुका म्हणे सर्व धर्म हरिचे पाय । आणिक उपाय दुःख मूळ ॥

( १८ )

काय काशी करिती गंगा ॥ भीतरिं चांगा नाहीं तो ॥
अधणीं कुचर बाहेर तैसा ॥ नये रसा पाकासि ॥
काय टिळे करिती माळा ॥ भाव खळा नाहीं त्या ॥
तुका म्हणे प्रेमेंविण । बोले भुंके अवघा शीण ॥

( १९ )

अन्नाच्या परिमळें जरि जाय भूक । तरि कां हे पाक घरोघरीं ॥
देखोनि जीवन जरि जाय तान । तरि कां सांटवण घरोघरीं ॥

देखोनियां छाया सुख न पवीजे । जंव न बैसीजे तया तळीं ॥
हित तरी होय गातां आईकतां । जरि राहे चित्ता दृढ भाव॥
तुका म्हणे होसी भावें चि तूं मुक्त । काय करिसी युक्त जाणिवेची॥

( २० )

नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ॥
तैसी चित्तशुद्धि नाहीं । तेथें बोध करील काई ॥
वृक्ष न धरी पुष्प फळ । काय करील वसंतकाळ ॥
तुका म्हणे जीवनेंविण । पीक न व्हे न व्हे जाण ॥

( २१ )

पुण्य उपकार पाप ते परपीडा। आणीक नाहीं जोडा दुजायासी॥
सत्य तोचि धर्म असत्य तें कर्म । आणीक हें वर्म नाहीं दुजें ॥
संतांचा संग तोचि स्वर्गवास । नर्क तो उदास अनर्गळता॥
तुका म्हणे उघडें आहे हित घात । जयाचें उचित करा तैसें ॥

( २२ )

हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥
न लगे मुक्ति आणि संपदा । संत–संग देई सदां ॥

( २३ )

नाहीं देवापाशीं मोक्षाचें गाठोळें । आणूनि निराळें द्यावें हातीं॥
इंद्रियांचा जय साधुनियां मन । निर्विषय कारण असे तेथें ॥
तुका म्हणे फळ आहे मूळापाशीं । शरण देवाशीं जाय वेगीं॥

( २४ )

देव वसे चित्तीं । त्याची घडावी संगती ॥
ऐसें आवडतें मना । देवा पुरवावी वासना ॥
तुका म्हणे जिणें । भलें संतसंघष्टणें ॥

( २५ )

मोलें घातलें रडाया । नाहीं असूं आणि माया ॥
तैसा भक्तिवाद काय । रंग बेगडीचा न्याय ॥

( २६ )

वचनेंचि व्हावें आपण उदार ॥ होईल विश्वंभर संतुष्टचि ॥
सत्यसंकल्पाचीं फळें बीजा ऐसीं ॥ शुद्ध नाहीं नासी पावें येत॥
तुका म्हणे जीव जितां थारे लावा । पडिलिया गोवा देशधडी॥

( २७ )

नरस्तुति आणि कथेचा विकरा । हे नको दातारा घडों देऊं ॥
ऐसिये कृपेची भाकितों करूणा । आहेसि तूं राणा उदाराचा ॥
पराविया नारी आणि परधना । नको देऊं मनावरी येऊं ॥
भूतांचा मत्सर आणि संत-निंदा । हें नको गोविंदा घडों देऊं ॥
देह-अभिमान नको देऊं शरीरीं । चढों कांहीं परी एक देऊं ॥
तुका म्हणे तुझ्या पायांचा विसर । नको वारंवार पडों देऊं ॥

( २८ )

लटिकें तें ज्ञान लटिकें तें ध्यान । जरि हरिकीर्तन प्रिय नाहीं ॥
लटिकेंचि दंभ घातला दुकान । चाळविलें जन पोटासाठीं ॥
नाम नावडे तो करील बाहेरी । नाहीं त्याची खरी चित्तशुद्धि ॥
तुका म्हणे ऐसीं गर्जती पुराणें । शिष्टांचीं वचनें मागिलाहि ॥

( २९ )

कांहीं न मागे कोणांसी ॥ तोचि आवडे देवासी ॥
भूत-दया ज्याचे मनीं ॥ त्याचे घरीं चक्रपाणी ॥
नाहीं नाहीं त्या समान ॥ तुका म्हणे मी जमान ॥

(३०)

थोर ती गळाली पाहिजे अहंता । उपदेश घेतां सुख वाटे ॥
व्यर्थ भराभर केलें पाठांतर । जोंवरि अंतर शुद्ध नाहीं ॥
घोडें काय थोडें वागवितें ओझें । भावेंविण तैसें पाठांतर ॥

(३१)

दिली मान तरी नेघावी शत्रूची । शरण आलें त्यासी जतन जीवें
समर्थाची असे विचाराची आण । भलीं पापपुण्य विचारावें ॥
काकुळतीसाठीं सत्याचा विसर । पडिलें अंतर न पाहिजे ॥
तुका म्हणे यशकीर्ति आणि मान ॥ करितां जतन देव जोडे ॥

(३२)

विद्या अल्प परी गर्व शिरोमणि । मजहून ज्ञानी कोण आहे ॥
अंगीं भरला ताठा कोणातें मानिना । साधूची छळणा स्वयें करी
साधूचे देहाचा मानी जो विटाळ । त्रिलोकीं चांडाळ तोचि एक
संतांची जो निंदा करी मुखें जपे । खतेला सकळ पापें तोचि एक
तुका म्हणे ऐसे मावेचे मइंद । त्यापाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥

(३३)

अर्थेविण पाठांतर कासया करावें । व्यर्थची मरावें घोकोनिया
घोकुनियां काय वेगीं अर्थ पाहे । अर्थरूप राहे होऊंनिया ॥
तुका म्हणे ज्याला अर्थी आहे भेटी । नाहीं तरी गोष्टी बोलों नका

(३४)

मस्तकीं सहावें टाकियासी जाण । तेव्हां देवपण भोगावें गा ॥
आपुलिये स्तुती निंदा अथवा मान । टाकावा थुंकोन पैलीकडे ॥
सद्गुरु-सेवन तेंचि अमृतपान । करूनी प्राशन बैसावें गा ॥
आपुल्या मस्तकीं पडोत डोंगर । सुखाचें माहेर टाळूं नये ॥
तुका म्हणे आतां सांगूं तुला किती । जिण्याची फाजिती करूं नये

( ३५ )

साता दिवसांचा जरी जाला उपवासी । तरी कीर्तनासी टाकूं नये
फुटो हा मस्तक तुटो हें शरीर । नामाचा गजर सोडूं नये ॥
शरीराचे होत दोनी तेही भाग । परि कीर्तनाचा रंग सोडों नये
तुका म्हणे ऐसा नामीं ज्या निर्धार । तेथें निरंतर देव असे ॥

---

## अनंतफंदी

### उपदेशपर फटका.

बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडूं नको ॥
संसारामधिं ऐस आपला उगाच भटकत फिरूं नको ॥
चल सालसपण धरूनि निखालस बोला खोट्या बोलुं नको ॥
पर-धन-पर-नार ह्यांस पाहुनि चित्त भ्रमुं हें देउं नको ॥
अंगीं नम्रता सदा असावी राग कुणावर धरूं नको ॥
नास्तिकपणांत शिरूनि जनाचा बोल आपणा घेउं नको ॥
भली भलाई कर कांहीं पण अधर्म-मार्गीं शिरूं नको ॥

॥ **चाल** ॥ मायबापांवर रुसूं नको । दूर एकला बसूं नको ॥
व्यवहारामध्यें फसूं नको ॥ कधीं रिकामा असूं नको ॥
। चा. प. । परी उलाढाली भलभलत्या पोटासाठीं करूं नको ॥
वर्म काढुनी शरमायाला उणें कोणाला बोलुं नको ॥
बुडवाया दुसऱ्याचा ठेवा करूनी हेवा झटूं नको ॥
मी मोठा शहाणा धनाढ्यहि गर्वभार हा वाहुं नको ॥
एकाहुन एक चढी जगामधिं थोरपणाला मिरवुं नको ॥
हिमायतीच्या बळें गरिबगुरिबांला तूं गुरकावुं नको ॥
दो दिवसांची जाइल सत्ता अपेश माथां घेऊं नको ॥

बहुत कर्जबाजारी होउनि बोज आपुला दवडूं नको ॥
स्नेहासाठीं पदर मोड कर, परंतु जामिन होउं नको ॥चा०॥
विडा पैजेचा उचलुं नको ॥ उणी तराजू तोलुं नको ॥
गहाण कोणाचें डुलवुं नको॥ असल्यावर भीक मागुं नको॥
नसल्यावर सांगणें कशाला गाव तुझा भिड धरूं नको ॥
उगीच निंदा स्तुती कुणाची स्वहितासाठीं करूं नको ॥
बरी खुशामत शहाण्याची ही मुर्खांची ती मैत्री नको ॥
कष्टाची बरि भाजिभाकरी तुपसाकरेची चोरि नको ॥
आल्या अतिथा मुठभर द्याया मागें पुढती पाहुं नको ॥
दिली स्थिती देवानें तींतच मानीं सुख कधिं विटूं नको ॥
असल्या गाठीं धनसंचय कर सत्कार्यीं व्यय हटूं नको ॥
आतां तुजही गोष्ट सांगतों सत्कर्मा ओसरूं नको ॥
सत्कीर्ती नौबदिचा डंका गाजे मग शंकाच नको ॥ चा० ॥
सुविचारा कातरूं नको । सत्संगत अंतरूं नको ॥
गावयास अनंतफंदिचे फटके मागें सरूं नको ॥ ३ ॥

---

## रामदास.

### मनास उपदेश.

मना सज्जना भक्ति-पंथेंचि जावें ।
तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावें ॥
जनीं निंद्य तें सर्व सोडून द्यावें ।
जनीं वंद्य तें सर्व-भावें करावें ॥ १ ॥

मना वासना दुष्ट कामा न ये रे ।
मना सर्वथा पाप-बुद्धि नको रे ।

मना सर्वथा नीति सोडूं नको हो ।
मना अंतरीं सार-वीचार राहो ॥ २॥
मना पाप-संकल्प सोडोनि द्यावा ।
मना सत्य-संकल्प जीवीं धरावा ।
मना कल्पना ते नको वीषयाची ।
विकारे घडे हो जनीं सर्व छी छी ॥ ३ ॥
नको रे मना क्रोध हा खेदकारी ।
नको रे मना काम नाना-विकारी ।
नको रे मना सर्वदां अंगिकारूं ।
नको रे मना मत्सरू दंभ भारू ॥ ४ ॥
मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें ।
मना बोलणें नित्य सोसीत जावें ।
स्वयें सर्वदां नम्र-वाचें वदावें ।
मना सर्व-लोकांसि रे नीववावें ॥ ५ ॥
तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी ।
मना चंदनाचेपरी त्वां झिजावें ।
परीं अंतरीं सज्जना नीववावें ॥ ६ ॥
नको रे मना द्रव्य ते पूढिलाचें ।
अति स्वार्थ-बुद्धी नको पाप साचे ।
घडे भोगणें पाप तें कर्म खोटें ।
न होतां मनासारिखें दुःख मोठें ॥ ७ ॥
मना सर्वथा सत्य सोडूं नको रे ।
मना सर्वथा मिथ्य मानूं नको रे ।
मना सत्य तें सत्य वाचें वदावें ।
मना मिथ्य तें मिथ्य सोडोनि द्यावें ॥ ८ ॥

सदां आर्जवीं प्रीय जो सर्व लोकीं ।
सदां सर्वदां सत्य-वादी विवेकी ।
न बोले कदा मिथ्यवाचा त्रिवाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ९ ॥
नसे गर्व अंगीं सदां वीतरागी ।
क्षमा शांति भोगी दया-दक्ष योगी ।
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा ।
अशा लक्षणीं जाणिजे योगि-राणा ॥ १० ॥
जयें मक्षिका भक्षिली जाणिवेची ।
तया भोजनाची रूची प्राप्त कैची ।
अहं-भाव ज्या मानसींचा विरेना ।
तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना ॥ ११ ॥
अहंता-गुणें सर्वही दुःख होतें ।
मुखें बोलिलें ज्ञान तें व्यर्थ जातें ।
सुखें राहतां सर्वही सूख आहे ।
अहंता तुझी तूंचि शोधोनि पाहे ॥ १२ ॥
फुकाचें मुखीं बोलतां काय वेचे ।
दिसंदीस अभ्यंतरीं गर्व साचे ।
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।
विचारें तुझा तूंचि शोधुनि पाहे ॥ १३ ॥
जया मानला देव तो पूजिताहे ।
परी देव शोधून कोणी न पाहे ।
जगीं पाहतां देव कोट्यानकोटी ।
जया मानली भक्ति जे तेचि मोठी ॥ १४ ॥
तिन्ही लोक जेथूनि निर्माण झाले ।
तया देवरायासि कोणी न बोले ।

जगीं थोरला देव तो चोरिलासे ।
गुरूवीण तो सर्वथाहि न दीसे ॥ १५ ॥
गुरू पाहतां लक्ष कोट्यनुकोटी ।
बहुसाल मंत्रावळी शाक्त मोठी ।
मना कल्पना चेटकें घातपाता ।
जनीं व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता ॥ १६ ॥
नव्हे वाउगी चावटी काय पोटीं ।
क्रियेवीण वाचाळता तेचि मोठी ।
मुख बोलल्या सारिखे चालताहे ।
मना सद्गुरू तोचि शोधून पाहें ॥ १७ ॥
न जायें जपासी न जायें तपासी ।
न जायेंचि काशी न जायें गयेसी ।
हरी-चिंतनेवीण कोठें न जायें ।
त्रिकाळीं सदा पाय तूं तेचि पाहें ॥ १८ ॥
मना गूज रे तूजला प्राप्त झालें ।
परी पाहिजे अंतरीं यत्न केले ।
सदा ऐकतां पाविजे निश्चयासी ।
धरीं सज्जनीं संगती धन्य होसी ॥ १९ ॥
मना संग हा सर्व सोडूनि द्यावा ।
अती आदरें सज्जनाचा धरावा ।
जयाचेनि संगें महा-दुःख भंगे ।
जनीं साधनेंवीण सन्मार्ग लागे ॥ २० ॥

## मुर्खांचीं लक्षणें.

परस्त्रियेसी प्रेमा धरी । श्वशुरगृहीं वास करी ।।
कुळेंवीण कन्या करी । तो एक मूर्ख ।। १ ।।
समर्थावरीं अहंता । अंतरीं मानीं समता ।।
सामर्थ्यैवीण करी सत्ता । तो एक मूर्ख ।। २ ।।
आपली आपण करी स्तुती । स्वदेशीं भोगी विपत्ती ।।
सांगे वडिलांची कीर्ती । तो एक मूर्ख ।। ३ ।।
अकारण हास्य करी । विवेक सांगतां न धरी ।
जो बहुतांचा वैरी । तो एक मूर्ख ।। ४ ।।
आपलीं धरूनियां दूरी । पराव्यासी मैत्री करी ।।
परन्यून बोले अहो-रात्रीं । तो एक मूर्ख ।। ५ ।।
बहुत जागते जन । तया-मध्यें करी शयन ।।
पर-स्थळीं बहु-भोजन । तो एक मूर्ख ।। ६ ।।
मान अथवा अपमान । स्वयें करी परिच्छिन्न ।।
सदां व्यसनीं जयाचें मन । तो एक मूर्ख ।। ७ ।।
घरीं विवेक उमजे । आणि सभेमध्यें लाजे ।।
शब्द बोलतां निर्बुजे । तो एक मूर्ख ।। ८ ।।
आपणाहून जो श्रेष्ठ । तयासी अत्यंत निकट ।।
शिकवणेचा मानी वीट । तो एक मूर्ख ।। ९ ।।
औषध न घे असोनी व्यथा । पथ्य न करी सर्वथा ।।
न मिळे आलिया पदार्था । तो एक मूर्ख १० ।।
विचार न करितां कारण । दंड करी अपराधेंविण ।।
स्वल्पासाठीं जो कृपण । तो एक मूर्ख ।। ११ ।।
घरिच्यावरीं खाय दाढा । बाहेर दीन बापडा ।।
ऐसा जो कां मूढ वेडा । तो एक मूर्ख ।। १२ ।।

स्वयें नेणे परोपकार ॥ उपकाराचा अनुपकार ॥
करी थोडें बोले फार ॥ तो एक मूर्ख ॥ १३ ॥
विद्या वैभव ना धन ॥ पुरूषार्थ सामर्थ्य ना मान ॥
कोरडाच वाहे अभिमान ॥ तो एक मूर्ख ॥ १४ ॥
जीवलगासी परम खेदी ॥ सुखाचा शब्द तोही नेदी ॥
नीच जनासी वंदी ॥ तो एक मूर्ख ॥ १५ ॥
पुत्र कलत्र आणि दारा ॥ इतुकाचि मानुनियां थारा ॥
विसरोन गेला ईश्वरा ॥ तो एक मूर्ख ॥ १६ ॥
जैसें जैसें करावें ॥ तैसें तैसें पावावें ॥
हें जयासी नेणवे ॥ तो एक मूर्ख ॥ १७ ॥
आदरेंवीण बोलणें ॥ न पुसतां साक्ष देणें ॥
निंद्य-वस्तु अंगीकारणें ॥ तो एक मूर्ख ॥ १८ ॥
पर-पीडेचें मानी सुख ॥ पर-संतोषाचें मानी दुःख ॥
गेले वस्तूचा करी शोक ॥ तो एक मूर्ख ॥ १९ ॥
अल्प-अन्याय क्षमा न करी ॥ सर्वकाळ धारकीं धरी ॥
जो विश्वास-घात करी ॥ तो एक मूर्ख ॥ २० ॥
समर्थाचे मनींचा तुटे ॥ जयाचेनी सभा विटे ॥
क्षणीं बरा क्षणीं पालटे ॥ तो एक मूर्ख ॥ २१ ॥
बहुत दिवसांचे सेवक ॥ त्यागून ठेवी आणिक ॥
ज्याची सभा निर्णायक ॥ तो एक मूर्ख ॥ २२ ॥
अनीतीनें द्रव्य जोडी ॥ धर्म नीति न्याय सोडी ॥
संगतीचें मनुष्य तोडी ॥ तो एक मूर्ख ॥ २३ ॥
कलह पहात उभा राहे ॥ सोडवीना कौतुक पाहे ॥
खरें असतां खोटें साहे ॥ तो एक मूर्ख ॥ २४ ॥
आपलें कार्य होय तोंवरी ॥ बहुसाल नम्रता धरी ॥
पुढीलाचें कार्य न करी ॥ तो एक मूर्ख ॥ २५ ॥

आपण वाचीना कधीं ॥ कोणासी वाचाया नेदी ॥
बांधोनि ठेवी बंदी ॥ तो एक मूर्ख ॥ २६ ॥

---

## पढतमूर्ख.

आपुलेनि ज्ञातेपणें ॥ सकळांस शब्द ठेवणें ॥
प्राणिमात्राचें पाहे उणें ॥ तो एक पढतमूर्ख ॥ १ ॥
समूळ ग्रंथ पाहिल्याविण ॥ उगाच ठेवी जो दूषण ॥
गुण सांगतां अवगुण ॥ पाहे तो एक पढतमूर्ख ॥ २ ॥
दोष ठेवी पुढिलासी ॥ तेंचि स्वयें आपणापासीं ॥
ऐसें कळेना जयासी ॥ तो एक पढतमूर्ख ॥ ३ ॥
अभ्यासाचे निगुणें ॥ सकळविद्या जाणे ॥
जनासी निववूं नेणें ॥ तो एक पढतमूर्ख ॥ ४ ॥
सांडूनियां श्रीपती ॥ जो करी नरस्तुती ॥
का दृष्टा पडल्याची कीर्ती ॥ वर्णी तो एक पढतमूर्ख ॥ ५ ॥
मागें एक पुढें एक ॥ ऐसा जयाचा दंडक ॥
बोले एक करी एक ॥ तो एक पढतमूर्ख ॥ ६ ॥
यथार्थ सांडुनी वचन ॥ जो रक्षून बोले मन ॥
ज्याचें जिणें पराधीन ॥ तो एक पढतमूर्ख ॥ ७ ॥
रात्रंदिवस करी श्रवण ॥ न सांडी आपुले अवगुण ॥
स्वहित आपलें आपण ॥ नेणे तो एक पढतमूर्ख ॥ ८ ॥
ज्ञान बोलोनि करी स्वार्थ ॥ कृपणा ऐसा साची अर्थ ॥
अर्थासाठीं लावी परमार्थ ॥ तो एक पढतमूर्ख ॥ ९ ॥

---

## करंटा.

करंट्यास आळस आवडे ॥ यत्न कदापि नावडे ॥
त्याची वासना वावडे ॥ अधर्मीं सदां ॥ १ ॥
लेहों नेणे वाचूं नेणे ॥ सवदासूत घेऊं नेणे ॥
हिशेब कितेब राखों नेणे ॥ धारणा नाहीं ॥ २ ॥
हारवी सांडी पाडी फोडी ॥ विसरे चुके नाना खोडी ॥
भल्याचे संगतीची आवडी ॥ कदापि नाहीं ॥ ३ ॥
आळसें शरीर पाळिलें ॥ परंतु पोटाविण गेलें ॥
सुडकें मिळेनासें झालें ॥ पांघरायासी ॥ ४ ॥
जनासी मैत्री करीना ॥ कठीण शब्द बोले नाना ॥
मूर्खपणें आवरेना ॥ कोणी एकासी ॥ ५ ॥
कोणी एकाशीं विश्वास नाहीं ॥ कोणी एकाशीं सख्य नाहीं ॥
विद्या वैभव कांहींच नाहीं ॥ उगाचि ताठा ॥ ६ ॥
स्वयें आपणास कळेना ॥ शिकविलें तें ऐकेना ॥
तयासि उपाय नाना ॥ काय करिती ॥ ७ ॥
झिजल्यावांचून कीर्ती कैची ॥ मान्यता नव्हे कीं फुकाची ॥
जिकडे तिकडे होते छी छी ॥ अवलक्षणें ॥ ८ ॥
भल्यांची संगती धरीना ॥ आपणास शाहाणे करीना ॥
तो आपला आपण वैरी जाणा ॥ स्व-हित नेणे ॥ ९ ॥
जेथें नाहीं उत्तम गुण ॥ तें करंटपणाचें लक्षण ॥
बहुतांसि न मानें तें अवलक्षण ॥ सहजचि झालें ॥ १० ॥

---

## महापुरूष.

कोणाचें मनोगत तोडीना ॥ भल्यांची संगती सोडीना ॥
सदैव लक्षणें अनुमाना ॥ आणूनि ठेवी ॥ १ ॥

नाना उत्तम गुण सत्पात्र ॥ तोचि मनुष्य जगमित्र ॥
प्रगट कीर्ती स्वतंत्र ॥ पराधीन नाहीं ॥ २ ॥
राखे सकळांचें अंतर ॥ उदंड करी पाठांतर ॥
नेमस्तपणाचा विसर ॥ पडणार नाहीं ॥ ३ ॥
नम्रपणें पुसों जाणे ॥ नेमस्त अर्थ सांगों जाणे ॥
बोला ऐसें वर्तों जाणे ॥ उत्तम क्रिया ॥ ४ ॥
तो परोपकार करीतचि गेला ॥ पाहिजे तो ज्याला त्याला ॥
मग काय उणें त्याला ॥ भूमंडळीं ॥ ५ ॥
बहुत जन-वास पाहे ॥ वेळेसी तात्काळ उभा राहे ॥
उणें कोणाचें न साहे ॥ तया पुरुषासी ॥ ६ ॥
न्याय–नीति-भजन-मर्यादा ॥ काळसार्थक करी सदां ॥
दरिद्रपणाची आपदा । तेथें कैची ॥ ७ ॥
मागें एक पुढें एक । ऐसा कदापि नाहीं दंडक ॥
सर्वत्रांसि अलोलिक । तया पुरुषासी ॥ ८ ॥
आपल्या कार्यास तत्पर । लोक असती लहान थोर ॥
तैसाची करी परोपकार । मनापासुनी ॥ ९ ॥
दुसऱ्याचे दुःखें दुखावे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे ॥
अवघेचि सुखी असावे । ऐसी वासना ॥ १० ॥
उदंड मुलें नानापरी । वडिलाचें मन अवघ्यांवरीं ॥
तैसी अवघ्यांचि चिंता करी । महापुरुष ॥ ११ ॥
बहुतांसि वाटे मी थोर । सर्व मान्य पाहिजे विचार ॥
धीर उदार गंभीर । महापुरुष ॥ १२ ॥

---

वाट पुसल्यावीण जाऊं नये ॥ फळ ओळाखिल्यावीण खाऊं नये।
पडिली वस्तु घेऊं नये ॥ एकाएकीं ॥ १ ॥

अति वाद करूं नये ॥ पोटीं कपट धरूं नये ॥
शोधिल्यावीण करूं नये ॥ कुलहीन कांता ॥ २ ॥
विचारेंवीण बोलूं नये ॥ मर्यादेवीण हालूं नये ॥
विवंचनेवीण चालों नये । कांहीं केल्या ॥ ३ ॥
जनीं आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये ॥
पुण्य-मार्ग सोडूं नये । कदा काळीं ॥ ४ ॥
तोंडाळासीं भांडूं नये । वाचाळासीं तंडूं नये ॥
संत-संग खंडूं नये । अंतर्यामीं ॥ ५ ॥
अति क्रोध करूं नये । जिवलगासी खेदूं नये ॥
मनीं वीट मानूं नये । शिकवणेचा ॥ ६ ॥
क्षणक्षणा रूसों नये । लटिका पुरुषार्थ बोलों नये ॥
केल्यावीण सांगों नये । आपुला पराक्रम ॥ ७ ॥
बोलिला बोल विसरूं नये । प्रसंगीं सामर्थ्य चुकूं नये ॥
केल्यावीण निखंदूं नये । पुढीलासी कदा ॥ ८ ॥
आळसें सुख मानूं नये । चहाडी मनासी आणूं नये ॥
शोधिल्यावीण करूं नये । कार्य कांहीं ॥ ९ ॥
सुखा आंग देऊं नये । प्रयत्न पुरुषें सोडूं नये ॥
कष्ट करितां त्रासों नये । निरंतर ॥ १० ॥
सभेमध्यें लाजों नये । बाष्कळपणें बोलों नये ॥
पैज होड घालूं नये । कांहीं केल्या ॥ ११ ॥
बहुत चिंता करूं नये । निसुगपणें राहूं नये ॥
परस्त्रीतें पाहूं नये । पापबुद्धी ॥ १२ ॥
कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखों नये ॥
पर-पीडा करूं नये । विश्वासघात ॥ १३ ॥
व्यापकपणा सांडूं नये । पराधीन होऊं नये ॥
आपलें ओझें घालूं नये । कोणा एकासी ॥ १४ ॥

बहुत अन्न खाऊं नये । बहुत निद्रा करूं नये ॥
बहुत दिवस राहूं नये । पिशुनाचे येथें ॥ १५ ॥
तोंडीं शिवी असों नये । दुसऱ्यासी देखोन हासों नये ॥
उणें आंगीं संचरों नये । कुळवंताचे ॥ १६ ॥
समई याया चुकूं नये । सत्वगुण सांडूं नये ॥
वैरियास दंडूं नये । शरण आलिया ॥ १७ ॥
अल्प-धनें माजूं नये । हरि-भक्तीसी लाजों नये ॥
मर्यादेविण चालों नये । पवित्र जनीं ॥ १८ ॥
सभा देखोनि गळों नये । समयीं उत्तर टळों नये ॥
धिःकारितां ढळों नये । धारिष्ट आपुलें ॥ १९ ॥
सत्य-मार्ग सोडूं नये । असत्यपंथें जाऊं नये ॥
कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा ॥ २० ॥
अपकीर्ती सांडावी । सत्कीर्ती वाढवावी ॥
विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ॥ २१ ॥

---

जन्मा आलियाचें फळ । कांहीं करावें सफळ ॥
ऐसें न करितां निर्फळ । भूमिभार होय ॥ १ ॥
नर-देहाचें उचित । कांहीं करावें आत्महित ॥
यथानशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमीं लावावें ॥ २ ॥
हें कांहींच न धरी जो मनीं । तो मृत्युप्राय वर्ते जनीं ॥
जन्मा येऊन तेणें जननी । वायांच कष्टविली ॥ ३ ॥
नाहीं भक्ती नाहीं प्रेम । नाहीं निष्ठा नाहीं नेम ॥
नाहीं देव नाहीं धर्म । अतीत अभ्यागत ॥ ४ ॥
नाहीं नीती नाहीं न्याय । नाहीं पुण्याचा उपाय ॥
नाहीं परत्रींची सोय । युक्तायुक्त क्रिया ॥ ५ ॥

शुची नाहीं स्वधर्म नाहीं । आचार नाहीं विचार नाहीं ॥
अरत्र नाहीं परत्र नाहीं । मुक्तक्रिया मनाची ॥ ६ ॥
परगुणाचा संतोष नाहीं । परोपकारें सुख नाहीं ॥
हरि-भक्तीचा लेश नाहीं । अंतर्यामीं ॥ ७ ॥
ऐसे प्रकारचे पाहतां जन । ते जितचि प्रेतासमान ॥
त्यासीं न करावें भाषण । पवित्र जनीं ॥ ८ ॥

---

अग्नि गृहासि लागला । आणि सावकाश निजेला ॥
तो कैसा म्हणावा भला । आत्महत्यारा ॥ १ ॥
आळसाचें फळ रोकडें । जांभया देउनि निद्रा पडे ॥
सुख म्हणोन आवडे । आळसी लोकां ॥ २ ॥
आळस उदास नागवणा । आळस प्रयत्नें बुडवणा ॥
आळसें करंटपणाच्या खुणा । प्रकट होती ॥ ३ ॥
म्हणोन आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा ॥
अरत्रीं परत्रीं जीवा । समाधान ॥ ४ ॥
प्रातःकाळीं उठावें । कांहीं पाठांतर करावें ॥
यथानुशक्ति आठवावें । सर्वोत्तमासी ॥ ५ ॥
मागील उजळणी पुढें पाठ । नेम धरावा निकट ॥
बाष्कळपणाची वटवट । करूंचि नये ॥ ६ ॥
कांहीं फळाहार घ्यावा । मग संसारधंदा करावा ॥
सुशब्दें राजी राखावा । सकळ लोक ॥ ७ ॥
ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबरदार ॥
दुश्चितपणें तर्‍हि पोर । वेढा लावी ॥ ८ ॥
चुके ठके विसरे सांडी । आठवण झालिया चरफडी ॥
दुश्चित आळसाची रोकडी । प्रचीत पाहा ॥ ९ ॥

या कारणें सावधान । एकाग्र असावें मन ॥
तरि मग जेवितां भोजन । गोड वाटे ॥ १० ॥
पुढें भोजन झालियावरि । कांहीं देवाची चर्चा करी ॥
एकांतिं जाउनि विवरी । नानाग्रंथ ॥ ११ ॥
तरीच प्राणी शाहणा होतो । नाहिं तरी मूर्खचि राहतो ॥
लोक खाती आपण पाहतो । दैन्यवाणा ॥ १२ ॥
ऐका सदैवपणाचें लक्षण । रिकामा जाउं नेदी क्षण ॥
प्रपंचव्यवसायाचें ज्ञान । बरें पाहे ॥ १३ ॥
कांहीं मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी ॥
शरीर कारणीं लावी । कांहीं तरी ॥ १४ ॥
ऐसा जो सर्व सावध । त्यास कैचा असेल खेद ॥
विवेकें तुटला संबंध । देहबुद्धीचा ॥ १५ ॥

---

दोष देखोन झाकावे । अवगुण अखंड न बोलावे ॥
दुर्जन सापडोन सोडावे । परोपकार करूनी ॥ १ ॥
दुःख दुसऱ्याचें जाणावें । ऐकोन तऱ्ही वाटोन घ्यावें ॥
बरें वाईट सोसावें । समुदायाचें ॥ २ ॥
अपार असावें पाठांतर । सन्निध असावा विचार ॥
सदां सर्वदां तत्पर ॥ परोपकारासी ॥ ३ ॥
आधींच शिकोन जो शिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी ॥
गुंतल्या लोकांस उगवी । विवेकबळें ॥ ४ ॥
बहुतिं शोधोनि पाहिलें । बहुतांच्या मनास आलें ॥
तरि मग जाणावें साधिलें । महत्कृत्य ॥ ५ ॥
अखंड एकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा ॥
काळ सार्थकचि करावा । जनासहित ॥ ६ ॥

आधीं कष्ट मग सुफळ । कष्टचि नाहीं तें निर्फळ ॥
साक्षपेंविण केवळ । वृथा पुष्ट ॥ ७ ॥
लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे ॥
जाण जाणो धरावे । जवळीं दूरी ॥ ८ ॥
अधिकारपरत्वें कार्य होतें । अधिकार नसतां व्यर्थ जातें ॥
जाणोन शोधावीं चित्तें । नानाप्रकारें ॥ ९ ॥
अधिकार पाहोनि कार्य सांगणें । साक्षेप पाहोन विश्वास धरणें ॥
आपला मगज राखणें । कांहीं तरीं ॥ १० ॥
बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें ॥
मना सारिखेंच असावें । सकळ कांहीं ॥ ११ ॥
ऐसें आहे मनोगत । परी ते कांहींच न होत ॥
बरें करितां अकस्मात । वाईट होतें ॥ १२ ॥
एक सुखी एक दुःखी । प्रत्यक्ष वर्तते लोकीं ॥
कष्टी होउनियां सेखीं । प्रारब्धावरि घालिती ॥ १३ ॥
अचुक यत्न करवेना । म्हणोन केलें ते समजेना ॥
आपला अवगुण जाणवेना । कांहीं केल्या ॥ १४ ॥
जो आपला आपण नेणे । तो दुसऱ्याचें काय जाणे ॥
न्याय सोडितां दैन्यवाणें । होती लोक ॥ १५ ॥
लोकांचें मनोगत कळेना । लोकांसारिखें वर्तवेना ॥
मूर्खपणें लोकीं नाना । कलह उठती ॥ १६ ॥
मग ते कलह वाढती । परस्परें कष्टी होती ॥
प्रयत्न राहतां अंतीं । श्रमचि होये ॥ १७ ॥
ऐसी नव्हे वर्तणुक । परिक्षावे नाना लोक ॥
समजलें पाहिजे नेमक । ज्याचे त्यापरी ॥ १८ ॥
दुसऱ्यास शब्द ठेवणें । आपला कैंपक्ष घेणें ॥
पाहों जातां लौकिकलक्षणें । बहुतेक ऐसीं ॥ १९ ॥

लोकिं बरें म्हणायाकारणें । भल्यास लागतें सोसणें ॥
न सोसितां भंडवाणें । सहजाचि होये ॥ २० ॥
बोलतो खरें चालतो खरें । त्यास मिळती लहान थोर ॥
न्याय अन्याय परस्परें । सहजचि कळे ॥ २१ ॥
जंवरी चंदन झिजेना । तंवरी तो सुगंध कळेना ॥
चंदन आणि वृक्ष नाना । सगट होती ॥ २२ ॥
जंव उत्तम गुण न कळे । तों या जनास काय कळे ॥
उत्तम गुण देखतां निवलें । जगदांतर ॥ २३ ॥
पेरिलें तें उगवतें । उसनें द्यावें घ्यावें लागतें ॥
वर्म काढितां भंगतें । परांतर ॥ २४ ॥
लौकिक बरेंपण केलें । तेणें सौख्य वाढलें ॥
उत्तरासारिखें आलें । प्रत्योत्तर ॥ २५ ॥
हें अवघें आपणापासीं । येथें बोल नाहीं जनासी ॥
शिकवावें आपुल्या मनासी । क्षणक्षणीं ॥ २६ ॥
खळ दुर्जन भेटला । क्षमेचा धीर बुडाला ॥
तरी मौन्येंचि स्थळ-त्याग केला । पाहिजे साधकें ॥ २७ ॥
लोक नाना परिक्षा जाणिती । परि अंतर परिक्षा नेणती ॥
तेणें प्राणी करंटे होती । संदेह नाहीं ॥ २८ ॥
थोर लहान समान । आपलेसारिखे सकळ जन ॥
चढतें वाढतें समाधान । करितां बरें ॥ २९ ॥

---

जैसें बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें ॥
मग महंत-लीला स्वभावें । आंगीं बाणे ॥ १ ॥
आपण यथेष्ट जेवणें । उरलें अन्न तें वाटणें ॥
परंतु वायां दवडणें । हा धर्म नव्हे ॥ २ ॥

तैसें ज्ञानीं तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनांस सांगावें ॥
तरि तें बुडों न द्यावें । बुडतयासीं ॥ ३ ॥
उत्तम गुण ते स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे ॥
वर्तल्यावीण बोलावें । ते शब्द मिथ्या ॥ ४ ॥
शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कायास यावें ॥
उणें पडों न द्यावें । कोण्ही एकाचें ॥ ५ ॥
अडलें गांजलें जाणावें । यथाशक्ति कामास यावें ॥
मृदुवचन बोलत जावें । कोण्ही येकासीं ॥ ६ ॥
दुसऱ्याचे दुःखीं दुःखी व्हावें । परसंतोषें सुखी व्हावें ॥
प्राणिमात्रास मेळउनि घ्यावें । एक्या शब्दें ॥ ७ ॥
बहुतांचे अन्याय क्षमावे । बहुतांचे कार्यभाग करावे ॥
आपल्या परी व्हावें । पारिखे जन ॥ ८ ॥
नेमकेंचि बोलावें । तात्काळचि प्रतिवचन द्यावें ॥
कदापि रागासिं न यावें । क्षमारूपें ॥ ९ ॥
उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा ॥
सावधपणें करीत जावा । संसार आपुला ॥ १० ॥
मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीसी सादर व्हावें ॥
मरोन कीर्तीस उरवावें । येणें प्रकारें ॥ ११ ॥
नेमकेपणें वर्तों लागला । तो बहुतांस कळों आला ॥
सर्व आर्जवी तयाला । काय उणें ॥ १२ ॥
ऐसा उत्तम गुणविशेष । तयास म्हणावें पुरुष ॥
जयाच्या भजनें जगदीश । तृप्त होये ॥ १३ ॥
उदंड धिःकारून बोलती । तरी चळों न द्यावी शांती ॥
दुर्जनासी मिळोन जाती । धन्य ते साधु ॥ १४ ॥
कीर्ति पाहों जातां सुख नाहीं । सुख पहातां कीर्ति नाहीं ॥
विचारेंविण कोठेंचि नाहीं । समाधान ॥ १५ ॥

आपले अथवा परावें । कार्य अवघेंचि करावें ॥
प्रसंगीं कामास चुकावें । हें विहित नव्हे ॥ १६ ॥
बरें बोलतां सुख वाटतें । हें तों प्रत्यक्ष कळतें ॥
आत्मवत् परावेतें । मानीत जावें ॥ १७ ॥
कठिण शब्दें वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें ॥
तर मग वाईट बोलावें तें । काय निमित्य ॥ १८ ॥
पेरिलें तें उगवतें । बोलायासारिखें उत्तर येतें ॥
तरी मग कर्कश बोलावें तें । काय निमित्य ॥ १९ ॥
आपुल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ।
परंतु कष्टी करावें । ही राक्षसी क्रिया ॥ २० ॥
दंभ दर्प आणि अभिमान । क्रोध आणि कठीण वचन ॥
हें अज्ञानाचें लक्षण । भगवद्गीतेंत बोलिलें ॥ २१ ॥
जो उत्तमगुणें शोभला । तोचि पुरुष महाभला ॥
कित्येक लोक तयाला । शोधित फिरती ॥ २२ ॥
मनापासुन भक्ति करणें । उत्तम गुण आगत्य धरणें ॥
तया महापुरुषाकारणें । धुंडित येती ॥ २३ ॥
ऐसा जो महानुभाव । तेणें करावा समुदाव ॥
भक्ति-योगें देवाधिदेव । अपुला करावा ॥ २४ ॥
जेणें बहुतांस घडे भक्ति । ते हे रोकडी प्रबोधशक्ति ॥
बहुतांचें मनोगत हातिं । घेतलें पाहिजे ॥ २५ ॥
बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करूनि बोलणें ॥
तयांचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥ २६ ॥
जे जनासीं मानेना । तें आपुलें नये मना ॥
आपण येकला नाना । सृष्टिमध्यें ॥ २७ ॥
म्हणोन सांगाती असावे । मानत मानत शिष्य करावे ॥
हळुहळु शेवटा न्यावें । विवेकानें ॥ २८ ॥

पोटिं चिंता धरूं नये । कष्टें खेद मानूं नये ॥
धिःकारितां झुरों नये। कदा काळीं ॥ २९ ॥
नित्य नेम सांडूं नये । अभ्यास बुडों देऊं नये ॥
परतंत्र होऊं नये । कांहीं केल्या ॥ ३० ॥
स्वतंत्रता मोडूं नये । निरापेक्षा तोडूं नये ॥
परापेक्षा होऊं नये । क्षणक्षणा ॥ ३१ ॥
अनर्गळता धरूं नये । लोकनिंद्य तें करूं नये ॥
कोठें तन्हि होऊं नये । आसक्त कदा ॥ ३२ ॥
कठिण शब्द बोलों नये । कठिण आज्ञा करूं नये ॥
कठिणता धरूं नये । कोणेविशीं ॥ ३३ ॥
नीच कृती लाजों नये । वैभव होतां माजों नये ॥
क्रोधें भरीं भरों नये । जाणपणें ॥ ३४ ॥
थोरपणें चुकों नये । न्याय नीति सांडूं नये ।
अप्रमाण वर्तों नये । कांहीं केल्या ॥ ३५ ॥
संशयात्मक बोलों नये । बहुत निश्चय करूं नये ॥
निर्वाहेविण धरूं नये । ग्रंथ हातीं ॥ ३६ ॥
नेणपण सांडूं नये । महंतपण सोडूं नये ॥
द्रव्यासाठीं हिंडों नये । हरि–कीर्तन करीत ॥ ३७ ॥
निस्पृह वक्तृत्व सांडूं नये । आशंका घेतां भांडों नये ॥
श्रोतयाचा मानूं नये । वीट कदा ॥ ३८ ॥

---

अवगुण सोडितां जाति । उत्तम अभ्यासितां येती ॥
कुविद्या सांडुनि अभ्यासिती । शहाणे विद्या ॥ १ ॥
मूर्खपण सांडितां जातें । शहाणपण शिकतां येतें ॥
कारभार करितां उमजतें । कोण्हिएक ॥ २ ॥

ऐसी प्रचीत येते मना। तरी स्वहित कां कराना ॥
सन्मार्गें चालतां जना। सज्जना मानें ॥ ३ ॥
न्यायें वर्तेल तो शहाणा। अन्यायी तो दैन्यवाणा ॥
नाना चातुर्यांच्या खुणा। चतुर जाणे ॥ ४ ॥
समाधानें समाधान वाढे। मैत्रीनें मैत्री जडे ॥
मोडितां क्षणमात्रें मोडे। बरवेंपण ॥ ५ ॥
लौकिकीं कार्यभाग आवडे। तो कार्य-भाग येथें घडे ॥
लोक सहजचि वोढे। कामासाठीं ॥ ६ ॥
म्हणोन दुसऱ्यास सुखी करावें। तेणें आपण सुखी व्हावें ॥
दुसऱ्यास कष्टवितां कष्टावें। लागेल स्वयें ॥ ७ ॥
आपण एकाकी एकला। सृष्टित भांडत चालला ॥
बहुतांमध्यें एकल्याला। यश कैंचें ॥ ८ ॥
शहाण्यास कोण्हि तरि बाहाती। मूर्खास लोक दवडून देती ॥
जिवास आवडे संपत्ति। तरि शाहाणे व्हावें ॥ ९ ॥
अहो या शहाणपणाकारणें। बहुतांचे कष्ट करणें ॥
परंतु शाहाणपण शिकणें। हें उत्तमोत्तम ॥ १० ॥
जो बहुतांस मानला। तो जाणावा शहाणा झाला ॥
जनीं शहाण्या मनुष्याला। काय उणें ॥ ११ ॥
आपलें हित न करी लौकिकीं। तो जाणावा आत्मघातकी ॥
त्या मूर्खायेवढा पातकी। आणीक नाहीं ॥ १२ ॥
वेडे करावे शाहाणे। तरीच जिणें श्लाघ्यवाणें ॥
उगेंच वादांग वाढवणें। हें मूर्खपण ॥ १३ ॥
जेथें नाहीं सारासार। तेथें अवघा अंधःकार ॥
नाना परिक्षेचे विचार। राहिले तेथें ॥ १४ ॥

---

# भगवद्गीतासार-धर्मरहस्य.

## ईश्वराचें स्वरूप त्याची कृती व त्याच्या भक्तीचा महिमा.

अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ १ ॥
अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥ २ ॥
यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ३ ॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ४ ॥
ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्यः पार्थ सर्वशः ॥ ५ ॥
न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा ।
इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते ॥ ६ ॥
यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥ ७ ॥
अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः ।
परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम् ॥ ८ ॥
नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः ।
मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥ ९ ॥

वेदाहं समतीतानि वर्त्तमानानि चार्जुन ।
भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ॥ १० ॥
मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ।
मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ॥ ११ ॥
अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ।
परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ॥ १२ ॥
समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥ १३ ॥
अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्त्तते ।
इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः ॥ १४ ॥
न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः ।
यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥ १५ ॥
सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ॥ १६ ॥
उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥१७ ॥
यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ।
अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥ १८ ॥
अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥ १९ ॥
मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् ।
नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः ॥ २० ॥
अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् ।
यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥ २१ ॥
अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ २२ ॥

अपिचेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥ २३ ॥
क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति ।
कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥ २४ ॥
मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥ २५ ॥
मय्यावेश्य मनो ये मां । नित्ययुक्ता उपासते ॥
श्रद्धया परयोपेता । स्तेमे युक्ततमा मताः ॥ २६ ॥
सन्नियम्येन्द्रियग्रामं । सर्वत्र समबुद्धयः ॥
ते प्राप्नुवन्ति मामेव । सर्वभूतहिते रताः ॥ २७ ॥
ये तु सर्वाणि कर्माणि । मयि संन्यस्य मत्पराः ॥
अनन्येनैव योगेन । मां ध्यायन्त उपासते ॥ २८ ॥
तेषामहं समुद्धर्ता । मृत्युसंसारसागरात् ॥
भवामि न चिरात्पार्थ । मय्यावेशितचेतसाम् ॥ २९ ॥
अद्वेष्टा सर्वभूतानाम् । मैत्रः करूण एवच ॥
निर्ममो निरहंकारः । समदुःखसुखः क्षमी ॥ ३० ॥
सन्तुष्टः सततं योगी । यतात्मा दृढनिश्चयः ॥
मय्यर्पितमनोबुद्धि । र्यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ ३१ ॥
यस्मान्नोद्विजते लोको । लोकान्नोद्विजते च यः ॥
हर्षामर्षभयोद्वेगै । र्मुक्तो यः स च मे प्रियः ॥ ३२ ॥
समः शत्रौ च मित्रे च । तथा मानापमानयोः ॥
शीतोष्णसुखदुःखेषु । समः संगविवर्जितः ॥ ३३ ॥
ये तु धर्म्यामृतमिदं । यथोक्तं पर्युपासते ॥
श्रद्दधाना मत्परमा । भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥ ३४ ॥
यो मामेवमसंमूढो । जानाति पुरुषोत्तमम् ॥
स सर्वविद्भजति मां । सर्वभावेन भारत ॥ ३५ ॥

सर्वकर्माण्यपि सदा । कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ॥
मत्प्रसादादवाप्नोति । शाश्वतं पदमव्ययम् ॥ ३६ ॥
ईश्वरः सर्वभूतानां । हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ॥
भ्रामयन्सर्वभूतानि । यंत्रारूढानि मायया ॥ ३७ ॥
तमेव शरणं गच्छ । सर्वभावेन भारत ॥
तत्प्रसादात्परां शान्ति । स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥ ३८ ॥
सर्वधर्मान्परित्यज्य । मामेकं शरणं व्रज ॥
अहं त्वा सर्वपापेभ्यो । मोक्षयिष्यामि माशुचः ॥ ३९ ॥
य इदं परमं गुह्यं । मद्भक्तेष्वभिधास्यति ॥
भक्तिं मयि परां कृत्वा । मामेवैष्यत्यसंशयः ॥ ४० ॥

---

## २ आत्म्याचें स्वरूप.

य एनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम् ॥
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥ १ ॥
न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः॥
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे २॥
वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृण्हाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ३
नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥ ४ ॥
अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥ ५ ॥

---

## ३ कार्याकार्य व त्याचें फल.

आशापाशशतैर्बद्धाः । कामक्रोधपरायणाः ॥
ईहन्ते कामभोगार्थ । मन्यायेनार्थसंचयान् ॥ १ ॥
इदमद्य मया लब्ध । मिमं प्राप्स्ये मनोरथम् ॥
इदमस्तीदमपि मे । भविष्यति पुनर्धनम् ॥ २ ॥
असौ मया हतः शत्रु । र्हनिष्ये चापरानपि ॥
ईश्वरोऽहमहं भोगी । सिद्धोऽहं बलवान्सुखी ॥ ३ ॥
आढ्योऽभिजनवानस्मि । कोऽन्योऽस्ति सदृशो मया ॥
यक्षे दास्यामि मोदिष्य । इत्यज्ञानविमोहिताः ॥ ४ ॥
अनेकचित्तविभ्रान्ता । मोहजालसमावृताः ॥
प्रसक्ताः कामभोगेषु । पतन्ति नरकेऽशुचौ ॥ ५ ॥
त्रिविधं नरकस्येदं । द्वारं नाशनमात्मनः ॥
कामः क्रोधस्तथा लोभ । स्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥ ६ ॥
अनुद्वेगकरं वाक्यं । सत्यं प्रियहितं च यत् ॥
स्वाध्यायाभ्यासनं चैव । वाङ्मयं तप उच्यते ॥ ७ ॥
मनःप्रसादः सौम्यत्वं ॥ मौनमात्मविनिग्रहः ॥
भावसंशुद्धिरित्येत । त्तपो मानसमुच्यते ॥ ८ ॥
दातव्यमिति यद्दानं । दीयतेऽनुपकारिणे ॥
देशे काले च पात्रे च । तद्दानं सात्त्विकं स्मृतम् ॥ ९ ॥
यत्तु प्रत्युपकारार्थं । फलमुद्दिश्य वा पुनः ॥
दीयते च परिक्लिष्टं । तद्दानं राजसं स्मृतम् ॥ १० ॥
अदेशकाले यद्दान । मपात्रेभ्यश्च दीयते ॥
असत्कृतमवज्ञातं । तत्तामसमुदाहृतम् ॥ ११ ॥
सर्वभूतेषु येनैकं । भावमव्ययमीक्षते ॥
अविभक्तं विभक्तेषु । तद्ज्ञानं विद्धि सात्विकम् ॥ १२ ॥

नियतं संगरहित । मरागद्वेषतः कृतम् ॥
अफलप्रेप्सुना कर्म । यत्तत्सात्विकमुच्यते ॥ १३ ॥
यत्तुकामेप्सुना कर्म । साहंकारेण वा पुनः ॥
क्रियते बहुलायासं । तद्राजसमुदाहृतम् ॥ १४ ॥
अनुबंधं क्षयं हिंसा । मनपेक्ष्य च पौरूषम् ॥
मोहादारभ्यते कर्म । यत्तत्तामसमुच्यते ॥ १५ ॥
प्रवृत्तिं च निवृत्तिं च । कार्याकार्ये भयाभये ॥
बन्धं मोक्षञ्च या वेत्ति । बुद्धिः सा पार्थ सात्विकी ॥ १६ ॥
यया धर्ममधर्मंच । कार्यं चाकार्यमेव वा ॥
अयथावत्प्रजानाति । बुद्धिः सा पार्थ राजसी ॥ १७ ॥
अधर्मं धर्ममिति या । मन्यते तमसावृता ॥
सर्वार्थान् विपरीतांश्च । बुद्धिः सा पार्थ तामसी ॥ १८ ॥
धृत्या यया धारयते । मनः प्राणेन्द्रियक्रियाः ॥
योगेनाऽव्यभिचारिण्या । धृतिः सा पार्थ सात्विकी ॥ १९ ॥
यया तु धर्मकामार्थान् । धृत्या धारयतेऽर्जुन ॥
प्रसंगेन फलाकांक्षी । धृतिः सा पार्थ राजसी ॥ २० ॥
यया स्वप्नं भयं शोकं । विषादं मदमेव च ॥
न विमुञ्चति दुर्मेधा । धृतिः सा पार्थ तामसी ॥ २१ ॥
सुखं त्विदानीं त्रिविधं । श्रुणु मे भरतर्षभ ॥
अभ्यासाद्रमते यत्र दुःखान्तं च निगच्छति ॥ २२ ॥
यत्तदग्रे विषमिव । परिणामेऽमृतोपमम् ॥
तत्सुखं सात्विकं प्रोक्त । मात्मबुद्धिप्रसादजम् ॥ २३ ॥
विषयेन्द्रियसंयोगा । द्यत्तदग्रेऽमृतोपमम् ॥
परिणामे विषमिव । तत्सुखं राजसं स्मृतम् ॥ २४ ॥
यदग्रे चानुबन्धे च । सुखं मोहनमात्मनः ॥
निद्रालस्यप्रमादोत्थं । तत्तामसमुदाहृतम् ॥ २५ ॥

देहिनोऽस्मिन् यथा देहे कौमारं यौवनं जरा ॥
तथा देहांतरप्राप्ति र्धीरस्तत्र न मुह्यति ॥ २६ ॥
कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदा च न ॥
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥ २७ ॥
कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ॥
जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयम् ॥ २८ ॥
ध्यायतो विषयान्पुंसः । संगस्तेषूपजायते ॥
संगात्संजायते कामः । कामात्क्रोधोऽभिजायते ॥ २९ ॥
क्रोधाद्भवति संमोहः । संमोहात्स्मृतिविभ्रमः ॥
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो । बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ३० ॥
रागद्वेषवियुक्तैस्तु । विषयानिन्द्रियैश्चरन् ॥
आत्मवश्यैर्विधेयात्मा । प्रसादमधिगच्छति ॥ ३१ ॥
प्रसादे सर्वदुःखानां । हानिरस्योपजायते ॥
प्रसन्नचेतसो ह्याशु । बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥ ३२ ॥
नास्ति बुद्धिरयुक्तस्य । नचायुक्तस्य भावना ॥
न च भावयतः शान्ति । रशांतस्य कुतः सुखम् ॥ ३३ ॥
तस्मादसक्तः सततं । कार्यं कर्म समाचर ॥
असक्तो ह्याचरन् कर्म । परमाप्नोति पूरुषः ॥ ३४ ॥
न बुद्धिभेदं जनये । दज्ञानां कर्मसंगिनाम् ॥
जोषयेत्सर्वकर्माणि । विद्वान्युक्तः समाचरन् ॥ ३५ ॥
ये मे मतमिदं नित्य । मनुतिष्ठन्ति मानवाः ॥
श्रद्धावन्तोऽनसूयन्तो । मुच्यन्ते तेऽपि कर्मभिः ॥ ३६ ॥
यस्य सर्वे समारम्भाः । कामसंकल्पवर्जिताः ।
ज्ञानाग्निदग्धकर्माणं । तमाहुः पंडितं बुधाः ॥ ३७ ॥
त्यक्त्वा कर्मफलासंगं । नित्यतृप्तो निराश्रयः ॥
कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि । नैवकिञ्चित्करोति सः ॥ ३८ ॥

निराशीर्यतचित्तात्मा । त्यक्तसर्वपरिग्रहः ॥
शारिरं केवलं कर्म । कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ ३९ ॥
यदृच्छालाभसन्तुष्टो । द्वन्द्वातीतो विमत्सरः ॥
समः सिद्धावसिद्धौ च । कृत्वापि न निबध्यते ॥ ४० ॥
न हि ज्ञानेन सदृशं । पवित्रमिह विद्यते ॥
तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मानि विन्दति ॥ ४१ ॥
श्रद्धावान्लभते ज्ञानं । तत्परः संयतेन्द्रियः ॥
ज्ञानं लब्ध्वा परां शान्ति । मचिरेणाधिगच्छति ॥ ४२ ॥
संकल्पप्रभवान्कामां । स्त्यक्त्वा सर्वानशेषतः ।
मनसैवेन्द्रियग्रामं । विनियम्य समन्ततः ॥ ४३ ॥
शनैः शनैरुपरमे । द्बुद्ध्या धृतिगृहीतया ।
आत्मसंस्थं मनः कृत्वा । न किञ्चिदपि चिंतयेत् ॥ ४४ ॥
यतो यतो निश्चरति । मनश्चञ्चलमस्थिरम् ।
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥ ४५ ॥
आत्मौपम्येन सर्वत्र ॥ समं पश्यति योऽर्जुन ॥
सुखं वा यदि वा दुःखं । स योगी परमो मतः ॥ ४६ ॥
श्रेयो हि ज्ञानमभ्यासात् । ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ॥
ध्यानात्कर्मफलत्याग । स्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥ ४७ ॥
इच्छा द्वेषः सुखं दुःखं । संघातश्चेतना धृतिः ॥
एतत्क्षेत्रं समासेन । सविकारमुदाहृतम् ॥ ४८ ॥
अमानित्वमदम्भित्व । महिंसा क्षान्तिरार्जवम् ॥
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥ ४९ ॥
इंद्रियार्थेषु वैराग्य । मनहंकार एव च ॥
जन्ममृत्युजराव्याधि । दुःखदोषानुदर्शनम् ॥ ५० ॥
नित्यं च समचित्तत्व । मिष्टानिष्टोपपत्तिषु ॥
मयि चानन्ययोगेन । भक्तिरव्यभिचारिणी ॥ ५१ ॥

अध्यात्मज्ञाननित्यत्वं । तत्वज्ञानार्थदर्शनम् ॥
एतद्ज्ञानमिति प्रोक्त । मज्ञानं यदतोऽन्यथा ॥ ५२ ॥
समं सर्वेषु भूतेषु । तिष्ठन्तं परमेश्वरम् ॥
विनश्यत्स्वविनश्यन्तं । यः पश्यति स पश्यति ॥ ५३ ॥
समं पश्यन् हि सर्वत्र । समवस्थितमीश्वरम् ॥
न हिनस्त्यात्मनाऽऽत्मानं । ततो याति परां गतिम् ॥ ५४ ॥

---

### ४ ईश्वराचें स्तवन नित्य करावयाचें तेंः—

स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च ॥
रक्षांसि भीतानि दिशोऽद्रवन्ति सर्वे नमस्यन्ति च सिद्धसंघाः१
कस्माच्च ते न नमेरन्महात्मन् गरीयसे ब्रम्हणोऽप्यादिकर्त्रे ॥
अनन्त देवेश जगन्निवास त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ॥ २ ॥
त्वमादिदेवः पुरुषः पुराणस्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
वेत्तासि वेद्यं च परञ्च धाम त्वया ततं विश्वमनन्तरूप ॥३॥
वायुर्यमोग्निर्वरुणः शशाङ्कः प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ।
नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ४
नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ॥
अनन्त वीर्यामितविक्रमस्त्वं सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ५ ॥
पितासि लोकस्य चराचरस्य त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ॥
न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभावः६
तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ॥
पितेव पुत्रस्य सखेव सख्युः प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम्॥७

प्रकृत ग्रंथाशिवाय आणखी ग्रंथ केले आहेत तेः—

( १ ) **सृष्टपदार्थनियम आणि सुधारणा**–सृष्टपदार्थ नियमांच्या व्यापारापासून सुधारणेंत कोणते फेरफार होतात, हें समजावयास लागल्यापासून युरोपियन लोकांची सुधारणा झपाट्यानें चालू आहे. ह्या शास्त्राकडे जितकें लक्ष असावें तितकें नसल्यामुळें आमच्या लोकांच्या सुधारणेवर काय परिणाम झाला आहे वगैरे गोष्टींचें विवेचन ह्या पुस्तकांत केलें आहे. हें पुस्तक येथील व वराडच्या विद्याखात्याच्या अधिकाऱ्यांनीं पसंत केलें असून अनुक्रमें लायब्ररीकरतां व बक्षिसाकरतां मंजूर केलें आहे. गुजराथेंतील व्हर्न्याक्युलर सोसायटी व श्री० गायकवाडसरकार ह्यांच्या आश्रयानें ह्या पुस्तकाचें भाषांतर गुजराथी भाषेंत रा० सा० परमानंद भोलाभाई पारेख फर्स्ट क्लास मुनसफ आणि स्पेशल माजिस्ट्रेट सिद्धपूर प्रांत कडी ह्यांनीं केलें आहे. कोल्हापूर व बडोदे येथील कमिटीनें हें पुस्तक पसंत केल्यावरून उभयता संस्थानांतून ह्या पुस्तकास आश्रय मिळाला आहे. दक्षिणा प्राईज कमिटीकडे हें पुस्तक पाठविण्यांत आलें होतें. ह्या कमिटीनें पुस्तक पसंत करून त्याबद्दल २५० रुपये बक्षिस दिलें आहे. कमिटीच्या विद्वान सभासदांचे अभिप्राय येणेंप्रमाणेंः—

Mr. Hatvalne in his preface says that the European nations have made rapid strides in civilization since they came to understand the operations of Physical laws. He then tries to impress on the readers the importance of the study of Physics.

He has offered this book, therefore, to create in them a taste for this subject and science generally, to explain to the people how physical laws shape the condition of man and the different stages of civilization he is in.

Mr. Hatvalne has furnished bare facts of history and his inferences and conclusions, are, I may say, generally sound and logical, though there may be some slight exceptions and deviations. It appears on perusal of the book, especially the foot-notes, that he has studied the subject with considerable care and has handed it in a masterly manner. It will be seen that he has consulted about fifty authors on this subject. But his main authority seems to be Buckle's History of Civilization. Political Economy and Physics are subjects prescribed for the curriculum of the Training Colleges and the study of such a book in connection with both these subjects would be most useful and salutary. It will encourage and call into full play the thinking powers of the young men attending the Training Colleges, and I would strongly recommend that there being no such book published hitherto in Marathi within my hearing, Mr. Hatvalne's labours be liberally rewarded and his book published departmentally. The several members of the Book Committee and especially Mr. Sohoni will, I hope, bear me out in my recommendation.

(Sd.) N. B. GODBOLE,

Ag. Marathi Translator, E.D.,

and

Secretary Dakshina Prize Committee.

---

I have read with great interest and satisfaction the work under report and agree generally with the Secretary in his commendation of the author's

hard work in connection with it. The essay is a very popular adaptation of Mr. Buckle's History of Civilization Chapter 2, Vol. 1, which treats of the influences exercised by physical laws or agents upon the organization of Civil Society and individual character. The author has not confined himself to Mr. Buckle's work, but has made free and intelligent use of Guizot's History of Civilization, Draper's Intellectual Development of Europe, Polar World, Tropical World, Humbolt's Cosmos, Smith's Wealth of Nations, Mill's and Fawcett's Political Economy, several histories of India, Smith's Philosophy of Health, Wonders of the World, Robertson's History of America and many other works. This is indication of much good work. The style for the most part is easy and the idiom correct. In the account given by the author of the Indian Civilization, he has shown much original research and independence. I think the work under report being almost the first of its sort, and indicating as it does much reading and work is certainly deserving of the Committee's patronage and I would award Rs. 250 to the author.

22—1—88. ( Sd. ) M. G. RANADE.

---

I have looked into Mr. Hatvalne's Book on 'सृष्टपदार्थविषयक नियमांचे व्यापारापासून सुधारणेंत होणारे फेरफार,' The subject is important. The investigation of the subject—what civilization is and how it can be developed has an important bearing on India, especially now when large and civilizing agencies are acting on and modifying the conditions of Indian life......Mr. Hatvalne's style is good. That he has laboured hard for collecting information is evident from his book. I, therefore, concur with the Secretary in his recommendation and believe that Rs. 250 be awarded to Mr. Hatvalne.

28—1—88 ( Sd. ) M. M. KUNTE.

I have read the Manuscript with interest. The subject which Mr. Hatvalne has taken up is yet new to native writers.....He has collected his information from great authors and has rendered it into Marathi in a clear and simple sty le, and I vote for a reward of Rs. 250 being paid.

7—2—88 ( Sd. ) N. B. DANDEKAR.

I have been able to read only the section on India. But even from that I feel myself in a position to state that this is one of the best books I have seen written in Marathi. Its general spirit is thoughtful. What the author says of the civilization of India is mostly true......I am decidedly of opinion that a prize of Rs. 250 should be awarded to the author.

(Sd.) R. G. BHANDARKAR.

दक्षिणाप्राईज कमिटीच्या सभासदांशिवाय आणखी कांहीं विद्वान गृहस्थांकडे हें पुस्तक पाठविण्यांत आलें होतें, त्यांपैकीं कांहींचे अभिप्राय पुढें दिले आहेत.

I congratulate you on the successful treatment of the subject. I am glad to see you have supplemented Mr. Buckle's account with information derived from other books. I liked very much your quotations from Max-Muller's book and Tod's Rajasthan. I have no doubt it ( book ) is a valuable addition to Marathi literature. I am glad to see that the Daxina Prize Committee has appreciated your book.

( Sd. ) VISHNU M. MAHAJANI.

Akola, 13th June 1890.

Those who will read Mr. Hatvane's adaptation of Mr. Buckle's chapter on the influence of physical laws on civilization, so rich in original effort and so acceptable in general style will feel per-

suaded that it is a work deserving of all possible encouragement and very wide sale.
Maratha 3rd Aug. 1890.

( Thoughts on present discontent. )

The author has made a good use of information collected from standard works such as Guizot's history of civilization, Draper's Intellectual Developement of Europe, Humbolt's Cosmos, Mill's Political Economy &c. produced a thoughtful work which is really a valuable addition to Marathi Literature.

Reporter on the Native Press.
( Catalogue of Books Quarterly ending
31st March 1890. )

I have not been able to go through the whole book. But from what I have been able to read, I have no hesitation in saying, the work does you great credit. I fully endorse what the *Kesari* said of it, and regard your work as a substantial addition to Marathi Literature. Your serious and sustained intellectual effort is the more welcome now that the energy of our young men seems to have been lost in the production of second and third rate dramas and novels.

The Daxina Prize Committee does not seem to have rewarded you adequately, although they have been lavish in their praise of your work.

( Sd. ) Krishnaji Parsharam Gadgil.

पुस्तकाच्या नांवावरून हा ग्रंथ शास्त्रीय आहे हें कळून येईलच. ह्या भागांतील प्रत्येक विषय उपयुक्त आणि बोधपर आहे. त्यांतून हिंदुस्थानाविषयींचा भाग तर प्रत्येकानें अवश्य वाचून त्याचें मनःपूर्वक मनन करावें अशा योग्यतेचा आहे. भाषा फार सोपी, साधी आणि चटकदार आहे. अशा प्रकारची ग्रंथरचना प्रो॰ भांडारकरांच्या म्हणण्याप्रमाणें मराठींत होत जावी, हें फार इष्ट व जरूर

आहे. नानातऱ्हेचीं पुस्तकें वाचून त्यांचे एके ठिकाणीं सार प्रस्तुतच्या पुस्तकांत भरलें आहे म्हणण्यास हरकत नाहीं. विषयाची मांडणी अगदीं बाळबोध, भाषा सोपी, ग्रंथ उपयुक्त, इतक्या गोष्टी एकत्र असल्यावर त्या ग्रंथाची योग्यता काय वर्णावयाची आहे ? प्रस्तुतचें पुस्तक प्रत्येक भाषाभिमान्यानें अवश्य जवळ बाळगण्याजोगें आहे. परंतु कोंब्याचे बाजारांत सोन्याला विचारणार कोण ? कल्पित भाकड कथा आणि विचकट प्रहसनें वाचणारांस ह्या ग्रंथाची योग्यता कोंबड्यास रत्न गवसलें, तेव्हां त्यास त्याची जितकी वाटली तितकीच वाटेल अशी भीति आहे.

**केसरी**, तारीख ७ जानेवारी १८९०.

पुस्तकांत ठिकठिकाणीं मुळांत किंवा टीपांच्या रूपानें पुष्कळ उपयुक्त माहिती दिली आहे, व एकंदरींत पुस्तक लिहितांना ग्रंथकर्त्यांनें पुष्कळ परिश्रम केलेले दिसतात. त्याचप्रमाणें ग्रंथाची भाषाही आपल्याकडून होईल तितकी सरळ व सोपी करण्याचा ग्रंथकारांनीं प्रयत्न केला आहे; व पुस्तकांत दिलेल्या शास्त्रीय माहितीच्या मानानें पाहतां ती पुष्कळ सिद्धीस गेली आहे, ह्याबद्दल रा० रा० हतवळणे प्रशंसेस पात्र आहेत ... ... पुस्तक लिहिण्यापूर्वीं ग्रंथकारांनीं बराच विचारपूर्वक शोध केला असावा, हें जागोजाग दिलेल्या अवतरणांवरून व आधारांवरून उघड होतें. ... ... लोकांत वाचनाभिरुचि अजून हवी तशी उत्पन्न झाली नसल्यामुळें असल्या श्रमाचें व्हावें तसें चीज होत नाहीं हें खरें. ... ... प्रस्तुत ग्रंथकारांनीं तात्कालिक लाभाकडे दृष्टि न देतां आपलें कर्तव्य बजाविलें, ह्याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. त्याचप्रमाणें आर्यावर्तांतील प्राचीन सुधारणेविषयीं जे त्यांनीं विचार प्रगट केले आहेत तेही मनन करण्यासारखे आहेत, व कांहीं कांहीं मुद्दे मार्मिक आहेत. विशेषेंकरून एकीकडे जुन्या गोष्टींविषयीं वृथाभिमान व दुसरीकडे सकृद्दर्शनीं दिपवून टाकणाऱ्या पाश्चात्य सुधारणेची आवड ह्या दोहोंच्याही जाळ्यांत न सांपडतां त्यांनीं निःपक्षपातानें आपलें मत दिलें आहे व त्याचें साधार समर्थन केलें आहे, ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे.

**नेटिव ओपिनियन,** तारीख १३ एप्रिल १८९०.

रा० रा० हतवळणे ह्यांचा ग्रंथ एकंदरीनें आम्हास चांगला वाटतो, व हा ग्रंथ लिहून ग्रंथकर्त्यानें आपल्या भाषेची बरीच सेवा केली आहे, असाही आमचा अभिप्राय आहे......ह्या ग्रंथाची भाषा फारच चांगली आहे. ती साधी, पोक्त आणि सोपी आहे इतकेंच नाहीं, तर तिचे द्वारें प्रतिपादन केलेला विषय चांगला समजतो. या ग्रंथांत विनाकारण संस्कृत शब्दांचा ग्रंथकर्त्यांनीं भरणा केला नाहीं, म्हणून तो अल्प आयासानें समजण्यासारखा उतरला आहे. अलिसन, राबर्टसन, बकल, गिबन, मेकाले वगैरे नामांकित इतिहासकारांचे ग्रंथ वाचूं लागलें, म्हणजे त्यांत ठिकाठिकाणीं वक्तृत्व चांगलें दृष्टीस पडतें. त्याचप्रमाणें आमच्या ग्रंथकारांचे वार्णांत वक्तृत्वाचाही चांगला भास होतो......

प्रस्तुतचा ग्रंथ आस्थेनें लिहिला आहे. ग्रंथकारांनीं उद्योग व वाचन किती केलें आहे, स्वभाषेची सेवा करण्याची त्यांस किती हौस आहे, वगैरे चांगल्या गुणांचें हें पुस्तक दर्शक आहे. अशीं पुस्तकें आपल्या भाषेंत थोडीं आहेत. तेव्हां हें पुस्तक लिहून मि० हतवळणे ह्यांनीं आपल्या वेळाचा व बुद्धीचा सदुपयोग केला असें कोणीही कबूल करील.

**ज्ञानप्रकाश,** नोवेंबर व डिसेंबर १८९०.

---

वर जे अभिप्राय दिले त्यांवरून 'सृष्टपदार्थनियम आणि सुधारणा' ह्या पुस्तकांत सर्वच गुण आहेत, दोष मुळींच नाहींत, असें नाहीं. कांहीं ठिकाणीं पुनरुक्ती होऊन विस्तार जास्त झाला आहे; कांहीं ठिकाणीं माहिती अपुरी आहे, तींत बेजहाट, लिविंगस्टन, ब्राईस वगैरे ग्रंथकारांचे ग्रंथांतून माहिती घेऊन भर घालावयाची होती, वगैरे दोष कांहीं विद्वान मित्रांनीं व गृहस्थांनीं दाखविले आहेत व ते यथार्थ आहेत. दुसरी आवृत्ती काढण्याचा सुयोग आल्यास, ह्यांविषयीं विचार करण्याचें योजिलें आहे. ज्या मित्रांनीं व गृहस्थांनीं आश्रय दिला

किंवा सूचना केल्या त्यांचे त्याबद्दल येथें आभार मानणें अवश्य आहे.

(२) **सुशिक्षित स्त्री**—सर्व शिक्षणाचा पाया गृहशिक्षण आहे. हें चांगलें मिळण्यास स्त्रिया सुशिक्षित असाव्या लागतात. स्त्रिया सुशिक्षित असतां त्या कशा प्रकारें शिक्षण देतात व त्यांच्या शिक्षणापासून काय कार्यें होतात, हें ह्या पुस्तकावरून समजून येईल. हें पुस्तक मे० डायरेक्टर साहेब ( मुंबई ) ह्यांनीं बुककमिटीकडे अभिप्रायाकरितां पाठविलें होतें, व कमिटीच्या शिफारशीवरून लायब्ररीकरितां व बक्षिसांकरितां मंजूर झालें आहे. कमिटीच्या सभासदांचे अभिप्राय देतां येत नाहींत. सृष्टपदार्थ पुतस्काप्रमाणें ह्याही पुस्तकासंबंधानें अनुकूल अभिप्राय आहेत. ते स्थलसंकोचास्तव देतां येत नाहींत. फक्त एकच दिला आहे.

**सुशिक्षित स्त्री**—हा ग्रंथ रा० रा० हतवळणे ह्यांनीं केला. स्त्रियांच्या कर्तव्यांविषयीं ह्यांत विवेचन आहे. भाषा साधी, सोपी व शुद्ध असून कथानकही चटकदार आहे, तेव्हां महाराष्ट्रीयांस हें पुस्तक अवश्य आवडतें होईल. कुलस्त्रियांनीं तर हें पुस्तक वाचावेंच. त्यापासून त्यांना पुष्कळ फायदे होतील.

नीतिविषयक ग्रंथांचा भरणा आमच्या भाषेंत फारसा अगर मुळींच नसतो. ती उणीव दूर करण्याचें पुण्यप्रद श्रेय संपादण्यास रा० रा० हतवळणे पूर्ण लायक दिसतात.

**केसरी**, ता० १७ नवंबर १८९१.

वरील ग्रंथांत मुख्य दोष दाखविण्यांत आले आहेत ते:—एकदोन ठिकाणीं पाल्हाळ जास्त झाला आहे, तो कमी करणें; व मुख्य विषयाची फोड करून निरनिराळे भाग करणें. ह्या सूचना घेण्यासारख्या असून त्यांविषयीं दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं विचार करण्याचें योजिलें आहे.

( ३ ) **हिंदुस्थानांत एक भाषा झाल्यास कोणती होईल ?** हा विषय फारच वादग्रस्त आहे. एक भाषा होणें अवश्य आहे, परंतु तशी गोष्ट होणें शक्य नाहीं, असें कांहींचें म्हणणें आहे. कांहीं म्हणतात एक भाषा झाली, तर ती हिंदुस्थानी होईल. कांहींचें म्हणणें ती इंग्रजी होईल. माझा अभिप्राय ह्यांहून भिन्न आहे.

ह्या विषयाचे पोट भाग योजिले आहेत ते:—

( १ ) हिंदुस्थानांत सांप्रत कोणत्या भाषा कोठें प्रचलीत आहेत वगैरे गोष्टींविषयीं स्थूल विचार. २ एक भाषेच्या संबंधाचे आक्षेपाविषयीं सामान्य विचार. ३ एक भाषेची आवश्यकता व इष्टता. ४ अशी भाषा होण्याची संधी केव्हां केव्हां येऊन गेली. ५ हिंदुस्थानी किंवा इंग्रजी भाषा एक भाषा होईल कीं काय. ६ जर ह्यांतून एकीचाही एक भाषा होण्याचा संभव नाहीं, तर मग एक भाषा झालीच तर ती कोणती होणार. ह्यांपैकीं कांहीं भाग वर्तमानपत्रद्वारा प्रसिद्ध झाले आहेत व कांहींची चर्चा व्याख्यानाच्या रूपानें झाली आहे. हे निरनिराळे भाग पुस्तक रूपानें प्रसिद्ध झाले असतां लोकांस सोयकर होईल, अशी कांहीं मित्रांनीं सूचना केल्यावरून फक्त प्रथमचा भाग पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

वरील तीन पुस्तकांची किंमत १८१२, १,८४, अशी ठेविली होती, ती अनुक्रमें १८४, ८१२, ८३ अशी केली आहे. पोस्टेज शिवाय. हीं पुस्तकें व प्रस्तुतचें गृहशिक्षण पुस्तक आमच्यापाशीं ( सदाशिव पेठ घर नंबर ४४४ ) किंवा ज्ञानप्रकाश, आर्यभूषण व जगद्धितेच्छू छापखान्यांत विकत मिळतील.

पुणे, ता० १ जानेवारी सन १८९८.

शं० रा० ह०.